मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
( ठाणे जिल्हा वाचनालय ) वाचनालय / संदर्भ / नौपाडा
इति० ९९ सन १८८६
ले. बाळाजी प्र. मोडक
कोल्हापूर व कर्नाटक प्रांतातील
राज्ये व संस्थाने यांचा इतिहास

गोविंद महादेव दीक्षीत

# HISTORY OF KOLHAPUR & S. M. STATES

VOLUME II PART I

# HISTORY OF THE KOLHAPUR

# कोलापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास.

उत्तरार्ध. भाग १.

## कोलापूर राज्याचा इतिहास.

हा ग्रंथ

बाळाजी प्रभाकर मोडक

यांणीं

अनेक जुन्या लेखांच्या आधारें रचिला

तो

कोलापूर येथें

आर्यप्रबोध छापखान्यांत छापिला.

सन १८८६.

किंमत १॥ रुपया.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

ठाणे.

नं. M ५१
ता.
ग्रा गो.

# प्रस्तावना.

कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास या पुस्तकाचे दोन भाग पहिला व शेवटला, बरेच दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. नुकताच पूर्वार्धाचा दुसरा एक भाग ज्यांत विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास आहे तो प्रसिद्ध केला आहे. हल्लीं हा उत्तरार्धाचा पहिला भाग वाचकांपुढें ठेवीत आहे. यांत कोलापूर राज्याचा निम्मा इतिहास आला आहे. बाकी निम्मा इतिहास व कोलापूरच्या जाहागीर घराण्यांचा इतिहास दुसऱ्या एका भागांत येईल.

प्रारंभीं मेजर ग्रेहामसाहेबांच्या रिपोर्टाच्या शेवटीं जो थोडासा कोलापूर घराण्याचा इतिहास दिला आहे त्याचें भाषांतर करून छापावें असा संकल्प करून त्याचें भाषांतर तयार केलें. परंतु त्यानें समाधान न झाल्यामुळें तसेंच ठेविलें आणि जुनें कागदपत्र व बखरा मिळविण्यास यत्न करूं लागलों. परंतु कोठें कांहीं फारशी माहिती मिळेना. फार तर बुवासाहेब महाराजांच्या वेळची कांहीं माहिती सांगणारे मात्र आढळले. अस्सल मराठी तहनाम्यांच्या सुद्धां नकला मिळेनात. करवीर सरकारच्या दप्तरचे कागदपत्र पहाण्यास मिळाल्याशिवाय कोलापूर घराण्याचा खरा इतिहास रचतां येणार नाहीं, अशी खात्री होऊन, ते पहाण्यास परवानगी मिळावी एतद्विषयीं बरीच खटपट केली. परंतु ती सफल होण्याची आशा दिसेना. तेव्हां कोलापूरचा इतिहास रचण्याचें काम तसेंच ठेवून प्रथम पटवर्धन आदीकरून कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास प्रथम हातीं घेतला. कारण, पटवर्धनवगैरे कर्नाटकांतील सरदारांच्या घराण्यांच्या माहिती संबंधीं याद्या, बखरी व कागदपत्र तिकडून बरेच मिळाले, म्हणून तोच इतिहास प्रथम पुरा केला. शेवटीं येथें रीजन्सीची स्थापना झाल्यावर रावबहादूर यशवंत मोरेश्वर केळकर हे येथें अक्टिंग दिवाणाच्या कामावर असतां करवीर सरकारचे जुनें कागदपत्र पहाण्याची व त्यांच्या नकला घेण्याची परवानगी सुमारें चारवर्षांपूर्वी मिळाली. अशा प्रकारानुरूप दप्तरें पाहून कागदपत्रांच्या नकला घेण्याचें काम चालविलें.

नकला घेण्यास कारकून ठेवावा लागला. त्याचा खर्च कैलासवासी श्रीमंत आबासाहेब कागलकर यांनीं दिला. कोल्हापूर दफ्तरीं फार महत्वाचे व उपयोगी असे अनेक कागद आढळले. त्यांपैकीं कित्येकांच्या नकला पुस्तकाच्या शेवटीं दिल्या आहेत. कोल्हापूरचे पहिले शिवाजी महाराज यांची बखर व त्यांच कारकीर्दीची रोजनिशी असे दोन महत्वाचे कागद सांपडले. त्यांचा उपयोग फार झाला. कागदपत्र शिवाजी महाराजांच्या अखेरपर्यंत मात्र पाहिले. पुढील पहाण्यास अद्याप वेळ मिळाला नाहीं. असो, सदरहू कागदपत्रांवरून जरी प्रस्तुतचा इतिहास रचिला आहे तरी अगदीं पुरा झाला असें वाटेना म्हणून बरेच दिवस ज्यांस त्यांस वाचण्यास देऊन ज्या कित्येक गोष्टींविषयीं कागदपत्रांवरून समाधान झालें नाहीं, त्याविषयीं माहिती मिळवीत होतो. परंतु तसें करण्यापेक्षां तयार झालेला इतिहास छापून प्रसिद्ध केल्यानें अनेकांच्या पहाण्यांत येऊन आपोआप अधिक माहिती मिळेल व अनेक दोष कळतील असें वाटल्यावरून हल्लीं हा भाग शिळाछापानें छापून प्रसिद्ध केला आहे. तरी ज्यांच्या हातीं पुस्तक जाईल ते यांतील दोष कळवितील व जीं ठिकाणें संदिग्ध आहेत त्यांविषयी माहिती देतील अशी आशा आहे.

राजाराम कॉलेज कोल्हापूर
तारीख १४ एप्रिल १८८६.

बाळाजी प्रभाकर मोडक.

ता. ७३

# कोल्हापूर

प्रांताचा

# अर्वाचीन इतिहास.

कोल्हापूर प्रांत मराठ्यांचे स्वाधीन झाल्यापासून कोल्हापूरच्या संभाजी महाराजाच्या अखेरी पर्यंत

सन १६५९–१७६० पर्यंत.

सतराव्या शतकांत ज्यावेळीं महाराष्ट्रदेशांत **शिवाजी** मराठी राज्याचा स्थापक हळुहळू प्रबळ होत चालला, त्यावेळीं हा प्रांत विजापूरकरांचे ताब्यांत होता. विजापूरकरांचे पदरचा **रुस्तुमजमान** या सरदाराचे जहागिरींतील हा एक सुभा असून साक्षात् त्याच्या अमलाखालीं होता. परंतु पन्हाळा किल्ला फार बळकट व प्रसंगीं शत्रु आल्यास टिकाव धरण्याजोगा असल्यामुळें, विजापूरकर पन्हाळा व कोल्हापूर यांवर एक स्वतंत्र कामगार नेमीत असत.

जरी हा प्रांत मुसलमानांचे हातीं होता, तरी चोहोंकडे सर्व कामगार मुसलमान नव्हते. कारण निवडक फौजेंत अधिक विश्वसनीय म्हणून स्वजातीय मुसलमानच अवश्य ठेवावे लागत. मुख्य कामगार ही स्वजातीय असणें जरूर होतें. म्हणून ठांबठांबच्या ठाण्यांवर सर्वदा मुसलमान नेमण्यास सवड होत नसे. या मुळें या प्रांतांतील बहुतेक किल्ल्यांवर जे किल्लेदार असत ते बहुधा हिंदूच असत. हा प्रांत पुणें व सातारा ह्या प्रांतांसारिखा सह्याद्री नजीक असून येथें किल्लेही अनेक होते. त्यांत **पन्हाळा, पावनगड, विशाळगड** वगैरे कित्येक मजबुती विषयीं फार प्रख्यात होते. या करितां शिवाजीचे मनांत हा प्रांत हस्तगत करण्याचें फार दिवस होतें. शिवाजीचा शेवट पर्यंत बाणाच होता कीं, जें काम

युक्ती प्रयुक्तीनें होईल तेथें लढाई करावयाची नाही.

अफझुलखानाचें पारिपत्य सन १६५९चे अक्टोबर महिन्यांत केल्यावर **शिवाजी** नें पन्हाळ्याचे किल्लेदाराशीं बोलणें लाविलें. *तो हिंदू होता. हिंदू कामगारांना मुसलमान कोणत्या प्रकारें वागवीत असत हें प्रसिद्ध आहे. यामुळें तो किल्लेदारवश झाला, आणि किल्ला घेण्याची सर्व मसलत **ठरली**. इतक्यांत शिवाजीस शंका आली कीं, विजापूर सरकारानें आपणास हस्तगत करण्याकरितां कांहीं युक्ति योजिली असेल, तर सर्व फसेल. याकरितां **अण्णाजीदत्तो** यास मावळे लोकांची लहानशी टोळी देऊन पुढें पाठविलें, आणि आपण घोडेस्वार व पायदळ घेऊन प्रसंग येईल त्या प्रमाणें करण्याच्या बेतानें किल्ल्याच्या आसपास लपून राहिला.

अण्णाजीदत्तोनें सर्वबेत सिद्धीस नेला. पन्हाळा व पावनगड हस्तगत झाले; त्यासरसे शिवाजीनें **वसंत**गडावर एका एकीं छापा घालून तो किल्ला घेतला, व कृष्णानदीचे दोन्ही बाजूंचे प्रांतांत खंडणी चालू करून गडावर ठाणीं ही बसविलीं. या प्रमाणें बत्तीस शिराळ्यापर्यंत ठाणीं बसवुन परत पन्हाळ्यास आला. परत येतांच सह्याद्रीवरील व खालील सर्व आसपासचे किल्ले घेण्याच्या इराद्यानें मावळे लोकांच्या टोळ्या चोहोंकडे पाठविल्या; बहुतेक किल्ले लढाई न करितां लोकांनीं त्याच्या स्वाधीन केले. परंतु **रांगणा** व **खेळणा** हे दोन किल्ले युद्ध करून घ्यावे लागले. खेळणा किल्ला हस्तगत होण्यास बरेच प्रयास पडले; म्हणून त्या वेळीं त्यास शिवाजीनें **विशाळगड** हें नांव दिलें. हा सर्व मुलख शिवाजीनें दोन महिन्यांतच म्हणजे सन १६५९च्या डिसेंबर महिन्याचे आरंभींच काबीज केला.

शिवाजीनें कोल्हापूरप्रांत व त्यांतील किल्ले वगैरे सर्व घेतले, तरी हें वर्तमान विजापुरी पादशाहास कळे पर्यंत रुस्तु-

मजमान सुभेदार यानें शिवाजीस बिलकुल अडथळा केला नाहीं या वरून तो **शिवाजी** स भ्याला तरी असावा, किंवा इंग्रजलोक संशय घेतात तसें शिवाजीनें त्यास लांच देऊन त्याचें तोंड तरी बंद केलें असावें. शेवटीं पादशाहानें जेव्हां त्यास कोल्हापूरचे बंदोबस्तास जाण्यास आज्ञा केली, त्यावेळीं तीन हजार स्वार व थोडेंसें पायदळ घेऊन शिवाजीवर चालून आला. पन्हाळ्या जवळ येतांच शिवाजीनें आपले स्वार जमा करून त्याचा अगदीं पराभव केला, व त्यास कृष्णेच्या पलीकडे हांकून लाविलें. पुढें आपलें सर्व पायदळ विशाळगड येथें जमवून शिवाजी लुटीत व खंडणी घेत विजापुरा जवळ गेला; आणि तेथून अशात्वरेनें माघारा विशाळगडास आला कीं, त्याच्यामागें पाठलाग करण्यास कोणास पाठविण्यास पादशाहाला अवकाश मिळाला नाहीं.

हा शिवाजीची त्वरा, जिकडे जाईल तिकडे त्याचा जय, त्याच्या धुन्या, व त्याच्या प्राबल्याची दिवसानुदिवस वृद्धि हें सर्व पाहून विजापूरकरांस मोठें संकट पडलें. शहरीं शहरीं व गांवोगांवीं शिवाजीचें भय इतकें लोकांस वाटत असे कीं, कित्येक भुरटे मराठे ही लहानसहान गांवीं जाऊन त्याच्या नांवावर खंडणी घेत व लूट आणीत असत. लहानसहान मुसलमान सरदार शिवाजीवर चालून जाण्यास फार भीत असत. पादशाहाच्या दरबारी लोकांत जीं वैमनस्यें होतीं तीं मोडून सर्वांचें ऐक्य झालें, आणि शिवाजीचा मोड करण्यास काय युक्ति योजावी, याचा सर्व विचार करूं लागले. शेवटीं कर्नाटकांत **कर्नोळास** एक शूर **जोहार** नामें शिद्दी विख्यात पुरुष होता. त्याजबरोबर अफझुलखानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचें पारिपत्य करण्यास त्यास नेमिलें; त्यास **सलाबतखान** हा किताबही दिला. आपले पित्याचे मृत्यूचा सूड घेण्याच्या इच्छेनें **फझिल महमदखान**, अफझुलखानाचा पुत्र यानें ही जोहार

शिद्दी बरोबर लढाईस जाण्याचें आपण होऊन पत्करिलें. मोहिमेचा बेत असा ठरला कीं, घांटावरील पन्हाळावगैरे किल्ल्यावर शिद्दी जोहारानें चालून जावें. फत्तेरवान यानें, त्याच वेळीं शिवाजीनें कोकणांतील मुलुखावर हल्ला करावा. वाडीचे देशमुखांस, शिद्दी जोहारास लागेल ती कुमक करण्याविषयीं ही आज्ञा झाली.

शिवाजी लुटीत व खंडणी घेत जरी अगदीं विजापुरापर्यंत गेला, तरी विजापूर सरकारास वार्ताही नव्हती, इतका त्यांचा बंदोबस्त व राज्य व्यवस्था ढिली होती. परंतु शिवाजीचे हेर चोहोंकडे असत, त्यांनीं विजापूर दरबारची तयारी लागलीच शिवाजीस कळविली. हें शिवाजीस कळतांच त्यानें घांटा खालील व वरील सर्व मुलखाच्या बंदोबस्ता करितां जिकडे तिकडे योग्य लोक नेमिले. पन्हाळगड, असा मजबूत केला कीं, तो कोणाचेही हस्तगत होऊं नये व तेथेंच स्वतः आपण कडेकोट बंदोबस्तानें राहिला.

विजापूरकरांचें लष्कर येत असतांना वाटेनें त्यास कांहीं उपद्रव न करितां तसेंच येऊं दिलें परंतु किल्ल्याजवळ येऊन छावणी देतांच नेताजीपालकर याजबरोबर स्वार देऊन सभोंवतालचा मुलूख लुटून ओस पाडून त्याच्या एवढ्या मोठ्या सैन्यास धान्यादि मिळेनासें केलें, रात्रीं किल्ल्यांतून मावळेलोक वगैरे पाठवुन फौजेवर एकाएकीं वरचेवर छापे घालवी, या प्रमाणें त्यांस जेर केलें. तथापि जोहाराचें सैन्य फार होतें, त्यानें किल्ल्यास असा वेढा दिला कीं, आंतून बाहेर व बाहेरून आंत अगदीं कोणाचा शिरकाव होऊं नये; आणि फौजेस असा हुकूम फर्माविला कीं, कोणीही मराठा सांपडला कीं, त्यास जिवंत सोडूं नये. रात्रीं निराळे व दिवसास निराळे असे अधिकारी व फौज नेमून त्यास सर्वकाळ जागृत व हुषार ठेवण्याची तजवीज केली, व आपणही फार सावधगिरीनें राहून स्वतः स-

र्व फौजेवर देखरेख ठेवूं लागला. असा बंदोबस्त असल्यामु- ळें शिवाजीचें कांहीं चालेना; म्हणून त्यानें दम घेऊन उत्थ- ळपणानें गडबड न करितां उगाच तसाच कांहीं दिवस राहिला. अ- शा बंदोबस्तानें वेढा घालला असतां चार महिने लोटले. शिवा- जीचे एकाही हेराचा आंत शिरकाव होईना. यामुळें बाहेर काय चाललें आहे हें आंत कळेना. कोकणांत व सातारा पुण्याकडे कार्य वर्तमान झालें हें ही समजेना. या बद्दल तिकडे आ- पले बेत कसकसे सिद्धीस जातात याची बातमी लागेना. आप- ला पुढारी सन्निध असतां मराठ्यांचे हातून जसें कार्य होतें, व त्यांस जशी हुशारी असते तशी त्याच्या पश्चात् त्यांस नसते. त्या बद्दल शिवाजीस मोठी काळजी पडली. परंतु पन्हाळग- डांतून बाहेर जाण्यास इलाज नव्हता. युद्ध करून अशा मो- ठ्या सैन्याचा वेढा उठविण्यास लागावें, तर विनाकारण फार प्रा- णहानी होणार. या करितां कांहीं युक्ती प्रयुक्तीनें बाहेर नि- घण्याचा निश्चय त्यानें केला.

सिद्दी लोक वचनाचे प्रामाणिक या विषयीं अद्यापि म- राठे लोकांत प्रख्याति आहे. शिवाजीनें जोहारास असा नि- रोप पाठविला, कीं जर माझे जिवास भय नसेल, तर मी तहाचें बोलणें करावयास येतों. त्यानें अभय वचन मिळाल्यावर, थोडेसे लोक बरोबर घेऊन संध्याकाळचा थोडा दिवस उरला हो- ता त्या वेळीं, किल्ल्याखालीं येऊन शिवाजीनें, जोहार शिद्दीची त्याचे छावणींत भेट घेतली. दोघांचें तहाचे कलमाविषयीं बोलणें झालें. बहुतेक मोठीं कलमें बोलून, युक्तीनें कांहीं हलकीं कलमें राहिलीं तीं न संपवितां, आज संध्याकाळ झा- ला उद्यां बोलूं असें सांगून परत किल्ल्यावर गेला.

हें पाहून घेरा घालणारे लोकांस वाटलें, कीं आतां शि- वाजी युद्ध करीत नाहीं. किल्ला हस्तगत झालाच; आणि इ- तःपर फारशी डोळ्यांत तेल घालून सावधगिरी राखण्याचें का-

रण नाहीं, हा त्यांचा बेसावधपणा पाहून **बाजी फसलकर** व थोडेसे मावळे लोक घेऊन रात्रीच अंधारांत कोणास कळूं न देतां किल्ल्या खाली उतरून शिवाजी रांगण्याकडे गेला. शिवाजी बराच दूर गेल्यावर शिद्दी **जोहारास** हें वर्तमान कळलें. तेव्हां त्यानें आपले स्वार व पायदळ त्याचे मागें त्याचा पाठलाग करावयास पाठविलें. त्यांनीं रांगण्याचे अलीकडे सुमारें तीन कोसांवर एके खिंडींत शिवाजीस चढतांनां पाहिलें; तेव्हां त्यानें ही त्यांस पाहिलें. त्यांच्याशीं लढाई करून आपला जीव धोक्यांत घालण्यापेक्षां, आपला बचाव युक्तीनें केल्यास मराठ्यांचें बहुत हित होईल हें जाणून बाजी फसलकर व दुसरे बरोबरचे मावळे लोक यांस त्याच खिंडींत ठेवून मी किल्ल्यावर जाऊन तोफांचे पांच बार करी पर्यंत तुम्हीं येत आहेत यांशीं लढत असावें असें सांगून आपण पुढें गेला.

तो **परभू** त्यांच्यांशीं दोन प्रहर लढला व त्यानें मुसलमानांस कित्येक वेळ मागें ही हटविलें. परंतु मागून दुसरी मोठी फौज आली, तेव्हां मोठें तुंबळ युद्ध झालें. त्यांत मावळे लोक अर्धे पडले. बाजी फसलकर ही घायाळ झाला; परंतु इतक्यांत किल्ल्यावरून तोफांचे पांच बार ऐकून, मी आपलें काम फत्ते केलें असें म्हणून त्यानें प्राण सोडिला. पहा या वेळीं शिवाजी यांत सांपडला नाहीं, म्हणून केवढा बचाव झाला! या करितां कित्येक त्यास कपटी म्हणोत, परंतु तो मोठा धूर्त व दूरदृष्टी होता यांत संशय नाहीं.

हें वर्तमान विजापुरीं पादशाहास कळलें तेव्हां जोहाराविषयीं त्याच्या मनांत बांकडे आलें. त्यास वाटलें कीं, त्याणें लांच घेऊन शिवाजीस सोडिलें. मग सन १६६१ मध्यें पादशाहा स्वतः सैन्य घेऊन आला आणि **रांगणा** व **विशाळगड** या दोहों किल्ल्यांखेरीज **पन्हाळा** वगैरे किल्ले व सभोंवतालचा **शिवाजीचा** मुलूख त्याणें घेतला.

पुढें पर्जन्यकाळ आला म्हणून कृष्णेच्या काठीं **चिमलगें** शहरीं फौजेसहीत तळ देऊन राहिला. **शिवाजी** या पादशाचे समोर कधीं उठावयास आला नाहीं. परंतु त्यानें सह्याद्री पर्वतावरील **रांगणा** व **विशाळगड** हे दोन किल्ले त्याचे हातीं लागूं दिले नाहींत. हे किल्ले कोल्हापूर प्रांतीचे पश्चिमेकडील बाजूस उत्तर व दक्षिणटोंकास आहेत.

पुढें शिवाजी दुसरीकडे प्रांत घेण्यांत वगैरे गुंतला असल्यामुळें पन्हाळावगैरे किल्ले विजापूरकरांचे हातीं बरींच वर्षें राहिले. सन १६७२ सालीं विजापूरचा सुलतान **अल्ली आदिलशाहा** मरणपावल्यावर त्याच्या मागें विजापूरच्या राज्यव्यवस्थेत गोंधळ झाला. सन १६७३ सालीं मार्च महिन्यांत विशाळगडावर मोठी फौज जमा करून पन्हाळ्यावर शिवाजीनें छापा घातला, आणि तो व दुसरे किल्ले त्याणें घेतले. पुढें **हुबळी** लुटली वगैरे जें वर्तमान झालें तें सांगण्याचें येथें प्रयोजन नाहीं.

पन्हाळा वगैरे किल्ले व त्या सभोंवतालचा कोल्हापूर प्रांतांतील मुलूख, तसेंच **चंदन, वंदन, पांडवगड, नांद गिरी** व **तातोरा** हे किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले, व शिवाजीचें सामर्थ्य पुनः अधिकाधिक वाढत चाललें. हें पाहून विजापूरचा सुलतान **शिकंदर** बादशाहा हा लहान म्हणून तेथचा मुख्य कारभारी **खवासखान** याणें मोठी फौज देऊन **अबदुलकरीम** यास पन्हाळा व आसमंतातचा मुलूख घेण्यास पाठविलें. त्याणें पन्हाळा किल्ल्याचे आसमंतातचा मुलूख घेतला आणि पन्हाळ्यास वेढा घालण्याची तयारी केली.

या वेळीं मराठ्यांनीं **पन्हाळ्याचा** वेढा उठविण्यास प्रयत्न न करितां, **त्रिचनापल्लीचा** वेढा उठविण्यास जी **क्लाईव्ह** साहेबानें, कित्येक वर्षें पुढें युक्ति योजिली, तीच यु-

क्कि या प्रसंगीं प्रतापराव गुजर याणें योजिला. पन्हाळ्यास कांहीं कुमक न पाठविनां **शिवाजी** नें प्रतापरावास विजापूरच्या भोंवतालचा मुलूख लुटण्यास पाठविलें. त्याणें तिकडे चोंहोंकडे लुटालूट चालविली, खंडणी घेऊं लागला, आणि त्याणें विजापूरकरांस इतकें जेर केलें, कीं **खवासखानास**, पन्हाळ्यास वेढा घातला होता तो उठवून सव फौजे सह अबदुलकरीमास परत बोलाविणें भाग पडलें. हें प्रतापरावास कळतांच त्याणें त्या फौजेची मिरज व विजापूर या मध्यें वाटच बंद केली. त्यांस कोणी कडून दाणापाणी मिळेनासें केलें. मुसलमानाच्या फौजेवर जिकडून तिकडून छापे घालून त्यांस अगदीं दमविलें. तेव्हां **अबदुलकरीमानें** प्रतापरावाशीं आर्जवाचें बोलणें लावून कांहीं दिवस लढाई तहकूब ठेवण्यास त्यास सांगितलें. तो लढाई तहकूब ठेवून त्या फौजेस विजापुरीं प्रतापरावानें जाऊं दिलें. हें ऐकून शिवाजीस फार राग आला आणि प्रतापरावाची फार निर्भत्सना करून त्यास एक तत्प्रदर्शीत पत्र लिहिलें.

आपणास ज्या कामाकरितां (पन्हाळ्याचा वेढा उठविण्यास) पाठविलें तें काम फत्ते झालें असें समजून प्रतापरावानें आपलें सैन्य वऱ्हाडांतील **पेनघाटचे** मुलुखांत चालविलें. प्रतापराव दूर गेलासें पाहून अबदुलकरीम पुनः सन १६७४च्या फेब्रुवारी महिन्यांत सैन्य घेऊन पन्हाळा घेण्याकरितां आला. परंतु प्रतापरावास हें वर्तमान लागलेंच कळलें, आणि तो आपले घोडेस्वार घेऊन आला. याच वेळीं त्याचे हातीं शिवाजीचें पत्र आलें. तेणें करून अतीत्वेष येऊन त्याणें अविचारानें विजापूरचे सैन्यावर उडी घातली. त्यांत तो पडला आणि त्याचे सैन्याची दुर्दशा झाली.

मराठे पळत पळत पन्हाळ्याजवळ आले, आणि तेथें त्यांस आश्रय मिळाला. इतक्यांत **हंसाजी मोहिते** नामें

सरदार पांचहजार स्वारांनिशीं आला. विजापूरकरांचे लोक मराठयांच्या पाठीस लागले आहेत, व त्यांमध्यें कांहीं बंदोबस्त नाहीं, असें पाहून त्याणें मुसलमानांवर हल्ला करून त्यांचा मोडकेला आणि त्यांस पळविलें. अबदुलकरीम राहिलेली फौज घेऊन मोठ्यालज्जेनें माघारा विजापुरीं गेला. हसाजी मोहिते याच्या सैन्यांतील दोन सरदार मोठ्या शौर्यानें लढले. एक संताजीघोरपडे, ज्यांचे वंशज हल्लीं कापशीस आहेत; व दुसरा धनाजीजाधव; त्यांचे वंशज ही कोल्हापूरकरांचे मानकरी आहेत.

या पुढें विजापूरचे दरबारीं फारसा एकोपा नव्हता. शिवाय हा प्रांत घेण्यास फार प्रयत्न करून ते शेवटीं दमले. शिवाजीच्या पराक्रमाविषयीं व मुत्सद्दीपणाविषयीं त्यांची खात्री झाली. विजापूरकरांनीं पन्हाळा व कोल्हापूरप्रांत घेण्यास या पुढें कधीं प्रयत्न केला नाहीं व त्यांच्या हातीं ही लागला नाहीं. अबदूलकरीमा बरोबर कोल्हापूर प्रांतावर जी विजापूरची फौज आली होती, ती शेवटची होय.

महाप्रतापि शिवाजीमहाराज सन १६८०सालीं निवर्तले. तेव्हां त्यांस दोन पुत्र होते. शिवाजीची ज्येष्ठ पत्नी सईबाई इचा पुत्र संभाजी हा वयानें ज्येष्ठ होता; आणि शिवाजीची कनिष्ठ पत्नी सोयराबाई इचापुत्र राजाराम हा वयानें कनिष्ठ होता. संभाजी यावेळीं पन्हाळ्यावर होता व राजाराम रायगडीं होता. दलेलखानाकडून आल्यावर शिवाजीनें संभाजीस त्याच्या दुर्वर्तनामुळें पन्हाळ्यावर बंदोबस्तानें ठविलें होतें. आपल्या मागें राज्यरक्षण कसें होईल ही काळजी शिवाजीस अंतकाळींच पडली होती. राज्य दोघां पुत्रांस वांटून द्यावें तर कलह वाढून राज्यवृद्धि होणार नाहीं. वडील पुत्र क्रूर व व्यसनी असून राज्यकरण्यास योग्य नाहीं. कनिष्ठ पुत्र गुणेकरून युक्त, परंतु वयानें लहान आहे. यामुळें पुढील विचार यथा-

स्थित दिसत नाहीं; असें बोलून पुढील व्यवस्था शिवाजीनें कांहीं निश्चयात्मक ठरविली नव्हती. राजारामाची आई रायगडावरच होती. पेशवे, अमात्य, सचिव, सेनापति वगैरे प्रधान मंडळीस बोलावून कळविलें कीं, महाराजांनीं अशी आज्ञा केली कीं "संभाजीस त्याच्या दुष्ट व उग्र स्वभावामुळें राज्य आवरणार नाहीं. तो सर्वांचा नाश करून आपलाही नाश करून घेईल. औरंगजेब समीप ठेपला आहे, त्याचा पराभव त्याच्यानें होणार नाहीं. यास्तव संभाजीस पन्हाळ्यावर बंदोबस्तांत ठेवून राजाराम यास घेऊन राज्य रक्षण करावें, व मोंगलांचें निवारण करावें, आणि नंतर राज्य संभाजीचे स्वाधीन करावें." ही ममलत सिद्धीस नेण्यास ते सर्व तयार झाले, व त्या प्रमाणें रायगडीं बंदोबस्त केला. पन्हाळ्याचा हवलदार **बहिर्जी नाईक** इंगळे होता व **सोमजी** नाईक बंकी व **हिरोजी** फरजंद हे दोघे सरदार त्याचे हाताखालीं होते; **जनार्दनपंत सुमंत करवीरीं** होते. त्या सर्वांस संभाजीस कैद करून बहुत सावधपणें असावें, अशीं पत्रें जासुदाबरोबर पाठविलीं; तीं पत्रें संभाजीस मिळालीं व त्यामध्यें सर्व मसलत समजली. तेव्हां त्याणें हवालदार व सबनीस यांस बोलावून त्याच्या देखत जासुदास दवावून विचारिलें. त्या समयीं जासुदानें झालेला मजकूर सविस्तर सांगितला. **सोयराबाई** साहेब व अष्टप्रधान यांणीं राज्य कारण करून **राजारामास** राज्यं देण्याचा विचार केला आहे; व आम्हांस कैद करण्याचा त्यांचा बेत आहे. यास्तव याचा पक्केपणीं विचार केला पाहिजे. तेव्हां त्याणें किल्ल्यावरील गडकऱ्यांस वश्य करून **सोमाजी** नाईक बंकी व **सूर्याजी** कंक मावळा या दोन सरदारांस कैद करून त्यांस मारून टाकिलें, आणि किल्ल्याचा पक्का बंदोबस्त केला. **हिरोजी** फरजंद हवालदार मात्र चिपळुणाकडे पळून गेला. नंतर जनार्दनपंत फौजेसह करवीरीं होता; त्याच्या फौजेंतील कांहीं लोक संभाजीनें फितूर केले; आणि त्यांस व पन्हाळ्यावरील निवडक

सं. ३.७३



मावळे लोकांस बरोबर घेऊन कोल्हापुरीं जनार्दनपंतावर छापा घालून त्यास धरून पन्हाळ्यास नेलें. पुढें पांच सहा महिन्यांत **संभाजी** रायगडीं गेला व त्याणें आपल्यास राज्याभिषेक करविला, आणि आपला सावत्र भाऊ **राजाराम** यास बंदींत टाकिलें, आणि त्याची आई **सोयराबाई** इजला ठार मारविलें.

संभाजी पुनः सन १६८१ त पन्हाळ्यास येऊन राहिला, आणि तो पुढें मरणकाळ पर्यंत याच प्रांतीं पन्हाळ्यापासून संगमेश्वरापर्यंत कोठें तरी रहात असे.

संभाजी स्वभावतः मोठा शूर, पण अधीर, उद्धट, अव्यवस्थित व व्यसनी होता. या मुळें **शिवाजीनें** मोठ्या प्रयासानें मजबूत पायावर बांधलेली मराठी राज्याची इमारत ढासळावयाचीच, परंतु औरंगजेबाचे हातून मोठ्या चुका झाल्या त्या मुळें, व मोगल लोकांस ऐषआराम व डामडौल याची आवड लागली होती व त्या कारणानें त्यांचें शौर्य ऱ्हास पावत चाललें होतें त्यामुळें मराठे शाई या प्रसंगीं निभावली. आतां कोल्हापूर परगणा मोगलांच्या हातीं कसा गेला हें सांगण्या पूर्वीं त्याचे माजी अधिकारी विजापूरकर या विषयीं व औरंगजेबानें दक्षिणेंत सैन्य आणिलें होतें, त्या विषयीं चार शब्द सांगणें अवश्य आहे.

दक्षिणेंत विजापूर, गोवळकोंडें वगैरे जीं मुसलमानांचीं स्वतंत्र राज्यें होतीं, त्यांशीं सख्य करून, त्यांचा व आपला साधारण शत्रु जे मराठे लोक प्रबळ होत होते, त्यांचा मोड करण्याचें टाकून मराठ्यांबरोबर या राज्यांचाही नाश करण्याचें वेडें कृत्य **औरंगजेबानें** आरंभिलें. या वेळीं विजापुरीं जो अवरंगजेबाचा वकील होता, त्यानें तेथील कारभारी मंडळींत वैमनस्यें पाडून एकाचा बेत दुसऱ्याच्या मनास येऊं नये असें करून सोडिलें. शिवाजीच्या अंतकाळीं जो विजापूरकरांचा व मराठ्यांचा थोडासा स्नेह झाला होता, तो नाहींसा करून शिवाजीनें कृष्णेच्या कांठचा मुलूख घेतला होता, तो परत घेण्यास विजापूरकरांस

शिकविलें. त्या प्रमाणें त्यांनीं फौज पाठवून तो मुलूख घेतला; तेणें करून त्यांच्या स्नेहांत अंतर पडलें. ही वकीलांची खटपट जर सिद्धीस न जाती तर हैदराबादचा (गोवळकोंडें) कारभारी महाणपंत याचा बेत होताकीं, विजापूरकर व आपण एक व्हावें व मराट्यांचा स्नेह संपादावा, आणि औरंगजेबाचें कांहीं चालूं देऊं नये. आणखी एक गोष्ट अशी झाली, कीं विजापूर येथील मसाउदखान कारभारी यानें कित्येक स्वार दूर केले, तेही मराट्यांकडे चाकरीस राहिले. गोंवळकोंड्याचे दरबारीं ऐक्य होनें असें नाहीं. तेथें महाणपंत हा हिंदु कारभारी होता. म्हणून तेथील मुसलमान सरदार, मानकरी वगैरे त्याचा हेवा करीत. हें वैर हलकरण्यास मोंगलाचे वकील हजर होतेच. बरें औरंगजेबानें दक्षिणेंतील हा मुलूख घेण्या करितां जी फौज आणिली तींत म्हणजे मोटे शूर योद्धे होते किंवा तींत फार व्यवस्था होती असें नाहीं. केवळ मराठे, विजापूरकर व गोवळकोंडेकर यांची अव्यवस्था व आंतल्या आंत फुटाफूट व मराट्यांच्या संभाजीची अव्यवस्थित वागणूक या मुळें मोंगलांचा जय झाला. या प्रसंगीं जर शिवाजी असता किंवा संभाजी पाशीं पहिले बाजीरावा सारखा प्रसन्नी व शूर कारभारी असता तर औरंगजेबास बऱ्हाणपूर वलांडूं दिलें नसतें.

औरंगजेबाचे फौजेंत उत्तरे कडील पंजाबी वगैरे लोक शरीरानें बळकट व धिप्पाड, आणि आंगांत लोखंडी जडचिलखतें घातलेले असे होते, त्यांचे घोडे ही उंच व धष्टपुष्ट असे होते; तसेंच पायदळांत चापाचे व तोड्याचे बंदुकवाले व कित्येक तीर कमाण वाले होते; फौजेंत लहान मोठ्या पुष्कळ तोफा होत्या, व गोलंदाजांत फिरंगी होते, व लढाऊ हत्तीही पुष्कळ होते. अशा या प्रचंड फौजे पुढें दक्षिणेंतील मराठे केवळ सुकुमार दिसत. हे लोक गिड्डे, व यांच्या आं-

गाचा बांधा अगदीं लहान व सडपातळ, पण चिवट; त्यांचा पोषाख गांडिंत लंगोटी, डोकीस मुंडासें, व आंगावर कांबळें; ज्यांचीं शस्त्रें भाला व तरवार, ज्यांची रहाण्याची रीत म्हटली म्हणजे राना वनांतून, गिरिगुहांतून, आज गुजराथेंत तर उद्यां कर्नाटकांत असें हिंडणें, ज्यांचे घोडे आंगानें लहान सडपातळ व मस्त; ज्यांचा जमाव पहावा तर लुटीच्या अथवा लढण्याच्या वेळे शिवाय एके जागीं पन्नास देखील असावयाचे नाहींत; ज्यांचें भक्ष्य केवळ जोंधळे, बाजरी वगैरेची भाकरी व चटणी, व वाटेनें तर कित्येक दिवस फक्त हुरड्याच्या कणसांवर काळ काढीत; अशा लोकांनीं मोंगलाच्या फौजेशीं टिकाव धरिला हें पाहून चित्तास आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं. परंतु जेव्हां मोंगल दरबाराचें वैभव, त्या दरबाराचा थाटमाट, राज्याचा अवाढव्य पसारा व अंदाधुंदी, वाटेंतील त्यांचा लवाजमा व खर्च, दरबारांतील वैमनस्यें, औरंगजेबाचा बेभरंवशी स्वभाव व जनानखाना, इत्यादि गोष्टी मनांत आणिल्या, म्हणजे औरंगजेबाचा दक्षिणेंत कांहीं काळ तरी कसा जय झाला याचाच अचंबा वाटतो. असो शेवटीं मोठ्या प्रयासानें व मसलतीनें विजापुर व गोंवळकोंडें हीं दोन्हीं राज्यें औरंगजेबानें रसातळास मिळविलीं. परंतु कोल्हापूर परगणा मराठ्यांच्या स्वाधीन होता, तो त्याच्या हातीं लागला नाहीं. या वेळीं दक्षिणप्रांत बहुतेक निष्कंटक झाल्यामुळें आपली सर्व फौज मराठ्यांचें पारिपत्य करण्यास औरंगजेबास पाठवितां आली. तथापि एवढ्या मोठ्या जिंकलेल्या मुलखांत चांगला बंदोबस्त ठेवून नव्या प्रांतावर हल्ला करावा हें शहाणपणाचें कृत्य न घडल्या कारणानें, मराठ्यांचा उपद्रव चालूच होता. आज मराठ्यांनीं ब्रह्माणपूर जाळिलें तर उद्यां खानदेश लुटला, परवां गुजराथेंत खंडणी घेतली इत्यादि वर्तमानें औरंगजेबाचे जासूद त्यास लष्करांत वरचेवर पोंचवीत. कोल्हापूर परगण्याची व्यवस्था-

म्हणजे कित्येक किल्ल्यांवर एक किल्लेदार असून त्याचे ताब्यांत त्या जवळपासचा मुलूख असे. त्या प्रमाणें **पन्हाळा, विशाळगड** वगैरे किल्ल्यांवर किल्लेदार होते. ही व्यवस्था **दाजी पंडिताचे** वेळपर्यंत कायम होती. किल्लेदारांशिवाय प्रत्येक गडावर एकेक मामलेदार होता. प्रत्येक किल्लेदारापाशीं त्याच्या ताब्यांतील मुलखाच्या संरक्षणापुरती फौज असे. जरी यास मोंगललोकांकडून एकसारखा उपद्रव पोंचत होता; तथापि त्यांणीं कोल्हापूर परगणा औरंगजेबाच्या हातीं लवकर लागूं दिला नाहीं, परंतु मराठे करतात काय? त्यांच्या राजापासून त्यांस कोणत्याच प्रकारें उत्तेजन मिळेना. राज्यव्यवस्थेंत फारसें चित्त न घालितां संभाजी **विशाळगड, पन्हाळा** आणि **संगमेश्वर** या स्थळीं **कलुषा** समागमें काळ चैनीनें चालवी. बरें आपण नाहीं तर नाहीं, पण आपल्या वडिलांच्या वेळचे हुषार व विश्वासू नोकर त्यांजकडे तरी कारभार सोंपवावयाचा होता; परंतु तसेंही त्याणें केलें नाहीं. उलटें बहुतेक जुन्या कामगारांस दूर करून कलुषाकडे सर्वकारभार दिला होता. सैन्यांतील अव्यवस्था, **संभाजी** चा अस्ताव्यस्त खर्च, रयतेवरील नवीन कर व इतर जुलूम, याणें मराठे देखील कंटाळले होते. या प्रसंगीं संभाजी ज्या शूर मराठ्यास रजा देई ते निरुपायास्तव जे किल्ले हातीं लागतील ते हस्तगत करून जिकडे तिकडे बंडें करून लुटालूट चालवीत. येणें करून बराच उपयोग झाला. कारण त्यांच्या पारिपत्यास **औरंगजेबास** फौज वरचेवर पाठवावी लागे.

कोल्हापूर परगणा घ्यावयास तकरीबखान नामें सरदारास तेथील फौजदारी द्यावयाच्या करारानें औरंगजेबानें पाठविलें.※ कोल्हापूर संबंधें, सहज हस्तगत होण्याजोगा जो मुलूख होता

---

※ मल्हार रामराव कृत संभाजीच्या बखरींत इलाचीबेग यासरदारानें घेतलें असें आहे.

तो मोंगलांच्या स्वाधीन झाला. परंतु पन्हाळा आदिकरून ज्या बळकट जागा होत्या त्या मराठ्यांच्याच हातीं होत्या.

तकरीबखान कोल्हापुरीं मराठ्यांविषयीं चोहोंकडून बातम्या काढीत असतां त्यास समजलें कीं, संभाजी असावधपणें संगमेश्वरीं राहिला आहे; तेव्हां त्यास वाटलें कीं, राजासच धरून कैद केल्यास मराठे आंई (शरण) येऊन सर्व प्रांत स्वाधीन करतील. अशा हेतूनें त्यानें संगमेश्वरीं गुप्तपणें स्वारी करून संभाजीस कैद करून कोल्हापुरीं आणिलें. नंतर त्यास औरंगजेबाकडे नेल्यावर, मराठ्यांत दहशत पडावी म्हणून क्रूरपणें त्यास जिवें मारिलें. परंतु याचा परिणाम उलट झाला. अगोदरच मराठे यांचें मोंगलांशीं हाडवैर होतें, तें या क्रूरकृत्यानें दसपट वाढलें.

संभाजीस मोंगलांनीं मारिलें, तेव्हां त्यास एक पुत्र शिवाजी नांवाचा होता. परंतु तो वयानें अगदीं लहान होता, सबब त्याची आई येसूबाई इच्या विचारें सर्व कारभाऱ्यांनीं राजारामास गादीवर बसवून राज्यकारभार चालविण्याचें ठरविलें. शिवाजी, येसूबाई, राजाराम वगैरे सर्व रायगडीं आहेत असें कळतांच रायगडास वेढा घालण्यास जुल्फिकारखाना बरोबर औरंगजेबानें फौज रवाना केली. तेव्हां राजारामानें विचार केला, कीं आपण जर येथें कोंडून राहिलों, तर बाहेरील व्यवस्था रहाणार नाहीं. यास्तव रायगडचा बंदोबस्त करून शिवाजी व येसूबाई यांस तेथें ठेवून आपण पन्हाळा व विशाळगड किल्ल्यांकडे जाण्यास निघाला. राजारामाची पहिली पत्नी वारल्यावर त्याचीं आणखी दोन लग्नें झालीं होतीं. एका पत्नीचें नांव ताराबाई, ती मोहित्यांची कन्या, व दुसरी राजसबाई कागलकर घाटगे यांची कन्या होती. या उभयतां पत्नीसहवर्तमान मुख्य कारभाऱ्यांस घेऊन राजाराम महाराज पन्हाळ्यास येऊन पोंचले. हें वर्तमान बादशाहास समजतांच त्यांजवर पन्हाळ्याकडे मोंगली फौज रवाना झाली.

तेव्हां तेथून निघून विशाळगड, रांगण्याकडे राजाराम महाराज गेले. तेव्हां पन्हाळ्यास वेढा घालून किल्ला मोंगलांनी हस्तगत केला. नंतर विशाळगड, रांगण्याकडे मोंगली फौज धांवली. सर्व प्रांतांत पादशाहाची फौज फिरूं लागली, आणि सर्व राज्य मोंगलांनीं व्यापिलें. जिकडे जावें तिकडे त्यांचे मार्गे आहेच. दमरवाऊन लोक ठेवणें, फौज बंदी करणें व एकादी मसलत बळावणे यास अवकाश सांपडेनासा झाला. यास्तव येथून जमाव फोडून चंदीस (जिंजीस) जावें, असा राजाराम महाराजांनीं निश्चय केला. आपले कबिले (स्त्रिया) विशाळगडीं ठेवून व रामचंद्र निळकंठ (बावडेकर) यांस हुकमतपन्हा हा किताब देऊन त्यांजकडे इकडील प्रांताचा व घांटमाथ्याचा बंदोबस्त सोंपवून, राजाराम महाराज कांहीं मुत्सदी सरदारांस घेऊन जंगम, लिंगाईत, कापडी यांच्या वेषानें चंदीस गेले.

इकडे रायगडास मोंगल व हबशी यांनीं वेढा दिला असतां किल्लेकरी यांनीं किल्ला दहा महिने भांडविला. परंतु बाहेरून कुमक येण्याची बंद झाली, तेव्हां येसूबाईनें तह करून मोंगलांचे हवाली किल्ला केला. तेव्हां रवान शिवाजीस घेऊन औरंगजेबाकडे गेला. नंतर मोंगलांची फौज पन्हाळ प्रांतीं आली. रामचंद्रपंत विशाळगड व रांगणा बळावून व जागजागीं फौजा ठेवून प्रांतांत स्वाऱ्या करूं लागले. मोंगलांनीं पन्हाळा घेतला व तेथें एक सरदार ठेवून रांगणा व दुसरे कोंकण बांधारीचे किल्ले सोई सोईनें घेण्याची तजवीज केली.

राजाराम महाराज चंदीस जाऊन पोंचल्यावर ते फौजबंद झाले. जिकडे जे गेले त्यांस सरदाऱ्या व किताब दिले. शिवाजी महाराजांची सर्व शिस्त सुरू करून पूर्व मर्यादे प्रमाणें व महाराजांनीं धारे करून दिले होते त्याप्रमाणें सर्व

राज्य चालवूं लागले. त्यांनीं ज्या प्रांतांत जाऊन आपल्या तरवारीनें मुलूख मारून चौथ, सरदेशमुखी, घासदाणा वगैरे अमल बसवून राखतील असें म्हटलें, त्यांस किताब व त्या अमलाच्या सनदा देऊन रवाना केलें. तोच प्रकार रामचंद्र पंतानें इकडेही सुरू केला. यामुळें टोळांच्या धाडी प्रमाणें मोगलांच्या मुलुखांत मराठ्यांच्या टोळ्या फिरूं लागल्या, व पादशाहाच्या फौजेच्या पाठीस सर्वत्र मराठे लागले. त्यांत धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनीं तर मोगलांस त्राही त्राही करून सोडिलें.

विशाळगडीं राजाराममहाराजांच्या तिन्ही स्त्रिया होत्या. राजाराम चंदीस निघाले त्यावेळीं ताराबाई दोन महिन्यांची गरोदर होती, ती विशाळगडींच शके १६१२ सालीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें. नंतर ताराबाई, राजसबाई आणि अंबिकाबाई या तिघांस रामचंद्र पंतांनीं कारकून हुजरे वगैरे देऊन गुप्तपणें घाटाखालीं पाठविलें व तेथून जहाजांतून चंदीस पोंचतें केलें.

रामचंद्रपंतांनीं पन्हाळा व पावनगड येथील हवालदार वगैरे मंडळीशीं संधान करून दोन्ही किल्ले घेतले. पुढें झुल्फिकारखान याचा वेढा चंदीस पुष्कळ महिने पर्यंत असतां त्याच्याशींच अंतस्थ मसलत करून राजाराममहाराज कुटुंब मुद्धां निसटून विशाळगडीं आले, व तेथून पन्हाळ्यास गेले. त्या स्थळाहून औरंगजेबाच्या छावणीवर गुप्त छापा घालून शिवाजीस (शाहूस) सोडवून आणावा, असा निश्चय ठरला, परंतु तो फसला. पुढें ते सिंहगडीं गेल्यावर नवज्वर होऊन मृत्यु पावले.

राजाराममहाराजांचा काल झाला त्या दिवशीं ताराबाई व राजसबाई पन्हाळ्यास होत्या. *अंबिकाबाई विशाळगडीं होती.

---

* विशाळगडच्या बखरेंत अहिल्याबाई असें नांव आढळतें. परंतु तो हस्तदोष असावा.

तिला हें वर्तमान कळल्यावर ती सती गेली. यावेळीं विशाळगडीं घडलेली चमत्कारीक गोष्ट मल्हाररामराव यांणीं आपल्या बखरींत अशी लिहिली आहे, व तिकडील लोक ही अद्याप सांगतात.

"[हें वर्तमान] विशाळगडीं कळलें, त्या समयीं चार सहा घटका दिवस होता. अंबिका बाई साहेबांस समजल्या नंतर त्या वाड्यांतून निघून मदरेस आल्या. हवालदार इत्यादिकांनीं मुजरा करून ते श्रमी झाले. तेव्हां बाई बोलल्या कीं, "हा मृत्यु लोक आहे. श्रमी कां होतां? आम्ही सहगमन करणार! साहित्य करावें!!" यावरून सरनोबत बोलिला कीं, "महाराज असतां वाड्या बाहेर निघतां येत नव्हतें. मनुष्य दृष्टीस पडत नव्हतें. हल्लीं या मिषें लोक पहावेत अशी इच्छा झाली." हें ऐकून ज्यांचें दैवीं माझें सतीचें जाणें पहाणें असेल ते पहातील." अशीं बाईचें मुखांतून अक्षरें निघतांच यांचे डोळे अंध झाले, त्या काळीं सरनोबत घाबरा होऊन [त्याणें] पायांवर डोई ठेविली. "महाराज! मी चुकलों! मजवर कृपा करावी" असें म्हटल्यावरून हसून बोलल्याकीं "सती जाण्याचें पहावें." म्हणतांच दिसूं लागलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहून विनंति केली कीं. "महाराजांचा काळ सिंव्हगडीं झाला, आज तिसरा दिवस. तेव्हां सहगमन कशास करावें?" तेव्हां उत्तर केलें "आपल्यास कळला तोच दिवस मुख्य. तुम्ही कोणी संशय न धरितां साहित्य लवकर करा. अनमान कराल तरी तुम्हांस महाराजांच्या पायांची शपथ." तेव्हां हवालदार यांनीं विनंति केली, "दिवस थोडा राहिला, मलकापुराहून साहित्य येणें, [त्यास] रात्र होईल. गलबलीचे दिवस, किल्ल्याचें काम, येविशीं आज्ञा व्हावी." "स्वार पाठवून जलदीनें सामान आणावें. मी सहगमन केल्यावाचून सूर्य अस्तास जाणार नाहीं." तेव्हां एकमेकांकडे पाहूं लागले. "तुम्ही खोटें मानूं नका." [असें सांगून] मदरेची सावली पडली होती, त्या सावली जवळ किंचित् मा-

तीचा ढीग करवून त्यावर पत्रसाचें पान रोविलें, [आणि] "त्यास ओलांडून सावली जाणार नाहीं." असें म्हटल्यावरून हवालदारां-नीं विनंति केली कीं, "आज्ञेप्रमाणें स्वार रवाना करितों. अस्तमान झाल्यास दरवाजे लावीन. साहेबीं रागें भरूंनये" "नाहीं" असें उत्तर केल्यावर, स्वारमार्गें स्वार ठेवुन स्वारांची डाक लाविली. पत्रसाचे पानावरून सावली गेली नाहीं. प्रकाश आहे तसाच होता. सत्कापुराहून साहित्य येऊन महाराजांच्या पागोट्यावरोबर बाई-नीं सहगमन केलें. स्नानविधि सर्वत्र करीत तों पर्यंत प्रकाश दि-सतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चारतास रात्र झाली. अंधःकार दिसूं लागला. हें पाहून सर्वत्रांस आश्चर्य वाटलें. "स-तीचा प्रताप" असें सर्वत्र म्हणू लागले. सतीचा मजकूर पन्हा-ळ्यास पंताकडे लिहून पाठविला. हें ऐकून त्यांनीं ही आश्चर्य मानिलें. पंतांनीं विशाळगडीं दान धर्म बहुत करविला. पुढें सती गेल्या ठिकाणीं बुवासाहेब महाराजांनीं वृंदावन बांधून खर्चाची नेमणूक केली. ती सन १८४४ इसवी पर्यंत चालत होती. हाल्लीं चालत नाहीं.

**राजाराम** महाराज वारल्याचें वर्तमान पादशाहाच्या लष्क-रांत पोंचलें आणि भवानी गायकवाड हुजरे येसूबाई व शाहू महा-राज यांजकडे जाऊन त्याणें त्यांस वर्तमान कळविलें. तेव्हां त्यांस बहुत शोक झाला व महाराजांस वाटलें कीं, थोरले महाराज व संभाजी महाराज आज मेले व राज्यही बुडालें. काका साहेब आ-म्हांस सोडवून नेतील अशी खात्री होती. आतां ईश्वरानें आम्हां-स निराश्रित केलें. असा बहुत शोक त्यांनीं केला. त्या संतापानें त्यांस ज्वर आला. हें वर्तमान पादशाहास कळतांच स्वारास्वारी शाहू महाराजांच्या समाचारास आली, व आंगावरून हात फिरवू-न पादशहा बोलिले कीं "तुमारा चिच्चा (काका) मरगया, इसवास्ते तुमारी तबियत बिगडगई; अजार हुवा, तुम चिंता मत करो, दरखनमें सबचोर, तुमसाहू.

तुमाराराज्य तुमकूं देउंगा. तुम हमारे बेटीके बेटे हो, कुच फिकीर मत करो" असें समाधान करून "राजाराम ही बहुत अच्छा था" असें बोलून "अपने बेटेकूं जल्दी अच्छा करना" असें बेगमेस सांगून स्वारी गेली.

महाराजांनीं भक्ताजी हुजरे यास सांगितलें, कीं "उभयतां आईसाहेबांच्या पायांवर डोई ठेविली आहे आणि उभयतां बधूंस आशीर्वाद मागावा." तसेंच रामचंद्रपंतास निरोप पाठविला कीं "काकांच्या ठिकाणीं तुम्ही असून काकासाहेबांच्या मागें आम्हांस नेण्याचा उद्योग करीत असावें. श्री इच्छेनें घडेल तो सुदीन. तथापि राज्य रक्षण करावें, श्रीकृपें सुदीन प्राप्त होईल." हा निरोप पोंचल्यावर रामचंद्रपंतास बहुत संतोष झाला, व नेत्रांतून उदक आलें.

रामचंद्रपंत अमात्य सिंहगडाहून पुण्यास गेले. तेथील बंदोबस्त करून संताजी घोरपडे, धनसिंगराव जाधव, दाभाडे, भोंसले आदिकरून सरदारांस मोंगलांवर पाठवून व पूर्वीप्रमाणें सर्व शिस्त बसवून पन्हाळ्यास आले. राजसबाई व ताराबाई या उभयतांस भेटून त्यांस बहुत रीतीनें समाधानाच्या गोष्टी सांगून त्यांचें समाधान केलें. राजसबाईचा पुत्र संभाजी तीन वर्षांचा होता. ताराबाईचा पुत्र शिवाजी १० वर्षांचा होता. कांहीं दिवसांनीं ताराबाईनीं पंतांस सांगितलें, कीं आपला मुलगा वडील आहे. त्याची मुंज करून त्यास राज्याभिषेक करावा. तेव्हां पंतानीं विनंति केली कीं शाहूमहाराज वीस वर्षांचे असून मोंगलाच्या लष्करांत आहेत. त्यांची मुंज अद्याप झाली नाहीं. ते लवकरच येतील, असें *बाळजोशीराव संगमेश्वरकर यांच्या सांगण्यांत आहे. यास्तव ते आल्यावर त्यांची वयांची एकदांच मुंज करूं व ते

---

* हे भोंदजोशीराव असावे असें त्या घराण्यांचे माहितगार सांगतात.

तख्तारूढ होतील, व हे उभयतां युवराज पद करतील. हें बोलणें ताराबाईस न रुचून त्या म्हणाल्या कीं “ ते धनी आणि हे चोर ” अ- सा अर्थ नाहीं. शिवाजी महाराजांची मला मुंज अवश्यमेव कर्तव्य आहे, असा आग्रह धरिला. तेव्हां परशुराम त्रिंबक व नारोशां- कर यांनीं अनेक प्रकारें सांगून पंताचा रुकार घेतला. नंतर मुंजी- चा निश्चय करून समारंभ आटपल्यावर सन १७०१ साली **शिवा- जी** महाराजांस राज्याभिषेक झाला. तेव्हां परशुराम त्रिंबक यांस प्रतिनिधि पद दिलें, आणि नारोशंकर यांस सचीव पद दिलें. रा- मचंद्र पंत यांजकडे कुल अख्त्यार होता; परंतु ते ताराबाईच्या आ- ग्रही स्वभावामुळें पूर्वीं प्रमाणें झटून काम न करितां जितक्यास ति- तकें करूं लागले. शिवाजी महाराजांचें लग्न बुंदकर घाटगे यां- च्या कन्येशीं झालें. तिचें नांव भवानी बाई ठेविलें. राजस बाई- स ताराबाईनें बंदींत टाकिलें.

या प्रमाणें चाललें असतां शाहू महाराज म्हणून एक तोतया उत्पन्न झाला. तो तोतया आहे अशी चौकशी अंतीं खात्री झा- ल्यावर त्यास धरून मारून टाकिलें.

**औरंगजेबाच्या** वार्धक्यामुळें मोंगलाच्या राज्यांत पुनः अव्यवस्था शिरली, आणि मराठ्यांचा उपद्रव दिवसें दिवस वाढत चालला. ताराबाई, रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रति- निधि यांच्या सहाय्यानें एकामागून एक असे किल्ले व मुलूख मों- गलांपासून घेत गेल्या. शंकराजी नारायण सचीव हे ही परा- क्रमी सिंहगड, राजगड वगैरे राखून होते. मोंगलाच्या खुद्द मु- लखांत सुद्धां मराठ्यांचा उपद्रव सुरू होताच. या संधीस औ- रंगजेब हा नगरास सन १७०७ साली ( शके १६२८ ) मरण पावला. तेव्हां त्याच्या मुलांत भांडणें लागून मोंगलांची फौज हिंदुस्थानां- त जाण्यास निघाली. हें पाहून मराठे सर्व प्रांतांत पादशाही ठा- णीं उठवून आपला अंमल बसवूं लागले. तेव्हां मराठ्यांमध्यें दु- फळी होऊन ते निर्बळ व्हावे, आणि त्यांच्या मध्यें आपसांत लढा-

ई जुंपून मोंगलाच्या मुलखास उपद्रव होऊं नये अशा हेतूनें अजीमशाहानें शाहू कडून करार करून घेऊन शाहूस मुक्त केलें.* शाहूमहाराज भरतपूर, जयपूर, जोधपूर उदेपूर व उज्जनी या वरून नर्मदेच्या आलीकडे आले, व तेथून गोदावरी उतरून दक्षिणेंत आले. स्वदेशीं पोंचतांच शाहूमहाराजांनीं बरेच सरदार वश्य केले. नंतर ताराबाईसाहेब व त्यांचे पुत्र शिवाजी राजे यांस व प्रधान व अमात्य रामचंद्रपंत वगैरे मुत्सद्दी, सचीव, चिटणीस, यांस पत्रें पाठविलीं, कीं आम्ही पादशाहापासून या मुलखीं येऊन पावलों. तिकडे लवकरच येत आहों.

हें पत्र पावतांच ताराबाईस वाटलें, कीं संभाजी राजे वडील, त्यांचे हे पुत्र, राज्याचे अधिकारी आले. आतां आपणास त्यांच्या आज्ञेंत वागलें पाहिजे. आजपर्यंत आपल्या पुत्रास सिंहासनीं बसवून राज्य चालविलें, तसें पुढें करितां येणार नाहीं. या करितां तिणें दुर्बुद्धि मनांत आणून असा संकल्प केला कीं, ज्या पेक्षां आपले भ्रतार यांनीं श्रम साहस करून राज्य रक्षिलें, त्या पेक्षां आपले पुत्र व आपण राज्य करावें; आणि पूर्वी एकवेळ तोतया शाहू आला होता त्यास धरून मारिलें, तसें यावर ही फौज पाठवून पारिपत्य करून मारावें. असा हेतु मनांत आणून रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण सचीव,

---

* त्याजबरोबर ५०००० फौज देऊन भाईसहा सुभ्यांत सरदेशमुखी, सहोत्रा पंचोत्रा वगैरे सहा अमल देऊन रवाना केलें. त्यावेळीं ताराबाई कडील वकिलांनीं पादशाहास अर्ज केला कीं, एक महाराज देशीं अमल करीत आहेत. शाहू महाराज देशीं गेल्यावर तो अमल घेतील. तेव्हां शिवाजी व संभाजी यांणीं काय करावें? त्यास पादशाहानीं उत्तर दिलें कीं, शाहू व शिवाजी आणि संभाजी यांनीं लढाई करावी. ज्यास जय येईल त्याजकडे अमल चालेल. ( विशाळगड बखर ).

नीळकंठ मोरेश्वर प्रधान, धनाजीराव जाधव, सेनापति वगैरे सरदार व मुत्सद्दी यांस बोलावून तिणें आपला मनोदय त्यांस कळवून बोलली कीं, तुम्ही सर्वांवर इतराजी करून संभाजी राजे यांनीं अपराध नसतां शिक्षा केल्या, आणि सर्व राज्य व दौलत गमाविली. त्या नंतर राजाराम साहेब यांणीं पुढें चंदीस जाऊन तुम्हा सर्वांस वाढवून तुमच्या सहाय्यानें राज्य सोडविलें. यास्तव त्यांचे पुत्र शिवाजी राजे यांस अंतर न देतां फौज घेऊन जाऊन प्रस्तुतचे शाहु राजे खरे किंवा खोटे असोत, त्यांशीं लढून त्यांस धरावें; असा त्यांजकडून शपथा घेतल्या. पत्रांचें उत्तर न देतां याप्रमाणें ताराबाईनें मसलत केल्याचें शाहु महाराजांस कळलें, तेव्हां ते गंगातीरींच मुक्काम करून राहिले. त्यांस वरचेवर कांहीं फौज व कोणी कोणी सरदार मिळत असत. ताराबाईनें सर्व फौज तयार करण्याचें काम चालविलें. तेव्हां अष्टप्रधान व सरदार यांनीं कारकून पाठवून शोध केला; तेव्हां शाहु महाराज खरे असें ठरलें; त्यांज बरोबरची सबनीस वगैरे मंडळी व केसकर आले तेही खरे. हें समजल्यावर सर्वांस बहुत विचार पडला. फौजेची तयारी झाल्यावर ताराबाईनें दूध भाताचें ताट भरून ठेवून सर्वांनीं क्रिया द्यावी, आणि फौज घेऊन पुढें जावें, असें सांगितलें. तेव्हां रामचंद्र पंत अमात्य व परशुराम त्रिंबक प्रतिनिधि आणि सेनापति यांणीं क्रिया दिली.

किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नये, व खर्चास मुलखांतील वसूल देऊं नये, अशीं पत्रें ताराबाईनें सुभे व किल्ले यांस पाठविलीं. तसेंच किल्ल्यांवर दारू गोळा वगैरे सामान चढवून आपले विश्वासू लोक व कारकून वगैरे रवाना केले. नंतर असा विचार ठरविला कीं, अमात्य यांणीं जवळ राहून सर्व मसलत व राज्यकारण संभाळावें. सेनापति व प्रतिनिधि यांनीं फौज घेऊन लढाईस जावें. सचीव व प्रधान यांनीं किल्ले व तालुके संभाळून लोक कुमकेस पाठवीत असावें. या प्रमाणें ठ-

रून प्रतिनिधि व सेनापति हे ४० हजार फौज घेऊन मोकाबल्यास गेले. सेनापतींनी बरोबर खंडोबल्लाळ चिटनवीस यांस घेतलें.

ताराबाईनें दुर्बुद्धि धरून आणि सर्व प्रधान, सरदार किल्ले कोट यांस अनुकूल करून मसलत आरंभिली, आणि आपणाशीं लढाई देणार, असें वर्तमान शाहूस कळलें. असो, थोरले शिवाजी महाराजांच्या पुण्यप्रतापें करून हे दिवस पाहिले. आपण राज्याचे अधिकारी आहों, यास्तव आपणास रक्षणें असल्यास श्रीभवानी व सांब रक्षील, असें म्हणून कुच करून पुढें निघाले. या वेळीं यांजपाशीं १५००० फौज होती. उभय फौजा समीप येऊन लढाईचा निश्चय झाला.

शाहू महाराज तख्ताचे खरे अधिकारी असतां त्यांशीं लढाई करण्याविषयीं आपलें इमान आईसाहेबांनीं घेतलें आहे, तेव्हां याचा विचार कसा करावा अशा गूढांत सेनापति पडले. प्रथमतः चिटणीस यांस पाठवून पक्केपणीं शोध करावा, आणि आपलें सर्व वर्तमान शाहूमहाराजांस विदीत करावें, असें त्यांनीं मनांत आणिलें. प्रतिनिधि यांचा निःसीम लढाईचा इरादा होता. यास्तव चिटणीस दुसरा वेष धारण करून गुप्त रूपें गेले, महाराजांस भेटून इकडील सर्व वर्तमान सांगितलें व तिकडील ऐकून घेतलें. महाराज खरे अशी खात्री झाल्यावर सेनापति व त्यांच्या विचारांत असलेले दुसरे सरदार यांचा मजकूर समजावून सेनापतींस खुणेचें पत्र घेऊन आले. महाराज तर खरे; त्यांशीं लढण्याविषयीं तर शपथ घेतली आहे. तेव्हां कपट युद्ध करावें असें ठरवून सेनापति व प्रतिनिधि लढाईस गेले व लढाईस आरंभ झाला. प्रतिनिधि व आईसाहेबांच्या लष्याचे सरदार वहुत लढले. महाराजांकडील परसोजी भोंसले व चिमणाजी दामोदर यांणीं घोडे घालवून लढाई केली. महाराज हत्तीवर हौद्यांत बसून व धनुष्य बाण हातीं घेऊन व ढाल तरवार बांधून युद्धास उभे होते. लढाई-

न हत्ती चालवून महाराजांनी तिरंदाजी केली व फौजेंत मिसळले. दहा हजार निवडक फौज घेऊन महाराजांनी हल्ला केला. सेनापति आपल्या घोड्याजवळ महाराजांचा हत्ती येई पर्यंत उभे राहिले. निम्मी फौज स्तब्ध राहिल्यामुळें प्रतिनिधि मोड होऊन पळून साताऱ्यास गेले व सातार किल्ल्याचा बंदोबस्त करून राहिले आणि आईसाहेबांस सर्व वर्तमान लिहून पाठविलें. सेनापतीच्या घोड्याजवळ महाराजांचा हत्ती आला, तेव्हां ते व त्यांच्या विचारांतील सर्व सरदार घोड्यावरून उतरून महाराजांस मुजरे व नजराणे करून भेटले. दुसऱ्या दिवशी फौज व सरदार यांच्या भेटी झाल्या. सर्वांच्या नजरा होऊन सर्वांस यथायोग्य चादरी वगैरे घातलें. नंतर सेनापतीस सेनापति पदाची वस्त्रें पद्धती प्रमाणें व बहुमान, हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे दिलें. गुंडो बल्लाळ चिटणीस यांस चिटणीशीचीं वस्त्रें, कलमदान, शिरपेंच, कंठी, चौकडा वगैरे दिलें.

तेथून कूच करून महाराज पुण्यास गेले. नंतर चंदन, वंदन किल्ले घेऊन साताऱ्यास प्रतिनिधींकडे पत्र पाठविलें. प्रतिनिधींनीं लढाई देण्याची तयारी केली. किल्ल्यावर भेद करून किल्ला हस्तगत केला व प्रतिनिधींस कैद केलें. नंतर शके १६२९ सालीं अलबंध पूर्वक राज्याभिषेक करून घेऊन सिंहासनारूढ झाले.

इतकें झालें तरी ताराबाई आपला पुत्र शिवाजी हाच मराठ्यांचा खरा राजा असें म्हणत असे. त्या मुळें मराठ्यांमध्यें दोन फळ्या झाल्या व आपसांत कलह लागून मोगलांच्या मुलखांतील उपद्रव कमी झाला, आणि त्यांचे इष्ट हेतु सिद्धीस गेले. ताराबाईनीं आपल्याच बहुतेक वजनदार सरदारांकडून शपथा घेऊन आपणास अनुकूल करून घेतलें होतें. तत्रापि त्यांतील बरेच शाहूस मिळाले. तरी ताराबाईचें पारडें अजून बरेंच जड होतें.

ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी, राजकारस्थानी, मसलती व चतुर होती. संधी सांपडेल तेथें आपलें घोडें दकलण्यास कधीं चुकत नसे. खरा मराठ्यांचा राजा कोण याचा निर्णय होण्याची अनायासें अवश्यकताच आली. हैद्राबादच्या लढाईंत झुलफिकार खानास शाहूनें चांगली कुमक केली, या मुळें शाहूवर त्याची मर्जी बसून त्याणें शाहूस दक्षिणेच्या सरदेशमुखीची सनद देण्याविषयीं दिल्लीस लिहून पादशाहाची मंजुरी आणविली. सनद देण्याच्या वेळीं ताराबाईच्या वकिलांनीं पादशाहाच्या वजीरास असें कळविलें कीं, ताराबाईचा पुत्र हा मराठ्यांचा मुख्य धनी आहे, यास्तव सरदेशमुखीची सनद त्याच्या नांवें द्यावी. तेव्हां त्यानें असें ठरविलेंकीं लढाई अंतीं जो मुख्यठरेल त्याच्या नांवें सनद देण्यांत येईल. या मुळें शाहू व ताराबाई यांच्या मध्यें निकराची लढाई होण्याची आयतीच वेळ आली.

त्या वेळीं पर्जन्यकाल होता. उष्ण प्रदेशांत पर्जन्यकाळीं लढाई करण्याची सोय नसते. मराठ्यांमध्यें अशी चाल असेकीं चातुर्मास हातांत तरवार धरावयाची नाहीं. या करितां उभयपक्षांनीं चार महिने लढाईची तयारी करण्यांत घालविले. शाहू महाराजांनीं चंदन, वंदन किल्ल्यावर व ताराबाईनें कोल्हापूर प्रांतीं फौज जमा केली. दसरा होतांच फौजसह शाहूमहाराज कोल्हापुराकडे कूच करिते झाले. मार्गीं वसंतगड घेऊन पन्हाळा व विशाळगड हे दोन बळकट किल्ले घेण्यासाठीं पन्हाळ्याकडे आले. पन्हाळ्यास मोर्चे लाविले. इतक्यांत ताराबाई पन्हाळयाहून शिवाजी व संभाजी यां सह रांगण्यास गेली. शाहूनें पन्हाळगड व पावनगड घेतले. पन्हाळ्यावर ठाणें करून कोल्हापूर प्रांतांत अमल बसविला. नंतर रांगण्यास कूच केलें. रांगण्याची बळकट किल्ल्यांत गणना असून त्या वेळचा तेथील किल्लेदार ही शूर होता. शाहू रांगण्यावर येतांच ताराबाईची तेथें राहण्या-

ची खानी होईना. ताराबाई नुसती लष्करांत असती तरी तिच्या लोकांस दुष्पट वारयाँ आली असती. या वेळीं तर शाहूच्या हातीं किल्ला जाण्याचा फारच कमी संभव होता. किल्ला पाहाडी असून बळकट होता. किल्लेदार शूर असून किल्ल्यावर तयारी मजबूत होती. किल्ल्यास वेढा दिला, तरी पुष्कळ दिवस टिकाव धरण्याजोगी मुबलक सामुग्री होती. तथापि तेथून जाण्याचा निश्चय करून शिवाजी व संभाजी यांस घेऊन रामचंद्रपंत अमात्य सुद्धां ताराबाई मालवणास गेली. महाराजांनीं रांगण्यास मोर्चे लाविले. ताराबाईनीं खेम सावंत आणि कान्होजी आंग्रे यांशीं राजकारण करून त्यांनीं आपले लोक कुमकेस पाठवावे असें केलें. दोहीं कडील फौज कुमकेस आणून रांगण्याचे मोर्चे मारावे असा इरादा धरिला. तिकडून कुमक आली नाहीं तरी किल्लेकऱ्यांनीं पुष्कळ दिवस टिकाव धरिला. रांगणा बिकट जागा असल्यानें लवकर हस्तगत होईना. तेव्हां हल्ला करून किल्ला घ्यावा, असें मनात आणून शाहूमहाराजांनीं हल्ल्याबरोबर जोरानें घोडा चालविला आणि किल्ल्यावर चढूं लागले, तों डोंगरांत घोड्याचा पाय घसरला, त्या वेळीं बरोबर खंडो बल्लाळ चिटणीस व होरवमिरा होते. चिटणीस यांणीं झाडास पाय देऊन घोडा ओढून धरिला आणि होरनमिरा याणें जलदी करून महाराजास घोड्यावरून उतरून घेतलें. यावरून उभयतांवर बहुत संतोष होऊन चिटणीस यांस पन्हाळप्रांतांचें नाडगौडीचें वतन पांच हजार रुपयांचें इनाम करून दिलें आणि होरव मिरा यास गांव इनाम दिला. हल्ला तहकूब करून मोर्चे कायम ठेविले. पुढें पर्जन्यकाळ आल्यामुळें करवीरकरांनीं पन्हाळा येथें छावणीस आले. विशाळगड तालुका खंडो बल्लाळ यांचे बंधु निळो बल्लाळ यांजकडे होता, त्यांस पत्रें गेलीं, तेव्हां ते येऊन भेटले. यामुळें त्यांजकडेच सुभा सांगून तालुका ठेविला.

पर्जन्यकाळ गेल्यावर रांगणा घेण्यास कुच करण्याचा विचार निघाला. परंतु इतक्यांत कांहीं कारणानें चौथ सरदेशमुखी वगैरे शाहूकडे चालविण्याचें झुलफिकारखानानें कबूल केल्यावरून अर्थात शाहूचें वर्चस्व ठरलें. म्हणून ताराबाईस जिंकण्याची अवश्यकता राहिली नाहीं. तेव्हां रांगणा घेण्याचें काम तितकेंच टाकून व प्रांताचा बंदोबस्त करून कोल्हापुराहून सन १७०९चे अखेरीस (शाके १६३२) सातान्यास शाहूची स्वारी निघाली. मार्गीं वारणेच्या तिरीं वडगांव येथें सेनापति मृत्यु पावले.

शाहू सातान्यास गेल्यावर ताराबाई आणखी जमाव करून व वाडीकर सावंत यांची कुमक घेऊन मालवणाहून रांगण्यास आली. पन्हाळ्यास पूर्वीं हवालदार होता त्यासच शाहूनें कायम केलें होतें. त्याशीं भेद करून ताराबाईनें पन्हाळा घेतला, आणि रांगण्याहून पन्हाळ्यास आली. येथें आल्यावर सारें मराठी राज्य हस्तगत करण्याचा नाद टाकून कोल्हापूरच आपलें संस्थान करून राहण्याचा तिनें निश्चय केला.

सन १७१२ (शाके १६३३) सालीं ताराबाईचे पुत्र शिवाजी राजे कांच्या फोड्या येऊन मरण पावले. यावेळीं शिवाजीची पत्नी भवानीबाई तीन महिन्याची गरोदर होती. रामचंद्रपंतानें ताराबाईस कारभारांतून काढून ती व तिची सून भवानीबाई या उभयतांस अटकेंत ठेविलें आणि राजारामाची कनिष्ठ पत्नी राजसबाई इचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून मोठ्या दक्षतेनें राज्यकारभार चालवूं लागला. भवानीबाई गरोदर होती ती प्रसूत होऊन तिला शाके १६३४ सालीं पुत्र झाला, त्याचें नांव रामराजा असें ठेविलें. याचा घात करावा अशी राजसबाईची बुद्धि दिसल्यावरून पुत्र मेला असें बाल्यात्कारी उठवून रामचंद्रपंताचा पुत्र भगवंतराव याच्या अनुमतें बावड्यास वाड्यांत दाई व माणसें देऊन त्या पुत्रास घ-

पडून ठेविलें.

शाहू महाराजांस बहुतेक सरदार मिळाले आणि मराठ्यांचा बहुतेक मुलूख शाहूच्या अमलाखालीं गेला. पन्हाळा, रांगणा, मालवण वगैरे थोडासा मुलूखमात्र संभाजीकडे राहिला. संभाजी राजे आपले बंधु आहेत, त्यांचाही इनमाम चालला पाहिजे, यास्तव शाहू महाराजांनीं संभाजीस सांगून पाठविलें कीं, तुम्ही विचारानें चालल्यास आणखी मुलूख खर्चास नेमून देण्यांत येईल. परंतु तें संभाजीस पसंत न पडून आपणास राज्याचा अर्धा वांटा द्यावा असा त्यानें आग्रह धरिला. तेव्हां महाराजांनीं सांगून पाठविलें कीं, राज्यांत वाटणी देण्याची चाल नाहीं. खर्चापुरती माफक नेमणूक घ्यावी. तें कांहीं न ऐकितां मोठें राज्यकारण करून पराक्रम दाखवावा आणि अर्धा वांटा घ्यावा, असा संभाजीनें निश्चय केला. या वेळीं संभाजीचें सामर्थ्य कितपत होतें तें पाहूं.

**रामचंद्र** पंत अमात्य प्रथमपासून कोल्हापूर करांचे पक्षाचा होता. **शंकराजी नारायण** सचिव यास ताराबाईचा पक्ष स्वीकारल्याबद्दल पश्चात्ताप होऊन त्याणें जलसमाध घेतली. त्याचा पुत्र शाहूस मिळाला. **परशुराम त्रिंबक** यास बंदींतून सोडून त्याचा मुलगा **कृष्णराव** यास शाहूनें प्रतिनिधि पद आणि विशाळगड तालुका दिला; तरी तो विशाळगडीं जातांच त्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारला व पुढें त्याच्याच मुलास कोल्हापूरकरांनीं प्रतिनिधि केलें. **हैबतराव निंबाळकरा** पासून पराभव पावल्यावर **चंद्रसेन** जाधव व **सरजेराव** घाटगे हे उभयतां कोल्हापुरीं आले. त्यांतील सरजेराव घाटगे यांचें वतन (विजापूरकरां पासून मिळालेलें) कागल प्रांतीं होतें, त्याजबद्दल त्यास संभाजीनें नवी सनद दिली, व तेव्हांपासून घाटगे कोल्हापूर करांचा पक्ष न सोडितां मोठ्या शौर्यानें व एक निष्ठेनें त्यांचें हित करण्यास झटले. या खेरीज जेधे

मराठ्यांचें, मुख्यत्वें शाहूचे अनिष्ट चिंतक, तेवढे यांजकडे हो-ते. कारण जर कदाचित् संभाजी व शाहू एक होऊन कलह मिटला, तर मराठे सर्वांस भारी होतील. या करितां मोंगलांचा दक्षिणेंतील सुभेदार व निजाम उलमुल्क हे नेहमीं संभाजीस शाहूशीं लढण्यास शिकवीत. सैन्य व द्रव्य यांची ही प्रसंगीं मदत करीत. कानोजी आंग्रे ही संभाजीकडेच होता.

मोंगलांचा सुभेदार चेयाकुलीचखान, सरजेराव घाटगे यांच्या मध्यस्थीनें संभाजीस दरएक मदत देऊन शाहूचें मुलखांत उपद्रव करवी. मराठ्यांत वैमनस्यें पडून आपणास जो त्यांपासून उपद्रव होत आहे तो कमी व्हावा एतदर्थ निजामतर रात्रंदिवस युक्ति योजीत असे. परंतु बाजीराव बल्लाळ या समयास शाहूचा मुख्य प्रधान झाला होता, त्याचें ब्राह्मणपण व शौर्य या पुढें कोणाचें कांहीं चालेना. निजाम, मोंगलांचा वजीर, आणि संभाजी या त्रिवर्गांची खोड मोडण्यास तो खंबीर होता.

अशी स्थिति असतां संभाजीनें एक राजकारण सिद्ध केलें. जाधवराव सेनापति महाराजांशीं विरुद्ध होऊन मोंगलाईंत (हैदराबादेस) गेले होते. त्यांस आपलेसे करून घेऊन त्यांच्या मार्फत नबाबाशीं (निजामाशीं) बोलणें लाविलें. नबाबास ही गोष्ट इष्टच होती. अनायासें घरफूट होऊन राजकारण आलें आहे, तें उभें करून मसलत करावी, असा संकल्प करून त्याणें असें ठरविलें, कीं संभाजी राजे यांनीं जी मराठी फौज व सरदार जमतील तितके अनुकूल करून घेऊन इकडे यावें, फौजेस खर्च पाहिजे तो राज्याचा वांटा संभाजीस मिळेपर्यंत नबाबांनीं दरमहा द्यावा. संभाजीनीं किल्ले, कोट, ठाणीं आणि सरदार व मुत्सद्दी यांशीं राजकारणें व भेद होतील तितके करून निघून यावें. या प्रमाणें ठरवून कां-

ही फौज जमवून भगवंतगड पंत अमात्य यां सुद्धां निघून संभाजी राजे नबाबा कडे गेले, नबाब पुढें सामोरे येऊन भेटी झाल्या.

या प्रमाणें संभाजीराजे नबाबाकडे गेले, नंतर हैदराबादची चौथाई मराठे घेत त्या पैकीं निम्मा हिस्सा आपला आहे, तो आपणास द्यावा, असें संभाजीनें मागणें केलें. त्यावरून त्यानें शाहू व संभाजी यांजमधील कज्जा मोडे पर्यंत वसूल जप्त ठेवण्याच्या इराद्यानें शाहूकडील सरदेशमुखीचा ऐवज वसूल करणाऱ्या कारकुनांस दूर केलें आणि हा घरगुती तंटा मिटून मराठ्यांचा खरा राजा कोण याचा निकाल होई पर्यंत वसूल मिळणार नाहीं, असें नबाबानें साफ सांगितलें. तेव्हां तोफखाना, जंगी सामान, गारदी वगैरे मानबर तयारी करून जाधवराव वगैरे सरदार व मनसबदार व संभाजीराजे फौजे सुद्धां कुच करून पुढें चालून गेले.

संभाजीराजे यांस विपरीत बुद्धि होऊन, ज्या यवनांचा नाशकरून वडिलांनीं राज्य सोडविलें, त्याच यवनांचा आश्रय करून राज्यास अपाय करूं इच्छितात, हें वर्तमान ऐकून महाराजांस फार वाईट वाटलें. नबाबाचें निवारण करणें प्राप्त आहे, या करितां महाराजांनीं प्रधान व इतर सरदार यांस फौजेच्या तयारीनिशीं येण्यास पत्रें पाठविलीं. संभाजीस शुद्धीवर आणण्याकरितां महाराजांनीं त्यास पत्र पाठविलें कीं, "हें राज्य श्रीचें आहे. साध्य करण्यास महत्व प्रयास लागले. यवन लोकांचा आश्रय करून तुम्हांस कधीं यश येणार नाहीं. तुम्हांस राज्य लोभ फार होता, तर आम्हांस मागून पाठवावयाचें होतें. आम्हांपाशीं दिगांत प्रतापी असे अनेक सेवक लोक आहेत, त्या पैकीं एकास तुमच्या बरोबर देऊन एकादें राज्य साधून दिलें असतें, किंवा पूर्वी महाराजांनीं साध्य केलें त्यांतून तुम्हीं साध्य करून पराक्रम दाखवावयाचा होता, अथवा आम्हीं यवनांनीं घेत-

त्यांचें राज्य सोडवितों तसें तुम्हीं ही सोडवून घ्यावयाचें होतें. आम्हीं सोडविल्या पैकीं निम्मा भाग मागतां हा कोणची बुद्धि ? ”

“ औरंगजेब या बलाढ्य शत्रूनें दोन लक्ष फौज व दोन लक्ष पायदळ घेऊन येऊन संभाजी महाराजांच्या अव्यवस्थेमुळें राज्य हरण केलें, त्या समयीं राजाराम महाराजांनीं चंदीकडे जाऊन फौज व सुभे जमवून दवलत जमाविली. तेथून रात्रंदिवस शत्रूशीं लढाया देऊन त्यांची (मोंगलांची) फौज बुडवून अंमल बसवीत चालले. तेथें प्रसंग आला तेव्हां देवीं घेऊन जातीनें लढाया देऊन त्यांचीं मोठीं स्थळें लुटलीं. राजाराम साहेब शिवाजीचे पुत्र, या करितां आपणासच राज्याभिषेक करून सिंहासनारूढ होणें त्यांच्या हातीं होतें. परंतु तसें न करितां आमच्या ठायीं त्यांणीं कसें लक्ष ठेविलें हें तुम्हांस साक्षात असून हा विचार केला हें फार वाईट केलें. या उपरांतरी यवनाचा आश्रय न करितां हरप्रकारें निघून यावें. तुम्हांस दौलत पाहिजे ती आम्हीं नवीन सिद्ध करून देऊं, किंवा खर्चास अधिक नेमणूक करून देऊं. राज्यांत वांटा देणें हें पुराणांतरींही घडलें नाहीं, करितां ती बुद्धि धरूं नका. ”

“ सेनापति सेवकलोक असून तुटाई केली व हरामखोरी करून महाराष्ट्रराज्य व धर्म सोडून यवनास शरण गेले. तेही रामदेवराव जाधव यांच्या कुळांतील असून त्यांनीं धर्म सोडिला व निमकहराम होऊन या मसलतीस मिळाले. त्यांची अनुकूलता करून सेवकलोकांस व यवनांस शरण गेलां हें फार गैर केलें. ” असें पत्र आलें. परंतु संभाजीस ही गोष्ट अगदीं रुचली नाहीं, व केल्या मनसुब्याच्या अभिमानास पडले. निजामही अभिनिवेशाच्या विद्यमानें चालणें ठरून पादशाहाशीं नड आल्या असतां, मराठ्यांचें गृहछिद्र हातीं घेऊन बिघाड करणें गैर आहे, हा विचार न करितां सर नि-

हिल्या प्रमाणें संभाजी सह पुढें चालून आले.

त्या समयीं महाराजांनीं पंतप्रधान, प्रतिनिधि, सेनापति, सर लष्कर इत्यादि सरदारांस फौजेची तयारी करून निघून येण्यास पत्रें पाठविलीं, व आपण जातीनें लढाईस जाण्याचा इरादा धरिला. तेव्हां अष्टप्रधान व सरदार यांनी विनंति केली, कीं आम्ही सारे सेवक असतां महाराजांनीं स्वतः निघावें अशी कांहीं मातबर मसलत नाहीं. खासा पादशाहा दिल्लीहून चालून आले असतां ही स्वामीस निघणें नलगे, अशी आमची उमेद आहे. मग या मसलतीचा हिशेब काय आहे? पादशाहींतील एक सुभेदार नबाब चालून आले व त्यांत संभाजी राजे जाऊन मिळाले म्हणजे मोठी गोष्ट सिद्ध केली असें नाहीं. एका सेवकास आज्ञा केली असतां तो कार्य करून येईल. ही सर्वांची उमेद पाहून महाराजांस बहुत संतोष झाला, आणि सर्वांनीं तयारी करून निघावें अशी त्यांणीं आज्ञा केली. मोंगलांशीं लढाई, म्हणून तोफखाना तयार करून दारूगोळ्यासह बरोबर घेतला; पायदळ, स्वार, बाजारबुणगें घेऊन प्रधान व सरदार निघाले. सर्वांनीं एक मतानें चालून **बाजीराव प्रधान** यांच्या मसलतीनें चालावें असें महाराजांनीं सांगितलें.

बाजीराव प्रधान व सरदार मोंगलांच्या मोकाबिल्यास पुढें गेले. त्यांनीं असा विचार केला, कीं तूर्तच लढाई देऊन माणूस व दारू गोळा खराब करूं नये. भोंवतें हिंडून गोळमाल देऊन त्यांचा मुलुख मारून धुंदी करावी. घेरून, धरून, जेर करून व जागां जागां घालवून लढाई द्यावी. असा विचार करून भोंवताली मुलुख मारून जाळून फन्ना करूं लागले. रसद, दाणा, गल्ला येणार त्या वाटा रोखून धरून मारूं लागले. मोंगलांच्या लष्करांत महागाई पडली. मोठी मजल करणें राहिलें. मोठी मजल केली असतां भोंवत्या मराठ्या फौजेच्या टोळ्या पसरून बुणगें

व कधीं कवाड मारूं लागले. कोणत्या समयीं कोणी कडून येतील याचा नियम लागेना. अशा रीतीनें मोंगलांस बाजीरावानें जेर केलें, तेव्हां निजाम, जाधवराव व संभाजीराजे यांस बोलले कीं, मराठी फौज लढाई न देतां मोड झाला तरी त्याचा हिशोब न धरितां फिरून पळून जाऊन लढाई देते, मुलुख मारून त्यांणीं रसद बंद केली. व आम्हांस घाबरें केलें. राजे व तुम्ही मराठे असून त्यांच्या लढाईच्या रीती तुम्हांसी माहीत. तुम्हीं उभयतां त्या प्रमाणें आपल्या फौजेच्या टोळ्या करून त्यांच्या मुलखांत बसाल, मुलुख माराल, लढाई देऊन ठाणीं घ्याल, आणि त्यांच्या प्रमाणें धुंदी कराल, असें समजून तुमच्या भरंवशावर ही मसलत केली, आणि शाहूशीं बिघाड केला. परंतु अद्यापि तुमच्या हातून तसें कांहीं झालें नाहीं. त्यास या उपरी तरी या प्रमाणें करून त्यांस घाबरें करावें. आणि रसद आणून लष्करांत पावती करावी. तेव्हां जाधवरावांनीं उत्तर केलें कीं, आम्हांपाशीं बहुतकरून मोंगल लोक आहेत. यामुळें धावणी होत नाहीं. संभाजीराजे यांणीं उत्तर केलें कीं, फौज बाहेर रवाना करावी; इतकी आम्हांपाशीं भारी जमाव नाहीं. हीं उत्तरें ऐकतांच नबाबाची हिम्मत गेली. त्यानें विचार केला कीं, राजारामाचे बेटे राजारामासारखे शूर व मसलती असतील असें समजून यांच्या भरंवशावर इतकी मोठी मसलत आरंभिली, आणि शाहूशीं बिघाड केला; हें फार वाईट केलें. या उपर पुढें जाणें ठीक नाहीं म्हणून कूच करून मागें सरले. तरी बाजीराव व त्याची फौज आघाडी पिछाडी मारूं लागले. तेव्हां एक दिवस मोठी मजल करावी, असा विचार करून मागें पुढें फौज व तोफा ठेवून नबाब निघाले. तेव्हां बाजीराव फौजेच्या टोळ्या करून त्यास घेरून चालले. संधी साधून आघाडी मारून हत्ती घोडे पाडाव केले. नंतर जवळ

पास पाणी नाहीं अशी जागा पाहून चौकी करून त्याग करून पिछाडी मारिली. पुढें चालणें अवघड पाहून नवाबांनीं चोहोंबाजूनीं मराठ्यांवर तोफांची मारगिरी केली. तेव्हां मराठे दौड करून लांब जाऊन उभे राहिले. मारगिरी बंद होऊन पुढें नवाब निघाले कीं, पुनः येऊन घेरूं लागले. या प्रमाणें नवाब अगदीं जेरीस आले. पुढें चालणें होईना. मुक्काम करावा तर पाणी नाहीं. या मुळें नवाबांनीं वकिला बरोबर सांगून पाठविलें, कीं लढाई तहकूब करावी, पाण्यासमीप आम्हांस मुक्काम करूं द्यावा, पाहिजे तर मराठी फौज भोंवती ठेवावी, आणि लढाईचें बोलणें करावें. तेव्हां दोन मानकर असाम्या आम्हांकडे पाठवून द्याव्या, म्हणजे तुम्हांस पाणी व वाट देऊन मुक्काम करवितों आणि आम्ही ही करितों असें उत्तर पाठविलें. त्या प्रमाणें नवाबानें असाम्या पाठविल्या. नंतर मुक्कामास पाणी जागा नेमून दिली, आणि नवाब जाऊन उतरल्यावर त्यांस घेरून मागें पुढें आपली फौज उतरविली. तहाच्या तीन शर्ती प्रधानांनीं सांगून पाठविल्या, त्या अशा:— (१) संभाजी राजे महाराजांचे बंधु आपणाकडे आले आहेत त्यांस आम्हांकडे पाठवावें. त्यांज विषयीं महाराजांकडे विनंति करून वाजवी असेल तें करून देऊं. (२) स्वराज्याचा अंमल तुमचे तालुकेदार कोठें कोठें सुरळीत देत नाहींत. त्यास राहिलेल्या ऐवजाचा फडशा करून द्यावा आणि पुढें सुरळीत चालावें. (३) आमचा अंमल नीट चालण्या करितां आम्हीं मुलूख व ठाणीं मागूं तीं दरोबस्त द्यावीं. शेवटल्या दोन शर्ती नवाबांनीं मान्य केल्या आणि सांगून पाठविलें कीं, संभाजी राजास आपल्या स्वाधीन करणें आमच्या इजतीस लायख नाहीं. आम्ही त्यांस कांहीं लोक बरोबर देऊन सरंजामासुद्धां पन्हाळ्यास पोंचवून देतों. त्यांस वाटेंत कांहीं उपद्रव न करितां तेथें गेल्यावर घरगुती मजकूर तु-

मचा पाहिजे तसा समजून घ्यावा. ही गोष्ट बाजीरावानें मान्य करून तहनामा ठरला.

संभाजी राजे पन्हाळ्यास येऊन पांचल्यावर त्यांस फार वाईट वाटून केल्या गोष्टीचा फार पश्चात्ताप झाला. आपण यवनांच्या आश्रयास गेलों, निमकहराम जाधवराव याच्या संगतीस लागलों, त्यांणीं जातीस बट्टा लावण्याचें योजिलें. आणि गोष्ट दैवानुरूप झाली. या उपर महाराजांच्या विरुद्ध कोणताही विचार न करितां महाराजांची आज्ञा मान्य करून रहावें हा उत्तम पक्ष आहे असा संभाजीनें निश्चय केला.

उदाजी चव्हाण हा मोठा पुंड होता. तो अथणी प्रांतांत असे. शिरवळच्या ठाण्यांत राहून चव्हाण चौथाई या नांवाची पट्टी आसमंतात घेऊन पुंडपणा करी. हा आपणास संभाजीचा आश्रित आहें असें म्हणवी. परंतु तो त्यांसही फारसा मोजीत नसे. बाजीराव फौज घेऊन उत्तरेस गेला ही संधी साधून हा चव्हाण वारणेच्या तिरीं येऊन मुलूख लुटूं लागला. म्हणून त्याचा पुंडपणा मोडण्याकरितां त्याजवर श्रीपतराव प्रतिनिधि यास फौज व सामान देऊन शाहू महाराजांनीं रवाना केलें. प्रतिनिधि चालून येतांच संभाजी राजे आणखी वीरश्रीत येऊन सामान व फौज घेऊन चव्हाणाच्या कुमकेस गेले. तेव्हां जी लढाई झाली तींत चव्हाण व राजे यांचा मोड होऊन मडे उभयतां पळून गेले. कबिले व बुणगें लुटलें गेलें. डेरे होते त्यांत ताराबाईसाहेब व राजसबाई साहेब व संभाजी महाराजां-

---

* जाधवरावाच्या नाटकशाळेच्या पोटीं पुत्र झाला होता. त्यास राजे यांणीं ताटांत घेऊन गोत पतकरून मराठे यांच्या सोयरिका कराव्या या विषयीं संभाजीशीं त्याणें बोलणें लाविलें. तेव्हां ती गोष्ट साफ घडावयाची नाहीं असें संभाजीनें सांगितलें

चे सर्व कबिले सांपडले. संभाजी महाराजांच्या पाठीस लागून शिर्किवानीं त्यांस पन्हाळ्यावर हांकून दिलें. व सरकारी लवाजमा ठेवून बंदोबस्त राखिला. या प्रमाणें जय संपादून त्या सर्वांस महाराजांच्या भेटीस घेऊन गेले. महाराजांस हें वर्तमान कळतांच पुढें सामोरे जाऊन या योगें तरी उभयतां मातोश्रींच्या व इतरांच्या भेटी झाल्या असें म्हणून त्यांचा बहुत सत्कार केला. वस्त्रें व अलंकार देऊन मेजवानी केली, आणि जावयाची मर्जी असल्यास जावें असें सांगितलें. तेव्हां नागबाई बोलली, कीं कोठें हीं कैदेंत रहावयाचें. त्यास ते व तुम्ही मला सारखेच आहां. तुम्हांपाशींच राहातें. त्या वरून लवाजिमा व खर्च नेमून देऊन सातारकिल्ल्याखालील वाडा नीट करून तेथें नागबाईस ठेविलें. वरकड सर्वांचा बहुमान करून कारकून व चाकरीचे लोक, सरंजाम व खर्चास देऊन व शिवाय कांहीं पागा व फौज बरोबर देऊन त्यांस संभाजीकडे पावती करून दिलीं. (शके १६५०).

या प्रमाणें चोहों कडून अपेश येऊं लागलें तेव्हां अर्ध राज्य मिळविण्याचा नाद सोडून शाहू महाराजांशीं सख्य करून असावें हा उत्तम पक्ष आहे अशी आणखी संभाजीची खात्री झाली. जिजाबाईसाहेब यांणीं ही बहुत प्रकारें सांगितलें, कीं महाराजांकडे वकील पाठवून तह करावा, व त्यांशीं स्नेहानें असावें. त्यावरून संभाजी राजे यांनीं बाबाजी प्रभु पारसनवीस व चिटको प्रभु चिटणीस यांस महाराजांकडे वकिलीस पाठवून कळविलें कीं, “ आम्हांस खर्चास मुलूख नेमून पन्हाळावगैरे प्रांत व त्यांतील स्थळें व किल्ले निर्वेध चालवावे, आणि स्वारी शिकारी करण्यास कांहीं खंडणीचा प्रांत नेमून द्यावा. या उपर महाराजांविरुद्ध कांहीं एक न करितां महाराज आज्ञा करतील त्या प्रमाणें चालूं. ” तेव्हां महाराजांनीं सांगून पाठविलें, कीं तुम्ही बंधूच आहां. तुमची आमची भेट व्हावी, म्हणजे तुमचा सर्व मजकूर

गेकून तुमच्या मनोदयानुरूप करून दिले जाईल. परंतु सफाई भेट झाल्यावांचून कांहीं होणार नाहीं. आम्ही त्या मानाजवळ येतों, तुम्हीं निकडून यावें. तुम्हास बोलनाश्वास व विश्वास आणण्यास पुढें मातबर सरदार रवाना करितां. हें संभाजीनें मान्य केलें. त्या प्रमाणें शाहू महाराजांची स्वारी सातान्याहून निघून उंब्रजेस मुक्कामास आली. या भेटीची हकीकत कोल्हापूर -सरी रवानी लिहिल्याप्रमाणें आढळते.

“ तह झाला त्या समयीं प्रथमस्वारी साधारण नाम संवत्सरीं (शके १६५२), सन इहिदे सल्लासीन (फसली ११४०) माघ मासीं (इ. स. १७३०), सातान्याहून श्रीमन्महाराज शाहू राजे यांजकडून श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांसी न्यावयास आले, व सांवतिनी श्रीपतराव प्रतिनिधि व नारोराम मंत्री व आबाजी पुरंधरे पेशव्यांचे मुतालीक व कृष्णाजी दाभाडे व निंबाळकर व पांढरे व कित्येक नामीनामी सरदार किल्ले पन्हाळ्याचे मुक्कामीं फौजें सुद्धां आले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति साहेबांस सर्वांनीं नजर व रुमाल व जडाव जवाहीर हत्ती घोडे नजर करून सलाम करून जोहार केले, त्या उपरी पद्धती प्रमाणें चादरा त्यांसी देऊन विडे होऊन ते किल्ल्याखालीं उतरले. उपरांतिक महाराज स्वामींची स्वारी किल्ले खालीं होऊन देवाळें तावडी येथें मुक्काम जहाला. तेथून कूच दरकूच जाऊन वाठारावरी मुक्काम केला. शाहू राजे उंबरज तर्फ होते. श्रीपतराव व नारोराम मंत्री वाठाराहून पुढें उंबरजेस गेले आणि शाहू राजे यांसी करहाडापुढें जखीण वाडीचे नजीक सामोरे घेऊन आले. त्याजबरोबरी संपूर्ण सरकारकून व नामीनामी सरदार वगैरे फौज लक्ष पावेतों, जखीण वाडीहून रावताची कौरगिरी बाहेर पावेतों म्हणतां दोन्हीं सैन्यें मिळून दोन लक्ष पावेतों जथ जाहला. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्र-

र्यंत सोन्याचे अंबारीनिसार होऊन आले, समागमें सरकारकून व सरदार व नामीनामी स्वारी दहा पांच हजार पर्यंत होते. कोरेगिरहून मुजरे घेत स्वारी जहाली. श्रीमन्महाराज उभयतां बागाचे रवाशी दर्शनी उभे राहून मध्यें लोक फरक करून तनवा टाकिल्या नामीनामी लोकांनिशी शाहूमहाराज घोड्यावरी स्वार होऊन आले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींची स्वारी हत्तीवरी होती ते घोड्यावरी स्वार होऊन तनवा बिछावल्या होत्या तेथें येऊन उभयतां महाराज घोड्यावरून उतरले. परस्पर सन्निध येऊन रोन्यना होऊन शाहू महाराज यांचे पायांवरी डोई श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांणीं ठेविली. महाराजांनीं परस्परें उभयतां बंधूनीं आलिंगनें केलीं. त्यावेळेस मोहोरा व रुपये व सोन्याचीं फुलें व रु. फुलें उडविलीं. परस्पर सत्कें झाले ते समयीं तोफेची सरबत्ती व नानाप्रकारचीं वाद्यें व शाहाजानें वाजवून आनंद झाला. फाल्गुन शुद्ध ३ मंदवासरीं दोन प्रहरा या प्रमाणें भेटीचा समारंभ झाला. तदनंतर शाहू महाराज यांणीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांचा हात धरून उभयतां बंधू एक अंबारी मध्यें हत्तीवरी स्वार झाले खवासखान्यांत दोन मोरचलें घेऊन संभूसिंग जाधवराव बसले संपूर्ण फौजेच्या कोरेगिरी मध्यें जोहार घेत कऱ्हाडपर्यंत गेले. कऱ्हाडानजीक कृष्णातिरीं मुक्काम आला. दक्षण तिरीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींचा मुक्काम; उत्तर भागीं श्रीमन्महाराज राजश्री शाहू राजांचा मुक्काम होता, त्या डेरिया पर्यंत उभयतां महाराज गेले. त्या वेळेस शाहू महाराज यांणीं ज्या हत्तीवरी स्वारी होती त्या हत्तीस व दुसऱ्या हत्तीस व दोन शृंगारिलेले घोडे एक रुप्याचे जिनाचा व एक जरिबादली जिनाचा व दुसरबादली व तडजवाहीर व ढाल तरवार या प्रमाणें दिलें श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति नदी आ-

चीकडे आपले डेरीयाचे मुक्कामास आले. कन्हाडाहून उभयतां बंधू महाराजांची सडी स्वारी जहाली. त्यांणी श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतीस हजार रुपये मलका करून बादली-दुस्त व जडजवाहीर व हत्ती व रंगविलेले घोडे बादली जिनाचे दिले. शाहू महाराजांच्या आग्रहाने उभयतां ऐक्यता असून सातारीयासी शिमगी पौर्णिमा व्हावी म्हणान ममता युक्त बोलून श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांसी घेऊन सातारीयासी गेले. त्या समयीं संपूर्ण शहरचे लोक बाहेर येऊन उभयतां बंधूंचा समारंभ पाहून सत्के व खैरात बहुत जहाली. आणि साताऱ्यास पेशव्याचे वाड्यांत मुक्काम जहाला. दोन महिने मुक्काम होता. संपूर्ण सरकारकून व नामी नामी सरदार यांणी श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज यांसी मेजवानी केली. नऊ हत्ती व बाळास घोडे व जडजवाहीर व दुस्त असे बहुमान आले. शाहूमहाराज यांणी रवानगी समयीं हत्ती व रंगविलेले घोडे सामानसुद्धां व ढाल तरवार व जडावाचा खंजीर व दुस्त बादली दिली व रोख दोन लक्ष रुपये दिले आणि रवानगी केली. वरोबर सरकारकून व फत्तेसिंग भोसले फौजनिशीं देऊन श्रीमन्महाराज यांची स्वारी किल्ले पन्हाळीयासी पावती केली. शाहू महाराज चार कोस घालवीत येऊन माघारे सातारीयासी गेले; त्या वेळेस तहनामा झाला त्याची यादी खाली दिली आहे."

"तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांसी प्रति राजश्री शाहू राजे यांणी लिहून दिल्हा सुरुसन इहिदे सल्लासीन मय्याव अलुफ. फ० ११४० छ १६ साबान, विरोधिकृत संवत्सर (शाके १६५३ इ० स० १७३० मार्गरव २५ माहे मे) चैत्र वद्य २ विलपडील

कलम १. इन्नारवा वारूण महाल तहत संगम दक्षिण तीर कुल हुतर्फी मुलूख दरोबस्त देखील ठाणी व किल्ले तुम्हांस दिले असत.

कलम २. तुंगभद्रेपासून तहत रामेश्वर देखील संस्थानें निम्मे आम्हांकडे ठेवून निम्मे तुम्हांकडे करार करून दिली असत.

कलम ३. किल्ले कोपळ तुम्हांकडे दिल्हा त्याचा मोबदला तुम्हीं रत्नागिरी आम्हांकडे दिला.

कलम ४. वडगांवचें ठाणें (किल्ला) पाडून टाकावें.

कलम ५. तुम्हांशीं जे वैर करितील त्यांचें पारिपत्य आम्हीं करावें. आम्हांशीं वैर करितील त्यांचें पारिपत्य तुम्हीं करावें. तुम्हीं आम्हीं एक विचारें राज्याभिवृद्धि करावी.

कलम ६. वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिणतीर तहत निवृत्ती संगम तुंगभद्रा पावेतों दरोबस्त देखील गडठाणीं तुम्हांकडे दिली असत.

कलम ७. कोंकणप्रांत साळशी पलिकडे तहत पंचमहाल आंकोलें पावेतों दरोबस्त तुम्हांकडे दिले असत.

कलम ८. इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नये, तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नये.

कलम ९. मिरजप्रांत विजापूर प्रांतीची ठाणीं देखील अथणी तासगांव वगैरे तुम्हीं आमचे स्वाधीन करावीं.

येकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदरहू प्रमाणें आम्हीं चालूं, यास अंतराय होणार नाहीं. (मोर्तब)

[illegible] तहनामा अस्सल पत्रावरून घेतला आहे. या पूर्वी इ. स. १७२७सा-

या प्रमाणें तहनामा ठरून सुमारें बारहजार चौरस मैल क्षेत्राचा व २८ लक्ष रुपये वसुलाचा मुलूख संभाजीस देऊन त्याणें राज्य स्वतंत्रपणें चालवावें असें ठरलें, आणि या बद्दल आज्ञापत्र* ही गेलें. याच्या सीमा उत्तरेस वारणा, दक्षिणेस तुंगभद्रा व पूर्वेस कृष्णा अशा होत्या.

कोल्हापूरचें राज्य स्वतंत्र झाल्यावर संभाजी महाराजानीं अष्टप्रधान नेमिले व त्यांस सरंजाम दिले. भगवंतराव परशुराम त्रिंबक यांचे नातू यांस विशाळगडची जहागीर देऊन प्रतिनिधि पद दिलें. रामचंद्र निळकंठ यांस बावड्याची जहागीर देऊन पंत अमात्य हा किताब दिला. प्रसिद्ध संताजी घोरपडे यांचे पुतणे शिधोजीराव यांस कापशीची जहागीर देऊन सेनापति पदाचीं वस्त्रें दिलीं. याच प्रमाणें मंत्रि, सुमंत व न्यायाधीश नेमिले. यांच्या मार्फत मुलुखाचा कारभार चालत असे. खेड्यापाड्यांनीं दिवाणी फौजदारी काम पंचांच्या मार्फत चाले. अष्टप्रधानां शिवाय आणखीं शेंकडों सरदारांस क्रमाक्रमानें सरंजाम देण्यात आले. या सर्वांनीं नियमित फौज ठेवून आपल्या तनख्याचा बंदोबस्त राखावा आणि कारण पडेल तेव्हां स्वारीशिकारीस महाराजांकडे फौज घेऊन यावें, असा नियम ठरविला. आणि थोरले शिवाजीमहाराज यांच्या कानूजा त्याप्रमाणें वहिवाट चा-

---

लीं शाहू व संभाजी या उभयतां मध्यें तह झाला असून त्याची ही असल प्रत दप्तरीं आहे. त्या तहाची नक्कल पुरवणींत दिली आहे. (नं.१०पहा) वारणेच्या पलिकडील मुलुखावर प्रतिनिधींचा अम्मल असल्यानें अम्मल बजावणी झाली नाहीं. परंतु ग्रँट डफ्‌ साहेबांनीं जो इतिहास लिहिला आहे त्याशीं याची संगती जुळत नाहीं.

* नं. ७, पहा.

[library stamp]

नू केली.*

या प्रमाणें अष्टप्रधान व सरदार यांच्या नेमणुका होऊन त्यांचा अंमल प्रांतांत बसला, तेव्हां कोल्हापूरच्या राज्यास बरें-च तेज व वजन आलें. कोल्हापूरचा मुलूख एकीकडे असल्यानें मुलखांतील सर्व लोकांची जूट व एक वाक्यता रहाण्यास फार अ-नुकूल झालें. कोल्हापूरचे सरदार सर्वदा हद्दीवरील तंट्यांत गुं-तत असल्यानें पश्चिमेकडील इतर संस्थानिकांच्या तंट्यांत व मस-लतींत शिरण्यास त्यांस फावत नसे व इच्छाही होत नसे.

शककर्ते शिवाजी महाराज यांच्या अस्सल वंशांतील को-ल्हापूरचे राजे असल्यानें त्यांजविषयीं लोकांत अत्यंत पूज्य बुद्धि असे. कारभारही अष्टप्रधान चांगल्या रीतीनें चालवीत. सं-भाजी कोणत्याही लुटीच्या किंवा दुसऱ्या स्वारीस जाण्यास सर्व काल तत्पर असे. परंतु आपला बहुतेक रिकामा वेळ नाच त-माशांत घालवी. व बराच पैसा व्यसनांत व ऐष आरामांत उधळीत असे, असाही संभाजी राजावर कित्येक ठिकाणीं दोष दिलेला आ-ढळतो.

मुलुखाची रचना ही राज्याचें स्वातंत्र्य रहाण्यास फार उप-योगी पडली. पश्चिमेस सह्याद्रिपर्वत असून जागजागीं हद्दीव-र बिकट व घोर अरण्यें होतीं. त्यांतून फौजवगैरे आणण्यास अत्यंत मुष्कील पडे. घांटमाथा बिकट व दुर्धर नदी प्रमाणें होता, आणि ठिकठिकाणीं पन्हाळा, विशाळगड, बावडा, रांगणा, भुदरगड, सामानगड असे पहाडी किल्ले असू-न यांची गणना हिंदुस्थानांतील बळकट किल्ल्यांत होत असे, आणि त्यांची मराठ्यांनीं बरीच सुधारणाही केली होती. सर्व किल्ल्यांत गोडपाण्याचे झरे असून पाण्याचा मोठा साठा होण्या-

---

* पुरवणी नंबर १.

जोगे तलाव होते; तसेंच धान्याची मोठमोठीं कोठारें भरलेलीं ठेवीत असत; सर्वांवर थोडी बहुत फौज असे, आणि ती फौज किल्ल्याच्या दुर्धरतें-मुळें शत्रूच्या बऱ्याच मोठ्या फौजेस सहसा दाद देत नसे; किल्ला हस्तगत करण्यास लांचलुचपतीचा लोभ दाखवून एखादी मसलत करावी लागे, किंवा धान्याचा दुष्काळ पडे पर्यंत वेढा देऊन बसावें लागत असे.

प्रत्येक किल्ल्यावर रक्षणाकरितां गडकरी नेमिलेले असत. ते भिन्न भिन्न जातीचे होते, या मुळें कट करून कांहीं बखेडा करण्यास जागा नसे. किल्ल्यानजीक गडकऱ्यांस वंशपरंपरा चालणाऱ्या जमिनी दिलेल्या होत्या, त्या जमिनीपासून महाराजांस कांहीं स्वामित्व पोंचे, गडकरीलोक गडास आपणास पोटास घालणाऱ्या आई प्रमाणें समजत.

जासुदाचें काम करण्यास महार, मांग, रामोशी वगैरे प्रत्येक गांवीं असत; आणि शिवाय शेत सनदी गांवांचे मराठे शिपाई गांवो गांव होतेच. यांस नोकरीकरितां जमिनी दिलेल्या असत. लहानपणापासून त्यांस तरवार मारण्यास व बंदूक उडविण्यास शिकवीत. यामुळें हे देशावर गनीम आला असतां त्याच्या निवारणार्थ सरकारची सूचना येतांच मोठ्या खुषीनें व आनंदानें एकत्र जमत. या प्रमाणें मराठेशाईच्या बहुतेक आरंभापासून थोड्या दिवसांची सूचना मिळतांच १,०००पर्यंत फौज जमवितां येत असे.

इ. स. १७३४ (शके १६५६ फ. ११४४) साली संभाजी महाराज व जिजाबाई राणीसाहेब या उभयतांची स्वारी जेजूरीस गेली होती, तेथून प्रतापगडावर गेली व तेथें सप्तरात्र मुक्काम झाला, तेथून महाबळेश्वरी गेली व तेथें सात दिवस राहिली, तेथून स्वारी सातान्यास गेली. त्यावेळीं शाहूमहाराज सर्व सरदार मानकरी सहवर्तमान [illegible] सामोरे आले होते. भेटी

होऊन स्वारी शहरांत गेली व पंतप्रधान यांच्या वाड्यांत उतरली. सातान्यास दोन महिने मुक्काम झाला. नंतर श्रीशिरवगास जाऊन परत येण्यास निघाली. शाहू महाराज कृष्णातीर नजीक बोरगांव पर्यंत पोंचवावयास आले होते. याप्रमाणें सन १७४० (शके १६६२ फ. ११५०) सालीं संभाजी व जिजाबाई यांची स्वारी पुनरपि सातान्यास गेली होती.

शाहू महाराज सन १७४९ इसवी सालीं निवर्तल्यावर बाळाजी बाजीराव पेशवे यांणीं मराठी राज्याचा सर्व अधिकार बळकाविला. त्यावेळीं संभाजी महाराजांस पूर्ववत्प्रमाणें सर्व चालवूं असा करारनामा* लिहून दिला.

सन १७५४ सालीं बाळाजी बाजीराव आणि सदाशिवराव भाऊ सावनूरकर, नवाब यांच्या प्रांतांत लढाईस गेले. त्यावेळीं उभयतां करवीरीं संभाजी महाराजांच्या भेटीस आले होते. त्या प्रसंगीं बाळाजी बाजिराव पंडित प्रधान यांणीं संभाजी महाराजांस विनंति करून सदाशिव चिमणाजीस प्रधान पदाचीं वस्त्रें देवविलीं. आणि पारगड, भीवगड, सामानगड, वल्लभगड आणि कलानिधि हे किल्ले देवविले. तसेंच कर्नाटकांतील चौथाईचा जो ऐवज महाराज सरकारांत दरसाल यावयाचा तो प्रधान यांणीं संस्थानिकांकडून वसूल करून करवीर सरकारांत दरसाल देत जावा असाही करार ठरवून घेतला. आणि महाराजांची सदर करारप्रमाणें ऐवज आपल्याकडे देणे विषयीं ताकीद पत्रें घेऊन पुढें सावनुरास गेले. सावनूरकरांशीं लढाई करून अखेर सल्ला झाल्यावर परत जातेवेळीं ही प्रधान करवीरीं उतरले होते. आणि पुण्यास बरोबर संभाजी महाराजांची पत्नी जिजाबाई यांची ही स्वारी गेली होती. या प्रसंगीं करवीरकरांस आपल्या

---

* नं ६ पहा.

कबज्यांत आणणे विषयीं पेशवे यांचा यत्न बराच सफल झाला, हें पुरवणींत या भेटीची हकीकत व नाकीद पत्रें दिलीं आहेत त्यावरून समजेल.*

स्वतंत्र झाल्यापासून ३० वर्षे राज्य करून शके १६८२ राज्याभिषेक शक ८७ मार्गशीर्ष शुद्ध १२ रोजीं (इ. स. १७६० तारीख २० माहे डिसेंबर) ठाणें वडगांव येथें मरण पावले. प्रेत करवीरीं आणून पंचगंगा तिरीं सार्थक केलें. पुढें त्या ठिकाणीं त्यांचें देवालय बांधण्यांत आलें.†

---

* नंबर ७, ८, ९, पहा.

† संभाजी महाराजांच्या कारकीर्दीची मिळावी तशी हकीकत कोल्हापूर दप्तरीं अद्याप आढळांत आली नाहीं. या मुळें माहिती त्रोटक दिलेली आहे.

# प्रकरण २.
## शिवाजी महाराज.
### सन १७६२–१८१२.

संभाजी महाराज यांचीं एकंदर ७ लग्नें झालीं होतीं. सात राण्यांचीं नांवें येणें प्रमाणें होतीं.

(१) आनंदीबाई, बुंदकर घाटगे यांची कन्या.

(२) उमाबाई, खानवेलकर यांची कन्या.

(३) सकवार बाईसाहेब.

(४) जिजाबाई, तोरगलकर शिंदे यांची कन्या.

(५) सुंदराबाई, तुरंबेकर घाटगे यांची कन्या.

(६) दुर्गाबाई, मोहिते यांची कन्या.

(७) कुसाबाई, मानगावकर घाटगे यांची कन्या.

इतक्या राण्या असून संभाजीस पुत्रसंतति नव्हती. आणि संभाजी महाराज हे खुद्द शिवाजी महाराजांचे शेवटले वंशज होत. संभाजी महाराज वारले त्यावेळीं कुसाबाई राणीसाहेब गरोदर होती. कुसाबाई प्रसूत झाली,* परंतु पुत्र झाला नाहीं. पुत्र झाला नाहीं, तर मालोजीचा कनिष्ठ पुत्र शरफजी यांच्या वंशांतील शाहाजीराजे इंदापूर परगण्यांत खानवट गांवीं होते; त्यांचा ज्येष्ठ पुत्र माणकोजी यास दत्तक घ्यावा अशी संभाजी महाराजांनीं अंतकाळीं आज्ञा केली होती.

---

* कुसाबाईच्या बाळंतपणास जिजाबाई राणीनीं आनूबाईसाहेब इचलकरंजीकर यांस पुण्याहून बलाविलें होतें. परंतु आनूबाईस करविरीं येण्यास पेशव्यांनीं निरोप दिल्हा नाहीं. त्यावरून आनूबाईस जिजाबाईनीं पाठविलेलें पत्र दिलें आहे, त्यावरून आनूबाईस न पाठविण्याचें कारण, व करवीर राज्याविषयीं पेशव्यांचे मनोगत स्पष्ट कळतात. नं॰ ११ पहा.

म्हणून संभाजीची पत्नी जिजाबाईसाहेब (वाडा चार)* यांणीं अष्टप्रधान, कामगार, सरकारी कारकून व सरंजामी यांस बोलावून आणून कळविलें कीं, महाराजांनीं कैलासवास केला, पुत्र संतान तर नाहीं, यास्तव कैलासवासी महाराजांच्या आज्ञेनुरूप शरफजी† च्या वंशांतील शहाजीराजे खानवटकर यांचा पुत्र माणकोजी यास दत्तक घेऊन गादीस मालक करावा, असा मनोदय आहे. तर तुमचे सर्वांचे विचारास कसें येतें तें सांगावें. त्यां वरून या गोष्टीस सर्वांची संमति पडली. तेव्हां आईसाहेबांनीं खानवटास कारकून व वकील यांजबरोबर पत्रें रवाना केलीं. कारकून व वकील यांनीं खानवटकर यांस भेटून पत्रें दिलीं, व मजकूर कळविला, आणि आपला वडील पुत्र द्यावा अशी विनंति केली. तेव्हां खानवटकर यांणीं उत्तर दिलें कीं, असें करण्यास आम्हाकडून हरकत नाहीं; परंतु पंतप्रधान पेशवे यांची या गोष्टीस सल्ला पाहिजे; सबब त्यांचें पत्र आम्हांस आणावें, म्हणजे चिरंजिवास हवालीं करितों. कारण आईसाहेब आहेत तों पर्यंत राज्य चालवावें, आणि त्यांच्या पश्चात् सातारा व कोल्हापूर

* महाराजास जितक्या बायका असत त्यांस रहाण्यास निरनिराळे महाल किंवा वाडे असत; व त्या वाड्यांस व त्यांत रहाणाऱ्या राण्यांस ही वाडा एक, वाडा दोन, अशीं नांवें देत.

† माणकोजी विषयीं एका बखरींत अशी गोष्ट लिहिली आहे:—माणकोजी लहान असतां त्यास सोप्यांत निजविलें होतें. जवळची माणसें कामानिमित्य घरांत गेलीं. तों एकाएकीं एक मोठा नाग येऊन मुलाचे मस्तकावर फडा धरून डुलत बसला. इतक्यांत बाहेर माणसें येऊन पहातात तों सर्प येऊन बसला आहे. गलबला होतांच सर्प निघून गेला. हें ऐकण्यांत आल्यावरून हा मोठा दैववान होईल म्हणून तोच दत्तक घ्यावा, अशी शाहू महाराजांनीं आज्ञा केली होती.

ही दोन्ही राज्यें एकत्र करावीं असें प्रधानांचे पूर्ण मत आहे. हे ऐ-
कून गेलेली मंडळी निरोप व पत्र घेऊन परत पन्हाळ्यास आ-
ली, व आईसाहेबांस सर्व मजकूर निवेदन केला. दुसऱ्या दिवशीं
पुनः अष्टप्रधान वगैरे मंडळीस जमा करून सर्वांस पत्र दाखवून ति-
कडील मजकूर कळविला, आणि पुढें कसा विचार करावा तें वि-
चारिलें. तेव्हां सर्वांनीं कळविलें कीं, गोविंदराव पारसन-
वीस हे पूर्वापार विश्वासू सेवक व माहितगार आहेत; त्यांस आ-
णून या विषयीं मसलत विचारावी. तेव्हां आईसाहेबांनीं पा-
रसनवीस यांस बोलावून आणून सांगितलें कीं, " तुम्ही पुरात-
न विश्वासूक आणि राजाराम महाराजांपासूनचे माहितगार आ-
हां; तेव्हां प्रस्तुतप्रसंगीं कसें करावें ? आणि कोणत्या प्रकारें इ-
च्छिलेली गोष्ट सिद्धीस न्यावी तें सांगावें. " त्यावरून त्यांनीं सां-
गितलें कीं, बायकांकडे लक्ष लावून मुलास आणावा. मुलगा ये-
थें आल्यावर प्रधानांचा रुकार घेतां येईल.

त्याप्रमाणें शाहाजी खानवटकर यांचे शालक नव-
लोजीराव महाडीक तारळ्यास रहात होते, त्यास आईसाहे-
बांनीं पत्र देऊन बाबूराव कारकून यास तारळ्यास पाठविलें.
ते महाडीक यांस भेटून त्यांचें पत्र त्यांची भगिनी बयासाहेब
खानवटकर यांस घेऊन आले. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं,
कोल्हापुराहून मुलास आणण्यास जी मंडळी येईल त्यांच्या स्वा-
धीन मुलाला बिनदिक्कत करावें, मनांत कांहीं अंदेशा आणूं नये. न-
तर तें पत्र व राजवाड्यांतील कांहीं दासी व दुसऱ्या कांहीं बायका
यांस बरोबर देऊन बाबुरावास खानवटास पाठविलें. ते तेथें जा-
ऊन बिऱ्हाड परभारें घेऊन बाहेर उतरले. नंतर युक्तीनें बया-
साहेबांची भेट घेऊन पत्र दिलें, व अंतस्थ मजकूर निवेदन के-
ला. तेव्हां ती गोष्ट यांच्या विचारास येऊन, त्यांणीं त्यांस पर-
भारेंच राहून कोणी विचारिल्यास बयासाहेब यांचे माहेराहून (तार-

बयाहून) आलों आहों असें बाह्यात्कारें सांगावें, आणि बरोबरच्या बायकांस व दासींस आमच्याकडे वाड्यांत भेटण्यास वरचेवर पाठवीत जावें, म्हणजे तुमच्या अंतर्यामचें राजकारण सिद्धीस जाण्याचा समय लवकरच येईल, असें सांगितलें. त्या प्रमाणें बायका व दासी दररोज बयासाहेबांकडे भेटीस जाऊं लागल्या, तेथें चार सहा घटका राहून मुलास घ्यावें, खेळवावें, त्यास खाऊ द्यावा, अशा प्रकारें वागूं लागल्या मुळें मुलास या बायकांची ममता थोड्याच दिवसांत लागली. कधीं कधीं मुलास खिन्हाडीं आणावें, तो रात्री पर्यंत त्यास ठेवून मग पोहोंचता करावा. असें करितां करितां चार सहा महिनें गेल्यावर मुलास पूर्ण ममता लागून मूल रात्रंदिवस इकडेच राहूं लागलें. नंतर आईसाहेबांकडे पन्हाळ्यास पत्र पाठवून वर्तमान कळविलें. तेव्हां त्यांनीं तीन तीन कोसांवर बायका व स्वार यांचे टप्पे ठेवून मुलास घेऊन येण्याविषयीं उत्तर पाठविलें. मग तिकडे नेलेल्या बायकांत मुलाच्या ममतेच्या ज्या बायका होत्या, त्या पैकीं एकेक बायको दरटप्प्यावर ठेवून तेथून मुलास घेऊन बाबूराव निघाले, आणि कूच दरकूच करून चवथ्या दिवशीं सुरखरूप पन्हाळ्यावर मुलास घेऊन आले. मूल पहातांच आईसाहेबांस फार आनंद झाला, व लागलीच आनंदानें साखर वाटली. बाबुरावांनीं कामगिरी वजाविली म्हणून त्यांजवर बहाल मर्जी होऊन त्यास "चिरंजीव" असें म्हणूं लागल्या, व त्यांणीं ही द्रवीड ब्राम्हण असतां भोसले उपनांव धारण केलें. त्यांस या कामगारीबद्दल घुणकी येथें ३० बिघे आणि कोडोली येथें ३० बिघे जमीन इनाम दिली. दुसऱ्या बरोबरच्या लोकांसही बक्षिसें दिलीं. मुलापाशीं नेहमीं रहाण्यास माणसें व हुजरे नेमिले; जानुबाई निकमीण इला दाई ठेविली, व मुलाजवळ खेळण्यास व खेळविण्यास गुजाजी गाईकवाड, रत्नाकरपंत आप्पा, गोंदजी चव्हाण,

आणि सोनजी मडके म्हारूळकर यांस ने[illegible] विद्याभ्यासासा-
ठीं शास्त्री व पंतोजी ठेवून वेळा नेमून दिल्या, [illegible] शिवाय सागी-
न्ह दौलतीची माहितगारी व राजनीति समजून देण्यास **खंडेराव गोविंद पारसनवीस** यांस सांगितलें.

या प्रमाणें बंदोबस्त करून दत्तक घेण्यास पंत प्रधानांची मसलत पाहिजे, म्हणून अष्टप्रधानांस आणून विचारिलें, त्यांत असें ठरलें कीं, ही गोष्ट दुसऱ्याच्या हातून निभावयाची नाहीं. खासा स्वारी गेली तरच सर्व जाबसाल उलगडतील. यास्तव पुण्यास जाऊन प्रधानाकडून दत्तकाविषयीं वगैरे जाबसाल ठरवून घ्यावे असें ठरलें. परंतु बाह्यात्कारें स्वारी महायात्रेस निघाली असें प्रसिद्ध केलें. नंतर कामगार नेमून दौलतीचा बंदोबस्त केला आणि चार महिन्याची बेजमी घेऊन ५००० फौज, सरदार, मानकरी वगैरे सह अक्षतृतीयेच्या सुमुहूर्तावर खासा स्वारी निघाली; **जेजुरीस** जाऊन दाखल झाल्यावर तेथील कामदारांनीं स्वारी आल्याचें वर्तमान प्रधानांस कळविलें. त्या वरून प्रधानांची स्वारी जेजूरीस जाऊन आईसाहेबांस भेटली, आणि कोणत्या उद्देशानें येणें झालें तें विचारिलें. तंव्हां आईसाहेबांनीं सांगितलें कीं, करवीर गादीस मालक करून देण्याचा आपला संकल्प दिसत नाहीं, म्हणून महायात्रेस जाऊन देह अर्पण करावा असा हेतु आहे, परंतु पूर्वी कैलासवासी शाहू महाराज यांणीं आम्हांकडील पारसनवीस यांचे विद्यमानें यादी करून दिली आहे. त्यांत दत्तक देऊन गादीस मालक करून द्यावा, आणि पन्हाळा व सातारा हीं राज्यें एक करूं नये, असें चिटणीसांचे विद्यमानें ठरलें आणि या विषयीं प्रधानास आज्ञा झाली आहे, असें पारसनवीस यांनीं सांगितलें. हा मजकूर मशारनिल्हेनीं श्रुत केला तो आपणास कळविला आहे. या उपर मर्जी अ-
[illegible] तंव्हां **प्रधानांनीं** उत्तर दिलें कीं, **सातारा**
मल [illegible]

व पन्हाळा हीं दोन पृथक् राज्यें नसून एकच आहेत. द्वैतभाव नाहीं. असें म्हणतांच आईसाहेब क्रोधाविष्ट होऊन निष्ठुरतेनें बोलिल्या कीं, राज्य तुम्हीं स्वाधीन करून घ्यावें. आपण पुत्रवत्‌च असून आपणास महाराजांनीं राज्याचे अधिकारी करून ठेविले आहेत. तर राज्य आपल्या स्वाधीन करून घ्यावें. आणि खर्चीची वगैरे बेजमी करून आमची महायात्रेची रवानगी करून द्यावी. हा आग्रह पाहून प्रधान निरोप घेऊन आपले डेऱ्यास गेले. दत्तक न देतां राणीसाहेबांस यात्रेस चालविण्याचें अपेश आपले माथीं घेण्याची पेशव्यांची छाती होईना. तेव्हां त्यांनीं विचारकरून असें ठरविलें कीं, सन १७४१च्या यादींत या विषयीं शाहु महाराजांची स्पष्ट आज्ञा आहे, आणि राज्यही वीस पंचवीस लक्षांचें आहे. यास्तव दत्तक द्यावा आणि आईसाहेबांची मर्जी राखून पन्हाळ्यास परत रवानगी करून द्यावी. या प्रमाणें मनात संकल्प करून प्रधान पुनः भेटीस गेले. आणि आपले मनोगत काय आहेत, म्हणून आईसाहेबांस विचारिलें तेव्हां गादीस मालक करून द्यावा आणि पदरच्या लहान मोठया माणसांचें रक्षण व्हावें. अशी इच्छा आहे, म्हणून आईसाहेबांनीं सांगितलें. स्वारी पुण्यास यावी म्हणजे तेथें मनोदयानुरूप बंदोबस्त करून देतों अशी प्रधानांनीं विनंति केली. तेव्हां राणीसाहेबांनीं यात्रेस जाणें रहित केलें, आणि सदर मतलबाचें पत्र प्रधान यांचें लिहून घेऊन बेलभंडारानिशीं शपथ घेतली. यासर्व स्नेह भावाच्या बोलण्याची खूण राहण्याकरितां प्रधानांचे हातांतील हिऱ्याची आंगठी घेऊन पुण्यास जाण्याचें ठरविलें. नंतर श्रीदेवास अभिषेक करून वस्त्रें व अलंकार दिले; तसेंच ब्राम्हणांकडून संतर्पण करविलें, व जेजूरीस एकंदर आठ दिवस मुक्काम करून स्वारीचा कूच पुण्यास झाला. समागमें पंतप्रधानांची स्वारी होती. वाटेंत एक मु-

क्काम करून दुसऱ्यादिवशीं स्वारी पुण्यास दाखल झाली. तेथें प्रधानांनीं त्यांस रहाण्याकरितां एक वाडा मोकळा करून दि-ला. बरोबरच्या सरदार मानकरी लोकांकरितांही जाग्याची न-जवीज करून लवाजिमा व फौज या करितां बाहेर डेरे दिले. दररोज खर्चास दीड हजार रुपये पोंचतें होत होते, व प्र-धान नित्य भेटीस आत असत.

पुणें येथें दत्तकप्रकरणीं कागदपत्र वगैरे पुरे झाल्यावर कोल्हापूर करांचे दोस्त निजामअली असफजाहा भागानग-रकर[*] यांची संमति येई पर्यंत दोन महिने मुक्काम झाला. तदनंतर शाहाजी भोंसले यांस कुटुंब सहित खानवटाहून आणवून प्रधानां-नीं कळविलें कीं, तुम्ही शरफजीच्या वंशांतील आहां. या-स्तव तुमचे पुत्रास दत्तक घ्यावा अशी उभयता कैलासवासी म-हाराजांची आज्ञा आहे. करितां तुम्ही आईसाहेबांसमागमें प-न्हाळ्यासजाऊन पुत्र दत्तक द्यावा, आणि आज्ञेंत चालावें; तुमचा बंदोबस्त करून देतील, असें सांगून खानवटकरांस वस्त्रें भूषणें देऊन निरोप दिला. नंतर आईसाहेबांस व अष्टप्र-धानांस पंतप्रधानांनीं मेजवानी वगैरे करून सन्मान केला व ब-रोबर खर्चास दोन लक्ष रुपये आणि दोनलक्ष रुपये किंमतीचा पो-षाख व जडजवाहीर वगैरे देऊन स्वारीची रवानगी केली.[+] रा-णीसाहेबांची स्वारी पुण्याहून खानवटकरांस घेऊन निघाली, ती श्रावणमासीं पन्हाळ्यास येऊन दाखल झाली. नंतर शके १६८४ आश्विन शुद्ध ५ सोमवारीं (सन १७६२ अक्टोबर) दत्तविधाना-चा मुहूर्त योजून यथाविधि दत्तविधान व नामकरण करून शि-वाजी छत्रपति हें नामाभिधान ठेविलें. पुढें शुद्ध १०स वि-

---

* निजामाची हैदराबाद यास पूर्वी भागानगर असें नांव होतें.

+ पेशव्यांची ताकीदपत्रें नं० ११।१२ पहा.

जयाच्छर्माचे मुहूर्तावर यथाशास्त्र अभिषेकादि होऊन सिंहासनारूढ झाले. या प्रसंगीं मनस्वी खर्च करून समारंभ मोठ्या थाटानें केला. सिंहासनारूढ झाल्यावर अष्टप्रधानांस विडे देऊन आणि सरदार मानकरी लोकांस वगैरे यथायोग्य वस्त्रें देऊन सर्वांस आनंदी केलें. या प्रमाणें समारंभ आटपल्यावर **पंतप्रधान, निजाम अल्ली, हैदर अल्ली, मुधोळकर** वगैरे यांस योग्यतेनुरूप पत्रें व आज्ञापत्रें देऊन कारकून व हुजरे यांजबरोबर पाठविलीं. महाराजांस ही पत्रोत्तरीं विनंति पत्रें व जडजवाहीर आणि पोषाख आले. **हैदरअल्लीखान** यांजकडून पोषाख, जवाहीर, घोडे, व झडराव व बाळसुंदर या नांवाचे हत्ती आले होते. या समारंभास अजमासें चार लक्ष रुपये खर्च झाला. हें ही राज्य पेशव्यांच्या दाढेंत न पडतां कायम राहून सनाथ झाल्याबद्दल लोकांस अत्यानंद झाला. महाराज सिंहासनाधीश्वर होई पर्यंत आईसाहेबांच्या नांवें शिक्का मोर्तब व कागदपत्र होत होते, ते बंद करून **महाराजांच्या** नांवें सर्व राज्यकारभार सुरू केला. यावेळीं जीं विनंति पत्रें आलीं त्या पैकीं कित्येकांचे उतारे पुढें दिले आहेत. त्यावरून कोल्हापूरकरांस इतरांची पत्रें येण्याचा व जाण्याचा संप्रदाय त्यावेळीं कसा होता हें दिसून येईल. *

समारंभ आटोपल्यावर माघ मासीं आईसाहेबांची स्वारी **छत्रपति** यांस घेऊन **नृसिंहवाडीस** जाण्याकरितां **करवीरीं** आली. त्या समयीं **भगवंतराव रामचंद्रपंत अमात्य** यांस दौलतीचें काम पाहून व्यवस्था ठेवावी अशी आज्ञा केली. तेव्हां त्यांणीं "स्त्री बुद्धि अशाश्वत, सबब हें काम आमच्या हातून व्हावयाचें नाहीं" असें अमर्यादेचें उत्तर दिलें. तें ऐकतांच आईसाहेब क्रोधायमान झाल्या व बोलल्याकीं, "आपण

* पुरवणी पहा. पत्रें नंबर १३।१४।१५ पहा.

काम न कराल तर मोठीशी अडचण पडेल असें समजूं नये; तें काम यःकश्चित् कुणबिणी कडून चालवितां येईल." नंतर **येसाजीराव** शिंदे सुभेदार हे आईसाहेबांचे माहेराकडील लेकावळे होते; ते फार शहाणे व कर्ते होते. म्हणून त्यास कारभाराचें काम करण्यास सांगून गंगू, रंगू, भागू, नागू, आणि लिंगू अशा पांच शहाण्या कुणबिणी पसंत करून शिरोळ, आळतें, वडगांव वगैरे ठिकाणीं कामें सांगून रवाना केल्या, त्याच कांहीं दिवस काम चालवीत होत्या. नंतर स्वारी वाडीस गेली आणि चार-पांच दिवस राहून देवदर्शन घेऊन पन्हाळ्यास आली. **वारणेच्या** तहा प्रमाणें हुकेरी तालुक्या पैकीं कांहीं ठाणीं **चिकोडी, बागेवाडी, वंटमुरी** व कांहीं किरकोळ ठाणीं येण्याचीं राहिलीं होतीं, तीं देण्याविषयीं **माधवराव बल्लाळ** प्रधान यांचें पत्र **बसव प्रभु देसाई** प्रांत हुकेरी याम चद्र ६ गाबानचें (सन १७६२, ६३) आलें. आणि त्या प्रमाणें ठाणीं सरकारांत आलीं (शाके १६८३ सन्न इसन्ने शित्तेन मय्याव अल्लफ).

याच सालीं आईसाहेबांची स्वारी माघमासीं श्री वाडीकडे असतां **शेषोनारायण** पेशव्यांकडील कर्नाटकांतील कामगार यांणीं **रघुनाथराव पंडित** यास फौजे सुद्धां आणून कसबा **वडगांव** ठाणें घेतलें. तेव्हां **भगवंत आप्पाजींचे** विद्यमानें सातलक्ष रुपये देण्याचा करार करून ठाणें परत घेतलें, पैकीं जामदारखान्यांतून रोख दोन लक्ष रुपये दिले, आणि **चिकोडी** व **मनोळी** हे दोन तालुके शेषोनारायण आणि भगवंत आप्पाजी या उभयतांकडे लावून देऊन त्यांची पांचलक्ष रुपये बाकी बद्दल निशा दिली.

रघुनाथराव परत पुण्यास गेल्यावर **गोपाळराव गोविंद पटवर्धन** यांजकडील **मिरजेचें** ठाणें घेण्याची मसलत करून पुण्याहून फौजेसह निघाले. हें वर्तमान गोपा-

व गोविंद याम समजल्यावर मिरजेच्या ठाण्यांतील खजिना वगैरे दौलत शिरोळास ठेवण्याविषयीं श्रीमन्महाराज **जिजाबाई साहेब** यांची परवानगी मागितली. तेव्हां आईसाहेबांनीं शिरोळचे मामलेदार **नरसो त्रिंबक भुयेकर** यांस आज्ञा केली कीं, मगारनिन्हे पटवर्धन याचा खजिनावगैरे शिरोळास ठेवून घ्यावा, आणि त्यांज कडील पत्रें येतील त्या प्रमाणें खजिन्यापैकीं ऐवज हुजूर परवानगीची गरज न धरितां देत जावा. रघुनाथराव पंडित फौजेसह मिरजेस आले व ठाण्यास वेढा दिला. तेव्हां मिरजेचा बंदोबस्त करून आपला जमाव घेऊन पटवर्धन मोंगलांचे प्रांतांत गेले. तेथें फौजेच्या खर्चाची अडचण पडली. त्या समयीं पत्र देऊन शिरोळचे मामलेदार यांजकडे कारकून पाठविले. त्या प्रमाणें खजिन्यापैकीं ऐवज मामलेदारांनीं कारकुनाच्या स्वाधीन केला. तो ऐवज कारकून यांणीं कापसाच्या गठ्ठ्यांतून मोंगलाईंत नेला. पुढें पटवर्धन मोंगलाईंतून परत आल्यावर मामलेदार यांणीं सर्व खजिना स्वाधीन करून पावती हुजूर पाठविली.

**शिवाजी** महाराजांस सतावें वर्ष लागलें, तेव्हां सन १७६३ सालीं शालिवाहन शके १६८५ चैत्र शुद्ध १२चे मुहूर्तावर महाराजांचा मोठ्या थाटानें व्रतबंध केला. याच वेळीं खानवटकरांस पांच हजाराचा सरंजाम देऊन करधिरी ठेवून घेतले.

**जिजाबाई** राणीसाहेबांच्या कारभारांत स्वाभाविकच अव्यवस्था उत्पन्न होत जाऊन प्रांतांत बंदोबस्त कमी झाला. यामुळें लोकांस लूट करण्यास अगदीं मोकळीक मिळाली. जिकडे तिकडे लुटारू लोक आणि कोल्हापूर करांच्या स्वारांच्या टोळ्या लूट करण्यास फिरू लागल्या. तेव्हां पेशव्यांचे मुलुखांत कृष्णेच्या पलीकडे त्यांचा उपद्रव सुरू झाला. त्या त्वषानेंच र-

घुनाथरावानें वडगावच्या ठाण्यावर हल्ला करून तें ठाणें घेतलें होतें. पश्चिम किनाऱ्यावर ही यांचे लोकांचीं जहाजें बंदरोबंदरीं फिरूं लागलीं व त्यांपासून व्यापारीलोकांच्या तारवांस अत्यंत उपद्रव होऊं लागला.

निजामाशीं कोल्हापूरकरांचें आंतून सख्य होतें. सभोंवार विशाळगडकर, बावडेकर, कागलकर व कापशीकर यांच्या जहागिरीचे मुलूख असून ते फौज बंद होते. प्रांतांत येण्याच्या वाटा व घांट यांवर त्यांचे पहारे असत, व कोणी प्रांतावर हल्ला केल्यास त्याचें निवारण हेच करीत असत. यास्तव राणीसाहेबांस पन्हाळ्यावर मोठ्या डौलानें व मिजाशीनें राहाण्यास सांपडे. स्वार, पायदळ, गडकरी, हुजरे वगैरे लवाजिमाही मोठा बाळगिला होता, व त्यांचा खर्चही मनस्वी होता. शिरस्त्याप्रमाणे जो प्रांताचा वसूल येई तो खर्चास पुरत नसे, परंतु नजर नजराणे व प्रांतांत जी लूट चालली होती तिचा कांहीं हिस्सा सरकारांत येण्याचा मामूल होता, त्यामुळेंच खर्चास तूट पडत नव्हती.

पश्चिम किनाऱ्यावर यांचे लोकांचीं आरमारें मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्या नजीक असत. मालवण वगैरे बंदरीं हे लुटारू लोक फारच बळावले होते. ते आपल्या जहाजांवरून क्वचित् दुसऱ्या बंदरीं माल नेत. परंतु व्यापाऱ्याचीं तारवें लुटून तो माल विकणें हाच त्यांचा मुख्य धंदा होता. या समयास ईस्टइंडिया कंपनीचीं जहाजें पश्चिम किनाऱ्यावर फिरूं लागलीं होतीं, व कंपनीचा माल मुंबईहून बंदरोबंदरीं जात असे. त्यांचीं जहाजेंही यांच्या सपाट्यांत सांपडून लुटलीं जाऊं लागलीं. शेवटीं हा उपद्रव इतका वाढला कीं, सन १७६५सालीं कंपनीनें मुंबईहून आरमारावरून फौज पाठविली आणि मालवणचा किल्ला सिंधुदुर्ग व नजीकचे सर्जेकोट, पद्मगड

वगैरे ताब्यांत घेतले. नंतर जिजाबाई राणी साहेबांनीं नु-कसानी बद्दल व शिबंदी खर्चा बद्दल सात लक्ष रुपये देण्या-चा ठराव करून कंपनीशीं सन १७६६ सालीं तहनामा केला, आणि मालवणाचा किल्ला परत ताब्यांत घेतला. यावेळीं मुंब-ईचे गव्हरनर चार्लस क्रासलीन हे होते. कंपनीच्या तर्फे टामसमाष्टिन आणि राणीसाहेबांच्या तर्फे यशवंतराव सु-भेदार या हरदु जणांच्या विद्यमानें जंजिरे फोर्ट आगष्टा-च्या मकाणांत तहनामा तारीख १२ जानेवारी सन १७६६ सा-लांत ठरला तो बितपशील कलमवार येणें प्रमाणें :-

शके १६८७ पौष व- द्य ३० तहनामा अवाली पन्हासरकार कंपनी इंग्रज व अस्मत पन्हा जिजाऊ राणीसाहेब या हरदूमध्यें क-रार जंजिरे फोर्ट आगष्टाचे मकाणीं केला बितपशील कलमवार, तारीख १२ जानेवारी सन १७६६ सूर सन शीत शिन्तैन मय्याव अल्लफ चंद्र २९ माहे रज्जब फ. ११७५

१ सरकार कंपनी व अस्मत पन्हा जिजाऊ राणीसाहेब व त्यांची वंश परंपरा यांशी कायम सल्लाह व निखालस दोस्ती चालावी, याजकरितां राणीमहाराज तर्फेचा एकमातबर भला अ-दमी कबिल्या सुद्धां आपल्या खर्चानिशीं मुंबईस ठेवावा.

२. महाराज जिजाबाई राणी यांणीं करार केला आहे कीं, रुपये सुमारें ७,५०,००० सातलक्ष पन्नास हजार द्यावे. जंजिरे फोर्ट आगष्ट याजवर फौज आली, व किल्ल्यांतील फौज वगैरे शि-बंदी खर्च सुटावयाकरितां महाराजयांहीं सरकार कंपनीशीं करा-र केले रुपये सातलक्ष पन्नास हजार, पैकीं रोखी तारीख जाने-वारी सन १७६६ पासून दोन महिन्यांनीं रुपये तीन लक्ष साठ ह-जार द्यावे. बाकी रुपये तीनलक्ष नव्वद हजार, या तारखे पासू-न चार वर्षांनीं फेडावे. [illegible] एकलक्ष या प्रमाणें तीन वर्षां-नीं [illegible] बाकी [illegible] हजार राहिले ते चवथ्या वर्षी बा-

रून द्यावे. हें चालावें याजकरितां महाराज तर्फेचे चवघे मातबर नामांकित द्रव्यवंत सावकार ज्या प्रमाणें मुंबईतील जनरल कौन्सिल खुष होऊन ठरावितील त्या प्रमाणें मातबर जामीन द्यावे. जंजिरा दिल्याच्या पूर्वी रुपये २,६०,००० येणें ते हुकेरी, पीर खानी व अवरंग शाई व अर्कोटी व शहाजानी त्या जातींचे रुपये घेऊन दर शेंकडा रुपये ६ सहा प्रमाणें बट्टा सरकार कंपनी भरून घेईल

३. आनराबल कंपनीस महाराज यांहीं वरल्या कलमीं करार केला आहे त्या प्रमाणें चालवून, प्रथम करारपैकीं रुपये तीन लक्ष साठहजार दिल्यावर जंजिरे सिंधूदुर्ग व राजकोट व सर्जाकोट देखील पद्मदुर्ग किल्ले स्वाधीन झाल्यास त्या खालीं मुलूख व जमीन पेशजी पासून असेल त्याशीं व सरकार कंपनीशीं मागें पुढें हर गोष्टीचा इलाखा नाहीं. ( त्याशीं कंपनी सरकार कोणत्याही तऱ्हेचा हक्क सांगणार नाहीं ).

४. आनराबल सरकार कंपनी कडून सामान, तोफा व गाड्या व गरनाळा व गोळे, व गरनाळाचे गोळे, व दारूवगैरे सामान व सरंजाम येथें आणले आहेत, ते सरकार कंपनी जाते समयीं घेऊन जाईल. आणि जंजिरे फोर्ट आगष्ट व राजकोट व सर्जाकोट व पद्मदुर्ग येथें तुमच्या तोफा व गाड्यांपैकीं शिल्लक ज्या राहिल्या असतील, त्या महाराज यांच्या स्वाधीन सरकार कंपनी करील.

५. महाराज जिजाबाई राणीसाहेब यांहीं आपल्या मुलुखांत राजकोटास सरकार कंपनीस फतोरीस ( फ्याक्टरीस) व वखारीस जागा द्यावी. अगर आनराबल कंपनीच्या चित्तास येईल तेथें. फतोरी व वखार उदिमास करून फतोरीवर कंपनीचें निशाण उडवूं द्यावें. आणि कंपनी तर्फेची थोर जहाजें व तरांडीं व गलबतें, चाकर माणसें खबरदारीस जी लागतील तीं सुखरूप ठेवावी. महाराज तर्फेचे व्यापारी व रयत सरकार मजकूरचें देणें अगर

कर्जदार होतील, तर त्यांचा ऐवज सुद्धां दस्त करून पैका घ्या-वयास महाराजांकडून अटक नसावी.

६. सरकार कंपनी कडील व महाराजांकडील रयत वगैरे व्यापारी लोक एकमेकांनी उदीम व्यवसाय करतील त्यांस उभयपक्षांची अटक नसावी.

७. सरकार कंपनीची व गोरे इंग्रज व्यापारी यांचीं तरांडीं थोरलीं व लहान (खिलखिला१ ज्यांवर इंग्रजी निशाण अथवा सरकारचा कौल असेल) अगर जीं इंग्रजी वलाव्या समागमें जात येत असतील, त्यांस महाराजतर्फेनें हस्तें परहस्तें, कळतां न कळतां, कोणे गोष्टीविषयीं मुजाईम व जलेल न व्हावें. त्याच्या बमोजीब सरकार कंपनी महाराज यांचे कौल व शिक्यानिशीं पाहून चालवील.

८. महाराज जिजाबाई राणीसाहेब यांहीं करार केला आहे कीं, आपल्या मुलुखांत विलायती जिनसा, मखलाद व शिसें व लोखंड व तिखें व तांबें वगैरे विलायती जिन्नस इंग्रजांनीं जातीनें आणून विकावे, व महाराज यांहीं आपल्या मुलखांतून जाऊं देऊन इंग्रजाखेरीज दुसरे टोपिकरांस आणूं न द्यावे.

९. महाराज राणीसाहेब यांच्या मुलखांतून व्यापारी वणजारी हर जिन्नस मालवण नजीक राजकोटास फत्तोरी असेल तेथें व हर जागा असेल तेथें, बैल, गद्धे व गाड्या जिन्नस भरून नेतील, व आणतील त्यांस मालाची जकात राजापूर वगैरेच्या शिरस्त्याप्रमाणें व्यापारी यांजकडून जकात महाराज यांहीं घ्यावी, अधिक घेऊं नये. इंग्रजांच्या फत्तोरींतील जिन्नस मावकार नेतील त्यांहीं कलमीं लिहिल्याप्रमाणें जकात द्यावी. इंग्रजांच्या फत्तोरींत हर जिन्नस हरजातीच्या आल्यास जकात नाहीं.

१०. महाराज यांहीं आमच्या सरकारचा चाकर इंग्रज

व गुलाम वगैरे यांस आपल्याकडे चाकरीस न ठेवावे, व कोणी इंग्रज व गोरा पळून जातील तर जागजागच्या अंमलदारांस ताकीद देऊन दस्तकरून फैतोरीस सरदार असेल त्याच्या स्वाधीन करावा. त्यास सजा न देतां क्षमा करतील. त्याच रीतीनें महाराज तर्फेचे लोक व गुलाम सरकार कंपनी देतील.

११ कदाचित् समयानुसार इंग्रजांची व व्यापारी यांची व इंग्रजांच्या निशाणा खाली रहाणारे असतील त्यांची तरांडी व गलबतें उभय पक्षांकडून शिकस्त होऊन माल मालियत सुद्धां किनारीं किंवा हरजागीं लागलीं, तर त्यास हरबाब मदत करून तरांडीं जिन्नस सुद्धां ज्यांचीं त्यांस देऊन मजुरांचा खर्च होईल तो ज्याचा माल असेल त्याजकडून देववावा.

१२ जंजिरे फोर्ट अगस्ट येथील रयत व लोक कित्येक जंजिरा घेतल्यापासून इंग्रजांच्या निशाणाखालीं राहिले, व कितीएक चाकरीस व व्यापाराकरितां आले, त्यांस महाराज यांहीं आम्हांस कळतां न कळतां हर एक गोष्टी विषयीं उपसर्ग न देतां त्यांची जमीन व घरें व वतन बाब पूर्वीपासून ज्या प्रमाणें त्यांचें चालविलें त्याच बमोजिब किल्ला स्वाधीन झाल्यास ज्यांचें त्यांस देऊन चालवावें.

१३. सरकार कंपनी यांहीं किल्ला घेतल्या समयीं बंदिवान धरिले आहेत ते राणी महाराज यांच्या स्वाधीन किल्ला करिते समयीं मुंबईस बंदिवान जे असतील ते स्वाधीन करतील.

१४. राणीमहाराज यांहीं करार केला आहे कीं, एकाद्या समयीं आनराबल कंपनीस हरजागा कोणी मुजाईम होऊं लागल्यास आपल्या फौजे निशीं सरकार कंपनीस मदत करावी. फौजेस सरकाराकडून अडिश्री मात्र दिली जाईल. त्याच प्रमाणें महाराज यांस अगत्य झाल्यास सरकार कंपनी अनुकूल असेल त्या प्रमाणें साहित्य करील.

**राणोजी घाटगे** सर्जेराव यांजकडे कागल तालुका होता. ते महाराजांचा हुकूम न मानितां गैर वहिवाट करूं लागले. यास्तव प्रधानांस करवीर करांनी कळविलें; तेव्हां प्रधानांनीं विठ्ठलराव यांस पाठवून तालुका घेऊन महाराज सरकारांत दिला; आणि घाटगे यांजकडे सरदेशमुखी व नाडगौंडी वतनाचे साडेसहागांवमात्र चालवावे असें ठरविलें. परंतु इतकें झालें तरी घाटगे यांची वागणूक सुरळीत होईना. सबब तेही त्यांजकडे चालविले नाहींत. तेव्हां **सर्जेराव** घाटगे यांनीं प्रधानाकडे अर्ज केला त्यावरून घाटगे यांजकडे साडेसहा गांव व नाडगौंडी चालवावी म्हणून आईसाहेब यांस व गोविंद नारायण यांस अशीं दोनपत्रें प्रधानांचीं आली.* तरी घाटगे यांचें वर्तन न सुधारल्यामुळें चालविले नाहींत.

**कृष्णराव पंडित प्रतिनिधि** विशाळगडकर हे सन १७६९ सालीं वारले. त्यांस संतति नव्हती, सबब प्रतिनिधींची पत्नी सखूबाई इच्या मांडीवर **आबाजीराव** यांस देऊन दत्त विधान पद्धति अन्वयें करविलें. आणि आबाजीरावांकडून इमान पत्र लिहून घेऊन त्यांस प्रतिनिधि पदांची वस्त्रें दिलीं. याच समयीं हणमंतराव माणकेश्वर यांनीं पंडित प्रतिनिधि यांशीं दरम्यान होऊन महाराज सरकारांत इमान पत्र लिहून दिलें.*

करवीर शहरीं पंचगंगेच्या तिरीं कैलासवासी शंभू छत्रपतीचें देवालय बांधण्याचें काम चाललें होतें. तें शके १६८९ सालीं समाप्त झालें, देवालयास खर्च ३०००० रुपये झाला. तेथें श्रीची स्थापना करून तेथील पूजा अर्चा वगैरे खर्चाबद्दल परगणें कागल तर्फ रुकडी येथील सरनायकीचें वतन श्रीकडे

* या गोष्टी वरून प्रधानाचा अमल सर्वत्र कसा बसला होता हें स्पष्ट होतें प.नं

* इमान पत्रें पुढें दिलीं आहेत तीं पहा नं. १७।१८

नूतन करून देऊन ते चालविण्यास राणोजीराव घोरपडे सेनापति यांस आज्ञा पत्र शके १६९० सालीं दिलें.

**हैद्राबादकर, निजाम** यांशी **कोल्हापूरकरांचें** सख्य कायम राहिल्यामुळें मागील बाकीचा उलगडा होतांच प्रधानांनी चिकोडी व मनोळी हे दोन तालुके पटवर्धनास दिले होते. ते तालुके परत देण्याविषयीं बोलणें चालविलें होतें. इतक्यांत **हैदरखानावर** मोहीम करण्याचें ठरून प्रधानाची स्वारी फौजेसहित म्हैसुराकडे गेली, लढाई होऊन हैदरखान जेरीस आला, व त्याजकडून खंडणी घेऊन पेशवे पुण्यास येण्यास निघाले, वाटेंत तुरकिरे मुक्कामी असतां चिकोडी मनोळी संबंधीं करारमदाराच्या यादि होऊन ते तालुके देण्याचा ठराव झाला. त्या यादी घेऊन येण्याकरितां शके १६९४ राज्याभिषेक शके ९९ सालीं पंडित प्रधान यांजकडे पुणें मुक्कामीं शिवाजी भोंसले, महादेव शास्त्री, अंताजी शामराव व व्यंकोजी नेवरे (हुजरे) यांस रवाना केलें. त्यांचें पत्र आलें कीं, पंडित प्रधान यांची प्रकृति दुखण्यानें फार हैराण आहे: त्यावरून प्रधान यांकडे समाचारास रामचंद्र बाबाजी पारसनवीस यांस पाठविलें.

माधवरावांस अंतकाळच्या समयीं पश्चात्ताप होऊन त्यांनीं विद्वानशास्त्री व पंडित यांस विचारिलें कीं, पेशव्यांचे राज्यांत धर्मोत्कर्ष होत आहे, दौलतींतील सर्व लोक सुखी आहेत, प्रजापालन चांगलें होत आहे, असें असता पेशव्यांचे वंशास क्षय लागला व पानपती फौज गार होऊन दौलत बुडाली याचें कारण काय? तेव्हां काशीकर शास्त्री यांणीं स्पष्ट उत्तर केलें कीं, स्वामी द्रोहापेक्षां थोर पातक नाहीं; धन्यास, प्रधान भरतिबंधांत ठेवून राज्याचा उपभोग करूं इच्छितात, याच कारणानें वंशक्षय व अपकीर्ति होत चालली आहे. हें ऐकून माधवरावांनीं आपले कनिष्ठ बंधु नारायणराव यांस बोलावून सांगितलें कीं, सातार-

कर महाराजांकडे पांच लक्षांचा नवीन तालुका सातान्या जवळ नेमून देऊन त्यांस सुप्रसन्न ठेवावें. येणें करून संतोष न झाल्यास आणखी दोन लक्षांचा प्रांत जास्ती देऊन मर्जी सुप्रसन्न करून घ्यावी; आणि महाराज जिजाबाई राणीसाहेब यांच्या तहनाम्याच्या यादि ठरवून ठेविल्या आहेत त्या प्रमाणें पुऱ्या करून त्यांजकडून आलेल्या मंडळीस निरोप द्यावा. त्या अन्वयें माधवरावांचा येऊर मुक्कामीं काळ झाल्यावर जेव्हां नारायणराव पेशवे गादीवर बसले, तेव्हां त्यांणीं कोल्हापूरकरांचे तहनाम्याच्या करार मदाराच्या यादि पुऱ्याकरून श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब यांचे शेवेशीं प्रविष्ट होण्या करितां जिवाजी भोंसले वगैरे गेलेल्या मंडळीसमागमें पाठवून दिल्या, आणि चिकोडी व मनोळी हे दोन तालुके व दुसरे कित्येक इमान गांव शेषोनारायण वगैरे यांणीं गफलतीनें घेतले होते तेही सर्व परत दिले ※

सन १७७२ साली फेब्रुवारी महिन्यांत (शके १६९४) राज्याभिषेक शक ९९ माघ वद्य ११ रोजीं) जिजाबाईसाहेब पन्हाळ्यावर कैलासवासी झाल्या. तेव्हां शिवाजी महाराजांचें वय १५ वर्षांचें होतें. मातोश्रीचें उत्तरकार्य यथा पद्धति प्रमाणें करून दान धर्म केला. मातोश्री दुर्गाआईसाहेब हयात होत्या त्यांच्या आज्ञेंत महाराज चालूं लागले; आणि जिजाबाई साहेबांच्या माहेर घरचे लेंकावळे यशवंतराव ऊर्फ येसाजी शिंदे सुभेदार हे जिजाबाई हयात असतां कारभार करीत होते, त्यांसच दौलतीचा कारभार सांगून दुर्गाआईसाहेबांचे विचारें कारभार चालवूं लागले.

महाराज जिजाबाई राणीसाहेबांनीं एकंदर बारा वर्षे रा-

※ याविषयी तपशील उतारा नं. १९ यांत पहा.

ज्य कारभार पाहिला. त्यांच्या कारकीर्दीत लहानथोर बऱ्याच धडामोडी झाल्या. जरी त्यांची कारकीर्द उत्तमशी झाली नाहीं तरी त्यांनीं मोठ्या दक्षतेनें व शहाणपणानें कामकरून **कोल्हापूरच्या** बदनक्षा होऊं दिला नाहीं. **येसाजीशिंदे** कारभाराचें काम साक्षात् पहात असून थोडेसें नावा लौकिकास येत चाललें होतें. या राणीसाहेबांच्या कारकीर्दीत कालिमा येण्यासारखी एक गोष्ट† घडत होती ती ही कीं; मनुष्यें बळी देण्याची चाल या वेळीं फार वाढली. बळी देण्याकरितां निराश्रित माणसास पकडून आणण्यास्तव टोळ्या आसपास रात्रौ फिरत असत, आणि जे सांपडतील त्यांस राजवाड्याजवळ ५०।६० हातावर बळी देत असत. ज्या देवनेम हे बळी देत त्या देवीचें देऊळ पन्हाळ्यावरील आंतल्या गडांत आहे. दोन बुरूज अगदीं जवळ जवळ असून त्या दोहों मध्यें हें देऊळ आहे. त्या सभोंवार किर्र झाडी व बुरूज इतके भव्य व उंच होते कीं; त्या देवळांत सूर्यकरणांचा अगदीं प्रवेश होत नसे; त्या मुळें त्या ठिकाणीं गडद अंधेर असून जागा स्वाभाविकच अत्यंत भयंकर होती, या मुळें या क्रूर कृत्यास ती जागा अगदीं योग्य होती असें म्हणण्यास चिंता नाहीं. अद्यापपर्यंत सुद्धा तो काळरूपी बुरूज पहाण्यास सांपडतो.

सन १७७४त रघुनाथरावानें नारायणराव पेशव्यास मारेकऱ्यां कडून मारविलें व आपण पेशव्यांचे गादीवर बसले, तेव्हां पटवर्धनास उपद्रव देण्यासाठीं ते फौजेसहित मिरजे नजीक श्रीकृष्णातिरास येऊन उतरले. त्यावेळीं त्यांच्या फौजेच्या लोकांकडून ठाणें शिरोळ येथें व ठाणे तर्फेचे गांवगन्ना कांहिकबाडाचा उपसर्ग झाला. त्यांच्या बंदोबस्ताविषयीं प्रधान व त्यांचे कारभार **आबाजी महादेव** यांस दुर्गाआईसाहेबां कडून आज्ञापत्रें* पाठविलीं.

† ही गोष्ट मेजर ग्रेहाम यांच्या बुकांतून घेतली आहे [illegible] तयेतात. याहून दुसरा चांगला आधार मिळाला नाहीं.

* पत्रें नं. २०, २१ पहा.

त्यांणीं आपलेकडील मनुष्यांस ताकिदी देऊन उपद्रव बंद केला.

सन १७७५ सालीं **सुबराव** पंत अमात्य यांजकडील साळवणचें ठाणें घेण्याची मसलत करून **येसाजी** शिंदे सुभेदार महाराजांस बरोबर घेऊन निघाले आणि साळवणा नजीक जाऊन ठाण्यास मोर्चे बंदी केली व शह दिला.

याच साली कार्तिकमासीं **कोन्हेरराव त्रिंबक** पटवर्धन हे फौज घेऊन करविरास येण्यास निघाले. मार्गांतील गांवें व खेडीं लुटून व जाळून उध्वस्त करूं लागले. हें वर्तमान येसाजी शिंद्यास कळतांच ते फौज घेऊन त्यांजवर चालून गेले. दोहों फौजेच्या गांठी **भोजे** जवळ पडल्या आणि लढाई जुंपली. पटवर्धनांची फौज शिकस्त होऊन पळून गेली, आणि सुभेदारांनीं पटवर्धनांच्या दोन पंचरशी तोफा पाडाव करून आणिल्या.

तेथून सुभेदार उचूराकडे वळले आणि त्या ठाण्यास त्यांणीं वेढा दिला. तो गांव इचलकंजीकरांचा होता. त्यांनीं लागलेंच प्रधानाकडे कळविलें, तेव्हां वेढा उठवावा असें सुभेदारांस प्रधानांचें पत्र आल्यावरून वेढा उठवून परत करविरास गेले. याचवेळीं प्रधानांनीं **पांडुरंगराव** गोविंद पटवर्धन मिरजकर यांसही पत्र लिहिलें होतें कीं, जर पत्र लिहिल्याप्रमाणें सुभेदार मोर्चे उठवून गेले नाहींत, तर फौजे सुद्धां जाऊन इचलकरंजीकरांस कुमक करावी.

त्याच सालीं माघमासीं **भवानराव** प्रतिनिधि कऱ्हाडकर व **भगवंतराव** विटेकर यांणीं दुर्बुद्धि मनांत आणून कसबें वडगांवावर स्वारी केली; सबब सुभेदारही वडगांवीं गेले. तेथें मोठी लढाई होऊन दोहोंकडील बरींच मनुष्यें मेलीं व जखमी झालीं. करवीरकरांच्या लोकांनीं धैर्य सोडलें, तेव्हां त्यांचा मोड झाला, आणि त्यांचे दोन हत्ती बजरिपटका असे शत्रूंनीं पाडाव करून नेले

पुढीलमाशीं म्हणजे फाल्गून महिन्यांत पेशव्यांकडील रामचंद्र गणेश डेरे हे कवठें येथें आल्याचें समजलें. तेव्हां सुभेदार तयारीनें तिकडे डेन्यांस मागें हटविण्यास गेले. उभयतां मध्यें जी लढाई झाली तींतही बरींच माणसें मेलीं व जखमी झालीं आणि सुभेदार शिकस्त होऊन करविरास परत आले.

या प्रमाणें जिकडे तिकडे नाट लागूं लागला. तत्रापि धैर्य न सोडितां सुभेदार पुनः कहीं तयारी करूं लागले. परंतु पडताकाळ केव्हां येतो याची शत्रु वाटच पहात असतात. करवीरकरांचा असा दोन ठिकाणीं मोड होऊन जेर झाल्याचें कळतांच कोन्हेर रावांनीं पुनः कंबर बांधिली आणि फौजे सुद्धां करवीरीं येऊन शहरास वेढा देऊन ७ दिवस बसले. तेव्हां शहरांतील लोकांची फार धांदल उडाली. आतां कोन्हेरराव शहर लुटून आपली सर्व चीजवस्त नेतो अशी सर्वांस धास्ती पडली. तेव्हां त्यांनीं युक्ति काढिली कीं; पटवर्धन ब्राम्हण आहेत, यास्तव श्री स्वामी जगद्गुरूचे मठास उपद्रव करणार नाहींत, असें मनांत आणून शहरवासी लोकांनीं आपली जिनगी, डागदागीनें, भांडीं वगैरे सर्व स्वामीचे मठांत नेऊन ठेविलीं. याची बातमी कोन्हेररावास लागतांच श्री जगद्गुरूचे मठास उपसर्ग करूं नये हें कांहीं मनांत न आणितां सर्वांनीं तेथें ठेविलेली मालमत्ता घ्यावी या लोभानें त्यांणीं मठावर गर्दी केली; आणि सर्व चीजवस्त मठांतील लुटून मठास अग्नी लावून दिला व स्वारी सातवे दिवशीं लढाई न करितां निघून गेली. पटवर्धन ब्राम्हण असतां असें अमर्याद कृत्य केलें हें पाहून श्रीनरसिंह भारथी स्वामी क्रोधायमान झाले व उपोषणें करूं लागले. आणि त्या संतापानें तेथून निघून ते कसबे वाळवें नजीक कृष्णा पैलतिरीं शिरगांवास गेले. हा गांव थोरात यांजकडून ब्राम्हणांस अग्रहार आहे. तेथें श्री सिद्धेश्वराचे देवालयासमोर एक समाधि बांधविली आणि पटवर्धनांचें गांवाकडे मुख करून त्या स्थळीं समाधिस्त बसले आणि

समाधि बुजाविली. पुढें कांहीं दिवसांनीं मस्तकांतून एक व दोन्हीं बाजूंस दोन असे तीन अश्वत्थ वृक्ष उगवले, अशी दंतकथा आहे. त्या समाधीची पूजा अर्चा होत असून वैशाख शुद्ध नवमीस उत्साह होतो. हें वर्तमान मधानीस कळल्यावर त्यांणीं ही कोल्हेरगांवांचा फार निषेध केला, व समाधीच्या खर्चाकडे पोखरणी हा गांव इनाम करून दिला. हल्लीं समाधी नजीक ब्राह्मणवगैरेंचीं घरें झालीं असून लहानसा गांव ही वसला आहे.

इसवी सन १७७४।७५ सालीं रामचंद्र गणेश पेशव्यांची फौज घेऊन कर्नाटकांत गेला आणि त्याणें तिकडे दंगा आरंभिला.

म्हैसुरास हैदरखानानें राज्य स्थापून कर्नाटकांत फार पुंडावा माजविला. त्याचा बेत सर्व कर्नाटक प्रांत सरकरून घेण्याचा होता. त्यानें हळुहळू नरगुंदकर, सावनूरकर यांजकडून खंडणी घेऊन थेट धारवाडापर्यंत आपला पगडा बसवीत आणिला होता. यास्तवत्यांचे बंदोबस्ताकरितां रामचंद्रगणेश याजबरोबर मोठी फौज देऊन त्यास पेशव्यांनीं कर्नाटकांत पाठविलें. पेशव्यांस कर्नाटक व पुणें यांच्या दरम्यान एक शत्रु स्थापित करण्यास्तव हैदरानें कोल्हापूरकरांशीं दोस्ती केली, तसेंच रघुनाथरावास पेशव्यांचे गादीवर स्थापण्यास साहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. पेशव्यांचें लक्ष आपणाकडे वळूं नये म्हणून हे दोन शत्रु उभारिले. तरी पेशव्यांची त्यावेळीं तयारी चांगली होती.

पेशव्यांची फौज कर्नाटकांत येऊन पोचली तेव्हां त्या फौजेशीं सामना करण्याची त्याणें तयारी चालविली आणि करवीरकरांस पत्रें पाठविलीं कीं, आम्ही येई पर्यंत सामनाचे लगत यां-

---

* पत्रें नं. २२,२३ पहा.

ठी फौज ठेवून प्रधानाचे फौजेस तंबी देण्याची तजवीज करावी; खर्चास ऐवज पाहिजे असल्यास बंकापुरास स्वार पाठवावे. त्या प्रमाणें स्वार पाठवून एक लाखाचा ऐवज खर्चास आणिला, व सुभेदारास फौजेनिशी धारवाडाकडे जरूर रवाना करण्याविषयीं महाराज दुर्गाआईसाहेबांस रवानाचें पत्र आलें* परंतु कांहीं कारणानें फौज जाण्याची राहिली.

शके १६९७साली प्रधानांकडील रामचंद्रगणेश सरंजपे फौजेसुद्धां कर्नाटकांत जात असतां मौजे कवठें येथें येऊन उतरले. त्या समयीं महाराज सरकारची फौज घेऊन यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभेदार त्यांवर गेले. हरदु फौजांची लढाई झाली. त्यांत महाराज सरकारचे फौजेचा मोड झाला. तेव्हां सुभेदारांस महाराज सरकारचे पागेवाले स्वार व एकांडे स्वार बचाव करून घेऊन आले.

शके १६९८ साली माघमासीं महादजी शिंदे जोतिबाचे डोंगरावरील श्रीकेदारलिंगाचे दर्शनास आले होते. तेथें त्यांचे मनांत विकल्प आल्यामुळें म्हणा, अगर पेशव्यांकडून लिहून आल्यामुळें म्हणा, कसेंही असो; शिंद्यानीं फौजेसुद्धां येऊन करवीरास वेढा घातला, आणि माघमासापासून चैत्र मासापर्यंत तीन महिने वेढा देऊन बसले. त्या समयीं श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गाआईसाहेब व शिवाजी महाराज यांच्या स्वाऱ्या करवीरीं होत्या. शहरास वेढा देऊन आसपास मुलूख उध्वस्त करण्याचा सपाटा सुरू केला. तेव्हां हैदरास कुमके विषयीं पत्रें गेलीं.† परंतु कुमक आली नाहीं व महाराज वगैरे शहरांत कोंडले गेल्यामुळें कांहीं इलाज चालेना. तेव्हां तह करण्याकरिता सखाराम भगवंत व

---

* पत्र नं. २४, २५ पहा.

† पत्र नं. २६, २७ पहा.

बाळाराव गोविंद आणि राणे खान नि॰ शिंदे यांच्या विद्यमानें बोलणें चालवून शिबंदीचे खर्चाबद्दल आणि पेशव्यांचे मुलखांत करवीर करांच्या स्वाऱ्यांपासून जें नुकसान झालें त्याजबद्दल १५लक्ष रुपये देण्याचें ठरवून कांहीं ऐवजाबद्दल **चिकोडी*** व **मनोळी** हे दोन तालुके लावून घेतले, आणि बाकी ऐवजा बद्दल **सटवाजी** भोंसले हवालदार यांची खात्री घेतली, या शिवाय पुढील कलमें हरदू तर्फे कबूल होऊन शके १६९९ चैत्रमाशीं तहनामा ठरला आणि लढाई न करितां वेढा उठवून शिंदे परत गेले.

## तहनामा.

| | |
|---|---|
| (१) महाराज सरकारांनीं खालीं लिहिल्या प्रमाणें देवस्थानांस, ब्राम्हणांस वैगेरे राजमंडळ पैकीं इनाम गांव करून द्यावे.<br>३००० क्षेत्र करवीर<br>२००० श्रीमहालक्ष्मीस गांव. १<br>५०० समस्त ब्राम्हण क्षेत्रस्थांस गांव. १.<br>५०० शंकराचार्य स्वामीस गांव १.<br>३०००<br>३५०० श्रीजोतिलिंगास गांव १.<br>३५०० श्री मनसूर साहेबांस गांव १<br>१०००० ... ... ... ... .. कलम | तुम्ही गांव द्यावे म्हणून लिहिलें त्यास सरकारांतून पेशजी गांव दिले आहेत ते सरकारांत घेऊन हाली तुम्ही लिहिल्या प्रमाणें गांव देवविले जातील, येणें प्रमाणें करार. |

* मेजर ग्रेहाम यांचें म्हणणें कीं, पेशव्यांनीं चिकोडी व मनोळी हे प्रांत ताब्यांत घेण्यासाठीं शिवाजी गोपाळ बरोबर फौज पाठविली, तिचा मोड सुभेदारांनीं केला; यास्तव मुद्दाम पेशव्यांनीं महादजीस करवीरास पाठविलें, परंतु यास दप्तरी आधार मिळत नाहीं.

(२) राज्याची अभिवृद्धि व आमचें कल्याण तेंच स्वामीनीं करावें. फैल फितूर करूं नये. तीर्थस्वरूप राजश्री दादा वगैरे राज्यांतील व हैदरनाईक वगैरे परराज्यांतील कोणी फितूर व लबाड, स्वामीकडे येतील त्यांस जागा देऊं नये. येणें प्रमाणें निरवालसता असावी ... ... ... कलम

राज्याचें कल्याण व राज्याची अभिवृद्धि होईल तेंच करूं. तुम्हीं करारा प्रमाणें निभावणी करावी म्हणजे तुम्हांशीं दुसरा अर्थ घडणार नाहीं. तुमच्या लक्षा प्रमाणें राजश्री रघुनाथ पंडित यांजकडे संधान करणार नाहीं. हैदर नाईक यांजकडे सूत्र लावून फितुर होणार नाहीं. राज्यांतील व परराज्यांतील यांजकडे सूत्र लावून राज्याचें अकल्याण करणार नाहीं. राज्याची अभिवृद्धि व तुमचें कल्याण तेंच घडेल. तुम्हांकडून हरएक विशीं फितूर होऊं नये. येणें प्रमाणें करार. ... ... ...

(३) जिवाजी गोपाळ, विरूपाक्ष शामजी, रामचंद्र गणेश व कोन्हेर त्रिंबक यांचे लढाईत वगैरे आम्हांकडील लहान मोठे धरून नेऊन बंदीत घातले आहेत, त्यांस सोडून द्यावें. ... ... ... कलम.

जिवाजी गोपाळ, विरूपाक्ष शामजी, रामचंद्र गणेश व कोन्हेर त्रिंबक यांचे लढाईत तुम्हांकडील सांपडले असतील, त्यांचे खत पत्र सुद्धां तुमचे खिसमतगार ठेवणें त्यां देखत पन्हाळ्याहून विशाळगडास पाठवून देऊं. तेथून राजश्री प्रतिनिधि पंत तुम्हांकडे पाठवितील, ते तुम्हीं कृष्णापार घेऊन जावे. येणें प्रमाणें करार. ... ... ... ...

| | |
|---|---|
| (४) घाटगे कागलकर हे पुरातन सेवक राजमंडळचे, यांजकडे पहिल्या पासून कागल आहे. आलीकडे शेषो नारायण यांचे कारकीर्दीस महाराजांनीं सरकारांत घेतलें होतें. फिरून आम्हीं घेऊन घाटगे यांजकडे दिलें आहे. त्या प्रमाणें चालवावें, अशीच सनद द्यावी; व घाटगे यांचीं वतनें आहेत त्या प्रमाणें चालवावीं. आम्हांकडे आलें होतें म्हणून आकस करूं नये. ... ... ... .. . .. कलम. | कागलकर पुरातन सरकारचे सेवक यांणीं सेवा चाकरी पूर्ववत् प्रमाणें करावी. चाकरी पूर्ववत् प्रमाणें केल्यास कैलासवासी आई साहेबांचे वेळेस चालत आलें त्या प्रमाणें कागळ वगैरे पूर्ववत् चालविलें जाईल. येणेंप्रमाणें करार ... ... ... .. ..... |

शालिवाहन शके १७०० राज्याभिषेक शक १०५ साली (सन १७७७) महादजी शिंदे गेल्यावर परशुराम रामचंद्र पटवर्धन यांणीं फौज घेऊन येऊन महाराजसरकारच्या अर्कीवाट ठाण्यास वेढा घातला. ठाण्यांत जे सनदी वगैरे लोक होते त्यांत दोघे भाऊ मोठे शूर शिपाई होते. ते मोठ्या धैर्यानें व पराकाष्टेनें लढले; त्यांणीं पटवर्धन यांची फौज जेरीस आणिली, व ठाण्यांत शिरकाव होऊं दिला नाहीं. परंतु आंतील लोकांस करविराहून कुमक येईना. ठाण्यांत दाण्यांचा तोटा पडला, आणि इतक्यांत दोघां शूर भावांपैकीं एक अकस्मात् गोळी लागून पडला. दुसरा मोठ्या पराकाष्टेनें लढला. परंतु त्यासही गोळी लागून तो पडला. तेव्हां पटवर्धनांनीं ठाणें जबरीनें ताब्यांत घेतलें. या प्रमाणें तोरगल, कटकोळ, चिकोडी, मनोळी कडेही परशुरामपंताचा उपद्रव चालू होता.*

* पत्रें नं २८,२९ पहा.

**यशवंतराव** शिंदे सेनासाहेब सुभेदार हे शिंद्यांच्या कुळां-
तील असून करवीरचा राज्यकारभार पहात होते, व दरबारी प्रमुख होते.
यामुळें **प्रतिनिधि** व **अमात्य** यांचें कांहींच चालत नव्हतें, व दरबार-
चे कोणतेच मसलतींत या उभयतांपैकीं कोणाचाच विचार सरकार निव्वळ
शिंदे घेत नसत. यामुळें ते स्वाभाविकच सुभेदाराचा हेवा करीत असत,
व त्याचा पायः दरबारांतून कसा काढावा या विचारांत होते. त्याच्या मं-
डळांत कोणी **सिताराम यादव हवलदार** म्हणून होता; त्याणें सु-
भेदारास मारेकरी घालून मारावें असा दुष्ट बुद्धि मनांत आणून सर्व
सिद्धता केली. त्यास ही दुष्ट बुद्धि होण्यास कांहीं विशेष कारण घडलें
असावें; परंतु तें काय झालें असावें याचा थांग कागदोपत्रीं लागला
नाहीं. त्याणें ही मसलत **आबाजीराव** कृष्णपंडित प्रतिनिधि,
व **सुबराव** कृष्ण पंडित अमात्य यास सांगतांच ते लागलेच सामील
झाले. तसाच **नेरलीकर** वगैरे ही मंडळी अनुकूल झाली. सर्वां[illegible]
क विचार झाल्यावर **यादव** हवलदार याणें मारेकरी यास [illegible] केले;
आणि किल्ले पन्हाळ मुक्कामीं श्रीमन्महाराज सरकारचे वाड्यांतील श्री
**अंबाबाईचे** देवघराच्या दरवाजाच्या पछ्यानजीक दोघे मारेकरी
नागव्या तरवारी घेऊन प्रातःकाळीं उभे केले. **सुभेदार** नित्यपाठप्रमा-
णें स्नान पूजा वगैरे आटपून आपल्या वाड्यांतून **श्री देवीच्या** दर्शना-
स सरकार वाड्यांत आले. देवीचें दर्शन घेऊन **महाराज** सरकारच्या
दर्शनास जाण्याकरितां देवघराचा पडदा वर करून जाऊं लागले तेव्हां
त्यांणीं पडद्या समीप नागव्या तरवारी घेऊन दोघे मारेकरी उभे आ-
हेत असें पाहिलें. त्यास पहातांच शिंदे सेनासाहेब देवघरांतून परत-
ले आणि आपल्या वाड्यांत गेले, आणि जातांना वाड्याच्या दरवाजा-
वरील लोकांस सदर मारेकऱ्यांस पकडण्यासाठीं पाठविलें. पकडून
आणिलेल्या मारेकऱ्यांच्या जबान्या घेतल्या, तेव्हां मारेकऱ्यांनीं सदर
मसलतींत सामील असलेल्यांचीं नांवें लिहून दिलीं. तेव्हां त्यांतील
**अमात्य** व **प्रतिनिधि** खेरीज करून **नेरलीकर** व **यादव** हवल-

दार वगैरे लोकांस धरून आणून किल्ले मजकुरीं कैद केलें, आणि चौकशी झाल्यावर सदर गुन्हेगारांचे डोळे काढिले. यादव यांचें कुटुंब करविरीं होतें त्यासह हवलदारास हद्दपार केलें. नंतर करविरी येऊन पंडित अमात्य व पंडित प्रतिनिधि यांस सरकारवाड्यांत बोलावून आणून सुभेदारांनीं त्यांस जबान्या दाखविल्या, आणि म्हणाले कीं, तुम्हीं महाराज सरकारचे कदीम विश्वासु नोकर असून अशा अनुचित कर्मास कसा रुकार दिला? तेव्हां ते कांहींएक उत्तर न देतां अधोमुखी असले. त्या समयीं सेनासाहेबांस फार संताप होऊन ते बहुत क्रोधायमान झाले. उभयतांच्या जाण्यास अटकाव करून सरंजाम जप्त करावे असें ठरविलें. तेव्हां गुजाजी राव गायकवाड सरखवास आणि खंडेराव गोविंद पारसनवीस या उभयतांनीं रदबदली करून व पराकाष्ठेची मेहनत घेऊन सरंजाम जप्त न व्हावा, व अटकाव ही न व्हावा, असा सेनासाहेबांचा रुकार घेतला, आणि उभयतांकडून महाराज सरकारांत इमानपत्रें लिहून घ्यावीं असें ठरविलें. नंतर इतःपर अशा अनुचित कर्मास प्रवृत्त न होतां राज्याच्या कल्याणाविषयीं मनोभावें झटूं अशाविषयीं उभयतांकडून इमान पुरःसर विनंति पत्रें लिहून घेऊन त्यास आपापल्या किल्ल्यास जाण्यास शिंदे यांणीं निरोप दिला. मार्गीं कांहीं अपाय होईल असा त्यांचे मनांत अंदेशा आल्यावरून पारसनवीस यास भणस्कुरा घांटापर्यंत पोचविण्यास देऊन स्वस्थलास सुरक्षित पोहोंचवून दिलें. पुढें कांहीं दिवसांनीं नेरलीकरांचे डोळे काढले बद्दल कृपाळू होऊन, त्यांस महाराजांनीं मौजे निडसोशी प्रांत हुकेरी हा गाव इनाम करून दिला.

शके १६९९ चैत्रमासीं सन १७७७।७८ सालीं कोल्हापूरकरांनीं महादजीशीं तह केल्याचें वर्तमान हैदरखानानें ऐकिलें, तेव्हां त्यांची दोस्ती दृढतर करण्याकरितां व त्यांजमध्यें आपणा विषयीं अधिक भरंवसा उत्पन्न करण्याकरितां खान महाराजांच्ये भेटीस कोल्हापुरास आले. कोल्हापूरकरांच्या कुमकेस आपली फौज देऊन खर्चास एक ल

क्ष रुपये दिले. नंतर हैदरखाना बरोबर तहनामा व्हावा एतद्वि- षयीं उभयपक्षीं वकिलांकडून बोलणी होऊन शके १७०० चंद्र ४ माहे ज- मादिलाखर सन तिस्सासबैन मयाव अल्लुफ सन १७७७।७८ सालीं म- हाराज सरकारांतून नबाब हैदर अल्लीखान बहादूर यांस तहनामा लि- हून दिला.*

शके १७००, राज्याभिषेक शक १०५ या सालीं (सन १७७९) आ- षाढ वद्य १० छ २३ जमादिलाखर रोजीं श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गा- आई साहेब पन्हाळे मुक्कामीं कैलासवासी झाल्या. त्या वेळीं शिवाजी महाराजांचें वय २१ वर्षांचें होतें. हा वेळ पावेतों दुर्गाआईसाहेबच मुख्य- त्वें कारभार करीत होत्या. या पुढें महाराज स्वतः सर्व कारभार पाहूं लागले.

वाघापूरकर घोरपडे यांणीं पटवर्धनांचे फुशीवरून महाराज स- रकाराविरुद्ध बंड केलें. तेंव्हां सुभेदार यांणीं फौज सुद्धां जाऊन वा- घापूरच्या ठाण्यास वेढा घालून मोर्चेबंदी केली. घोरपडे यांणीं पर- शुराम भाऊची फौज कुमकेस आणून लढाई दिली. त्यांत महाराज सर- कारच्या फौजेचा अगदीं मोड झाला. सुभेदार शिकस्त झाल्यावर पर- त आले.

या प्रमाणें करवीरच्या फौजेचा मोड होतांच भाऊनीं महाराज सरकारच्या शिरोळच्या ठाण्यास वेढा घातला. ठाण्यांत जमाव कमी होता, व करवीराहून कुमक वेळेवर आली नाहीं, यामुळें ठाणें जेरी- स आलें. तेंव्हां परशुराम भाऊनें तर्वरानें ठाणें ताब्यांत घेतलें. तेथें य- वनी अमलांतील घुमट चिरेबंदी होता तो पाडून दगड नेऊन मिलवडी नजीक श्री कृष्णाबाईचा घाट बांधिला.

सन १७८० (शके १७०२) राज्याभिषेक शक १०७ सालीं किल्ले भु- दरगड येथें मोठें बंड झालें. त्याचें कारण असें कीं, भुदरगड तनख्या-

---

* हा तहनामा मिळाला नाहीं.

चे गांवगन्ना जमिनींत कांहीं कसर आल्याचें समजलें यास्तव गांवगन्नाची फिरून मोजणी करण्याकरितां हुजुरून भिमाजी जोती कारकून यास रवाना केलें. त्यांणीं जाऊन किल्ले मजकूरचे तनख्यांतील मोजणी करून अव्वल डोंगर, कुणगर, व गुरें चारमाळ व पड देखील गंकदर मोजून जमीन दुप्पट केली. तेव्हां गडकरी हे दील होऊन हुजूर जाहीर न करितां सरकार कामगारांची अमर्यादा करावी असा त्यांणीं निश्चय केला. गडकऱ्यांत प्रमुख कुसाजी नलगे यांणें खटलें करून मामलेदारास किल्यावरती घालविलें, त्या समयीं मामलेदार मौजे शेणगांवीं जाऊन राहिले, आणि तेथून गडकरी यांणीं खटलें उत्पन्न केल्याचा मजकूर लिहून हुजूर विनंति पत्र पाठविलें. पत्र पावतांच मामलेदाराच्या कुमकेस दोन हजार लोक रवाना झाले. कुमक येतांच गडकऱ्यां बरोबर लढाई सुरू झाली. गडावर लढाई चालू असतां गडकरी यांणीं शेणगांवीं येऊन तेथील घरें जाळिलीं. कांहीं दिवस लढाई चालल्यावर गडावरील लोकांस दम निघेना. तेव्हां त्यांणीं नेरळीकर यांजकडे कुमकेस लोक व खर्चास ऐवज मागितला. नेरळीकर यांणीं लागलेच ५०० लोक कुमकेस पाठविले, व खर्चास पुरवठा ही केला. तेव्हां नलगे वगैरे गडकरी यांणीं सतत एक वर्ष पर्यंत खटलें चालविलें, व हुजूरच्या फौजेचा गडावर कदाव चालूं दिला नाहीं. पुढें नेरळीकरांकडून खर्चाचा पुरवठा होईना. गडावर धान्याची तर अगदीं तूट पडली, दारूगोळा हि सरला. तेव्हां निरुपाय होऊन नेरळीकर देसाई यांच्याच विद्यमानें परशुराम भाऊ पटवर्धन यांशीं बोलणें लाविलें तेव्हां आजपर्यंत लढाई करितां गडकरी व नेरळीकर यांणीं जो खर्च केला, तो सर्व घेऊन भाऊंच्या स्वाधीन किल्ला करावा, आणि त्यांच्या आश्रयानें गडकरी यांणीं रहावें, असें ठरलें. त्या प्रमाणें खर्चाचा ऐवज घेऊन पटवर्धनांकडील कारकून बाजी गोपाळ यांच्या हवालीं किल्ला केला; गडावर भाऊंचे लोक चढले, आणि नेरळीकरांचे लोक परत गेले.

भुदरगडावरील कुसाजी नलगे वगैरे गडकरी याणीं बदमामली करून मोजणीचे कारणावरून खटले केले, (शके १७०३ राजशक १०८) व मामलेदार यास हाकून दिलें, हुजूरच्या लोकांशी नेटानें कित्येक महिने टक्कर मारिली, हें वर्तमान वाडीकर सावंत भोंसले यांस समजलें. तेव्हां ही संधि साधून वाडीकर भोंसले याणीं बालाजी भोगटा नामे सरदार यास जमावीनिशीं ज्येष्ठमाशीं घांटावर पाठविलें. आणि रांगणें किल्ल्यानजीक चिक्केवाडी येथें मेटा घालून रांगणें किल्ल्यासही वेढा घातला. तेव्हां अंताजी जनार्दन वाकनीस गोंदजीबावा वरपटे यां समागमें किल्ल्याचे कुमकेस महाराज सरकारांतून फौज रवाना झाली. तसेंच विशाळगडकर आणि बावडेकर यांस ही कुमकेस जाण्यास आज्ञा झाली. ते तयारी करून अश्विनमासीं जाऊन पोंचले. सावंता बरोबर सुमारें तीन महिने लढून माघ शु० १५चे सुमारास किल्ले मजकूर येथील चिक्केवाडीचा मेटा महाराज सरकारच्या फौजेनें घेतला. तेव्हां सावंत किल्ला सोडून निघून गेले. नंतर यशवंतराव शिंदे ही किल्लेमजकुरास जाऊन किल्ल्याचा बंदोबस्त करून परत आले.

या वेळीं कुमके बद्दल व सावंतांचा चार गोष्टी मागण्या बद्दल महाराज सरकारांतून कंपनीच्या कामगारांसही पत्रें गेलीं होतीं, त्याचीं उत्तरें* पुरवणींत दिलीं आहेत

कर्नाटक प्रांतीं हैदरखानावर पेशव्यांनीं स्वारी केली होती, आणि बारभाईशीं खटला चालविला होता. त्यांत हैदरखानाकडून कुमक पाठविण्या विषयीं करवीरकर महाराजास वरचेवर पत्रें येतच असत. हैदर व करवीरकर यांतून रघुनाथरावासही सामील असून त्यांच्याशीं ही पत्रव्यवहार चालला होता. त्यां पैकीं कांहीं परिशिष्टांत दिलीं आहेत त्यावरून त्यावेळच्या लोक लक्षांत येईल.

---

* पत्रें नंबर

करवीर महाराजांचा, नबाब हैदरअलीखान बहादूर यांच्याशीं तहनामा झाल्याचें आणि रघुनाथरावांस अंतस्थ करवीरकरांचें सहाय्य असल्याचें वर्तमान पंतप्रधानांस समजलें. तेव्हां त्यांणीं विचार करून ठरविलें कीं, करवीरकरांचे चिकोडी व मनोळी हे दोन तालुके सोडून देऊन त्यांस खूष राखावें, आणि त्यांजकडून खान व दादा यांस कुमक मिळूं नये असें करावें, असें ठरवून शके १७०२ राज्याभिषेक शक १०७ या सालीं महाराज सरकाराशीं यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार यांच्या विद्यमानें तहनामा केला. त्यांत एकंदर कलमें ३० होतीं. पैकीं मुख्य खालीं दिलीं आहेत.

(१) प्रांत हुकेरी तालुका व मनोळी तालुका व फुटगांव, प्रांत कागल व रायबाग व कटकोळ तालुक्यासुद्धां पेशजी चालले प्रमाणें स्वामींकडे चालवावें. मध्यें सांगणाराचे गोष्टीवरून विपर्यास पडला. पुढें (तसें) होणार नाहीं. या प्रमाणें करार करून शफत पूर्वक विनंति पत्रें यावीं.

प्रांत हुकेरी तालुका व मनोळी तालुका यांच्या सनदा स्वामींनी दिल्या, त्या हल्लीं स्वामीस नजर केल्या. हल्लीं हुकेरी प्रांत व मनोळी प्रांत नजर केले असत; येणें प्रमाणें करार.

(२) भगवंत पंत व शेषोपंत यांणीं हुजूरचीं आज्ञापत्रें नेलीं; व प्रधान पंताकडील उभयतांकडे आहे तीं, व रामचंद्र महादेव व बाळाजी केशव यांजकडे गोपाळभट यांचे विद्यमानें हुजूरचीं आज्ञापत्रें व सावकारी पत्रें व मनोळीच्या सनदा व दरम्यानगिरीचीं पत्रें व सनदा आहेत, तीं व आप्पाजी रामजी व महादेव भट यांचे विद्यमानें सावकारी पत्रें व हुजुरचीं आज्ञापत्रें आहेत, व प्रधानपंताकडील करारांचीं पत्रें आहेत, तीं हुजूर यावीत.

आजपर्यंत करार मदारांचीं मागीलपत्रें व यादी वगैरे कागदपत्र ज्या ज्याकडे असतील, ते शोध करून पाठवून देऊं. शोध न लागल्यास तीं पत्रें रद्द असत. येणें प्रमाणें करार.

(३) तीन सालांत राजश्री परशुराम रामचंद्र यांणीं गांव व ठाणीं जीं घेतलीं आहेत, तीं व ज्यांकडे दिलीं आहेत तीं, झाडेनिशी सरकारांत द्यावीं. हल्लीं झाडेनिशी करारा प्रमाणें सरकारांत सोडून देऊं येणें प्रमाणें करार.

(४) करवीर करांवर महादजी शिंदे आले, त्या समयीं करार बंदाच्या यादि व सरकारची पत्रे व कागदकतबे व अकरा लक्षांचा कतबा व राजश्री सुबराव पंडित अमात्य व राजश्री आबाजी राव पंडित प्रतिनिधि यांचे कागद कतबे देविले ते झाडून माघारे द्यावे. महादजी शिंदे यांजवळ कागदपत्र व यादी आहेत, त्या तिकडून आणून देऊं, न आल्यास रद्द असत. येणें प्रमाणें करार.

(५) जरी पटका व दोन हत्ती हुजूरचे नेले आहेत ते हुजूर द्यावे. स्वामीकडील जरी पटके व दोन हत्ती व तोफा चार रामचंद्र गणेश यांजकडे आहेत त्या देऊं. स्वामींनीं कोन्हेरराव त्रिंबक यांजबाबत तोफा नेल्या आहेत त्या द्यावयाची आज्ञा करावी.

(६) हणमंत शिवराम व भिकाजी नरसिंह व घनःशाम यशवंत, अंताजी जनार्दन व व्यंकाजी सुर्वे वगैरे, व त्यांजबरोबर कारकून व मराठे व मनुष्यें तुम्हांकडे असतील त्यांस हुजूर पाठवावें.

स्वामीकडील जे सांपडले आहेत त्यांस सोडून देऊं. स्वामीकडे आमचे (लोक) सांपडले आहेत त्यास सोडून द्यावेत, येणें प्रमाणें करार.

(७) आज पावेतों भगवंत आप्पाजी व त्रिंबो नारायण व आप्पाजी शामजी यांणीं गैरवाका हुजूर विनंति करून तुम्हांस हुजूरचा गैरवाका समजावून देऊन राज्याची खराबी केली, आणि तुम्हांशीं विपर्यास घातला याजमुळें राज्याची खराबी झाली, याचा दिनाव त्यांणीं भरून द्यावा लागेल.

येविशीं स्वामींनीं त्यांचे हातून सेवा घ्यावी. सेवे अंती जी आज्ञा

करणें ती करावी; येणें प्रमाणें करार.*

इसवी सन १७८३ (शालिवाहन शके १७०५ राजशक ११०) सा-
लीं चैत्रवद्य ३० रोजीं यशवंत राव शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभे-
दार यांस महामारीचा उपद्रव होऊन करवीर मुक्कामीं त्याचा काळझाला.
सुभेदार वारल्याचें वर्तमान पन्हाळे मुक्कामीं महाराजांस कळल्यावर
बाजीपंतास उत्तरकार्य करण्यास रवाना केलें. बाजीपंत हे सुभेदारां-
चे विश्वासु कारकून होते. त्यांणीं आज्ञेप्रमाणें उत्तरकार्य आटपून पु-
ढें कामांत वागणें ठीक नाहीं, हें मनांत आणून आपल्या वहिवाटीचा, स-
र्व दौलतीचा एकंदर हिशेब करवीरीं तयार करवून एकलक्ष ब्राम्हण
भोजन घालून हिशेब गुजरण्यास पन्हाळ्यास गेले. सर्व हिशेब गुज-
रून सरकारचे मर्जीस येईल त्याजकडून कारभाराचें काम घ्यावें,
आणि आपणास महायात्रेस जाण्यास निरोप द्यावा म्हणून विनंति के-
ली. तेव्हां चातुर्मास झाल्यावर आज्ञा होईल असा हुकूम झाला.
रत्नाकरपंतआपा हे कारकुनीच्या हुद्यापासून चढून पोतनीस
झाले होते, व या वेळीं सर्व फौजेवर मुख्य कामगार होते. त्यांस का-
रभाऱ्याचे कामावर नेमून ज्येष्ठ शुद्ध ५ चे दिवशीं वस्त्रें दिलीं.

शके मजकुरीं भाद्रपद वद्य षष्ठीस कपिला षष्ठीचा योग आला
होता. (शके १७०६). यास्तव महाराज सरकारची स्वारी करवीरास आ-
ली. पर्वकाळीं तीर्थस्नान करून आठ मुक्काम झाल्यावर स्वारी पन्हाळ्या-
स परत गेली.

पुढें अश्वीनमासीं शारदी नवरात्राचा उत्साह आटपल्यावर (श-
के १७०६) बाजीपंतास महायात्रेस जाण्यास निरोप दिला. त्या सम-
यीं महाराजांची जनक मातोश्री बयासाहेब खानवटकर यांणीं बा-
जीपंताबरोबर महायात्रेस जाण्याचा मानस कळवून रवानगी करून घा-

---

* या वेळीं महाराज सरकारांतून कलमबंदीची जी यादी पुण्यास प्रथम पाठविण्यां-
त आली होती तिची नक्कल पुढें देण्यांत आली आहे. नं पहा.

वी, असें महाराजांस सांगून पाठविलें. तेव्हां बरोबर घोडीं माणसें वगैरे सरंजाम नेमून व खर्चास २५००० रुपये देऊन रवानगी केली. त्यांजबरोबर **रत्नाकरपंत आप्पा** यांणीं आपल्या मातोश्रीचीही रवानगी करून दिली; व बरोबर आपले बंधु जोतीपंत यांसही पाठविलें.

याच सालीं (सन १७८४) बावड्यावरील गडकऱ्यांच्या हक्कांत बावडेकर पंत यांणीं कांहीं धांदल केल्यावरून गडकरी बेदील झाले, व त्यांणीं बंड केलें. **महादाजी शंकर** व **बाजी महादेव** व **चिटको महादेव** गोणवी व **महादाजी बल्लाळ देसाई** जात कऱ्हाडे यांनीं गडकऱ्यांस अनुकूल करून घेऊन **सकबराव कृष्ण** अमात्य यांस किल्ल्याखालीं घालवून बदलून बसले. ही बातमी हुजूर येतांच **गुजाजी** गायकवाड सरखवास यास फौज देऊन बावड्यास रवाना केलें. खवास पावले असतां बोलणें वगैरे कांहींच आलें नाहीं. तेव्हां पंधरा दिवस वाटपाहून खासास्वारी फौजेसह बावड्यास निघाली. तिसरे दिवशीं किल्ले मजकुरानजीक पोंचून किल्ले लगत रूपणीच्या ओढ्यावर फौजेस रहाण्यास आज्ञा झाली, व सडीस्वारी पेठेंत विठलाईच्या देवळाजवळ गेली. देवळाजवळ जातांच किल्ल्यावरून गडकऱ्यांनीं तोफा सुरू केल्या. तेव्हां सायंकाळपर्यंत स्वारी राहून परत आली. दुसरे दिवशीं साळवपास येऊन मल्हारपेठेंत पंधरा दिवस मुक्काम केला. तत्राप बोलणें कांहींच आलें नाहीं. सबब कुच होऊन स्वारी पुनः किल्ले बावड्यास गेली. त्या समयीं किल्ल्यावरून पुनः तोफा सोडल्या. त्यावेळेस **राघोजी भोसले** हवलदार हिम्मत देवघर यास विठलाईच्या देवळा नजीक गोळी लागून ठार झाले. त्या दिवशीं महाराज सरकारचा मुक्काम त्याच स्थळीं झाला. दुसरे दिवशीं स्वारी मल्हारपेठेस गेली. नंतर कामगार गोणवई वगैरे यांस अभयपत्रें देऊन आणविलें, आणि समेट करून परत बावडे किल्ल्यास पाठविलें. पिराजी घेसाजी शिंदे सुभेदार यांणीं राशिवडें हा गांव जप्त करून सरकारांत घेत-

ला होता, त्या गांवची सोडचिठ्ठी पंडित अमात्य यांस देऊन रा- शिवड्यास जाऊन रहाण्यास आज्ञा दिली आणि स्वारी परत करवि- ली आली.

सन १७८५ (शके १७०७ राज्याभिषेक शक ११२) साली का- र्तिकमासीं श्रीमन्महाराज सकलसौभाग्यादि संपन्न मातोश्री सई- बाई साहेब यांहीं पन्हाळे मुक्कामीं कैलासवास केला.

हुजूरच्या घांटाखालील प्रांतास वाडीकरांचा उपद्रव सुरू होता. (शके १७०७) मालवण तालुक्यांतील कांहीं गांवाच्या स्वामित्वाबद्दल हरदू सरकारांत तंटे चालू होतेच. शिवाय महादजी शिंद्यांची पुतणी जयाजीराव शिंद्यांची मुलगी लक्ष्मीबाई इचा विवाह खेमसावंत भों- सले सावंतवाडीकर यांशीं सन १७६३ सालीं झाला असून लक्ष्मीबाई- नें महादजीच्या विद्यमानें दिल्लीच्या पादशहाकडून मोर्चेल धरण्या- चा हक्क नवऱ्याकरितां मिळविला होता. छत्रपतिशिवाय इतरांस मोर्चे- ल धारण करण्याचा हक्क नाहीं. यास्तव ही गोष्ट करवीरकरांस रु- चत नव्हती. याकरितां रत्नाकरपंत आपांनीं घांटाखाली स्वा- री करण्यास आपण स्वतः निघावें अशी महाराजांस विनंति केली. त्याप्रमाणें मार्गशीर्ष अखेरीस खासास्वारी पन्हाळ्याहून निघून फौ- जे सुद्धां वाडीकर सावंत यांचा मुलूख घेण्यास रांगणाकिल्ल्याचे घा- टानें खालीं उतरली. वाडीकरांशी लढत मौजे माणगांव पावेतों जा- ऊन नेरूरच्या मुक्कामास येऊन दाखल झाली. सावंतास महाराजा- च्या फौजेनें एकाएकीं गांठल्यामुळें त्यांची फार दुर्दशा उडाली. नेरू- राहून रत्नाकरपंत पोतनीस कारभारी यांस फौजे सुद्धां मालवणा- कडे रवाना केलें. वाडीकरांचा मेढा तिप्पणखडी येथें होता, आपा मालवणाकडे वळल्याची बातमी लागतांच, सावंत पुढें येऊन तरीच्या मार्गावर आडवे आले, आपास पुढें जाऊं दिलें नाहीं. तत्राप तिकडी- ल प्रांताचा बंदोबस्त करून व वाडीकरांस तबीब पोहोंचवून नेरूरा- हून स्वारी फाल्गुन शुद्ध १३ रोजीं पन्हाळ्यास परत आली. प्रसिद्ध

उदाजीराव चव्हाण यांचे पुत्र प्रीतिराव यांणीं पूर्वी महादजी शिंदे व कोन्हेरराव कर्वीरावर आले त्या वेळीं मोठी मर्दुमकी केल्यावरून त्यांस हिम्मतबहादूर हा किताब देऊन जहागीर व जरी पटका शके १७०६ राज्यशक १११ सन १७८४ फाल्गुन वद्य ३ रोजीं दिला होती. या स्वारींत ही शौर्य प्रकट केल्यावरून सरकारतर्फेन्ही देसगत आणि कोथळी, रेंदरें व शिवरें हे ३ गांव इनाम करून दिले. (शके १७०८ छ १४ रमजान).

मातोश्री बयासाहेब वगैरे मंडळी महायात्रेस गेली होती ती यात्रा करून दीड वर्षानें परत आली. करवीरानजीक आल्याचें वर्तमान समजतांच स्वारी सामोरें जाऊन त्यांस घेऊन आले, आणि ब्राम्हण समाराधना त्यांजकडून करविली. पूर्वी रवानवटकरांस पांच हजारांचा सरंजाम दिला असून हल्लीं आणखी चार हजारांचा गांव व हवेली तर्फेची सरदेशमुखी दिली.

बाळाबाई आका यांचा विश्वासराव घाटगे सर्जेराव यांजबरोबर विवाह करून चोळी कांकणाबद्दल मौजे 'नरतवडें' हा गांव इनाम करून दिला. (शके १७०७).

पुढें कार्तिकमासीं (शके १७०७ सौभाग्यवती सईबाई साहेब यांणीं पन्हाळे मुक्कामीं कैलासवास केला. यांच्यावर महाराजांचा लोभ फार होता. यामुळें महाराजांस फार दुःख झालें.

सन १७८५ (शके १७०७ राज्यशक ११२) सालीं मार्गशीर्ष मासीं यशवंतराव घाटगे सरजाराव यांची ज्येष्ट कन्या इजशीं महाराजांचें लग्न झालें. त्याच वेळीं बाबा महाराज यांच्या दोन कन्यांचीं लग्नें झालीं. एक विशाळगडकरांस व दुसरी कडगांवचे देशपांडे यांस दिली.

सन १७८६ (शके १७०८ राज्यशक ११३) सालीं कर्नाटक प्रांतांतील बदामीचा किल्ला नबाब हैदरखान याणें घेतला होता. तो घेण्याकरितां पुण्याहून बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणवीस, ह-

रिपंत फडके व परशुराम रामचंद्र पटवर्धन वगैरे सरदार मोठी फौज व तोफखाना सुद्धां आले. बदामीच्या किल्ल्यास वाश देऊन मोर्चे बंदी करून दोनतीन महिने बसले. किल्ल्यावर खानाची मनुष्यें व सरंजाम बहुत होता. सबब किल्ला हातीं लवकर येईना. पुढें संधि साधून हल्ला करून किल्ला घेतला. परशुराम रामचंद्र वगैरे सरदारांस फौजे सुद्धां कर्नाटक प्रांतांत ठेवून नाना व हरिपंततात्या थोडी फौज घेऊन पुण्यास निघाले. मार्गांत महाराज सरकारच्या सरहद्दीवर आले. बरोबर हैबतराव शंकर पागे होते. ते करवीरचे खंडेराव गोविंद पारसनवीस यांचे शालक; सबब त्यांची भेट घ्यावी व महाराज सरकारचें दर्शन घेऊन महाराज सरकारांत आपली वडिलार्जित चिटणिशीची असामी आहे तिजवर काम करण्यास आपल्या तर्फे कोणास तरी ठेवावें, अशी विनंति करावी, या हेतूनं नानांचा निरोप घेऊन करवीरीं आले. नंतर पारसनवीस यांचे विद्यमानें महाराजांचें दर्शन घेऊन विनंती केली कीं, आजपर्यंत दरबारची चिटणीशीची सेवा वडिलांकडून घेतली, तें काम आतां सेवकांस देण्याची आज्ञा व्हावी. तेव्हां तुमचें काम तुम्हांस देण्याची आज्ञा होईल. परंतु पेशव्यांची पागा तुम्हांकडे आहे; त्यांत एक कडा घोडा आहे तो तुम्हीं नजर द्यावा. त्या वरून मशारनिल्हेनीं तो घोडा महाराजांस नजर दिला. आणि चिटणीशीचें काम करण्याची आज्ञा घेतली. नंतर राहाण्यास जागा घेऊन घर बांधून आपल्या तर्फेचा कारकून ठेवून निरोप घेऊन गेले. त्यांनीं नजर केलेला घोडा फार देखणा व चांगला होता. महाराजांनीं त्यांचें नांव बारक्या म्हणून ठेविलें.

इसवी सन मजकुरीं (१७८६) रत्नाजीराव खानवीलकर यांचे कन्येशीं लग्न झालें. (शके १७०८) याचसमयीं वाडीकर सावंताच्या फुशीवरून सामान गडावर बंद झालें. गडकरी यांणीं गैरराहा वर्तणूक करून मामलेदारास खालीं घालविलें. हें महाराजांस विदीत होतांच त्यांणीं रत्नाकरपंतास फौजेसहीत रवाना केलें. त्यांस गड-

करी यांणीं किल्ल्यावर घेतलें नाहीं. तेव्हां ते कडगांवीं राहिले. आणि तेथून महाराजांस विनंतिपत्र पाठविलें. पत्र पावतांच स्वासाऱ्या गडास गेली. किल्ल्यानजीक पोंचल्यावर बरोबरची फौज खालीं ठेवून पन्नास लोक व दहा हुजरे बरोबर घेऊन सडीस्वारी दरवाज्यांत दाखल झाली. महाराजांस पहातांच गडकरी शरण आले. तेव्हां किल्ल्यावर हजारो लोक नेऊन किल्ल्यावरून गडकरीलोकांस खालीं घालविलें आणि पहिला हवलदार सटवाजी भोंसले यास काढून हंबीरराव जाधव यास हवलदारी देऊन किल्ल्याचा बंदोबस्त केला. नंतर गडकरीलोकांस घेऊन स्वारी पन्हाळ्यास आली. गडकऱ्यांस एकवर्ष पन्हाळ्यास ठेविलें होतें. नंतर जामीन घेऊन परत सामानगडास जाण्यास हुकूम दिला.

(शके १७०९ राजशक ११४ संसानसमानीन छ २४ शाबान इसन १७८७ जून) सामानगडच्या खटल्यांत वाडीकरांची सर्व लबाडी बाहेर पडली. तेव्हां वाडीकरांच्या मुलखांत स्वारी करण्याच्या इराद्यानें कार्तिकमासीं सर्व सरदार व फौज घेऊन महाराजांनीं कूच केलें. पाटगांवाकडील प्रथम सोनगड घेतला. नंतर घोडप्याच्या घांटानें खालीं कोकणांत उतरून भरतगड, निवति, वेंगुर्लें, वनाळगड वगैरे किल्ले आणि नदि अलिकडील सुमारें दीड लक्षाचा मुलूख एका महिन्यांत सरकरून मार्गशीर्षमासीं नेरूर व वाकोळी (वालावली) या मुक्कामीं स्वारी आली. या मुलखाच्या सामन्याचें नांव दुरुणी महाल असें ठेवून सदर मामल्याचा वहिवाट जिवाजी आबाजी ऊर्फ बापू वांकनीस यास सांगितली. हा प्रांत महाराज सरकारांत सुमारें सात वर्षें होता. नंतर वाडीकरांनीं महादजी शिंदे यांजकडे बोलणें लावून त्यांच्या विद्यमानें प्रांत मोकळा करून घेतला.

(इ. स. १७८८ तिसा समानीन) यशवंतराव घाटगे सर्जेराव कागलकर यांस चिखली, भडगांव, वाळवें, मलगे खुर्द, मलगें बुद्रूख आणि मौजे कुरणी हे सहागांव इनाम करून दिले. आज्ञापत्र रत्ना-

करपंत आप्पा यांच्या हातचें छ ११ रमजानचें आहे (शके १७१० आषाढ शु॰ १२ इ॰ स॰ १७८८ तारीख १६ जुलै)

इ॰ स॰ १७८८।८९ (शके १७१० राजशक ११५) साली पौषमासीं माधवराव नारायण पंडित प्रधान यांजकडील कारभारी यांच्या सांगण्यावरून खवमाजी भोंसले अनूरकर यांणीं दुर्बुद्धीनें बंड केलें आणि तोरगलकरांच्या कनिष्ठ घराण्यांतील नेसरीकर यांस सामील करून घेऊन नेसरी नजीक तुर्कवाडी येथें येऊन उतरले (तिस्सा समानीन, रबिलाखर) आणि महाराजांच्या प्रांतास गांवगन्ना उपद्रव देऊं लागले. त्यांचें पारिपत्य लवकर न केल्यास जमाव जाजती होऊन पारिपत्यास श्रम लागतील, असा महाराजांनीं विचार करून रत्नाकरपंत यांस समागमें सरदार व फौज देऊन अनुरकरांवर रवाना केलें. ते अगोदर सामानगडास जाऊन नंतर भवानगडास गेले. तेथें दगाकरून बखेडा करण्याचा मानस भोंसले यांचा दिसला. तेव्हां आप्पांनीं मल्हारनिल्हे भोंसले यास सांगून पाठविलें कीं, तुमची आमची प्रथमतः भेट व्हावी, नंतर जें काय बोलणें तें बोलावें. तेव्हां रत्नाकरपंताच्या मनांत विकल्प आहे कीं काय याची परीक्षा न पाहतांच मानवर चांगल्या माणसांची खात्री न मागतां बहिरव संगेश त्रिपूरकर जात शेणवी निसबत त्रिंबकराव हेरवाडकर, यांनीं खात्री मागितली. सटरगांव बहिरवराव यांजकडे नेसरीकर शिंदे याजकडून इनाम चालत होता व ते पूर्वी वल्लभगड व सोलापूरचे वहिवाटीस होते. तेहि हल्लीं रत्नाकर आप्पा बरोबर लष्करांत होते. त्यांनीं खात्री दिल्यावरून खवमाजी भोंसले भावार्थानें लष्करानजीक येऊन आप्पांस भेटले, व चार घटका बोलणें होऊन निरोप घेऊन जाण्यास निघाले. आप्पांनीं पूर्व संकेताप्रमाणें माणसें तयार ठेविलीं होतीं. त्यांनीं गर्दी करून मल्हारनिल्हे भोंसले घोड्यावर बसते समयीं त्यास ठार मारलें. नंतर त्यांचें दरोबस्त लष्कर लुटून तुर्कवाडीचें ठाणें घेतलें. तेथें तोफावगैरे सा-

मान होते ते घेऊन नेसरीस आले. भोसल्यांचे सार्थक करवून व पाडाव केलेल्या तोफा सामान गडावर ठेवून आणि किल्ले वल्लभगड, गंधर्वगड आणि भिंवगड घेऊन राजाज करविरां आले.

विश्वासराव घाटगे व यशवंतराव घाटगे यांचा कागल प्रांतांतील वतने व इनामगांव या संबंधी खटला चालला होता, तो आपसांत तुटेना. तेव्हां उभयतांचें खटले सरकारांत आले. तेव्हां सरकारांतून ठराव होऊन व ठरावाची याद करून त्यांस दिली. आणि त्याप्रमाणें ते चालूं लागले.

शके १७१० साली रत्नाकरपंत राजाज यांचे चिरंजीव नारायणराव यांस वारवा होऊन करविरी फारच आजारी पडले, याजकरितां रत्नाकरपंत निरोप घेऊन समाचाराकरितां पन्हाळ्याहून करविरास निघाले. मार्गी मनस्वी पर्जन्य लागला यामुळें चिखल झाला होता. वडणगें नजीक घोड्याचा पाय निसरून आप्पा पडले; आणि आंगाखालीं पाय सांपडून दुखावला, तरी तसेंच करविरीं आले. हें वर्तमान महाराजांस समजतांच समाचारासाठीं स्वारी निघून करविरीं आली. कांहीं दिवस उपाय केल्यावर पायाचें दुःख कमी झालें. या प्रमाणें पदरच्या कामगारास वगैरे वरचेवर करविरीं यावें लागतें, व गडावर सर्वांस रहाण्याची अडचण, यास्तव करवीरास राजधानी करून रहावें असा निश्चय करून महालच्या स्वाऱ्याही पन्हाळ्याहून आणिल्या (इ. स १७८८।८९).

आऊबाई आक्कास आठवें वर्ष लागलें, यास्तव यशवंतराव घाटगे सर्जेरावयांस वर योजून माघ शु० ७चे मुहूर्तास मोठ्या समारंभानें लग्नोत्साह केला. (शके १७११ राज शक ११६ इ. स १७९० ता. २३ जानेवारी) दानधर्म ब्राम्हण भोजन वगैरे यथास्थित केलें. याच वेळीं मोंगलां कडील व विजापूर करांकडील कागल जाहागिरीबद्दल ज्या सनदा होत्या त्या नवीन करून दिल्या.

(शके १७१३ राजशक ११८ इ. स. १७९१ नवंबर) सालीं महाराज-

बावड्यावरील कामदारांकडून कार्तिकमाशीं बोलणें आलें कीं, आम्हीं वदलून अमात्यास खालीं घालविलें, व आज साहावर्षे मवास होऊन राहिलों, ही आमची चूक झाली; किल्ला सरकारांनीं घेऊन सेवक लोकांचा अपराध माफ करावा; कुटुंबाचें संरक्षण करावें, आणि सेवा चाकरी घ्यावी. तेव्हां गुजाजी गायकवाड सरखवास यांच्या विद्यमानें बोलणें ठरविलें, आणि मशारनिल्हे सरखवास आणि नारायणराव पाटणकर सरलष्कर या उभयतांस जामीन घेऊन सदर्हू अन्वयें बोलण्याचा ठराव झाला, आणि महाराज सरकारची स्वारी बावडे किल्ल्यास जाऊन पोहोंचली. तेव्हां गडकरी आणि हवालदार यांणीं महाराजांस आणि शीतोळराव चव्हाण व सरलष्कर व रत्नाकरपंडित राजाज्ञ यांस दिंडींतून किल्ल्यांत घेतलें व बाकीची मंडळी व फौज खालीं राहिली. महाराजांची स्वारी करवीराहून निघाली तेव्हांच सुबराव पंडित अमात्य यांस सांडणी स्वारांबरोबर आज्ञापत्र पाठविलें होतें कीं, "बावडेकर कामदार यांचें बोलणें ठरल्यावरून स्वारी बावड्यास निघाली आहे. तरी तुम्हीं रांगिवड्याहून निघून जलद बावड्यास यावें." या प्रमाणें पंतअमात्य ही स्वारीस येऊन मिळाले. स्वारी गडावर जाऊन गडकरी व हवलदार यांची खात्री केल्यावर किल्ला स्वाधीन केला, आणि किल्ल्याचा दरवाजा उघडून तोफा उडविल्या. तेव्हां सरदार व फौज वर आली. त्यां बरोबर अमात्यही परत आले. त्यांस पहातांच महाराजांची मर्जी सुप्रसन्न झाली, आणि अमात्यांस आज्ञा केली कीं, आपला किल्ला आपले स्वाधीन करून घ्यावा; तुमच्या पेंचांतून श्री अंबाबाईनें आम्हांस काढलें. या प्रमाणें किल्ला अमात्याचे स्वाधीन करून स्वारी खालीं पेठेंत आली. तेव्हां अमात्यांनीं येथें नाटें व्हावीं अशी विनंति केली; परंतु प्रस्तुतच्या प्रसंगीं येथें रहाणें बरोबर नाहीं. येथें नाटास रहावयाचें नाहीं. या वेळीं रत्नाकर पंतांनीं अमात्यांस विचारिलें कीं, महाराज सरकारांनीं कृपाळू होऊन किल्ला

आपले स्वाधीन केला, सबब महाराजांस आपण नजर काय केली हें समजलें नाहीं. त्याजवरून पंडित अमात्यांनी उत्तर केलें कीं, किल्लावसर्व दौलत महाराजांचीच आहे, मी सेवक आहें; त्या पेक्षां धन्यास मी काय द्यावें? तथापि आपण प्रश्न केला त्यास आपलेकडे **पावनगड** आहे. त्या तनख्यांत आमचा सालाबादचा ऐवज येणें तो आपणास माफ करून देतों, तो आपण घ्यावा. असें बोलून किल्ले मजकूरचे तनख्यांतील बाबतीचे ऐवजाचीं माफी पत्रें राजाज्ञांच्या नांवचीं करून दिलीं. त्या प्रमाणें पावनगड राजाज्ञ यांजकडे होता तों पर्यंत बाबतीचा ऐवज घेत होते. पुढें किल्ले मजकूरच्या तनख्यांतील बाबतीचा ऐवज महाराज सरकारांत जाऊं लागला.

सन १७८८ पासून पुढें पांच सालें कोल्हापुरावर परचक्र आलें नाहीं, व प्रांतांत स्वस्थता होती. वरचेवर बंडें होत, व सरदार गैरवर्तन करीत. यामुळें कित्येक सरंजाम व इनामगांव जप्त केल्यानें वसूलही जास्त होऊं लागला. येणें करून तिजोरींत बरीच शिल्लक जमली, तिचा व्यय तुळजापुरास **श्रीभवानीचे** यात्रेस स्वारी गेली त्यांत झाला. या यात्रेस स्वारीही मोठ्या थाटानें गेली होती, यास्तव त्या स्वारीचें थोडेंसें वर्णन देणें या स्थळीं आवश्यक आहे.

शके १७१३ साली माघमासीं श्रीभवानीचे दर्शनास तुळजापुरीं महाराजांची सडी स्वारी निघावी असा निश्चय ठरला. त्या समयीं सरहद्दीवरील पंत प्रधान व पेशव्यांकडील दुसरे सरदार यास श्रीचे दर्शनास स्वारी तुळजापुरास जाणार म्हणून आज्ञापत्रें गेलीं नाहींत. कारण ही गोष्ट प्रसिद्ध झाल्यानें कदाचित् स्वारीच्या जाण्यास हरकत येईल, असा अंदेशा आला होता. स्वारी निघण्यापूर्वीच **भगवंतराव** भोपे तुळजापूरचे पुजारी यांस गिरगांव तर्फ खानापूर हा गांव राज शक ११८ माघ शुद्ध १० रोज गुरुवारची सनद देऊन इनाम दिला; आणि वद्य पक्षीं महाराजांची खाशी स्वारी करविराहून महालच्या स्वाऱ्यां सहित निघाली. स्वारी समागमें **अमात्य, प्रतिनिधि,** इ. स. १७९२ फे.

हिम्मतबहादर, सरलष्कर, सेनाखासकील, सेनापति, घाटगे सरजाराव वगैरे सरदार होते. शिवाय दोन हजार निवडक स्वार, दरखदार वगैरे मंडळींचीं घोडीं ५००, पायदळ, खासबारदार, हुजराम वगैरे पथकें आणि गडकरी व सरदारांचे लोक मिळून पांच हजार शिवाय बाजारबुणगे, तट्टें, उंटें, बैल सरसुद्धां एकंदर अजमासें दोन हजार सरंजाम घेऊन स्वारी कूच दरकूच निघाली, ती तिसरे दिवशीं पंढरपुरास पोंचली. इतक्या त्वरेनें स्वारीचा कूच झाल्यामुळें घोडीं, बैल वगैरे — लोक थकून गेले. महालच्या भोयांपैकीं पांचचार असामी उरीं फुटून मेले. म्हणून त्यांचे बायकांमुलांस रांडरोटी जमीन दर एकास पांच बिघे प्रमाणें गांवगन्ना इनाम करून दिली. पंढरपुराहून मध्यें एक मुक्काम होऊन पांचवे दिवशीं स्वारी तुळजापुरास दाखल झाली. तेथें स्वारीचे पांच मुक्काम झाले. श्रीचें दर्शन होऊन श्रीस अभिषेक केला, वस्त्रालंकार दिले, महापूजा बांधिली, समाराधना केली, व गोरगरीब लोकांस धर्मादाय वांटला. या प्रमाणें यात्रेचें काम आटपून सहावे दिवशीं कूच होऊन स्वारी निघाली. महाराजांची स्वारी श्रीचे दर्शनास दरकूच निघाल्याचें वर्तमान समजताच पंत प्रधानांचीं पत्रें डाकेंतून मामलेदारांस गेलीं कीं, ज्या मुक्कामीं महाराज सरकारच्या स्वारीचा मुक्काम होईल तेथल्या मामलेदारांनीं महाराजांस नजर करून मेजवानीचा सरंजाम हजर करावा, आणि बराेक प्रकारें सरबराई ठेवावी. लिहून आल्याप्रमाणें स्वारी परत करवीरीं येत असतां प्रधानांकडील कामदारांनीं सरबराईचा बंदोबस्त ठेवून दर्शन घेऊन नजराणे केल्या. स्वारी कूच दरकूच दवडीनें पंधरावीस कोसांचे मुक्काम करून पंधरावे दिवशीं करवीरास येऊन दाखल झाली.

स्वारी परत आल्यावर मर्जी बहुत संतोषी होऊन तुळजापूर निवासिनीचे खर्चास फाल्गुन शुद्ध ८ रोजीं मौजे वडूर तर्फ रुकडी हा गांव इनाम करून दिला.

(इ. स. १७८९) कंपनी सरकारांशीं जे सावंतांचे व कोल्हापूरकरांचे तहनामे होते, ते बरोबर रीतीनें अमलांत आणण्याचें सामर्थ्य कंपनीस नव्हतें, किंवा पेशवे सरकाराशीं वेगळे तहनामे झाल्यामुळें त्यांच्या ताब्यांतील सरंजामा बरोबर त्यांच्या इतल्या शिवाय लढाई करितां येत नसे. या कारणानें सावंताचा पुंडावा पश्चिम किनाऱ्यावर धडाक्यानें अबाधित चाललाच होता. आणि कोल्हापूरकर ही या वेळीं आपल्या पूर्व वहिवाटीस प्रवृत्त झाले होते. यामुळें कंपनीच्या तारवांस फारच उपसर्ग पोंचून तो दुःसह झाला. तेव्हां सन १७८९ सालीं मुंबई सरकारानें पश्चिम किनाऱ्यावरील चांचे लोकांची खोड मोडण्याचा निश्चय केला. जरी कोल्हापूरचें राज्य अगदीं स्वतंत्र असून पेशव्यांचे ताब्यांतील नव्हतें, तरी मुंबई सरकारास हें राज्य पेशव्याचे ताब्यांतीलच एक सरंजाम असावा, असा अंदेशा येऊन पेशव्यांचे इतल्या शिवाय कोल्हापूरकरांवर कशी स्वारी करावी हा विचार पडला. ही बातमी नाना फडणवीसास समजतांच त्याणें कोल्हापूरकर महाराजास पत्रें लिहिलीं कीं, या वेळीं इंग्रजांची फौज कोल्हापुरावर येणार यास्तव प्रस्तुत समयीं मुकाट्यानें पेशवे सरकारची ताबेदारी पत्करून प्रधानांचे बाहेदारी खालीं यावें, म्हणजे हें परचक्र टळेल. प्रथमारंभीं महाराज या म्हणण्यास रुकार देण्याच्या विचारांत होते. परंतु त्यांस लागलाच अंदेशा आला कीं, यांत कांहीं तरी पेशवे सरकारचें कृत्रिम असून राजकारण साधण्याचा त्यांचा बेत असावा. इतक्यांत महाराजास कळलें कीं, इंग्रज टिपूशीं लढाई करण्यास जाणार आहेत. हें समजतांच ही गोष्ट घडणार नाहीं असें नानास साफीचें उत्तर महाराजांनीं पाठविलें. नंतर इंग्रजांची फौज म्हैसुराकडे गेल्याचें कळतांच चांचे लोक फारच चेवले व त्यांचा पुंडावा या समयीं अत्यंत माजला.

तेव्हां इ. स. १७९२ सालीं मुंबई सरकारानें मुंबईहून फौज पश्चिम किनाऱ्यावरील चांचे लोकांचा मोड करण्याकरितां रवाना केली.

फौज समीप येतांच महाराज सरकारांनीं सलुख्याचें बोलणें लाविलें, व माफी मागितली, आणि मागील बाकी व हल्लीं झालेलें नुकसान भरून देण्याचें कबूल केलें, आणि उईलयम टामस सांडीफर्ड निसबत मुंबई सरकार आणि बाळाजीराम सरलष्कर निसबत महाराज सरकार यांच्या विद्यमानें पुढील सल्हा कलमी तहनामा ठरविला. त्यांत मालवण व कोल्हापूर येथें फ्याकुटरी व वखारी घालण्याची परवानगी कंपनीस मिळाली.

करारनामा सुजातवंत बुर दस्त गाह अज्जम लेफ्टनंट उइलयम टामससांडिफोर्ड कारपरदाज अजतर्फ हुशमत पनाहा अज्जम आनराबल मेजर जनरल रावर्ट अबर क्रांबी प्रेसिडेंट गव्हरनर जनरल जंजिरे मुंबई व अज्जम बाळाजीराम सरलष्कर अज तर्फ श्रीमन्महाराज शिवाजी राजे छत्रपति तक्त कोल्हापूर यां दरम्यान हरदू तर्फेनें सरकारचे कुल अख्त्यारांनीशीं येकवाल पन्हा आनराबल कंपनीचें कर्ज श्रीमन्महाराज राजे यांजकडून येणें त्याचे फेसल्याबाबें व जंजिरे मुंबई येथील सरकारचे पन्हांतील व्यापारी यांशीं इंग्रजी सन १७८५ पासून मालवणच्या आरमारानें नुकसान केलें असे, त्याचे फेसल्याबाबें. तपशील नेल्हे बमोजीब करार केला आहे :—

**कलम १.** जैद दोस्ति आज कदी मूल आयाम पासून आनराबल कंपनी व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या दरम्यान चालत आली आहे ते फेर मोह्डोकम करून तर्फेनें दरम्यान कज्या चालत आहे तो हीं कलमे फैसल झाल्यावर फैसल होईल.

**कलम २.** श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांहीं अज्जम मेस्तर ब्रुम यांजशीं करार केला होता त्या पैकीं बाकी आनराबल सरकार कंपनीचें कर्ज देणें असेल तें तिहीं दफातीनें द्यावें; पहिले दफातीचा ऐवज तारीख १ माहे जानेवारी सन १७९३ ते दिवशीं आदा करावा; व दिगर दफातीचा ऐवज आदा होय तों पावेतों दरसालच्या जानेवारी महिन्याचे पहिले तारखेस देत जावा. म्ह-

णजे तारीख १ जानेवारी सन १७९५ ते दिवशीं कुल फैसल होईल.

**कलम ३.** सदरहू कर्ज राजे कोल्हापूर यांजकडून सरकार कंपनीस देणें त्यास बिसयार सालें गुजरलीं व व्याज चढलें. सबब कीं त्यांचे राज्यावर बहुत कसाला गुजरला, त्यामुळें त्यांच्यानें व्याज द्याव-याची ताकद नाहीं, म्हणून आनराबल सरकार कंपनी कडेस आज तरी-क मेहेरबानी दरखास्त करितात कीं, व्याज माफ करावें. त्यांस व्याज द्यावयाची हिंमत राहिली नाहीं या करितां कबूल केलें जात आहे, जे सदरहू करारा प्रमाणें श्रीमन्महाराज इमान राखून ऐवज आदा करि-तील तरी व्याजाचा दावा करणार नाहीं.

**कलम ४.** श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांचे आरमाराकडून बेपारी यांस नुकसानी इंग्रजी सन १७८५ पासून झाली आहे. त्याची याद दास्तबमा व्याज इंग्रजी ता॰ ३१ जुल-ई सन १७९२ पावेतों करून हशामत पन्हा मेजर जनराल राबर्ट अंब-र क्रांबी प्रेसिडेंट गव्हरनरजनरल जंजिरे मुंबई यांहीं श्रीमन्महारा-ज राजे यांजकडेस पाठविली आहे त्याचा ऐवज द्यावया करितां क-रार करितात कीं, हूर्त अज्जम बाळाजीराम सरलष्कर यां बरोबर रु-पये २०००० पाठविले आहेत ते घ्यावे व दिगर ३५००० रुपये चहूं द-फातीनें घ्यावे, म्हणून करार केला असे. त्याचा तपशील पहिली दफात तारीख १ मार्च सन १७९३ व दिगर तीन दफातीचा ऐवज दर-साल मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस देत जावा, जवलग सद-रहू ३५००० रुपयांचा फैसला होय तंव पावेतों या ऐवजांत बेपारी यांचें कुल नुकसान फैसल होईल.

**कलम ५.** सदरहू दफातीचा ऐवज आदा व्हावा त्याचे जामिनी करितां व या पुढें कोणी तरांड्यांस श्रीमन्महाराज राजे यां-चे आरमाराकडून इजा न पोहोंचावी या विषयीं सरकार कंपनी-ची निशा पुरली पाहिजे, म्हणून श्रीमन्महाराज राजे करार करितात कीं, जंजिरे मालवणास इंग्रजाहीं फेतोरी (फ्याक्टरी) घालावी.

त्या फतोरीवर इंग्रजी निशाण उडेल. जंव पावेतों सदरहू दावे फेसल होत अगर त्या बाद इंग्रज चाहातील कीं, फटोरी ठेवावी तर त्या बाबें इंग्रजाचा अखत्यार असे. या शिवाय श्रीमन्महाराज राजे कबूल करितात कीं, इंग्रजांस दरकार पडल्यास कोल्हापुरांत आपण जेथें राहातात त्या जागीं फतोरीस जागा द्यावी, व त्या हरदू फतोऱ्यांत शिपाईलोक सरकार इंग्रजाकडून राहातील, त्यांस अनुका अडिथ्री श्रीमन्महाराज राजे देतील, जेथपावेतों सदरहू कलम अमलांत येत तंव पावेतों.

कलम ६. सदरहू कलमें करारांत आणून त्याजवरी श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या तर्फे नि अज्जम बाळाराम यांहीं खुद्द आपली निशाणी व महाराजांकडून या कामाकरितां शिक्का त्यांजकडेस दिला असे तो शिक्का करून द्यावयासी, त्यांस अखत्यार कुल असे; याजकरितां मशारनिल्हे बाळाजीराम यांही या करारावरी निशाणी करून महाराजांचा शिक्का केला म्हणजे हा करार श्रीमन्महाराज राजे यांजकडूनच बाहाल व मोहकम झाला. व येक बाल पन्हा सरकार कंपनी तर्फेनें जे वन्की हा करारदाद बंगाल येथील शाहामत व अवाली मर्तबत राईट आनराबल अर्ल कार्नवालीस नाइट ऑफ दी गारटर बहादूर गव्हरनर जनरल हिंदुस्थान कबूल करून कुल अखत्यार पाठवितील तेव्हां सरकार कंपनी तर्फे निशाणी व शिक्का होईल.

सदरहू कलमें आनराबल मेजर जनराल राबर्ट आबरक्रांबी प्रेसिडेंट गव्हरनर जंजिरे मुंबई या तर्फेनें अज्जम लेप्टनेंट ख्रुलियम टामस सांडिफोर्ड कारपरदाज, व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर यांचे तर्फेनीं अज्जम बाळाजी राम सरलष्कर या दरम्यान जंजिरे मुंबईचे मुक्कामी करार जाहला आहे, तो इंग्रजी तारीख २५ माहे नवंबर सन १७९२ छ १० माहे रबिलारवर सन सल्लास तिसेन मयातेन व अल्लफ.

याच सुमारास पेशव्यांच्या मध्यस्तीनें **दुराणी महाल** या नांवाचा वाडी करांचा मुलूख जो कोल्हापूर करांनीं घेतला होता तो वाडीकरांस परत दिला.

**बाबूराव केशव** यांणीं कोल्हापूर शहरीं कात्यायनी पासून पाणी आणण्या करितां नळाचें काम शके १७११ इ. स. १७८९ सालीं आरंभिलें होतें तें शके १७१३ इ. स. १७९१ सालीं समाप्त होऊन शहरांत पाणी आलें.

शके १७१४ (सन १७९२–९३) सालीं **परशुराम रामचंद्र** पटवर्धन यांच्या दुराचरणा विषयीं प्रधान यांच्या चित्तीं विकल्प येऊन परशुराम पंतांस किल्ल्यांत नजरबंदींत बंदोबस्तांत ठेविलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांस सोडून दिलें. नंतर इकडील (करवीराकडील) प्रांतांत तंटा बखेडा करावा असें मनांत आणून इकडे येतांना सातान्यास जाऊन तेथें मनमानेल तशी धांदल करून व अमर्यादा करून नासगांवीं आले. नंतर करविरास मोहीम करण्याच्या संकेतानें त्यांचे चिरंजीव **रामचंद्र परशुराम** यांस समागमें १०००० दहा हजार फौज देऊन इसवी सन १७९३ (शके १७१५) सालीं रवाना केलें. ते मार्गशीर्ष शुद्ध ८ ता. ११ दिजंबर रोजीं **अळत्या** नजीक येऊन पोंचले. दुसऱ्या दिवशीं ठाण्यास तोफा लाविल्या. ठाण्यांत **अमृतराव भोपे** व **हणमंत शिताराम** आणि एक हजार आरब लोक होते. या वेळीं महाराजांची स्वारी **पट्टण कोडोली** मुक्कामीं होती. **बाळाचार्य** जोशी हे मोठे सिद्धांती ज्योतिषी समीप होते. यास्तव त्यांणीं दिलेल्या सुमुहूर्तावर लढाई करण्याचा बेत ठरविला. नंतर त्यांस मुहूर्त विचारितां त्यांणीं सांगितलें कीं, आज कोठें तरी युद्धास आरंभ करावा. त्या प्रमाणें रत्नाकरपंतांनीं फौजें निशीं कोडोलीवर जाऊन लढाईस आरंभ करून अस्तमानीं परत येऊन बाळाचार्यांस कळविलें. तेव्हां उदईक सूर्योदयाच्या पूर्वीं चार घटिकाशीस रवासा स्वारीस घेऊन जावें; म्हणजे अस्तमानपर्यंत शत्रु हस्तगत

होईल असें त्यांनीं सांगितलें. त्या प्रमाणें तयारी करून स्वारी फौज व तोफखान्या सहित मुहूर्तावर निघून श्री त्र्यंबुली जवळ गेली. तों अळत्याहून पत्र आलें कीं, शत्रूंनी गांव घेतला. शुद्ध १० रोजीं भोपे यांस मोर्चांतील गोळी लागून ते स्वामी कार्यावर खर्च झाले. ठाणें लढत आहे, कुमक जलदी करावी." इतक्यांत दुसरें पत्र आलें कीं, "कुमक येत असल्यास त्यास अडविण्याकरितां अळत्याच्या खिंडींत चारशें स्वार उभे आहेत." त्या वरून स्वारी रुकडी माणगांवच्या मार्गानें गेली. तों शत्रूंनीं ठाण्यास तोफा लावून ठाणें जेरीस आणिलें आहे, व दुकानांत शत्रु बसले आहेत असें पाहिलें. तेव्हां फौजेच्या चारपांच टोळ्या करून महाराज चालून गेले, व नौबत सुरू केली. असें कळतांच शत्रूंनीं तोफा बंद केल्या आणि मागें महाराजांच्या फौजेवर फिरले, आणि **रामचंद्रराव** घोड्यावर बसून फौजे सह ओढ्या नजीक येऊन उभे राहिले. त्यांस पहातांच महाराजांनीं आपल्या फौजेची उठावणी केली, आणि मोठी हात घाईची लढाई जुंपली. तींत पटवर्धनांच्या फौजेनें नामोहोरम होऊन पळ काढिला. **विठ्ठलराव** पटवर्धन व **बाबा** फडणीस पाडाव झाले. पटवर्धनांच्या फौजेच्या पाठीस **रत्नाकरपंत** लागले. मजलें व शिरगांवच्या खिंडींत **रामचंद्रराव** व त्यांच्या पदरचे **रास्ते** व **शितोळे** हस्तगत झाले, व आप्पांनीं त्यांच्या तोफाही पाडाव करून आणिल्या. रामचंद्र पंतास तरवारीच्या जखमा लागल्या होत्या, सबब त्यांस रत्नाकर पंत यांणीं पालखींतून आणून महाराजांच्या चरणावर घातलें. तेव्हां महाराजांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्ही परत तासगांवास जावें, रवानगी करून देतों. त्या समयीं मशारनिल्हेनीं आम्ही करविरास येतों अशी विनंति केली. तेव्हां त्यांस घेऊन स्वारी करविरीं आली. महाराजांनीं परशरामपंत भाऊस आज्ञापत्र पाठविलें कीं, "रामचंद्रपंत लढाईंत हस्तगत झाले आहेत; बरे आहेत; काळजी करूं नये." करविरीं आल्यावर रामचंद्ररावास जोशीराव यांच्या घरीं ठेवून जखमा वगैरे प-

हाप्यास **आनंदराव घाटगे** यांस नेमिलें. नंतर आचार्यांचें
दर्शन घेऊन त्यांनी सांगितलेल्या मुहूर्तावर मोहीम फत्ते झाली,
या कारणानें सर्जा सुप्रसन्न होऊन पावनगड तनख्यांतील दोन गां-
व त्यास इनाम करून दिले. कांहीं दिवसांनीं हिम्मत बहादूर यांच्या
वाड्याच्या पश्चिमेस भवानी कोठी होती तेथें रामचंद्ररावास ठेविलें.
तेथें एक महिना होते. खासास्वारी आठचार रोजांनीं समाचारास
जात असे. जखमा रोजेस आल्यावर रवानगी करून द्यावी. तिक-
डे भाऊस आज्ञापत्र पावतांच ते बहुत खिन्न झाले. पुत्र मेला अस-
ता, तर फार उत्तम झालें असतें. शत्रूच्या हातीं सांपडला हें फार वा-
ईट झालें. आपण खुद्द जाऊन मोहीम करावी असा निश्चय करू-
न डेरे बाहेर काढून तयारी करण्यास हुकूम दिला. जखमा नीट झा-
ल्यावर निरोप व्हावा अशी रामचंद्रपंतांनीं विनंति केली. तेव्हां बाद-
शीचा पोषाख, शिरपेंच, मोत्यांची कंठी, हत्ती, घोडे वगैरे देऊन बहुत
मान केला. आणि मौजे दानवाड व एकसंबें हे दोन गांव इनाम देऊन
सनदा करून दिल्या. त्या समयीं आपली ढाली गेली आहे ती द्या-
वी म्हणून विनंती केल्यावरून ढाली दिली. त्यावेळीं रामचंद्ररावां-
नीं आजपासून राजमंडळावर तरवार धरणार नाहीं, व वडिलांस ये-
ऊं देणार नाहीं, अशी क्रिया बेल भंडारा देऊन महाराजांच्या पायांवर
हात ठेविला. नंतर बरोबरच्या मंडळींस वस्त्रें देऊन मानकरी, स्वार,
व लोक पोंचविण्यास देऊन पंतांस तासगांवास रवाना केलें. **रामचं-
द्रपंत** तासगांवीं पोंचल्यावर भाऊंनीं चिरंजिवाची भेट घेतली ना-
हीं, व तोंड पाहिलें नाहीं. रामचंद्रपंत यांणीं आपणास किती म-
मतेनें वागविलें व आपणाबद्दल महाराजांनीं फार काळजी घेतली, तें
कळवून आपण घेतलेली शपथही कळविली, आणि फारकाकुलती-
नें लढाईस न जाण्याविषयीं विनंति केली. तेव्हां **भाऊंनीं** उत्तर के-
लें कीं, अशी शपथ घेणें शूरास अगदीं अनुचित आहे, आतां पाडाव
झालेल्याचें रक्षण केलें हें महाराजांचें कर्तव्यच होतें. वस्तुतः मुला-

च्या आणभाकांकडे लक्ष न देतां स्वारस निघावें असें मनांत आणून मोठ्या आवेशानें तयारी निशी फौजे सुद्धां निघाले, आणि मौजे उचगांव या नजीक पंचगंगेच्या किनाऱ्यास येऊन उतरले. माघ शु॰ ७ रोजी **श्रीत्र्यंबुली** नजीक येऊन लढाईस आरंभ केला. करवीरच्या कोटास दररोज तोफा मारूं लागले. तलावेस जे येत त्यांजबरोबर लढाई करीत. या प्रमाणें उभयपक्षांचे लोक भिडून दररोज लढाई होत-होती; असें कांहीं दिवस चालले; आणि भाऊंचा कडेकोट वेढा शहरास बसला. या प्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर भाऊंचा वेढा उठविण्यास महाराजांचा कटाव चालेना. तेव्हां टेंकीस येऊन वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळजोशी राव यांच्या विद्यमानें बोलणें होऊन फाल्गुन शु॰ १० रोजीं तह ठरविला कीं; भाऊंस महाराजांनीं १० लक्ष रुपये द्यावे. पैकीं ३ लक्ष रुपये रोख द्यावे, तीन लक्षाचा भरणा होऊन उलगडा होईपर्यंत वाकस असाम्या ओलीस द्याव्या. बाकी ७ लक्ष रुपये रहातात त्या ऐवजाचे भरण्यास महाराज सरकारांतून चिकोडी व मनोळी तालुके लावून द्यावे. या प्रमाणें ठराव होऊन **रामचंद्र जोशीराव**, रत्नाकर पंतांचे चिरंजीव **नारायणराव**, **रायाजी जाधव** सरनोबत यांचे चिरंजीव **गोपाळराव**, हिंमत बहाद्दर यांचे पुत्र **उदाजीराव**, गुजाजी गायकवाड यांचे पुत्र **दौलतराव**, निंबाजी जाधव यांचे पुत्र **जिवराव** व **शिवराम जाधव** यांस तीन लक्षांचा भरणा होईपर्यंत ओलीस मागितले. त्या प्रमाणें देण्याचें ठरवून नारायणरावास पंडित असा किताब देऊन पोषाख दिला, आणि सोन्याच्या काठीचा भालदार व चवरी देऊन हत्ती, घोडे वगैरे लवाजम्या सह सर्वांस रवाना केलें. ते गोटा जवळ येतांच चिरंजीव व कारभारी यांस पुढें सामोरे पाठवून त्यांस घेऊन आले. दुसरे दिवशीं कुच करून फौजेनिशीं शके १७१५ सालीं मिरजेस गेले. तेथें **नारायणरावास** रहाण्यास हरी भास्कर यांचें घर दिलें. बरकडमंडळींस लक्ष्मणपंत यांचें घर दिलें. त्यांच्या समाचारास चिरंजिवा-

पाठवीत. तसेंच भोजनास आमंत्रण सांगणें झालें तरी चिरंजिवास पाठवीत. मंडळी आली म्हणजे आपण दरवाजा पर्यंत सामोरे जात आणि घेऊन घेऊन ओटाशीं बसवीत. भोजनोत्तर आपण विडे, गुलाब, अत्तर देऊन दरवाजा पर्यंत जाऊन पोंचवीत. पुढें बिऱ्हाडा पर्यंत चिरंजिवास पोंचविण्यास पाठवीत व पोंचवून तेही निरोप घेऊन येत. या प्रमाणें ओलीस नेलेल्या लोकांची बरदास्त ठेवीत. यावरून त्यांच्या मनाच्या थोरवीची परीक्षा होते. भाऊंची स्वारी तासगांवास गेली, तेव्हां ओलीच्या मंडळीस तासगांवास नेलें. ऐवजाचा बहुतेक भरणा होऊन कांहीं बाकी होती, इतक्यांत **प्रधानांचें** निजाम अलीवर मोहिमेस जाण्याचें ठरलें. व **परशुराम भाऊंस** फौजेसह जलदीनें येण्याविषयीं पत्र आलें. तेव्हां राहिलेले रुपये न मागतां पंडित वगैरे ओलीच्या मंडळीस निरोप द्यावा, असें सर्वांच्या विचारें ठरवून, त्यांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं, आणि भाद्रपद वद्य ११ रोजीं निरोप दिला. त्यांस पोंचविण्यास आपले कडील मानकरी वगैरे दिले होते. ओलीची मंडळी साडेसहा महिने तासगांवीं आणि दीड महिना मिरजेस राहून दिपवाळीस परत करवीरीं आली. ओलीच्या मंडळीस पाठविल्यावर भाऊ खड्र्याच्या स्वारीस गेले. सन १७९५ (शके १७१७ राजशक १२२) सालीं **बाळाबाई** आकाचा विवाह करण्याचें ठरवून सुलतानराव नाईक निंबाळकर, खर्डेकर, हैद्राबादचे सरदार यांस वर योजून तयारी करविली; आणि त्यास करवि-रीं आणून मोठ्या समारंभानें फाल्गून शुद्ध १२ रविवारीं विवाह केला.

शके १७१८ अश्वीन शुद्ध १५ इ. स. १७९६ भुदरगड किल्ला १० वर्षें परशुराम भाऊ पटवर्धन यांजकडे होता, तो परत घेण्याची मसलत **हैबतराव** गायकवाड यांजकडून ठरून आल्या वरून किल्ला घेण्यासाठीं हुजुरून **मानाजी** घोरपडे घाघापूरकर, **उदाजीराव** घाटगे, आप्पाजी नलगे गडकरी किल्ले मजकूर यांस खास बारदार वगैरे लोकांची पथकें, गोलंदाज, वरोंदे यांस बरोबर देऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय



अश्विन शुद्ध ११ रोजीं रवाना केले. ते किल्ल्यानजीक जाऊन दोन दिवस रानांत छपून राहिले. अश्वीन शुद्ध १५ चे दिवशीं किल्ल्यावर कोठें झाडझाड असून जिकडे तिकडे सामसूम आहे, अशी संधि पाहून तळाचे शिड्या लावून किल्ल्यावर खासबारदार लोक चढले. ते गेल्यावर गनीम वर चढला अशी गलबल झाली, आणि पटवर्धनाकडील **आबाजी गोपाळ** फडके मामलेदार लोकांस जमा करून खासबारदार लोकांच्या तोंडावर गेले, तेव्हां लढाई जुंपली. दोहों कडील लोक मोठ्या नेटानें व निकरानें लढले. लढाईत मजारनिल्हे मामलेदार पडले. कुसाजी नळगे गडकरी दरवाजा उघडून खालीं गेले व घरीं जाऊन आपल्या कुटुंबाचीं सारीं माणसें घेऊन रातोरात निघून गेले. तेव्हां पटवर्धनाचे लोकही पळून गेले आणि किल्ला सर झाला. उजाडल्यावर मजारनिल्हे **घोरपडे व घाटगे** यांणीं किल्ल्याच्या दरवाजावर आपल्या लोकांच्या चौक्या ठेवून महाराजांस झाल्या हकीकतीचें विनंतिपत्र पाठविलें. **रत्नाकरपंत** यांस किल्ल्याचा बंदोबस्त करण्यास महाराजांनीं पाठविलें. ते जाऊन बंदोबस्त करून आले. किल्ला सर करण्यांत **हैबतराव** गायकवाड यांची मुख्य खटपट होती. यास्तव गुजाजी गायकवाड यांचा सरखवास हा किताब काढून त्यांस विश्वासराव हा किताब दिला, आणि हैबतरावास सरखवासीचा किताब दिला. **सयाजीराव** जाधव सरनोबत यांस किल्ल्याची हवालदारी दिली. **उदाजीराव** घाटगे यांस मौजे पुधाळगांव सरंजामांत दिला. गोंदजी वरोटे यांस खासबारदाराची हवालदारी दिली व किल्ले मजकूरची सरनोबतीची असामी आणि किल्ले मजकूरच्या तनख्यांतील जमीन दिली. खासबारदार लोकांनीं प्रथम शिड्या लावून किल्ल्यावर हल्ला केला, म्हणून दर असामीस बक्षीसांत व वेतनांत कागल तालुक्यांतील गांवगन्ना जमिनी पांच सात बिघे या प्रमाणें दुणग्या दिल्या.

**चिकोडीचें** ठाणें पटवर्धनाकडे होतें, तें घेण्याकरितां या-

के मजकुरीं अश्वीन वद्य ५ रोजीं महाराजांची स्वारी निघाली. तें ठाणें घेऊन परत करविरीं दिपवाळीस आली. नंतर कार्तिक मासीं स्वारी जाऊन मनोळीचें ठाणें ही घेतलें. मनोळीहून स्वारी क-हाडाकडे वळली. इतक्यांत **भास्करराव निंबक** मंत्री यांनीं मौजे खोचीच्या पागेंतील भले लोकांशीं खटलें केल्याचें वर्तमान कळलें, तेव्हां स्वारी परत आली. मंत्री यांस तबीब देऊन खंडणी घेतली. तेथून स्वारी करविरास जाण्याची ती न जातां तासगांवास गेली. भाऊ व इतर पटवर्धन मंडळी पुण्यास होती. नाना व भाऊ यांच्यामध्यें वैमनस्य पडलेंच होतें, व पटवर्धनांच्या मुलखास उपसर्ग करण्यास्तव नानांचीही पत्रें आलीं होतीं. हा संधि साधून महाराजांनीं तासगांवावर हल्ला केला. नंतर शहरांत शिरून भाऊंच्या वाड्यांत कडबा भरून वाड्यास अग्नि लावून दिला. सर्व वाडा दग्ध झाल्यावर गांव लुटून कृष्णे पर्यंत ठाणीं बसविलीं. नंतर कटकोळास जाऊन तेथें ठाणें बसविलें.

इतक्यांत नानाफडणविसाकडून पत्र आलें कीं, **भास्कर सखदेव** मामलेदार ठाणें जमखिंडी यांणीं सरकारचा ऐवज घेऊन मवासगिरीनें जमखिंडीच्या ठाण्यांत बदलून राहिले आहेत, यास्तव त्यांचें पारिपत्य करून हल्लीं कारकून पाठविले आहेत त्यांच्या जिम्मेस ठाणें करावें. त्यावरून स्वारी यादवाडच्या मार्गें जाऊन यादवाडचें ठाणें घेऊन जमखिंडीस फौजे सुद्धां दाखल झाली, आणि जमखिंडीस मोर्चेबंदी केली. **रत्नाकरपंत** आप्पाचा मोर्चा दरवाजांत होता. ठाणें जेरदस्तीस येऊन बोलणें आलें कीं, कौल द्यावा म्हणजे ठाणें सोडून निघून जातों. या प्रमाणें फत्ते झाल्यावर खुष होऊन रत्नाकरपंतास '**राजाज्ञा**' पद देऊन वस्त्रें दिलीं. नंतर जमखिंडींतील मामलेदार यांस कौल देऊन बाहेर काढिलें, आणि मार्गशीर्ष वद्य ५ रोजीं महाराज सरकारचे लोक ठाण्यांत शिरून बंदोबस्त केला. राजाज्ञा खुद्द जाऊन **भास्कर सखदेव** यास त्यांच्या लोकां सुद्धां

शके १७१८ इ. स. १७९६ दि.

कृष्णापार करून परत जमखिंडीस आले. नंतर नानाकडील कारकुनांच्या जिम्मेस ठाणें करून स्वारी जमखिंडीहून करविरास जाण्यास निघाली.

मार्गी रामदुर्गास स्वारीचा मुक्काम असतां कुपरीकर यांची समजी होऊन कुपरीचें ठाणें सरकारांत घेतलें. नारायणराव शिंदे नेसरीकर हे रवमाजी भोंसले व पटवर्धन यांस अनुकूल राहून वहिवाट करीत होते. सबब त्यांस नेसरीहून निघून जाण्याविषयीं आज्ञापत्र गेलें. त्या प्रमाणें ते निघून गेल्यावर त्यांचे धाकटे बंधु जिवणराव यांस सरंजाम देऊन त्यांजकडून चाकरी घेण्याचें ठरविलें.

शके मजकुरीं (शके १७१९ इ. स. १७९७ जून ६). ज्येष्ठ शुद्ध ११ रोजीं राजाज्ञा आणि हिंम्मत बहादर फौज घेऊन संवळग्यास गेले. ठाण्यास वेढा घालून पंधरा रोजांनीं ठाणें घेतलें. तेथून उभयतांनीं फौजे सुद्धां भिरडीस जाऊन ठाण्यास वेढा दिला. त्या समयीं आंतून बुरजांत बुदले पुरून बुरूज उडविला, तेव्हां बाहेरील लोक फारजखमी झाले, व कांहीं मयत झाले. नंतर हल्ला करून आषाढमासीं ठाणें घेऊन करविरास आले.

पटवर्धन पुण्याच्या राजकारणांत गुंतल्यामुळें कर्नाटकांत कोल्हापूरकरांस कोणी शिरजोर राहिला नाहीं, यामुळें यांचा पुंडावा जिकडे तिकडे यथास्थित चालला, व फत्ते होत चालली. यास नानांच्या पक्षाचा पुरा जोर सांपडल्यामुळें यांचें चांगलें पिकलें. सदरहू प्रमाणें इकडील भांनीं करवीरकरांचा पुरा अम्मल बसला. आणि आरभीं नानांनीं सुचविल्या प्रमाणें फौज घेऊन स्वारी अश्वीन मासीं विजया दशमीचे मुहूर्तादर कर्नाटकांत निघाली, (शके १७१९ इ. स १७९७ सप्टंबर) आणि कर्नाटक प्रांतीं प्रवेश होऊन कसबा गोकाक नजीक दाखल झाली. त्या समयीं कसबा मजकूरची खंडणी सव्वा लाख रूपये ठरली. पैकीं कांहीं ऐवज आत्माराम हवालदार यांचे मार्फत पावता झाला. बाकीचा ऐवज रामचंद्र जोशीशाक

यांणीं पटवून घेऊन महाराज सरकारांत आपली निशाणिठी दिली. तेथून कूच करून स्वारी कित्तूर तालुक्यांत गेली, व तिकडे कांहीं दिवस मुक्काम झाला. हुबळी, वल्लभगड, नवलगुंद वगैरे शहरें लुटलीं, आणि हुबळी वगैरे परगण्यांतील खंडण्या ठरवून घेतल्या. या स्वारींत कित्तूरकर देसाई यांणीं फौजे सुद्धां येऊन बहुत मेहनतीनें सेवाचाकरी करून दाखविली, त्यास्तव कृपाळु होऊन महाराजांनीं देसाई यांस समशेरबहाद्दूर हा किताब दिला. नंतर राजाज्ञा, हिंम्मतबहाद्दूर, अनंतराव प्रतिनिधि, व शंकरराव शिंदे सेना खासकील, निळकंठराव शिंदे साहेब सुभा, विश्वासराव घाटगे सर्जाराव, बहिरजीराव घोरपडे, हिंदुराव गजेंद्रगडकर, नारायणराव पाटणकर, सरलष्कर, व सटवाजीराव यादव यांस फौजेसहीत कर्नाटक प्रांतीं ठेवून खासास्वारी मनोळीस आली. तेथें आठ दहा मुक्काम होऊन मजल दरमजल स्वारी करविरास आली.

जेव्हां नानाफडणवीस पुण्याहून पळून महाडास आले, तेव्हां त्यांनीं कोल्हापुरकर व पेशवे यांचा शत्रु निजाम यांशीं कसें राजकरण केलें, व कोल्हापुरकरांस ऐवजाची भरणा करून जास्त फौज ठेवण्यास लावून त्यांजकडून सर्व कर्नाटक प्रांतीं कसा धुडावा माजविला, वगैरे वर सविस्तर हकीकत आलीच आहे. याच प्रमाणें पेशव्यांनीं आपला अधिकार बळकावून घेतला आहे तो स्वाधीन करून घ्यावा, व या कृत्यास कोल्हापूरकरांचें साहाय्य घ्यावें, या प्रमाणें सातारकरांस चिडवून त्यांजकडून सातान्यास बंड करविलें. शेवटीं नानांनीं सातारचें राजकारण सिद्ध करून सातारकरांस ऐवज देऊन त्यांजकडून फौज ही ठेवविली. तिकडे ठरल्या प्रमाणें महाराजांचे बंधु चतुरशिंग राजे भोंसले सातान्याहून करविरास आले. ही गोष्ट तर महाराजांस अत्यंत इष्ट होतीच. त्यांचीं बोलणीं करारांत येऊन चतुरशिंग सातान्यास गेले. नंतर महाराजांचा सदलगे येथें मु- (शके १७२० इ॰ स॰ १७९८)

क्काम असतां शिंग येऊन भेटले. दुसऱ्या दिवशीं महाराज 'शिंग' यांच्या डेऱ्यास गेले, आणि परस्पर खात्रीचीं बोलणीं झालीं. नंतर महाराजांनीं कूच करून शिरोळच्या मार्गानें कऱ्हाडानजीक 'काळें' जवळ जाऊन ज्येष्ठमासीं मुक्काम केला. (शके १७२० इ. स. १७९८ मे व जून). **सातारकर** महाराज ही किल्ल्याखालीं उतरले. **कोल्हापूरकर** महाराजांचा असा बेत होता कीं, **चतुरशिंग** राजे यांच्या विद्यमानें ठरल्या प्रमाणें साताऱ्यास जाऊन **महाराज, माईसाहेब व त्रिवर्ग** चिरंजीव यांस पन्हाळ्यास घेऊन जावें, **रायाजी जाधव** यांस फौजे सुद्धां तेथील बंदोबस्तास ठेवावें, आणि मागून राजांनांस कर्नाटकांतून आणवून साताऱ्यास पाठवावें. परंतु **प्रतिनिधि** प्रधानांस अनुकूळ झाल्यामुळें पुढें जाण्यास मार्ग देईनात. सबब काळेसच मुक्काम करून नित्य कऱ्हाडाजवळ लोकांस तलायेन पाठवीत. या स्थळीं मुक्काम असतां महाराजांनीं चतुरशिंग राजे यांस सांगितलें कीं, आपल्यास पुत्र नाहीं सबब सातारकर महाराजांचे मधले पुत्र **भाऊसाहेब** आम्हांस द्यावे. त्यावरून राजे यांणीं आपले कारभारी यांस युक्तीनें साताऱ्यास पाठवून सल्ला आणविला, आणि त्याबरोबर महाराजांचा निरोप ही आला कीं, राज्य व मुलें आपलीं आहेत. आपण वडील आज्ञा कराल तसें घडून येईल. परंतु हल्लीं ठरल्या प्रमाणें अवश्य घडलें पाहिजे. कऱ्हाडा नजीक काळें येथें दोन अडीच महिने मुक्काम झाला. नित्य तलावे होत होते. पुढें तर मार्ग जाण्यास मिळेना. अधिक श्रावणमासीं कऱ्हाडकर व कोल्हापूरकर यां मध्यें मोठी लढाई झाली. कऱ्हाडकरांस पटवर्धनांचें सहाय्य होतें. या लढाईंत **नागोजीराव** घाटगे, **इंगळाराव** वगैरे कित्येक सरदारांस जखमा लागल्या. लढाई नुंबळ झाली. **हैबतराव** गायकवाड व **विश्वासराव** गायकवाड यांजकडे सरकारचा महाल, पागा व निशाणें होतीं. त्यांजकडील बारगीर लोकांनीं

बेधडक शत्रूवर चालून जाऊन मोठ्या निकरानें लढाई देऊन शर्थ केली. कांहीं बारगिरांस जखमाही लागल्या. या प्रमाणें कऱ्हाडकर व त्यांच्या मदतीस आलेले पटवर्धन शिकस्त होऊन मागें हटले. श्रावण शुद्ध द्वितीयेस महाराजांनीं फौजे सुद्धां कुच करून तृतीयेस परगणें शिराळें नजीक ओढयाचे किनारीं मुक्काम केला. हैबतरावांचे वडील शुजाजीराव मृत्यु पावले, सबब हैबतरावांस विश्वासराव हा किताब दिला. (इ. स. १७९८ तारीख १७ आगष्ट). नंतर **नागपंचमीच्या** दिवशीं नाग निघतात तो समारंभ पहाण्यासाठीं स्डी स्वारी महालांत बसून ओढयाच्या आळीकडे आली. महाला नजीक **मानसिंगराव** बाळासाहेब घोरपडे खासास्वारी बरोबर होते. **परशुरामरामचंद्र** पटवर्धन* यांणीं मारेकऱ्यांकडून महाराजांस मारवावें या बुद्धीनें मारेकऱ्यांस मोठीं बक्षिसें देण्याची कबुलात करून सिद्ध केले. स्डी स्वारी महालांत नागांचा समारंभ पहाण्यास बसली असतां चार असामी मारेकरी जिवाच्या करारानें स्वारीवर गर्दी करून तरवारीनें महाराजांस मारावें या इराद्यानें नजीक आले. तरवारीचे सळ सोडून एकच गर्दी करून ते येऊन महालास भिडले, आणि त्यां पैकीं एक असामी आघाडीस येऊन महालांतील महाराजांच्या पालखीवर तरवारीचा वार टाकिला. त्या वारानें पालखीची पिंजरी तुटून, **घोरपडे** जवळ होते त्यांच्या मानेवर तरवारीची पुतळी लागून रक्त वाहूं लागलें. मारेकरी याणें महाराजांवर दुसरा वार करण्यास हातवर केला असें पाहून **घोरपडे** याणीं जलदी करून मारेकऱ्यास आंवळून धरिलें. घोरपडेही बलाढ्य होते. त्यांणीं त्या मारेकऱ्यास खालीं पाडून त्यावर बसले. मारेकऱ्याच्या हातांत तरवार होती, तिणें घोरपड्यांच्या पायास जखम लागली. हें सर्व महाराज सरकार स्वतः पहात होते. दोन जख-

---

* भाऊंनीं वरील गोष्ट आपण करविली असें कोल्हापूरच्या कागदीपत्रीं आढळतें, पण तेंही असंभवनीय वाटतें.

मा लागून घोरपडे रक्तबंबाळ झाले, जमिनीवर दोघांची कुस्ती होत होती. घोरपडेही मोठे जोरदार होते. त्यांनीं त्या मारेकऱ्यास हालूं दिलें नाहीं. इतक्यांत गलबला ऐकून खासबारदार व बंदुकबारदार लोक जमले. त्यांनीं घोरपड्यास युक्तीनें बचावून त्या मारेकऱ्यास जखमी केलें. तथापि त्या मारेकऱ्यानें घोरपड्यांच्या अंगावर तिसरा वार टाकिला. त्याची जखम भारी लागून फार रक्त वाहूं लागलें. तेव्हां घोरपडे यांस काढून घेऊन मारेकऱ्यास ठार मारिलें. नंतर मल्हारजी घोरपडे यांस पालखींतून लष्करांत पाठविलें व जखमा शिवून शेकावयास लाविलें. घोरपडे यांणीं मारेकऱ्यास जमिनीवर पाडून दुसरे लोक येई पर्यंत हालूं दिलें नाहीं, व आपला बचाव केला, हें महाराजांनीं प्रत्यक्षच पाहिलें होतें. यास्तव मल्हारजी घोरपडे यांनीं जी योग्य सेवा केली, त्या बद्दल कृपाळू होऊन त्यांस **हसूर** व **हेबाळ** हे दोन गांव इनाम करून दिले.

परगणे मजकुरीं एकदोन मुक्काम करून स्वारी करविरास येण्यास निघाली. येते समयीं अष्टे व बोरगांवचीं ठाणीं घेऊन स्वारी परत निघाली आणि साताऱ्चा सर्व मनसबा तसाच राहिला.

**धनाजीराव** चव्हाण हिम्मतबहादर यांणीं व त्यांचे चिरंजीव **उदाजीराव** व **नारायणराव** यांणीं जन्मारभ्य सरकारची सेवा चाकरी मोठ्या साहसानें केली, सबब त्यांवर कृपाळू होऊन धनाजीरावास **उमदेतुल उमराव** हा किताब दिला; आणि त्यांचा हिम्मतबहादरचा किताब **उदाजीरावास** देऊन **नारायणरावास** **ममलकत मदार** असा किताब दिला.

तिकडे राजाज्ञ वगैरे फौजेसुद्धां पुढें कर्नाटकांत चालते झाले होते. ते मौजे **शून्यहाळी** (सुदनहळ्ळी). येथें पोंचले. तेथील बारी काटकांनीं भरून मार्ग बंद केला होता. या करितां काटकाच्या नायकास फितवून चारशें काटक लोक धरून आणिले, आणि त्याच दिवशीं आपल्या समक्ष राजाज्ञ यांणीं त्यांचीं डोकीं मारविलीं. तेथून पुढें

सावनुरास गेले. तेथें धोंडोपंत गोखले होते. त्यांची यांची लढाई वरचेवर चालली. . इरद्रू फौजांमध्यें इ. स. १७९८ सालीं (शके १७२०). भाद्रपद वद्य ६ अकटंबर तारीख २ रोजी मोठ्या निकराची लढाई झाली. तींत राजाज्ञ, सेनाखासकील, हिंमत बहादूर व सरलष्कर हे शिकस्त होऊन मोड झाला. तेव्हां पंडित राजाज्ञ वगैरे चवथे दिवशीं मनोळीस आले. आणि फौजेचा जमाव करूं लागले. हे वर्तमान करविरीं महाराजांस समजतांच महाराजांनीं त्यांच्या मदतीस निघण्याची तयारी केली. पुण्यास अखेर बाजीराव रघुनाथ हे पेशव्यांच्या गादीवर बसून त्यांच्या हातीं सर्व पेशवाईचें सूत्र आलें; व नाना बाल्यात्कारें कारभार करूं लागले. महाराज काळे येथून निघण्याच्या संधीसच बाजीराव व त्यांचे प्रीतींतले दवलतराव शिंदे व सखाराम घाटगे सर्जाराव यांची स्वदस्तुरचीं पत्रें फौज मदतीस पाठविण्याविषयीं आलीं. त्या प्रमाणें नारायणराव घोरपडे सेनापति व रायाजीराव जतनमुलूख यांजबरोबर कांहीं फौज तिकडे रवानाकरून, स्वारी राजाज्ञांचे कुमकेस गेली.

मनोळीस जातांनां मार्गांत पाच्छापूरच्या बारींत कोण्णूरकर देसाई यांणीं मार्ग बंद करून महाराजांवर गोळी झाडली. यास्तव परत आठकोस येऊन मुक्काम केला, आणि राजाज्ञांस येण्यास पत्र पाठविलें. ते लागलेच १०००० फौज घेऊन आले, आणि महाराजांचें दर्शन घेऊन तिकडील सविस्तर मजकूर कळविला, व निरोप घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. डेऱ्यास जाऊन भोजन केलें, आणि गोलंदाज यांस आणवून उदईक दोन प्रहराच्या आंत कोण्णूरचें ठाणें घ्यावयाचें, असें सांगून ठाण्यास तोफा लाविल्या. तेव्हां राजाज्ञाच्या मारानें ठाणें जेरीस येऊन हस्तगत झालें; नंतर देसाई व काटक यांस मारून बंदोबस्त केला. या प्रमाणें तेथील काम आटपून निरोप घेऊन राजाज्ञ पुनः कर्नाटक प्रांतीं गेले. महाराजा-

ची स्वारी तेथून चिकोडीस येऊन राहिली. रत्नाकरपंत फाल्गून मास पर्यंत गोरवल्याशीं लढून विशेष यश न संपादितां माघारे आले.

चिकोडीहून कुच होऊन रामदुर्गाच्या बारीनें जथ व डफळापूरच्या प्रांतीं स्वारी गेली. तेथें मुक्काम होऊन त्यांच्या खंडणीचा फाल्गुन शुद्ध ७ रोजीं ठराव केला. या मुक्कामीं **दौलतराव शिंदे** अलीजा बहादूर यांचें महाराजांस पत्र आलें कीं, "मातोश्री बायांनीं चार चोघा लबाडांच्या सल्ल्यानें खूळ माजवून दगा चालविला आहे. हल्लीं कुच करून करवीराकडे जाणार असें ऐकण्यांत आलें आहे. त्यांस तिकडे आश्रय देऊं नये." तेथून स्वारीचा कुच होऊन मौजे **कडंगी** प्रांत अथणी येथें मुक्काम झाला. तेथें असतां सप्तसागरची खंडणी ठरून कांहीं घोडीं लुटींत आलीं, त्यांचा तलास करितां वर्तमान समजलें कीं, **महादजी** शिंदे यांची स्त्री लक्ष्मीबाई व नातकशाबा व तिच्या कन्या आणि यशवंत जिवाजी सरदार, शिपायी करकट करून फौजे सुद्धां पुण्याहून निघाल्या त्या ह्या प्रांतीं आल्या. त्यांजकडील पठाण लोक जिकडे तिकडे खंडण्या घेत व लुटीत कऱ्हाडच्या मार्गानें नरसिंगपुरास आले. तेथें त्यांनीं **श्रीबाबामहाराजांचा** वाडा वेढून खंडणी करितां दोन दिवस गर्दी केली होती. हें वर्तमान लष्करांतून हुजूर निवेदन होतांच कर्नाटकांतून नुकतेच परत आलेले रत्नाकरपंत राजाज्ञा यांस आज्ञा झाली कीं, तुम्हीं **नरसिंगपुरास** तावडतोब फौजे सुद्धां जाऊन पठाणाच्या पहाऱ्यांतून श्रीबाबामहाराजांस सोडवून आणावें. हुकूम होतांच ते त्याच वेळीं निघाले, आणि मोठ्या मजलीनें वीस पंचवीस कोस एका दिवसांत जाऊन श्रीबाबामहाराज यास कुटुंब सुद्धां पठाण यांच्या पहाऱ्यांतून काढून घेऊन नरसिंगपुराहून कुच करून निघाले, ते वाटेंत मुक्काम न करितां त्याच दिवशीं करवीरास आले; आणि त्यास सरकार वाड्यांत **श्रीअंबेच्या** चौकांत ठे-

चून सर्व बंदोबस्त करून रत्नाकरपंत लष्करांत गेले व खासा स्वारी **श्री बाबा** महाराजांच्या दर्शनासाठीं करविरीं गेली.

शिंद्यांकडील बाया महाराजांच्या दर्शनास आल्या व या प्रांताचा दंगा बंद झाला. **महादजीच्या** रखेची कन्या तिच्या मातोश्रीसह तिजबरोबर होती. तिला मुरारराव घोरपडे यास देण्याचें ठरवून वैशाखमासीं राजापूर व खिद्रापूर नजीक अर्कीवाट येथें लग्न करण्याचें ठरलें. त्या प्रमाणें टिळा लावण्यास शिंद्याकडील मंडळी व बाया सरंजाम घेऊन आल्या. टिळयाच्या समारंभास बायांनीं दागिनें व कापड सुद्धां अजमासें खर्च ५०, ६० हजार रुपये पर्यंत केला. लग्न समारंभ आटपल्यावर बायाही पुण्यास माघाऱ्या गेल्या, व मुाररावाची करविरीं रवानगी करून दिली.

(शके १७२१ इ. स. १७९९) महाराजांची स्वारी **अर्कीवाटाहून बोरवाडास** व तेथून **हमिदवाडास** गेली. या प्रमाणें कोल्हापूरकरांचा क्रम कर्नाटक प्रांतीं नानाच्या फुत्रीवरून सरास अबाधित चालला होता. कारण **परशुराम भाऊ** तिकडे पुण्यास अटकेंत असल्यामुळें त्यांस कोणाचेंच भय नाहींसें झालें. इतक्यांत नाना व भाऊ यांची एकी झाली. कोल्हापूरकरांचें प्रकरण अनावर झालें, त्या विषयीं पुण्याच्या दरबारीं धास्ती पडली. जरी टिपुसुलतानावर स्वारी करण्याचें ठरलें होतें, तरी करवीरकर महाराजांचें बंड अगोदर मोडावें असा पुण्याच्या दरबारीं निश्चय झाला, आणि भाऊस त्या कामगिरीवर नेमिलें. ही गोष्ट त्यास प्रिय होतीच. त्यांनीं लागलीच जंगी फौज जमवून चिकोडीस येऊन तळ दिला. हे वर्तमान महाराजांस समजतांच हमिदवाड येथें महाराजांनीं आपली सारी फौज जमविली. तेथून **पट्टणकुडीचे** रानांत तळावेस जाऊन दोन अडीच महिने उभय फौजांच्या लढाया होत होत्या. भाऊस महाराजांच्या फौजेची मुळींच दर्द वाटत नसे. दोन अडीच महिने ज्या लहान लहान लढाया चालल्या होत्या, त्यांत महाराजांकडील फौजेचाच जास्त नाश होत होता. या प्रमाणें

चोरट्या लढाईनें काळ घालवून व्यर्थ बळहीन होण्या पेक्षां एकदम सर्व फौज जमा करून जंगी तयारीनें शत्रूच्या फौजेवर चालून जाऊन हल्ला करावा, आणि शत्रूस पिटाळून लावावें, असा निश्चय करून सर्व फौज व सर्व सरदार एके ठिकाणीं जमा करून महाराजांची स्वारी भाद्रपद शु० ४ तारीख ४ सपटंबर रोजीं हमिद वाड्याहून पट्टणकुडीच्या रानांत दाखल झाली. महाराजां कडील एकंदर फौज अजमासें १६००० होती. तिच्या त्यांनीं चार टोळ्या करून चारी दिशांस उभ्या केल्या. दक्षिण बाजूच्या टोळींत **नारायणराव** घोरपडे सेनापति, **विश्वासराव** घाटगे सर्जाराव, **हैबतराव** गायकवाड विश्वासराव यांचीं पथकें, आणि सामानगडकरी व भुदरगडकरी येणें प्रमाणें होते. पश्चिमेकडील टोळींत **प्रीतिराव** चव्हाण हिम्मत बहाद्दर ममलकत मदार, **रायाजीराव** जप्तन गुलुख आणि **महाराजांची** खासास्वारी, **खासबारदार** वगैरे लोकांसह होती. उत्तर बाजूस **रत्नाकर** पंडित राजाज्ञ वगैरे सरदार होते; आणि पूर्व आघाडीस **पांढरे** यांचें पथक, **जोत्याजीराव** कदम यांचें पथक व एकांडे लोक वगैरे होते. या प्रमाणें राज्यांतील निवडक फौज जमवून सदरहू प्रमाणें व्यवस्थेनें पट्टण कुडीच्या रानांतील नाक्याच्या टेंकड्यांवर उभी केली होती. रुप्याचे हौद्याचे व निशाणाचे हत्ती प्रत्येक टोळींतील मुख्य सरदारापाशीं उभे होते; सर्व फौजेच्या आघाडीस जेजाला व तोफा लादून शृंगारलेले उंट उभे होते. महाराजांकडील खासबारदार लोकांनीं लोखंडी चिलखतें व शिरस्त्राणें धारण केलीं होतीं. भाले व तरवारी वाल्या स्वारांच्या टोळ्या पायदळांत मधून मधून जिकडे तिकडे उभ्या केल्या होत्या. या प्रमाणें घोर संग्रामाची तयारी करून शत्रूच्या तोंडावर निघाले.

महाराजांची खासास्वारी जंगी फौज घेऊन पट्टण कुडीच्या रानांत दाखल झाल्याची बातमी आली. तेव्हां **परशुरामभाऊ** भोजन करून बुदबळें खेळत बसले होते. त्यांणीं फौज व तोफ-

खाना लढाई देण्यास पाठवावा, म्हणून सांगून आपण तसेच बुदब- ळे खेळत बसले. त्यांजकडील फौज व तोफखाना लढाईस पुढे आ- ला; व त्यांनीं उत्तर बाजूस राजाज्ञाच्या टोळीवर हल्ला केला. तें- व्हां पूर्व बाजूस **पांढरे** यांचें पथक होतें. व तें उत्तर बाजूनें पु- ढें सरसावलें आणि लढाईस आरंभ केला. पटवर्धनांनीं सपाट्या सरशी तोफांचा भडिमार सुरू केला; या मुळें महाराजांकडील लोकांची एकच धादल उडून गेली. निशाणाच्या हत्तीवर चढा- ई करून त्यांस घेरलें. **पांढरे** यांजकडील पांच सात सरदार ठा- र झाले. तेव्हां बाकीच्या लोकांनीं कच खाल्ला. हें वर्तमान म- हाराजांकडे येतांच **हिम्मतबहादूर** ममलकत मदार यांणीं विनंति केली कीं, "या वेळीं महाराजांनीं खंबीरी करून पुढें व्हा- वें; समय हाच आहे. **महाराजांनीं** हिम्मत धरली असतां लो- कास दुप्पट दम व वीरश्री येईल. येणें करून महाराजांचा हमेश वर्णन करण्याजोगा लौकीक होऊन शत्रूचा क्षय होईल." हें ऐकून महाराजांस ही वीरश्री चढली व ते सिद्ध झाले. त्यांणीं राजाज्ञा- कडेस पहातांच जोहार करून एकदोन पथकें व पागा घेऊन तेही महाराजां बरोबर निघाले. मग काय विचारतां? खासे निघतांच सर्व सरदारही पुढें सरले. फौजेंतील लोकांस स्फुरण चढून आप- ली हिम्मत व कर्तबगारी दाखविण्याचा हाच प्रसंग आहे असें म- नांत आणून शत्रूवर चढाई केली. प्रथम **पांढरे** यांजकडील निशाणाचा हत्ती शत्रूंनीं घेरला होता, त्या ठिकाणीं लगट करून मो- ठ्या आवेशानें शत्रूच्या फौजेवर जाऊन पडले. असा हल्ला आल्यास बचाव करण्याची पटवर्धनांची तयारी नव्हती. महाराजांच्या लोकां- नीं निशाणाचा हत्ती सोडवून घेऊन शत्रूच्या फौजेचा मोड केला. इतक्यांत दक्षिणेकडील टोळींतील **सेनापति, घाटगे, वि- श्वासराव** वगैरे सरदारांनीं शत्रूच्या गोटावर हल्ला करून गोट लु- टला. व शत्रूकडील लोकांची कत्तल करण्यास आरंभ केला. इ-

तर्की दुर्दशा एका घटकेंत झाली, असें भाऊस समजतांच बुदवळांतील लटकी लढाई टाकून खऱ्या लढाईस डेऱ्यांतून बाहेर आले, आणि आपण ढिलेपणानें लढाई केली त्याचा त्यास पश्चात्ताप झाला. लगेच घोड्यावर स्वार होऊन गोटांतील फौजेची थावराथावर करून फौज जमविली, आणि लढाई देण्यास निघाले. महाराजांकडील नारायणराव घोरपडे सेनापति, हैबतराव गायकवाड, आणि त्यांचे दोघे बंधु दवलतराव सरखवास व विश्वासराव जवळ तयारच होते, यांनीं जलदी केली; आणि आपल्याकडील पागेच्या लोकांस, खास पागेच्या लोकांस, व भले लोकांस ते बेधडक पुढें सरून भाऊच्या तोंडावर चालून गेले. लढाई मोठ्या निकरानें झाली. भाऊंच्या लोकांकडील लढाईची शिस्त अगोदर पासूनच बिघडलेली होती, या मुळें त्यांचा जम बसेना आणि खुद्द महाराज आपल्या सरदारांत व लोकांस हिंमत देण्यास समीप असल्यानें जो कोल्हापूरच्या लोकांस आवेश आला होता त्या पुढें भाऊचें कांहीं चालेना. अखेर भाऊस लढाईंत भारी जखमा लागून ते घायाळ झाले व त्यांच्या फौजेचा अगदीं मोड झाला. वडील जखमी होऊन घायाळ झाल्याचें वर्तमान समजतांच भाऊंचे चिरंजीव रामचंद्रराव लष्कर सोडून पळून जमखिंडी-कडे गेले. त्याचे पाठीमागें पाठलाग करीत राजाज्ञ फौजेसुद्धां जमखिंडी नजीक गेले. परंतु रामचंद्रराव हस्तगत न होतां त्वरीनें जमखिंडीच्या गण्यांत जाऊन पोंचले. सबब राजाज्ञ माघारे चिकोडीस आले. एथें भाऊचा मुक्काम होता. तेथें तीस चाळीस हजाराचें कापड सांपडलें. तें घेऊन राजाज्ञ लष्करांत आले. इकडील लोकांनीं भाऊचा सारा गोट लुटून व जाळून फस्त केला. भाऊस फार जखमा लागल्या असतां जीव वांचविण्या करितां त्यांस तसेंच टाकून त्यांजकडील सर्व सरदार व लोक, खुद्द त्यांच्या चिरंजिवा सुद्धां पळून गेले.

ही गोष्ट त्यांनी मोठ्या शरमेची केली. ज्याने शेंकडो लढायांत यश संपादून आपली कीर्ति सर्व मराठखंडांत गाजविली, व ज्याणें कोल्हापूरकरांस आज पर्यंत जर्जर केलें होतें, त्यांच्याच कडून पराभव पावून त्यांच्या हाती जखमी होऊन सांपडावें. मुलगा जवळ असतां त्यानें देखील पळून जावें आणि घायाळ झालेल्या भाऊस पाणी देण्यास किंवा त्याचे प्राणोत्क्रमण झाल्यावर दहन करण्यास सुद्धा कोणी समीप नसावें; असें त्याच्या नशिबी आलें! यास्तव दैवाची गति फार अगाध व विचित्र आहे !!! जेव्हां कोल्हापूरकरांनीं **अळत्याच्या** लढाईंत रामचंद्ररावांस पाडाव करून नेलें, व बहुमानानें परत पाठविलें आणि रामचंद्ररावानें, महाराजावर आपण कधीं तलवार धरणार नाहीं व वडिलांसही धरू देणार नाहीं अशी शपथ घेतली होती, तेव्हां मुलगा लढाईंत मेला असता तर याहून उत्तम झालें असतें, असें म्हणून त्याची क्रिया शपथ ऐकण्यास त्याची भेट न घेतां व त्याचें मुख न पाहतां तयारी करून ज्या मर्दानें कोल्हापूरकरांशी लढाई करून पंधरा लक्ष रुपये हबकले व फेड होई पर्यंत हव्यास्या शेलक्या लोकांस करविराहून मोठ्या विजयानें नेलें व या प्रमाणें आजन्म ज्याणें वीरास योग्य असेंच वर्तन केलें, त्या वीरास जसें मरण यावें तसेंच रणांत आलें; ही मोठी त्याची सुकीर्ति होय.

असो; लढाईंत भाऊस जबर जखमा लागल्या होत्या. तेणें करून जेर होऊन त्यांनी लवकरच प्राणोत्क्रमण केलें. नंतर त्यांचें शव हमिदवाड्यास नेऊन त्या गांवच्या तळ्या नजीक रामचंद्र जोशीराव यांजकडून यथाविधि सार्थक महाराजांनी करविलें.

या प्रमाणें महाराजाकडील लोकांनीं लढाईंत शार्थ केली, व त्यांच्या पुण्यप्रतापें करून यश ही आलें. एक दोन रोजांनी चिकोडी प्रांतांतील गर्णा घेण्यास लोक रवाना करून खासास्वारी कुच करून विजयी होत्साती करविरास परत आली.

भाऊंचे चिरंजीव जमखिंडीस पळून गेले होते, ते तेथून थेट पुण्यास गेले; त्यास "भाऊ जखमांनी घायाळ झाले असतांही कोल्हापूर

करांकडील **विश्वासराव** गायकवाड याने तुकडे तुकडे करून ठार मारिले." असा खोटा मजकूर कोणी कळविला होता, तेणे करून त्यास अत्यंत त्वेष आला. वडिलांच्या वधाबद्दल सूड घेईन तरच जीव ठेवीन, असा त्यांनी मनांत निश्चय केला; आणि आपण पाडाव झालो तेव्हा कोल्हापूरच्या महाराजांनी आपणास कसे वागविले, व त्या वेळी आपण आणाशपथा काय घेतल्या होत्या, त्याचा विचार न करिता डोळ्यांत आसवे आणून पेशवे व शिंदे यांस पित्याच्या क्रूरवधाची जी हकीकत ऐकिली होती, ती मोठ्या करुण स्वराने निवेदन करून उभयतां कडे साह्य मागितले. रामचंद्ररावाने आणखी सांगितले की, जर मला पित्याच्या वधाचा योग्य रीतीने सूड घेता आला तर भूतळी जन्मास आल्याचे सार्थक झाले; असे समजेन; आणि तसे न घडले तर सर्व परित्याग करून संन्यास घेऊन काशीवासास जाईन. पेशव्यांस ही कोल्हापूरचे प्रस्थ दिवसें दिवस माजत चालले ते इष्ट नसून त्याचे पारडे हलके करावे असे वाटत होते. यास्तव रामचंद्ररावाच्या विनंतीस तत्काळ रुकार मिळाला. पंत प्रधानांनी **बजाबा** शिराळकर यास फौजे सह रामचंद्रावा बरोबर जाण्यास आज्ञा केली. तसेच शिंद्यानीही आपली पलटणे व **व्यंकोजी शिंदे** आणि **गणेश भिकाजी** मनूरकर या सरदारास पाठविले. रामचंद्ररावानेही तयारी करून आपली फौज जमविली, आणि पुण्याहून आणलेली व आपली स्वतःची अशी फौज घेऊन ते करविरास निघाले (सन १७९९ नोवेंबर, शाके १७२१ राजशक १२६). आणि कोल्हापूर प्रांतात शिरून त्यांचा **शिरोळास** पहिला मुक्काम झाला. हे वर्तमान महाराजांस कळतांच **रत्नाकर** पंडित राजाज्ञ, **चतुरशिंगराव** भोसले व **नाना** पाटणकर सरलष्कर वगैरे सरदार यास फौजे सुद्धां करविराहून रवाना केले. ते कसबा कोडोलीस जाऊन राहिले. नंतर पौषमासी **बोरपाडळी** नजीक दोहो कडील सैन्याची गांठ पडली, आणि वद्य १२ तारीख २३ जानेवारी स. १८०० रोजी लढाई झाली. ती

बहुतेक बराबरीचीच झाली व दोहों कडील मनुष्यें ही जाया जरवमी फार झाली; तरी कोल्हापूरची फौज कचरली. तेथून शत्रू निघून फौजे सुद्धां मौजे शिरोली नजीक पंचगंगेच्या किनारीं उतरले. नंतर माघ शु॥ ८ तारीख ३ फेब्रुआरी रविवारीं फौजेची तयारी करून लढाई देण्यास जयंतीचा (जितीचा) ओढा उतरून चोफाळ्याच्या माळावर आले. कोल्हापूरची फौज ही त्यांच्या तोंडावर गेली; व मोठी लढाई झाली. तींत शत्रूस मोठेसें यश आलें असें जरी झालें नाहीं तरी त्यांनीं कोल्हापूरच्या फौजेस किल्ल्यांत हाकून लाविलें. व नारायणराव घोरपडे सेनापति यांस पाडाव करून नेलें. त्यांस घेऊन रामचंद्रराव फौजे सुद्धां मुक्कामास गेले. त्याच दिवशीं रंकाळ्या नजीक गुरें उतरलें होतें, तें इचल करंजीकर यांणीं लुटून गुरें, मेंढरें ही तें घेऊन गेले. त्याच रात्रीं महाराजांनीं राजाज्ञास व दुसऱ्या सरदारांस बोलावून आणून पुढें विचार कसा करावयाचा, या विषयीं सल्ला विचारिली.

महाराज म्हणाले कीं, **पटवर्धन** यांणीं आपली सारी फौज व पेशव्यांकडील फौज आणिली आहे; एवढीच असती तर तिच्याशीं आम्हीं कशीबशी टक्कर मारिली असती. परंतु **शिंद्यांची** इंग्रजी कवाईत शिकलेली मेजर **ब्राउनिंग** यांच्या हाताखालची पांच पलटणें व तोफखाना पटवर्धनांनीं आणिला आहे, त्या बरोबर लढाईस आमची फौज कशी टिकते; याचा चित्तांत मोठा अंदेशा आहे. अशा दुर्घट प्रसंगीं किल्ल्याचा बचाव कसा होतो! तेव्हां **राजाज्ञ** यांणीं विनंति केली, कीं प्रसंग तर दुर्घट खरा, तथापि धैर्य खचूं न देतां धिम्मेपणानें शत्रूशीं टक्कर मारिली पाहिजे. अशा समयीं महाराजांनीं येथें रहाणें ठीक नव्हे, यास्तव **महाराजांची** स्वारी, **दवाशामहालांच्या** स्वाऱ्या, व श्री **बाबा** महाराजांची कुटुंब सुद्धां स्वारी पन्हाळयास जावी; आम्हीं सर्व येथें राहून शहरचा बंदोबस्त करून लढाई देतों. ही सल्ला महाराजांस व इतरांस पसंत पडली, आणि महाराजांनीं **श्रीबाबा** महाराजांकडे जाऊन सर्व मजकूर कळवि-

त्या. तेव्हां राजाज्ञांच्या सल्ल्याशिवाय दुसरी सल्ला या प्रसंगी उपयोगी नाहीं. राजाज्ञ म्हणतात त्या अन्वयें करावें, अशी **श्रीबाबा** महाराज यांणीं आज्ञा केली. नंतर महाराजांनीं विनंति केली कीं; श्रीची स्वारी निघण्याची तयारी व्हावी. तेव्हां श्रीनें सांगितलें, कीं राजाज्ञ येथें रहाणार; सबब आम्हीं ही येथेंच रहातों. आपण **बाबा महाराज, नाना महाराज** व **भाऊ महाराज.** यांनीं कुटुंब मुद्धां घेऊन जावें. अशी आज्ञा होतांच स्वारी वाड्यांत येऊन निघण्याची तयारी करण्यास आज्ञा केली. राजाज्ञाजवळ **शंकरराव** शिंदे सेना खासकील तोरगलकर, **प्रीतिराव** चव्हाण उमदेतुल उमराव बहादर, **निळकंठराव** शिंदे साहेब सुभा, **आबादियारजंग** व **सफदरजंग** पगाण पन्हाळकर, **रामचंद्र** भगवंत बेडकीहाळकर आणि **एकांडे** मानकरी व **खासबारदार** वगैरेंची पथकें, **बाजीराव** कृष्ण रेणावीकर यांचें पथक, **बंदुकबारदार, पंतप्रतिनिधि** कडील लोकांचा जमाव, **अमात्या** कडील लोकांचा जमाव व गांवगन्नाचे सनदी प्यादे यांस कराविरास ठेविलें. **बळवंतराव** पंडित प्रतिनिधि, **नारायणराव** पाटणकर सरलष्कर, **चतुरशिंग** राव भोसले, **हैबतराव** गायकवाड विश्वास राव, **दौलतराव** गायकवाड सरखवास, **विश्वासराव** गायकवाड, **रायाजी** जाधव **जफ्तनमुल्लख** वगैरे सरदारांस स्वारी बरोबर कुटुंब सुद्धां निघण्याचा हुकूम झाला. नंतर स्वारी निघण्याची तयारी होऊन खाशा महालाच्या स्वाऱ्या, व श्रीनाबामहाराज वगैरे त्रिवर्ग व दुसरे सरदार सुद्धां खासा स्वारी रंकाळवेशींत आली. त्या ठिकाणीं राजाज्ञ व उमदेतुल उमराव यास महाराजांनीं आज्ञा केली कीं, प्राणापरतीं मेहनत करून किल्ला रक्षण करावा. शत्रूच्या हातीं जाऊं देऊं नये. तेव्हां उभयतांनीं उत्तर दिलें कीं, आम्ही सेवक जिवंत आहों तो पर्यंत किल्ला शत्रूच्या हातांत जाणार नाहीं, ही प्रतिज्ञा समजावी; असें बोलून हुजूरच्या चरणावर मस्तक ठेविलें त्या समयीं महाराज बोलले, कीं राजा-

ज व तुम्ही गुरुबंधु आहांत. या परती कोणती आज्ञा होणेची, असें म्हणून आपल्या मस्तकावरील तिवट काढून उमदेतुल उमराव यांस दिलें आणि याची शरम राखावी असें सांगितलें. हे सरकारी तिवट प्रासादीक आहे. याची मी नित्य पूजा करीन. जी पूर्वी प्रतिज्ञा केली आहे तींत किमपी अंतर करणार नाहीं, हे सरकारांनीं पक्कें समजावें; असें म्हणतांच स्वारी चालती झाली. परंतु इतक्यांत स्वारी जाते, त्यापेक्षां आम्ही येथें कोणाचे म्हणून लढावें, अशी विनंति करून नायकवडी आडवे आले. तेव्हां घोळ पडून त्या दिवशीं स्वारीचें रहाणें झालें. दुसरे दिवशी राजाज्ञ पदर पसरून बोलले कीं, अशा बिकट प्रसंगीं सरकारास येथें रहाणें सुरक्षित नाहीं. यास्तव महाराज आहेत, आणि राजाज्ञ गेले असें मनांत आणून सेवा करावी. अगोदर आमचा प्राण जाईल, मग तुमचें काय होणें तें होईल, ही खात्री बाळगावी. अशी अनेक प्रकारें त्यांची समजूत घालून स्वारीच्या जाण्यास अडथळा करूं नये असें ठरविलें, आणि माघ शु० १० तारीख ५ फेब्रुआरी रोजीं संध्याकाळीं स्वारी करविराहून निघून चालती झाली, ती पहाटेच्या तास रात्रीस किल्ल्याच्या चार दरवाजा नजीक येऊन पोंचली. दरवाजे महामूर सबंब मंगळवार पेठेंत मुक्काम होऊन दुसरे दिवशीं खाशा महालच्या स्वाऱ्या, श्रीबाबा महाराज, नाना महाराज व भाऊ महाराज यांच्या कुटुंब सुद्धां स्वाऱ्या व जे सरदार समागमें होते त्यांचीं कुटुंबें यांस किल्ल्यावर रहाण्यास रवाना केलें; आणि खासा स्वारी रेंडघाटीच्या चौकीत राहिली. व बरोबरचे लोक, स्वार व पायदळ घेऊन बळवंतराव प्रतिनिधि यांस राक्षीच्या वाडीवर जाऊन उतरण्या विषयीं आज्ञा केली, त्या प्रमाणें तेही तिकडे जाऊन राहिले.

स्वारी गेल्यावर दुसरे दिवशीं **राजाज्ञ** यांणी उमदेतुल उमराव यांस विचारिलें, कीं जर तुम्ही लोकांचे खर्चाचा व किल्ल्याचा बंदोबस्त कराल, तर मला जी सेवा संभाळण्यास सांगाल ती मी संभाळीन, किंवा जी दुसरी कामगिरी सांगाल ती करीन. तेव्हां त्यांणीं सांगित-

तेंव्हां किल्ल्याचा व लोकांचा बंदोबस्त आपणच करावा, आमच्या हातून व्हावयाचा नाहीं; आम्हीं विजापूर (आदिलवार) वेशीस पारसनवीस यांच्या वरीं राहून आमच्या निसबतीचीं पथकें व पागेचे लोक आहेत त्यांस वेशीच्या बुरजावर व तटावर चौक्या नेमून देऊन ठेवितों. या प्रमाणें त्यांनीं केल्यावर राजाज्ञ यांणीं साऱ्या वेशींवर सरदार नेमून आपण गंगेच्या वेशीस रहाण्याचा बेत ठरविला; नंतर बुरजांवर व तटांवर रखासवारदार लोक व बंदुकबारदार लोक यांस नेमून आपण जातीनिशीं जाऊन जागा पाहून चौक्या ठेविल्या. या प्रमाणें किल्ल्याचा बंदोबस्त करण्यांत अस्तमान झाला. संध्याकाळीं राजाज्ञ घरीं येऊन स्नान करून संध्या आटपल्यावर चिंताक्रांत होऊन पाटावर बसले होते. इतक्यांत वेदमूर्ति राजश्री चिंतामण भटजी परांडेकर देवघरांत आले. तेव्हां राजाज्ञ यांणीं भटजींस नमस्कार करून बसविलें, आणि प्रसंग तर दुर्घट प्राप्त झाला आहे, किल्ला रक्षण करण्याची मीं महाराजांसन्निध प्रतिज्ञा केली आहे, ती श्री कशी सिद्धिस नेईल या काळजींत आहें; असें भटजींस सांगतांच भटजी म्हणाले, तुम्हीं या विषयीं चिंता करू नये; किल्ला शत्रूंच्या हातीं श्रीभवानी जाऊं देणार नाहीं. हें गंडांतर साडेतीन महिन्याचें आहे. तुमची फौज आलेल्या पलटणाबरोबर लढाई देऊन यश घेणार यांत संशय नाहीं. तुमची प्रतिज्ञा खरी करणार श्री समर्थ आहे. या अन्वयें आम्हांस ही श्रीची आज्ञा झाली आहे. यास्तव खात्री ठेवावी, आणि चित्तांत तिळप्राय अंदेशा न धरितां स्वामी सेवेस तत्पर असावें, व शत्रूंची भीति न धरितां स्वस्थ रहावें. असें सांगून भटजींनीं एक सुपारी राजाज्ञांचे हातीं दिली. दुसरे दिवशीं राजाज्ञ आपल्या वाड्यांतून निघून गंगावेशीच्या चौकींत जाऊन राहिले. देवघराकडील सखारामपंत कुलकर्णी पिशवीकर यांचें घर नजीक होतें, त्या घरांत स्नान, पूजा व भोजन करीत.

रामचंद्र रावाचा तळ शिरोली नजीक असतांच माघ शुद्ध १२ रोजीं महाराज पन्हाळ्यावर गेल्याची बातमी कळली. तेव्हां तिकडे जाऊन छा-

पा घालावा, अशी मसलत करून फौजे सुद्धां रामचंद्रराव रेंढेघाटी जवळ आले. महाराजांकडील फौज घेऊन दौलतराव व विश्वासराव गायकवाड तळावेस फिरत होते. माघ वद्य १४ रोजीं रात्रीं फौजेची तयारी करून अरुणोदयीं असुरल्याच्या ओढ्या नजीक राक्षीच्या भोंढ्यावर महाराजांची फौज उतरली होती तिजवर रामचंद्ररावानें छापा घातला. तळावेस फौज फिरत होती, ती ही येऊन दोहों फौजांची तुंबळ लढाई झाली. दोहों कडील माणसें जायाजखमी बहुत झाली. हैबतराव गायकवाड यास जखमा लागल्या. परंतु आंगांत चिलखत होतें, म्हणून जखमा हलक्या लागल्या. दौलतरावास बाथ्यात (बार्थेत) भाल्याची जखम जबर लागली. विश्वासराव पाडाव झाले. त्यास धरून असुरले नजीक रामचंद्ररावा पाशीं नेलें. तेव्हां त्यांनीं लागलाच हुकूम केला कीं, त्याचा गळा कापावा. पाडाव झालेल्या मनुष्याचा गळा कापणें हें योग्य होणार नाहीं. मर्जी असल्यास त्यास कैदेंत ठेवावें. असें सर्वांनीं सांगतांच रामचंद्रपंत म्हणाले कीं, विश्वास रावांनीं आमच्या वडिलांस मारिलें आहे, सबब यास ठेवावयाचें नाहीं. असें म्हणून कानांत व नाकांत दारू भरून उडवून मारिलें. गायकवाड यांचे मावळे शिंदे मळणगांवकर शत्रू कडे होते. त्यांणीं मुडदा मागून घेऊन सायंकाळीं पन्हाळ्यास आणिला. दौलतरावही जखमेनें मुडदा येण्या पूर्वींच मृत्यु पावले होते. तेव्हां दोन्ही शवांचें एकदांच सार्थक केलें. गायकवाडास मारल्यावर पटवर्धन फौजे सुद्धां तळास गेले. दुसऱ्या दिवशीं गायकवाडांची मातोश्री गोदूबाई इच्या समाचारासाठीं महाराजांची स्वारी त्यांचे घरीं गेली आणि तिला व हैबतरावास म्हणाले, कीं तुम्ही कष्टी होऊं नका, होणारास उपाय नाहीं. तुमचें चालविण्यास आम्ही कमी करणार नाहीं. या प्रमाणें महाराजांनीं शांतवन केल्यावर बाईनें विनंति केली, कीं उभयतां चिरंजिवांनीं सरकार सेवेंत प्राण दिला, आणि गायकवाडाच्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक करून लौकीक मिळविला, या स्तव पुत्र गे-

त्याचा मी शोक करीन नाहीं. त्यांस सद्गति मिळाली आहे. हें ऐकून महाराज सद्गदीत झाले, आणि दोघांच्या कुटुंबांस मौजे कोथळी तर्फ बोरगांव हा गाव गंडरोटीस देऊन उत्तरकार्यास ही खर्चास दिलें.

या प्रमाणें राक्षीच्या ओढ्या वरील जय संपादून भाऊस ज्यांनीं साक्षात् मारिलें असें आप्यांस कळलें होतें त्याचा फडशा केला. पुढें पन्हाळगड फार दुर्धर, त्यावर आपला लाग साधणार नाहीं; यास्तव त्यावर छापा घालण्याचा नाद टाकून आप्पांनीं करवीरचे कोटास वेगा देण्याचें ठरविलें. त्या ठरावा अन्वयें आप्पा फौजे सुद्धां परत येऊन फाल्गून शुद्ध ४ तारीख २८ फेब्रुआरी गुरुवारीं करवीरच्या कोटास कडेकोट वेढा देऊन मोर्चे बंदी केली, आणि दरगेज पलटणींतील तोफांची मारगिरी करूं लागले; या मुळें शहरांतील माणसें फार जेरीस आलीं.

शहरची अशी अवस्था झाल्याचें महाराजांस समजलें. तेव्हां गोंवेकर इटाव साहेब महाराज सरकारचे बहुता दिवसांचे स्नेही पलटण सुद्धां गोंवे बंदरीं आहेत; त्यांजकडे वकील पाठवून त्यांचीं पलटणें कुमकेस आणावीं, अशी मसलत ठरवून फाल्गून वद्य १ तारीख १ मार्च रोजीं नागोजीराव घाटगे झुंजारराव; रघुनाथराव गायकवाड, महिपतराव फारसनवीस, बाळाजी सखाराम निसबत प्रतिनिधि, बाळाजी मल्हार निंबाळकर व फरीदभाई भोरी यांस थैली देऊन गोंव्यास रवाना केलें. तसेंच सखाराम घाटगे सर्जाराव पुण्यास दौलतराव शिंद्यापाशीं होते. त्यांजकडे कोणी पाठवून ठराव करून शह उठवावा असा विचार करून शिंदे अलिजाबहादर यांस आणि मशार निल्हे घाटगे यांस आज्ञापत्रें देऊन आकाराम यादव हवलदार यास पुण्यास पाठविलें.

धोंडोपंत गोखले कर्नाटकांत होते त्यांस पत्र लिहून रामचंद्ररावांनीं फौजे सुद्धां करवीरीं कुमकेस बोलाविलें. नाना फडणवीस शके मजकुरीं फाल्गून शु० १३ तारीख ९ मार्च रोजीं वारले, आणि त्याच

दिवशीं पहाटेस चार घटका रात्रीस करवीरीं **धोंडोपंत** गोखले* जमा-
वा सुद्धां येऊन दाखल झाले. नंतर शिंद्यांकडील पलटणें व तोफा घेऊन **रा-
मचंद्रराव** मौजे वडणगें नजीक पंचगंगेच्या किनारीं उतरले, आणि गो-
खले यांस रंकाळवेशी नजीक ठेविलें. मग शिंद्यांच्या तोफा पंचगंगावेशी-
च्या सुमारास आणवून दररोज प्रातःकाळीं दोन तास व सायंकाळीं तास
दीड तास या प्रमाणें करवीरच्या किल्ल्याच्या तटावर व बुरुजांवर फाल्गु-
न शु० १४ भृगूवार तारीख १० मार्च पासून मारगिरी करूं लागले.

**यादव** पुण्यास पोंचले, व घाटगे यांस आज्ञापत्रें देऊन मजकू-
र कळविला. तेव्हां घाटगे यांचें म्हणणें पडलें कीं, कागल तालुका आम-
च्या घराण्यांतील वडील यशवंतराव घाटगे यांजकडे सरकारांतून चालत
आहे. यास्तव त्यांची समजूत काढून, जर सदर तालुका आम्हांकडे दे-
णें होईल, तर अलिजाबहादुराकडे सक्त मेहनतीनें रदबदली करून
कोल्हापूरचा ग्रह उठविण्याची कांहीं तरी तोड काढण्यास यत्न करीन.
हा मजकूर यादव यांणीं महाराजांकडे लिहून पाठवून तालुका देण्या-
विषयीं रुकार आणविला. या प्रमाणें कोल्हापुराहून उत्तर येऊन पोंच-
ण्यास १०।१२ दिवस लागले.

या काळांत इकडे करवीरीं तटावर मारगिरी चाललीच होती, प-
रंतु किल्ल्याचा तट २० फूट उंच व १० पासून २० फूट पर्यंत रुंद असून मो-
ठमोठ्या दगडांनीं मजबूद बांधलेला होता व जागजागीं ४५ बुरूज होते.
आंत तटावर व बुरुजांवर चौक्या असून गोलंदाज व बंदुकबारदार ही मा-
रगिरी करीत होते. शिवाय कोठें तट पडला कीं, तेव्हां लागलाच बांधून
घेत असत. आंतील लोक उंच जागीं होते, सबब त्यांच्या बंदुकीच्या
मारगिरी पुढें शत्रूच्या लोकांस तटा नजीक येण्यास सांपडत नसे. इत-
क्यांत आकाराम यादव हवलदार पुण्याहून १५ रोजांच्या तहकूब चि-
ठ्या घेऊन फाल्गुन वद्य ३० छ २८ सव्वाल, तारीख २५ मार्च सन १८००

---

* रोजनिशींत बापूजी गणेश गोखले असें नांव आढळतें.

इसवी रोजीं करविरीं दाखल झाले. त्यांतील मजकूर असा होता कीं, " १५ दिवस गाळागोळी बंद असावी. बाहेरच्या लोकांनीं गोळ्या मारूंनये, व आंतून करवीरच्या कोटावरून गोळा मारूं नये. दोघण्याचा ठराव होई पर्यंत चाहरा सभोंवता राह देऊन असावें. आणि महाराजांनीं वेदशास्त्रसंपन्न भाऊजोशीराव, राजश्री रायाजी जाधव जप्तन मुलुख आणि विश्वासराव घाटगे सर्जाराव या त्रिवर्गांस पुण्यास पाठवावें. ते येऊन अखेर ठराव झाल्यावर फौजेचा राह उठेल. " पुण्याची पत्रें व चिट्या घेऊन शिवाजी अंबाजी व बचाजीबल्लाळ व पुण्याहून आलेले जासूद यांजबरोबर पटवर्धन व शिंदा कडील कामगार यांजकडे पाठविली. परंतु त्यांनीं पत्रांतील मजकूर मनास न आणिला पत्रें घेऊन गेलेल्या उभयता गृहस्थांस जावसाल केला कीं, पंधरा दिवस उगीच तहकुवी करून रहावयाची आपणास सवड नाहीं. आम्ही पत्रें पाठवितों, त्यांचीं उत्तरें येतील त्या प्रमाणें वर्तणूक करूं. या प्रमाणें सांगून उभयतांस लष्करांतून घालवून दिलें. व वेढ्याचें काम पूर्ववत् चालतें. तहकुबी चिट्या येनांच व त्या अमलांत न आल्यावर महाराजांनीं नागोजीरावास गोव्यांहून जलदी कुमक घेऊन येण्याविषयीं पत्रें पाठविली. या प्रमाणें तहकूब चिट्यांप्रमाणें गोळागोळी बंद न होतां पूर्व क्रम चालला. चैत्रमाशीं नटानजीक मोर्चे बंदीजास्त करून तोफांची मारागिरी अधिक करूं लागले. तेव्हां कांहीं दिवशीं किल्ला कांहीं जेरीस आला आहे, असें दिसल्यावरून किल्लयावर एकाएकीं छापा घालून हल्ला करावा असें ठरवून हल्लयाच्या दिवशीं अस्तमान पासून तोफांची मारागिरी सुरू केली; आणि चौथे प्रहरीं म्हणजे पहाटेच्या प्रहररात्रीस फुरसुनीचा समय पाहून किल्ल्याच्या कुसवास शिड्या लावून हल्ला करण्यास पलटणचे लोक चढूं लागले. तेव्हां **चणेचोरटीचे** बुरुजावर **बाजीराव कृष्ण रेणावीकर** व बंदुकवारदार लोक होते. त्यांणीं लोकांस चढतांना पहातांच बंदूकीची मारागिरी चालविली. वेशी नजीकच्या बुरुजावरील खासबारदार लोकांनींही बंदुकीची मारगिरी चालविली. येणें करून शिड्यांवर

चढून वर येण्याचें ज्यांणी साहस केलें होतें ते सर्व ठार झाले. इतक्यांत राजाज्ञ दरवाजांतून तटावर आले; आणि मानकरी एकांडे लोक यांज कडून शिड्या खालीं ढकलून देविल्या; एकच हरबी करून व सर्वांस हिम्मत देऊन शत्रूच्या लोकांवर बंदुकांच्या, पाषाणांच्या व बाणांच्या भडीमार करून अशी हुल्लड केली कीं, तेणें करून शत्रूचा फार नाश झाला. पलटणीचे दोनतीन युरोपियन सरदार ठार पडले. पलटणीचे व इतर लोक मिळून सुमारें २७०० ठार झाले; व हजार दीडहजार लोक जखमी झाले. या प्रमाणें शत्रूची अवस्था झाल्यावर हल्ला करण्यास आलेले लोक मागें फिरून गोळीचा मार चुकवून शक्कनार चावडीपलीकडे जाऊन उभे राहिले. इतक्यांत सूर्योदय झाला, तेव्हां श्री अंबिकेनेंच चमत्कार करून दाखविला असें म्हणून **श्रीचा जयजयकार करीत** तटावर उभे राहून शत्रूच्या फौजेस पाहूं लागले. नंतर पलटणच्या लोकांपैकीं दोनचार असामी हत्यारें ठेवून रेणावीकरांकडे आले, आणि तटावरील व बुरजावरील गोळी बंद करण्याविषयीं हुकूम देण्यास राजाज्ञास विनंति करावी, म्हणजे आम्ही हत्यारें ठेवून मुडदे घेऊन जाऊं असें म्हणाले, तेव्हां राजाज्ञांनीं गोळी बंद करण्यास हुकूम देऊन मुडदे नेण्यास परवानगी दिली. त्या समयीं पलटणचे लोक हत्यारें ठेवून मुडदे नेण्यास आले. त्यास इकडील लोक तटावरून व बुरुजावरून पहात होते. त्यांनीं मुडदे नेऊन सार्थकें केलीं. युरोपियन सरदारांची थडगीं शहरानजीक अद्याप आहेत.

या प्रमाणें किल्ल्यांतील लोकांनीं मोठी मर्दूमकी व शौर्य करून हल्ला फिरविला आणि पलटणच्या लोकांची खराबी केली. येणें करून इकडील लोकांस लढाई देण्याची जास्त हुषारी आली.

कोल्हापुरावर हल्ला झाला होता व तो फिरून पलटणच्या लोकांचा फार नाश झाला हें वर्तमान शिंद्याकडे गेलें. घाटगे यांची कागल तालुका देण्याविषयीं महाराजांकडील जोतीराव प्रभृति मंडळींनीं खात्री करितांच त्यांनीं शिंद्यांस महाराजांचीं आज्ञापत्रें सादर करून बोलणें सुरू

केलें होतें. इतक्यांत ही बातमी येऊन थडकली. तेव्हां ही संधि चांगली आहे, असें समजून मल्हारनिल्हे घाटगे सर्जाराव यांणीं शिंदे अलिजा बहाद्दर यांस सांगितलें कीं, आपण मराठे कुळांत प्रतापवंत असतां, शककर्ते शिवाजी महाराजांचे वंशज जे कोल्हापूरचे महाराज त्यांच्या राज्याची अशी खराबी आपण आपल्या हातानें करावी हें आपले कुळास अगदीं योग्य नव्हे. महाराजांच्या राज्याचें कल्याण करून, त्यांच्या राज्य वृद्धी विषयीं यत्न करावा, हा सेवक धर्म असून त्यांतच आपल्या दौलतीचें कल्याण आहे, हें पुरें चित्तांत आणावें, आणि कारभारी यांच्या मतलबी सल्लयावर इतबार ठेवूं नये. या प्रमाणें शिंद्यास बोध करून त्याचें मन फिरविलें. ही गोष्ट शिंद्याच्या मनांत ठसली, व त्यांची बाळाभाऊ पागे (प्रसिद्ध बाळोबा तात्या कुंजर). यांजवर गैर मर्जी होऊन त्यास चैत्र वद्य ४ सन १८०० एप्रील तारीख १३ रोजीं कैद करविलें, शिंदे यांच्या मनांत सखाराम घाटगे सर्जाराव यांची अत्यंत रूपवति कन्या बायजाबाई इजशीं लग्न करण्याचें फार दिवस मनांत होतें. त्या प्रमाणें बायजाबाईस देण्याचें ही कबूल करून कोल्हापूरचा ग्रह उठवावा असें घाटगे यांणीं ठरावांत आणिलें, नंतर जोशीराव, विश्वासराव घाटगे सर्जाराव व जसन मुलुख यांचे दौलतरावांच्या विद्यमानें पंतप्रधानाशीं सर्व बोलणें ठरलें. परशुराम भाऊनीं चिमाजी आप्पास पेशव्यांच्या गादीवर बसवून आपणास उपद्रव दिला, या बद्दल बाजीरावाच्या मनांत पटवर्धनांचा नाश करण्याचें होतेंच. त्यांत शिंद्यांकडूनही असें बोलणें येतांच रामचंद्र रावास व इतर पटवर्धनांस कैद करण्या विषयीं पत्र पाठविण्यास त्यांनीं लागलाच रुकार दिला. पत्र पावतांच रामचंद्ररावास कैद करावें, आणि किल्लयाचा मोर्चा उठवून परत निघून यावें. या प्रमाणें शिंद्यांचीं पत्रें पलटणच्या सरदारास रवाना झालीं. जासूदानीं पत्रें पलटणच्या सरदारांस देण्याचीं तीं रामचंद्र रावाच्या हातीं दिलीं. त्यांनीं लखोटे फोडून पाहिले. तेव्हां त्यास आपल्या विरुद्ध मजकूर आलेला समजला.

तेव्हां त्यांनीं आपल्या फौजेस सूचना करून सर्व पटवर्धन मंडळी सह- रामचंद्रराव वैशाख शुद्ध ३ रोजीं रात्रीचे रात्री पळून गेले. ते कोगनोळी- मुक्कामी राहिले; तेथून जलदी करून तासगांवास गेले. उजाडल्याव- र पटवर्धन सरदार पळून गेले असें कळलें व पुण्याचीं पत्रेंही पलटणच्या कामगारांस मिळालीं त्या- प्रमाणें करवीरच्या किल्ल्याचा मोर्चा उठवून वैशाख शुद्ध ७ तारीख १ एप्रील गुरुवार घ ६ जिल्हेज रोजीं रुकडी नजीक नदी किनारीं जाऊन ते उतरले. करविरास सुमारें एक महिना सत्तावीस दिवस शत्रूचा वेढा हो- ता, व तो **सखाराम** घाटगे यांच्या यत्नानें उठला.

हें वर्तमान महाराजांस परभारें समजलें व राजाज्ञांचेंही विनं- तिपत्र गेलें कीं, वेढा उठला आणि हुजूरची स्वारी यावी. असें पत्र पों- चतांच महाराज, **रवाशीमहालांच्या** स्वाऱ्या, **श्रीबाबामहारा- ज, श्रीनानामहाराज** व **श्रीभाऊमहाराज** यांच्या स्वाऱ्या व कुटुंबें आणि सरदार व मानकरी कुटुंब सुद्धां पन्हाळ्याहून निघून क- रविरीं वैशाख शुद्ध ९ रोजीं दाखल झाले. पंचगंगेवर आल्याचें स- मजतांच राजाज्ञ, उमदेतुल उमराव, सेनाखासकील वगैरे सरदार व मानकरी सामोरे गेले व त्यांनीं नजरा केल्या. नंतर स्वारी श्री **शंभु छ- त्रपतीचें** देवालयीं जाऊन दर्शन घेऊन किल्ल्यांत गेली, आणि **श्रीम- हालक्ष्मीचें** दर्शन घेतलें, व श्रीनें किल्ला राखिला, यास्तव श्रीच्या सं- स्थानाकडे मौजे कुरडू हा गाव इनाम करून दिला. मग स्वारी वाड्यां- त जाऊन सदरेस बसली, आणि राजाज्ञ यांणीं किल्ला राखिला; याक- रितां किल्लेभुदरगडच्या सनदा चिटणीस यांजकडून लिहून निशाणमो- र्तब करून त्या सनदा राजाज्ञांच्या हातीं दिल्या. त्या घेऊन सर्व राज्य- च सरकारांनीं स्वाधीन केलें आहे, सनदा कशास पाहिजेत, असें म्ह- णून पुढें येऊन महाराजांच्या चरणावर मस्तक ठेविलें, आणि डोंगरास श्रीजोतीबाच्या दर्शनास जाण्याविषयीं आज्ञा घेतली. जे लोक युद्धांत जखमी झाले व मेले त्यांच्या बायका मुलांस, कोणास **रांडरोटी**, को- णास **खुनकाट**, कोणास इनाम, व **बक्षिसें** अशीं इनामें जमि-

नी वगैरे देऊन सर्वांचें समाधान केलें.

राजास नदीपलीकडे जाऊन तेथून नमस्कार घालीत डोंगरास गेले. पांचवे दिवशी डोंगरावर पोंचले. तेथें श्रीचें दर्शन घेऊन श्रीस अभिषेक करविला; आणि वस्त्रें दिलीं व कंठा, शिरपेंच, तुरा वगैरे जवाहीर दिलें. नंतर १०,००० ब्राम्हणांची समाराधना घालून श्रीस चौघडा व हत्ती देऊन त्यांचे खर्चास मौजे पोहाळे व मौजे कुशिरें हे गांव इनाम दिले. श्रीच्या नैवेद्याकडे दरगांव गल्ला एकदोन रुपये व कित्येक ठिकाणीं मण दोन मण गल्ला करून दिला. यात्रेंत डबी होती ती सोडून दिली. गुरवाकडून दरसाल चार हजार रुपये पट्टी घेत होते त्या पैकीं दोन हजार रुपये सोडून दिले. या प्रमाणें यथासांग दर्शन घेऊन राजास डोंगराहून परत करविरास आले. करविरीं आप्पाबावा तेलंग यांणीं ब्राम्हणाकडून अनुष्ठान करविलें होतें त्याची शांति करून समाप्ति केली. तसेंच श्रीबाबा महाराज यांणीं अनुष्ठान करविलें होतें त्याची ही शांत केली.

पीर बाबूजमाल यांच्या दरग्यांत खबकदरजंग व आबादियारजंग पठाण यांजजवळ दावति म्हणजे प्रयोग करीत होते, त्यांजकडून श्रीबाबा महाराज यांणीं प्रयोग करविले, आणि गावांत सेफी म्हणणार मुसलमान होते त्यांजकडून व पारसनवीस यांजपाशीं पीरसाहेब म्हणून वस्ताद होता त्याजकडून मशार निल्हे बाबामहाराजांनीं सेफी म्हणविण्यास प्रारंभ केला. पंधरा दिवस सेफी म्हटल्यावर पीरसाहेब वस्ताद यास पहाटेच्या प्रहरराचीं स्वप्नांत दृष्टांत झाला. त्या वेळीं एका मलंग फकिरानें सांगितलें, कीं सेफी सुरू झाल्या दिवसापासून ४० वे दिवशीं करवीरच्या वेढा उठणार. त्या प्रमाणें ४० वे दिवशीं करवीरचा वेढा उठून गेला. तेव्हां बाबामहाराजांनीं आपला गांव वळीवडें येथें पीरसाहेब वस्ताद यांस सहाविघे जमीन इनाम करून दिली, व तेही अनुष्ठान पुरें करविलें.

शिंद्यांची पलटणें रुकडी नजीक उतरली असतां त्यांवरील सर-

दारांस शिंद्यांचें पत्र आलें कीं, पलटणें व तोफा घेऊन शिधोजीराव निंबाळकर निपाणकर यांजबरोबर जाऊन नेरलीचें ठाणें घेऊन निपाणकरांच्या हवाली करावें. त्या प्रमाणें कूच करून पलटणें नेरली नजीक गेलीं, व नेरलीच्या ठाण्यास वेढा दिला. आठ पंधरा दिवस झाले तरी ठाणें जेरीस आलें नाहीं. सबब निपाणकर यांणीं महाराजांस विनंती पत्र पाठविलें कीं, राजाज्ञ यांस फौजे सुद्धां कुमकेस पाठवावें म्हणजे नेरलीचें ठाणें घेऊं. त्या समयीं राजाज्ञ यांची फौज सुद्धां नेरलीचें ठाणें घेण्यास रवानगी झाली. राजाज्ञ नेरलीस पोंचल्यावर सर्व ठाण्यासभोंवती फिरून दरवाजाजवळ येतांच पालखींतून उतरले, आणि पायउतारा लोकांस घेऊन दरवाजांत जिथें नजीक एकदम मोर्चा कायम केला. तेव्हां पलटणच्या सरदारांनीं राजाज्ञांची जमावर्दी व धारिष्ट पाहून तोंडांत बोटें घातलीं, व मोठी तारीफ केली. दरवाजांतील मोर्चाच्या अडचणी मुळें ठाणें जेरीस आलें, आणि ठाण्यांतील लोक कौलानें उतरून गेले. तेव्हां ठाणें राजाज्ञयांणीं निपाणकरांच्या स्वाधीन केलें. नंतर पलटणच्या सर्व सरदारांनीं राजाज्ञाकडे भेटीस येतों म्हणून सांगून पाठविलें. त्या वरून त्यांणीं ही तयारी करून येण्या विषयीं सूचना पाठविली. त्या प्रमाणें ते येऊन भेटले. क्षणभर बसून परस्पर बोलणीं झालीं. नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब, वगैरे देऊन निरोप दिला; व ते आपल्या डेऱ्यास गेले. दुसऱ्या दिवशीं निपाणकरांचा निरोप घेऊन राजाज्ञ फौजे सुद्धां करविरास गेले.

चतुरशिंग राजे सातान्याहून पळून करविरीं आल्यापासून त्यांस दरमहा पंधरा हजार रुपये पोंचत होते. वेढा उठून स्वारी करविरीं आल्यावर ते पन्हाळ्याहून सातारा, पुणें प्रांतीं गेले ते पुन्हा इकडे आले नाहींत.

सखाराम घाटगे यांणीं दौलतरावास आपली कन्या बायजाबाई दिला देण्याचें कबूल केलें होतें. परंतु शिंद्याचे वडील महादजी कमजातीचे, सबब त्यांस मुलगी द्यावयाची नाहीं असा सखाराम

घाटगे यांचे वडील बंधु विश्वासराव यांणी आग्रह धरिला, आणि मु-
लगी नेऊं लागल्यास अपाय करावा असा त्यांणी निश्चय केला. लग्न झा-
ल्या शिवाय कोल्हापूरचे तहनामे पुरे होईनात. यास्तव मुलगी गुप्त रूपें
नेण्यासाठीं पुण्याहून **नरसिंगराव** मल्हार चिटणीस यांस घाटग्यांनीं
पाठविलें. तेही विश्वासरावाच्या भयानें चिखलीस न जातां परगांवीं उ-
तरले, आणि **जिनाबाई**च्या विचारें उभयतां मुलांस हस्तगत करून
पळून गेले. मुलगी पुण्यास पोंचल्यावर मोठ्या समारंभानें लग्न झालें.

लग्न आटपल्यावर शालिवाहन शके १७२२ राजशक १२७ रौद्रना-
म संवत्सरे, सूरसन इहिदे मयातैन व अल्लफ इ. स. १८०० सालीं बाजी-
राव रघुनाथ पंडित प्रधान यांजकडून दौलतराव शिंदे यांणीं आषाढमा-
शीं महाराज सरकारांत दोन तहनामे छ. १९ सफर ऊर्फ आषाढ वद्य ६
रोजीं ठरवून दिले. त्या तहनाम्यांत **चिकोडी** व **मनोळी** व **क-
टकोळ** तालुके महाराज सरकारांत द्यावे, व आणखी नवीन पावणे ती-
न लक्षांचा प्रांत महाराजांच्या राज्या नजीक द्यावा, सन १८०१ सालीं या प्र-
माणें दौलतराव शिंदे अलिजाबहाद्दर यांच्या विद्यमाने ठरलेले तहनामें
दोन घेऊन **सखाराम** घाटगे सर्जाराव पुण्याहून शके १७२२ चैत्रमा-
शीं निघाले. ते कऱ्हाडानजीक येऊन उतरले. शके १६९६ राज शक
१०१ इसवी सन १७७४ सालीं **भवानराव** प्रतिनिधि यांणीं कसबा
वडगांवचे ठाणें घेतलें, त्या वेळीं महाराज सरकारचा जरीपटक्याचा ह-
त्ती व दुसरा हत्ती पाडाव करून नेले होते. पैकीं दोनही हत्ती मयत
झाले होते. या मुळें पेशजींचा जरीपटकापरशराम पंडित प्रतिनिधि
यांजकडून घेऊन तो जरीपटका व दोन तहनामें घेऊन सखाराम घाटगे
सर्जाराव करविरीं आले. त्यांस राजास यांणीं सामोरें जाऊन बहुमाना-
नें शहरांत आणिलें. मशारनिल्हे घाटगे यांणीं महाराजांची भेट घे-
ऊन पद्धति प्रमाणें नजरा केल्या आणि प्रधानाकडील आणलेले तह-
नामें व जरीपटका गुजरले. नंतर पटवर्धन यांचीं चिकोडी व मनोळी
तालुक्यात ठाणीं होतीं तीं उठवून महाराज सरकारांतून मामलेदार र-

वाना झाले. चिकोडीची मामलत लिंबाजी यादव हवालदार यांस सांगितली. आणि मनोळीची आबाजीराम मामलेदार किल्ले पन्हाळा यांस आणि कटकोळची खंडेराव भोसले यांस सांगितली. तदनंतर पूर्वी ठरल्या प्रमाणें घाटगे यांजकडे कागल तालुका सरंजामास लावून दिल्या बद्दल महाराजांनीं आज्ञापत्रें दिली. तसेंच घाटगे यांच्या विनंती वरून शिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई प्रांत हुकेरी यांस त्यांजकडे पूर्वीची इनामें चालवून नवीन आज्ञापत्र दिलें. तहनामे व आज्ञापत्रें यांच्या तालिका पुढें पुरवणींत दिल्या आहेत.

शके १७२२साली सौभाग्यवती कमळजाबाई राणीसाहेब वाडा १४ फाल्गून शुद्ध २ सन १८०१ फे. ता. १५ छ १ सव्वाल रोजीं प्रसूत झाल्या. व पुत्र झाला. महाराजांस मोठा आनंद होऊन नामकरणादि बारा दिवस समारंभ होऊन नांव राजाराम असें ठेविलें. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं तो पुत्र निवर्तला. पुढें फाल्गून वद्य ८ रोजीं सौभाग्यवती सुंदराबाई राणीसाहेब वाडा ६ यांस पुत्र झाला (तारीख ८ मार्च) त्यावेळीं समारंभ करून नांव '**शंभुमहाराज**' असें ठेविलें. पुढें शके १७२३ सालीं सन १८०२ तारीख २२ जानेवारी पौष वद्य ३ गुरुवारीं सौभाग्यवती **कमळजा** बाईसाहेब वाडा १४ प्रसूत झाल्या व त्यांस पुत्र झाला. त्यावेळींही समारंभ करून नांव '**शहाजीराजे**' असें ठेविलें.

**श्रीबावामहाराज** नरसिंगपुरास असतांना शिंदे यांजकडील लक्ष्मीबाई वगैरे बाया **दौलतरावाशीं** खटले करून फौजेसुद्धां दक्षिणेंत आल्या, व खंडण्याघेत फिरत असतां त्यांजकडील पठाणांनीं नरसिंगपुरास श्रीबावामहाराज यांस खंडणी करितां अटकेंत ठेविलें व तें वर्तमान महाराजांस समजतांच राजाज्ञास तिकडे पाठवून त्यास सोडवून आणवून करविरीं सरकार वाड्यांत पुढील चौकांत ठेविलें होतें वगैरे हकीकत मागें आलीच आहे. पुढें कांहीं दिवसांनीं महाराजांनीं त्याजपासून उपदेश घेतला व नंतर सरंजाम व वाडा देऊन गुरुमहाराजांस मोठ्या इतमानानें ठेविलें. करविरीं असतां शके १७२२ सालीं (सन १८००)

बाबामहाराजांस वेडा मधुरा होऊन वैशाख वद्य ६ स सरकार वाड्यांतच ते मृत्यु पावले. त्यांचें सार्थक खुद्द खासा स्वारी जाऊन यथास्थितपणे करविलें. दहावे दिवशीं खासा स्वारी बनपुरीचे घाटावर तिळांजळी देण्यास गेली होती. दोन प्रहरपर्यंत पिंडास **काकस्पर्श** झाला नाहीं. कैलासवासी बाबामहाराजांचे पुत्र श्री बाबा महाराज यांणीं अनेक संकल्प मनांत योजून उदक सोडिलें; तथापि स्पर्श होईना. शेवटीं दर्भाचा काक करून त्याजकडून पिंडास स्पर्श करविला, व कर्माची समाप्ति केली. अकरावे दिवशीं महाराज सरकारांतून पालखी, घोडा, दासी वगैरे दशदानें श्री बाबा महाराजाकडून देवविलीं. दानधर्मास नक्त रुपये देऊन **श्रीमन्महाराज शंभुछत्रपति** यांच्या पंचगंगा तिराच्या देवालयाच्या आवारांत प्रांतांतील समस्त ब्राम्हणांस दोन रु० प्रमाणें दक्षिणा झाली. नंतर पंचगंगेच्या तिरीं गुरुमहाराजांचें दहन झालें त्या ठिकाणीं देवालय बांधून सन १८०७ सालीं वैशाख शुद्ध ९ स पादुका स्थापन केल्या आणि अर्चेस व उत्साहास सरंजाम करून दिला.

**धोंडजी वाघ** याणें जमावनिशीं चिकोडी व मनोळी तालुक्यांत उपद्रव केला. त्याचा पुंडावा दक्षिणेंत चोहोंकडे चालला होता. या करितां त्याचा बंदोबस्त करण्यास **कर्नल वेल्स्ली** साहेबांची नेमणूक झाली होती. त्यांचें पत्र कुमक पाठविण्याविषयीं आल्यावरून महाराजांनीं फौज रवाना केली, आणि अखेर त्याचा बंदोबस्त झाला

शके १७२६ सालीं चातुर्मास झाल्यावर श्री भवानीच्या दर्शनास जाण्याचा संकेत ठरला. परंतु कित्येक कारणांनीं दिनावधी होऊन माघ शुद्ध ३ सन १८०५ फे. २ स उभयता चिरंजीव व महालच्या स्वाऱ्या सुद्धां स्वारी करविराहून निघाली. सहावे दिवशीं स्वारी तुळजापुरास दाखल झाली. तेथें पांच मुक्काम होऊन श्रीस अभिषेक करवून दागिने व अलंकार दिले. तेथून कुच होऊन तिसरे दिवशीं स्वारी श्री पंढरीस आली. तेथें महापूजा व समाराधना करून फाल्गुन

शुद्ध १० तारीख १० मार्च रोजीं स्वारी करविरास परत आली.

शके १७२७ सन १८०६ सालीं फे० २३ फाल्गुन शुद्ध ५ रोजीं **आनंदराव** प्रतिनिधि यांचा काळ झाला. त्यास पुत्रसंतती नव्हती, सबब त्यांचे कनिष्ठ बंधु भगवंतराव यांस शिरस्त्याप्रमाणें नजराणा व इनामपत्र घेऊन पदाधिकारांचीं वस्त्रें दिलीं.

सन १८०३ (शके १७२५) सालीं सावंतवाडीचे **खेमसावंत** मृत्यु पावले. त्यांस पुत्रसंतान नव्हतें, यामुळें अंतकाळीं त्यांणीं आपली पत्नी लक्ष्मीबाई इच्या स्वाधीन सर्व कारभार केला. श्रीरामसावंत ऊर्फ रावसाहेब आणि सोमसावंत यांजमध्यें गादी बद्दल खटले लागले. शेवटीं सोमसावंत यांस धरून रामसावंतानें वाडीच्या किल्ल्यांत अटकेंत ठेविलें. तेव्हां आपण शत्रूच्या हातीं सांपडल्यास आपले हालहाल करतील, या धास्तीनें आपले सभोंवतीं दारू पसरून बत्ती लाविली आणि तो व त्याच्या कुटुंबांतील बहुतेक माणसें मरण पावलीं. त्यांचा मुलगा **फोंडसावंत** हा रेडीच्या किल्ल्यावर अटकेंत होता, तो मात्र वांचला. त्याणें करवीरकरांकडील दत्ताजी अनंत मालवणास होते, त्यांजकडे बोलणें लाविलें. त्या वरून महाराजांनीं रत्नाकर आप्पा राजाज्ञ व शिवराम भोसले सुभेदार यांस फौज देऊन कुमकेस पाठविलें. आप्पा रेडीस गेले आणि किल्ला सरकरून घेऊन फोंडसावंताची समक्ष भेट घेतली. नंतर किल्ल्यावर करवीरचे लोक ठेवून बंदोबस्त केला आणि मालवणाहून त्यांस सामुग्रीवगैरे मिळावी अशी तजवीज करून फोंडसावंतास घेऊन मालवणास गेले, व तेथून करविरीं आले. महाराजांनीं सावंताचा चांगला आदर सत्कार करून पर्जन्य काळ संपतांच कुमक देण्याचें अभिवचन दिलें. बरसात खलास होतांच रत्नाकर आप्पा फौजेसह घांटाखालीं वाडीप्रांतांत गेलें. सणाच्याबरोबर कुडाळचें ठाणें घेतलें, आणि तेथून आसपासचा प्रांत उध्वस्त करूं लागले. तेव्हां लक्ष्मीबाईनें फोंडसावंतास वाडीस येण्याविषयीं आणि त्यास त्याच्या बापाचे सर्व हक्क देण्या विषयीं कबूल केलें. तेव्हां आप्पा करविरास परत आले.

इतक्यांत **श्रीराम** सावंतानें पुनः फौज जमवून फोंडसावंतावर हल्ला केला. त्यांत त्याचा (फोंडसावंताचा). पराभव होऊन तो मोठ्या संकटानें अरवेरीस पळून गेला. तेथून त्याणें कुडाळास जाऊन आश्रय घेतला, तेथें त्यास रांगण्याचा * किल्लेदार **राणोजी नाईक** निंबाळकर याणें कुमक करून अरवेरी पर्यंत ठाणीं घेतलीं. नंतर मालवणाहून कुमक आणवून सिद्‌गडास ही वेढा घातला, परंतु तो किल्ला हस्तगत झाला नाहीं. इतक्यांत रामसावंत मरण पावला. व वाडींतील बरवेड्याचें पत्र महाराजास पावलें. पत्र पावतांच महाराजांची स्वारी शके १७२७ श्रावण वद्य ५ स सन १८०५ आगस्ट १५ करविराहून निघून **प्रसिद्धगडास** (रांगण्यास) गेली. तेथें पंधरा दिवस राहून भाद्रपद शुद्ध पक्षीं घाटाखालीं गेली. लागलीच नेवतीचा किल्ला घेऊन मालवणास गेली. तेथें शारदी नवरात्राचा उत्साह करण्याचा बेत ठरून महालच्या स्वाऱ्या व उभयतां चिरंजीव यांस आणण्या करितां राजाज्ञांस करविरास पाठविलें. ते स्वाऱ्या घेऊन भाद्रपद वद्य १४ रोजीं मालवणास दाखल झाले. (तारीख २२ सपटंबर.). नवरात्राचा उत्साह आटपून कार्तिकी पौर्णिमा झाल्यावर महालच्या स्वाऱ्या वगैरे खटलें **नारायणराव पंडित** यांज बरोबर पाठवून खासास्वारी भरतगडास गेली. किल्ल्यास मोर्चे लावून किल्ला घेतला. नंतर आसपासचीं ठाणीं घेऊन स्वारीपरत करविरास शके १७२७ सन १८०५ दिजंबर पौषमाशीं आली. **राणोजीनाईक** निंबाळकर याणें नरसिंग गडही घेतला.

करविरीं स्वारीआल्यावर शंभु छत्रपति ऊर्फ आबासाहेब यांचा विवाह करण्याचा बेत ठरला. नारायणराव खानवेलकर यांची कन्या वधु योजिली. शके १७२८ फाल्गून शुद्ध ३ सन १८०७ मार्च १२ रोजीं मुहूर्त योजिला नंतर तयारी करून सुमूहूर्तावर विवाह मोठ्या समारंभानें झाला.

---

* यास प्रसिद्ध गड असें ही म्हणतात.

तिकडे वाडीस फोंडसावंताचा पूर्ण अंमल बसला नाहीं, वाडीच्या लोकांनीं दंगा आरंभिला. शके १७२८ सन १८०७ जानेवारी, पौषमाशीं लक्ष्मीबाई कडील लोक जमावानिशीं मालवणास चालून आले. परंतु सिंधुदुर्गावर कटाव चालला नाहीं. श्रीरामेश्वराच्या देवाळया नजीक पेठ आहे त्या पेठेवर हल्ला करून पेठेची खराबी केली. तेथून त्यांणी मेढ्यावर* हल्ला केला. तेथें त्यांचा मोड झाला, व त्यामुळें त्यांस परत जावें लागलें. पुनः आठ रोजांनीं जमावानिशीं येऊन पेठेंतील लोकांची घरें जाळिलीं. तेथून जाऊन त्यांणी भरतगडास वेढा दिला.

हें वर्तमान करवीरास समजतांच १००० निवडक लोकांस महाराजांनीं रवाना केलें, व मालवणाहून **शिदराम** भोसले सुभेदार यास तिकडे जाण्यास हुकूम केला. त्याणें जाऊन भरतगडाचा वेढा उठविला. महाराजांनीं **हैबतराव** गायकवाड सरखवास यांस २०० स्वारांनिशीं पुढें पाठवून खासास्वारी ३००० पायदळ घेऊन रत्नाकरपंत आप्पां सह वर्तमान निघाली. ती **हणमंत** घाटानें **महादेव** गडानजीक दाखल झाली. तेथें गडकरी यांणीं खटले काढलें. त्यांत गोळागोळी होऊन अखेर गडकरी लोक पळून गेले, व किल्ला स्वाधीन झाला. तेथें बंदोबस्तास लोक ठेवून फौजेसह स्वारी पुढें निघाली. **चौकळ** (चौकुळी) येथें वाडीकरांच्या फौजेशीं मोठी लढाई झाली; सन १८०७. तींत वाडीकरांचा अगदी पराभव झाला. तेथून महाराजांनीं कुच करून वाडीस जाऊन मोर्चे दिले. आतां आपला निभाव लागत नाहीं असें पाहून **लक्ष्मीबाईनें आप्पासाहेब** निपाणकर यांजपाशीं कुमक मागितली. तेव्हां त्यांणीं लागलेच २००० आरब पाठविले; आणि इकडे करवीर करांचे चिकोडी व मनोळी प्रांत जबरीनें ताब्यांत घेतले. तेव्हां अर्थात महाराजांस चैत्र शुद्ध ११ शके १७२९ तारीख १८ एप्रील रोजीं मोर्चे उठवून आपल्या तालाच्या रक्षणार्थ वाडीहून परत यावें लागलें.

---

* मालवणच्या एका भागास मेढा असें नांव आहे.

शके १७२९ सन १८०७ मे १६ वैशाख कृष्ण ९ रोजीं सातारकर शाहू छत्रपति यांणीं कैलासवास केला. हे वर्तमान **शिवाजी** महाराजास समजतांच, आधार होता तो गेला; पुढें मुलांस प्रधानांचा कारागृह होणार, हें मनांत आणून फार श्रमी झाले. त्या समयीं चतुरसिंग राजे भोसले करविरीं होते, त्यांस पंधराहजार रुपयांचा सरंजाम देत असतां तो न घेतां ते साताऱ्यास निघून गेले. जाते समयीं त्यांस खर्चास पांच हजार रुपये दिले.

आप्पासाहेब निपाणकर यांणीं करवीर प्रांतास उपद्रव देण्याचें सुरू केलेंच होतें. जी आज पांच सात वर्षें या प्रांतीं स्वस्थता होती ती तेव्हांपासून मोडून पुनः दंग्या बखेड्यास आरंभ झाला. वाडीकर लक्ष्मीबाईनें पेशव्यांकडे व इंग्रजांकडे कुमक मागितली होती. इंग्रजांनीं या कामीं हात घालण्याचें नाकबूल केलें. परंतु पेशव्यांनीं कोल्हापूरकराशीं युद्ध करण्यास निपाणकरांस परवानगी दिली. **आप्पा** साहेब देसाई यांनीं जी गोष्ट पूर्वींच आरंभिली होती, तीस पेशव्यांचा रुकार मिळतांच त्यांनीं उघडपणें जंगी तयारी करून फौजेसुद्धां करविरास कुच केलें. टेंबलाईचे माळावर तळ देऊन तेथें आठ दिवस मुक्काम केला, आणि तेथून नित्य तोफांची मारगिरी शहरावर करूं लागले. परंतु उपाय चालेना व पर्जन्यकाळ समीप आला, यास्तव तळ उठवून परत निघून गेले. जरसान खलास होतांच **देसाई** पुनः (शके १७२९ सन १८०७ अकटोबर) दसऱ्याच्या मुहूर्तानें निघाले. चिकोडी व मनोळी तालुक्यांत त्यांणीं गाणी घातली. कटकोळचें ठाणें घेतलें, आणि जिकडे तिकडे प्रांतांत प्रजेस उपद्रव देऊन अमर्याद पीडा केली. ज्या त्या गांवाकडून जबरीनें खंड घेऊं लागले. या प्रमाणें देसाई यांनीं दंगा आरंभिला. निपाणकरांवर बाजीराव पेशव्यांची प्यार मर्जी होती. त्या वेळच्या योध्यांत ही यांचा पहिला नंबर होता. यांच्या फौजेंत निवडक आरब लोक होते. यांजविषयीं कागाळी कोणीं पेशव्यांकडे नेली असतां ते बिलकूल मनावर घेत नसत. यामुळें हे राजरोस लोकांस दंड बांधून नागवीत. हे स्वभावतः

किती क्रूर होते या विषयीं या प्रांतीं लोक अद्याप गोष्टी सांगतात. याच पुस्तकाच्या* दुसऱ्या एका भागांत निपाणी संस्थानचा इतिहास दिला आहे त्या ठिकाणी यांचें समग्र चरित्र दिलें आहे, त्या वरून यांचा करवीर दरबाराशीं मूळचा संबंध, पुढें हे कसे चढले, करवीरकरांशीं यांचा कसा बिघाड आला, व यांचा स्वभाव आणि वर्तन कसें होतें, वगैरे सर्व हकीकत त्या स्थळीं दिली आहे, यास्तव येथें द्विरुक्ति करीत नाहीं. अशा क्रूर व बलाढ्य शत्रूचा उपद्रव आपल्या रयतेस होऊं लागला, तेव्हां महाराजांनीं राजाज्ञांस बंदोबस्तासाठीं करवीरीं ठेवून दुसऱ्या सरदारां सहवर्तमान जंगी फौज व तोफखाना घेऊन खासास्वारी निपाणकरांशीं सामना करण्यास निघाली. महाराजांनीं निपाणकरांनीं घेतलेलीं कांहीं ठाणीं घेऊन कसबा **सांवगांव** येथें मुक्काम केला. निपाणकरास हें वर्तमान समजतांच त्यांनीं महाराजांशीं युद्ध करण्याची तयारी चालविली. कोल्हापूरचे 'सरलष्कर' हे निपाणकरांचे माऊस बंधु होते, त्यांस देसाई यांनीं फितवून त्यांच्या मार्फत करवीरच्या दुसऱ्या कित्येक सरदारांस अंतर्यामीं अनुकूल करून घेतलें. नंतर माघ शुद्ध ७ सन १८०८ फेब्रुवारी तारीख ४ रोजीं दोन प्रहरच्या समयास फौजे सह सांवगांवास येऊन ठेपले; आणि एकदम महाराजांच्या फौजेवर हल्ला करून युद्धास आरंभ केला. निपाणकर येतात ही बातमी लागतांच महाराजांनींही लढाईची तयारी केली होती. आघाडीस तोफखाना ठेवून बाकी फौज शिस्तीनें उभी केली होती. निपाणकरांनीं हल्ला करतांच त्यावर तोफांची मारगिरी सुरू केली. करवीरच्या तोफांच्या मारापुढें निपाणकरांचा कटाव चालेना. करवीरच्या तोफा मोठ्या व गोलंदाजही निभावलेले व हुषार होते. परंतु दैववशात् करवीरच्या तोफखान्यावरील कामगार **यशवंत** राव घाटगे झुंजारराव गोळा लागून पडले. ते पडतांच थोडी धांदल उडाली. इतक्यांत **रघुनाथ** राव माने भीमबहाद्दर हे आपल्या पथ-

---

* दक्षिण महाराष्ट्रांतील जहागीरदारांचा इतिहास पृष्ठें १८८ – १९५ पहा.

का मिर्झा पुढें चालून गेले. परंतु तोफांच्या मारगिरींत खळ पडतांच निपाणकरांची फौज पुढें सरसावली होती. त्या मुळें **भीमबहादर** व **बाबुराव** भोंसले हे उभयतां गोळे लागून पडले. याच संधीस **सरलष्कर** वगैरे फितुरी मंडळी निपाणकरांच्या तोंडावर न जातां बाजूस सरली. हें पाहून करवीरच्या सर्व फौजेनें कच खाल्ला, व लोक हवालदील झाले. पुढें निभाव कसा लागतो याची पंचाईत पडली. याप्रकारची धांदल करवीरच्या फौजेंत उडालेली पाहून निपाणकर एकलगट करून कोल्हापूरच्या फौजेवर चालून आले, आणि गर्दी करून कत्तल करण्यास आरंभ केला. तेव्हां कोल्हापूरच्या फौजेची लढाईची शिस्त बिघडून गेली, रांगा फुटल्या. रामचंद्रराव सेनापति ही पडले. दुसरे दोन सरदार पाडाव झाले. तेव्हांतर लोकांचा अगदीं धीर सुटला, व जिकडे तिकडे ते पळत सुटले. या समयीं जर खुद्द महाराजांनीं पुढें होऊन लोकांस धीर देऊन लगट केली असती, तर इतकी फुटाफूट झाली नसती; व इतका नाश झाला नसता. तसें झालें नाहीं. **नरसिंग मल्हार** अष्टेकर यांस भाल्याची जखम लागली. आवांतर पुष्कळ लोक मेले, व कांहीं जखमी झाले, आणि महाराजांचा अगदीं मोड झाला. खुद्दमहाराजांचा बचाव कसा होतो याची लोकांस काळजी पडली. **रायाजी जाधव जप्तनमुलुख** यांणीं त्यांस आपल्या घोड्यावर पाठीशीं घेऊन तेरणांतून निसटले. त्यास निपाणकर यांच्या स्वारांनीं गांठून महाराजांवर भाला टाकला. तो किंचित् लागून जखम झाली व थोडें रक्त वाहूं लागलें. परंतु जप्तन मुलुख यांणीं घोड्यास टाच मारून घोडा उडविला, आणि महाराजांस सुरक्षीत घेऊन पार झाले. बरकड लष्कर ही चारी दिशांनीं गेलें. जरी पटका, निशाण सहित हत्ती, डंका, **आनंदी** तोफे सहीत सर्व तोफा वगैरे निपाणकरांनीं हिराबून नेल्या. एक हत्ती रणांतच मयत झाला. सुमारें दोन हजार मनुष्यें ठार झालीं. दोन अडीच हजार सुमारें जखमी झालीं. त्या शिवाय सुमारें पांचशें पाडाव झालीं. **मुरारराव भोंसले** सुभेदार, **उदाजीरा-**

राव चव्हाण, हिंमत बहादर, मोतीगिरी गोसावी, लक्ष्मणराव साळोखे वगैरे कित्येक सरदारांस पाडाव करून नेले. त्यांस मौजे कोगनोळी येथें ठेविलें. अप्तन मुद्दाम महाराजांस घेऊन निसटले ते प्रथम 'तमद-लग्यास' गेले व तेथून थेट रातोरात करवीराकडे निघाले.

मोड झाल्याचें वर्तमान करवीरास चार घटिका रात्री राजाज्ञ यांस समजलें. महाराजाचा ठिकाण नाहीं, असें त्यांस समजल्यावरून ते फारच घाबरले. वाड्यांत व शहरांत हल्लकल्लोळ झाला. इतक्यांत मागून दुसरा मनुष्य आला, त्याणें कळविलें कीं, निपाणकरांच्या स्वारानें महाराजांवर वार टाकिला, आणि त्यांस जखम केली. हें ऐकून राजाज्ञ फारच गडबडले. परंतु रात्रीचा समय असल्यामुळें उपाय नव्हता. शहराचा व वाड्याचा बंदोबस्त करून महाराजांच्या शोधाकरितां स्वार व लोक पाठविले; आणि आपण विजापूर वेशीच्या दरवाजांत जाऊन बसले. तिकडून जखमी झालेले लोक येत त्यास आंत घेऊन त्यांच्या जखमा बांधवीत. या प्रमाणें सूर्योदय पर्यंत चालविलें. सूर्योदयीं 'महाराज सुखरूप आहेत' अशी बातमी येऊन पोंचली. इतक्यांत स्वारी रुकडी नजीक आल्याचें वर्तमान आलें, तेव्हां संतोषाची शर्करा शहरांत वांटण्यास सांगून आपण निघून पुढें सामोरे गेले. महाराजांचें दर्शन होतांच चरणीं मस्तक ठेविलें. महाराजांची मुखश्री म्लान पाहून स्वारी क्षेम आली, हा आज मोठा लाभ झाला, आतां प्रतिस्पृष्टि करूं; तेथें निपाणकरांची कथा काय आहे. या प्रमाणें शांतवन करून स्वारी घेऊन शहरांत आले. श्रीचें दर्शन घेऊन महाराज वाड्यांत दाखल झाले. तिकडे ज्यांचीं माणसें मेलीं होतीं, त्यास ताकीद करून पाळून मुडदे आणविले, आणि सार्थकें करविलीं. कोणास रांडरोटी, कोणास इनाम, कोणास बक्षीस, अशी जमीन व गाव दिले; आणि सर्वांची समाधानी करविली. या स्वारींत प्रतिनिधि, अमात्य, सेनाखासकील, कागलकर घाटगे वगैरे जमावानिशीं होते.

या लढाईचें वर्तमान पुण्यास श्रीमं तास समजतांच निपाणकरयांजवर गैरमर्जी झाली. महाराजांचें रक्त भू ास लागूं नये ते लागलें. या बद्द-

ठरल्या प्रमाणें वागतील याची त्यांस आशा राहिली नाहीं.

सदर प्रमाणें निपाणकरांच्या लग्नाचा सोहळा आटपून स्वस्थता झाल्यावर बद्यपक्षीं आपल्या दुसऱ्या दोन मुलींचीं लग्नें यथास्थितपणें समारंभ करून केलीं. चिमाबाईस नागोजीराव पाटणकर यांस व आक्कुबाईस लक्ष्मणराव शिंदे सेनाखासकील यांस देण्याचें ठरवून त्यांस करवीरीं आणविलें, आणि दोनही विवाह यथासांग सुमुहूर्तावर झाले. पाटणकरास करवीरासच ठेवून घेतले. तोरगलकर ही कांहीं दिवस राहून तोरगलास गेले.

रायाजीराव जाधव सरनोबत आणि हैबतराव गायकवाड विश्वासराव हे कोल्हापुरास मोठे कर्ते होते. राजाज्ञ यांच्या हातीं सर्व कारभार असल्यानें त्यांचें तेज पडेना. यास्तव राजाज्ञांकडून कारभार कोणत्या रीतीनें निघेल याच्या विचारांत ते होते. त्यांणीं एके दिवशीं महाराजांची गांठ घेऊन कळविलें कीं, आजपर्यंत राजाज्ञांनीं कारभार चालविला, व मोठमोठीं कामें केलीं; परंतु दौलतींत कांहीं शिल्लक न उरवितां दौलत खराबीस आणिली, आणि मनुष्यमात्रास जर्जर केलें. त्यांत आतां तर त्यांचा वृद्धापकाळ झाला. जर सरकारची आम्हांस आज्ञा होईल, तर दौलतीचें काम व्यवस्थापूर्वक चालवूं व जेणेंकरून प्रजेस सुख होईल अशी तजवीज करूं. त्या समयीं राजाज्ञांस त्यांची इच्छा नसतां कामावरून दूर करणें महाराजास परम अवघड वाटलें. रत्नाकर आप्पा राजाज्ञ हा मोठा शूर, चतुर व दक्ष असा मुत्सद्दी होता. याणें सतत २६, २७ वर्षें राज्यकारभार केला. तो महाराजांस बिकट प्रसंगीं कसा उपयोगी पडला, त्याणें सरकारची चाकरी कशी केली, दवलतीचें काम कसें चालविलें, आणि बिकट प्रसंगीं त्याणें महाराजांस कशी सल्ला दिली वगैरे गोष्टी जे कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांचें चरित्र वाचतील त्यांच्या ध्यानांत सहज येतील. व त्यांस (राजाज्ञांस) निष्कारणीं घरीं बसविणें महाराजांस किती अवघड वाटलें असेल याची ही कल्पना सहज

ळ शांति करविली.

निपाणकरांनीं जय संपादिल्यावर चिकोडी व मनोळी ही गाणीं हुकेरी परगण्यासहित कबजांत घेतलीं. व ते तोरगलकर व इतर कोल्हापूरचे जहागीरदार यांचा प्रांत लुटून उध्वस्त करूं लागले. तेव्हां महाराजांनीं निपाणकरांशीं सल्ला करण्या विषयीं बोलणें लाविलें. या उभयतां मध्यें सल्ला करण्या साठीं पेशव्यांनीं मनावर घेतलें " शिधोजीराव निपाणकर " यानें प्रथमारंभीं जेव्हां करवीर सोडलें, तेव्हांच पण केला होता कीं, खुद्द महाराजांच्या कन्येशीं लग्न करीन तरच नांवचा शिधोजी असेन. त्या प्रमाणें महाराजांनीं कन्या दिल्यास सल्ला होईल असें सांगितलें. देसाई यांचा हा इरादा समजल्यावर सरलष्कर वगैरे फितूरी मंडळीनीं सुंदराबाई राणी साहेब यांच्या संमत्तानें त्यांची कन्या येसुबाई साहेब उपवर होती तिला देण्याचा बेत केला होता. परंतु महाराजांचा रुकार न पडल्यामुळें एवढे प्रकरण वाढून एवढा नाश झाला. पेशव्यांसही महाराजांचा तोरा न चालेल ती गोष्ट इष्टच होती. त्या मुळें त्यांनीं ही महाराजांस सल्ला दिली कीं; येसूबाईचें देसाई यांशीं लग्न व्हावें, आणि निपाणकरांनीं महाराजांशीं इतःपर खटला करूं नये असा ठराव व्हावा. तेव्हा निरूपाय होऊन महाराजांनीं रुकार दिला. नंतर शके १७३० सालीं वैशाख शुद्ध पक्षीं लग्नाचा निश्चय करून निपाणकरांस बोलावणें पाठविलें. नेमिल्या मुहूर्ताच्या दिवशीं निपाणकर सर्व फौज व लवाजमा घेऊन करविरास येऊन बाहेर उतरले. मुहूर्ताच्या वेळेस निवडक लोक समागमें घेऊन मोठ्या साशंकित चित्तानें वाड्यात आले आणि लग्न समारंभ ज्येष्ठ माशीं ( सन १८०८ जून ) झाला. इतक्यांत त्यांस कांहीं दगा असल्याची शंका येऊन भोजन न करितां तेव्हाच वरात काढून बाहेर आले, आणि दुसरे दिवशीं निपाणीस निघून गेले. निपाणकरानें सर्व म्हणणें कबूल केल्यावर ही ते सरळपणानें वागले नाहींत, या मु॰ महाराजांस वाईट वाटलें; व देसाई

होईल. परंतु तसें न करावें तर हे उभयतां कर्ते असून त्यांची स-रशी होती, त्यांचें म्हणणें या प्रसंगीं कबूल न केलें, तर ते नाहीं तीं खेकटीं काढून बखेडे करतील. यास्तव त्या उभयतांस बरें आहे असें सांगितलें. नंतर राजाज्ञांस बोलावून आपून सांगितलें, कीं आपला आतां वृद्धाप काळ झाला, या मुळें आपणास सतत एवढा राज्याचा गाडा हाकंण्याची तसदी देणें बरोबर होणार नाहीं. शिवाय दुसरे कारभाराचें काम कसें करितात हें पहाणें अवश्य आहे. आपण आजपर्यंत जो दक्षतेनें कारभार केला, लढाया मारल्या, व प्रसंगास योग्य अशा सल्ला मसलती दिल्या त्याबद्दल आम्हांवर मोठे उपकार आहेत. यास्तव आपण आतां कांहीं कामकाज न पाहतां पूर्वील्या नेमणुकीचा उपभोग घेऊन घरीं स्वस्थ बसावें, अशी आमची इच्छा आहे. पूर्ववत् आपलेकडे तीन मामले चालतील. त्यांतून आपला खर्च भागून जो ऐवज शिल्लक राहील तो सरकारांत जमा करावा. अशी आज्ञा झाल्यावर राजाज्ञ यांणीं काम पहाण्याचें सोडिलें, व सदर **सरनोबत व गायकवाड** शके १७२१ सन १८०९ साली कारभार पाहूं लागले.

पुढें सन १८११ सालीं **येसुबाई** राणी साहेबांची प्रकृति बिघडून सुंदराबाई साहेबांचें लग्न झाल्यावर एकाएकीं राणीसाहेब मृत्यु पावल्या. तेव्हां आचाजीराव निंबाळकर वाठारकर यांची कन्या नेमस्त होऊन महाराजांचा त्या कन्येशीं विवाह झाला.

महाराज सरकारच्या घराण्याशीं केलेला शरीर संबंध व त्यावेळीं झालेला ठराव मनांत न आणितां दुर्बुद्धीनें कांहीं खटले काढून निपाणकरांनीं कोल्हापूर प्रांतास उपद्रव देण्यास पुनरपि सुरुवात केली. निपाणकरापाशीं फौज भारी असून पेशवे व इंग्रज यां मध्यें वसईचा तह झाल्यापासून त्यांचा फौजेस कांहीं काम नाहींसें झालें होतें. त्यास कोल्हापूरचा प्रांत अगदीं लगत होता. या मुळें कांहीं तरी कलागत काढून त्या प्रांतांत आपल्या लोकांस सोडीन. असें ते ल-

ष्कर टोलीप्रमाणें महाराज सरकारच्या मुलखावर येई. निपाणकरयांनी अकेवारचें ठाणे घेऊन सामानगडास वेढा दिला. नंतर जमावानिशी पुनः करवीर शहरावर चालून आले. देसाई नजीक आल्याची बातमी कळतांच महाराजांची स्वारी फौजेची तयारी करून बाहेर पडली. दोन्ही फौजांची केवळ्याच्या माळावर गांठ पडून लढाई झाली. त्या समयीं ही पूर्वीच्या फितूर मंडळींनीं बाजू धरून तोंड काढिलें. या मुळें करवीरच्या फौजेंत गलबल झाली, व लोक कचरले. तेव्हां निपाणकर एकदम चालून येऊन भिडले. कोल्हापूरकरांचा अगदीं मोड झाला. एक हत्ती गोळा लागून मेला. पांच तोफा पाडाव करून नेल्या. सुमारें चारशें माणसें ठार झालीं, आणि सुमारें साराचो लोक पाडाव झाले. या प्रमाणें जय मिळाल्यानर निपाणकर परत गेले, आणि कित्येक ठिकाणीं प्रांतांत त्यांणीं नवीं ठाणीं घातलीं (शके १७३३ सन १८११). याच सालीं सखाराम घाटगे आषाढ शुद्ध १५ रोजीं वारले.

असें वरचेवर निपाणकरांनी कोल्हापूर करांस जर्जर करून सोडिलें. पुणें दरबारची असें करण्यास देसायांस आंतून फूस असल्यावरून देसाई वरवेडा करितात, असें महाराजांस वाटे. परंतु प्रधानांकडून महाराजांस पत्रें येत कीं, देसाई यांस ही दुष्कर्मे करण्यास प्रवृत्त होण्याविषयीं आमची बिलकुल सल्ला नाहीं. त्या वेळीं पुण्याचे ब्रिटिश सरकारचे रेसिडेंट **एलफिंस्टन** साहेब कर्नाटकांतील जहागीरदार व पेशवे यांमधील तक्रारींचा निकाल लावून व्यवस्था करण्यांत गुंतले होते. त्यांजकडे कोल्हापूर करांनीं निपाणकराच्या दुर्वर्तनाविषयीं कळविलें.

सन १७६५ च्या तहा नंतर मालवणचा किल्ला कोल्हापूरकरांस परत दिल्यापासून इंग्रजांच्या व्यापारी लोकांच्या जहाजांस हमेष उपद्रव सुरू होता. तो बंद करण्यास मालवण ताब्यांत घेतल्या शिवाय दुसरा उपाय नव्हता, यास्तव निपाणकरांचा उपद्रव बंद केल्यास महाराज मालवणचा किल्ला देऊन तह करतील असें एलफिंस्टन साहेबांस दिसलें. त्या वरून प्रधानांकडून निपाणकरांस ... त्यास बोलावून नेवून इक-

डील हकीकत विचारली. आतून पेशवे महाराजांस पत्रे लिहीत की, रेसिडेंटाचें म्हणणें बिलकूल ऐकूं नये, व मालवणचा किल्ला देऊं नये. तिकडे रेसिडेंटास कळवीत कीं, कोल्हापूरचें राज्य पेशव्यांच्या पुलरवांतलें असल्यामुळें कंपनी सरकारास त्यांच्याशीं स्वतंत्र तह करितां यणार नाहीं. असे उपंडाव व गवळाटाची पेशव्यांकडून चालली. तेव्हां पंढरपुरीं फौजेसुद्धां जाऊन कर्नाटकांतील पेशव्यांच्या जहागिरदारांविषयीं ठराव केल्यावर, पलटणानिशीं साहेब करविरास येण्यास निघाले आणि सन १८११ साली भाद्रपद वद्यपक्षीं कुरलें मुक्कामीं आले. आणि पुढें कोस मोजावयाचें चाक रवाना केलें.

हें वर्तमान महाराजांस समजल्यावर सर्व कामदार व राजाज्ञ यांस वाड्यांत बोलावून आणून त्यांस महाराज म्हणाले कीं, कंपनी सरकारचा व या सरकारचा पूर्वापार स्नेह असून साहेब पलटणानिशीं आले आहेत, त्यांजबरोबर युद्ध करणें बरोबर नाहीं, व युद्ध करून निभाव ही लागणार नाहीं. आपल्या सरहद्दीवरील निपाणकर आणि वाडीकर यांच्या हमेषा कटकटी चालल्या आहेत. त्यांचा उलगडा पेशवे दरबारांतून होत नाहीं. पटवर्धनांचा ही शिलशिला मधून मधून उद्भवतो. पुणें दरबारचा आम्हांशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं. कंपनी सरकार दिवसें दिवस बळावत चाललें असून अधिकाधिक मुलूख सर करीत आहे, व सर्वांचे उपद्रव बंद करण्यास समर्थ आहे. तर अशा प्रसंगीं कोणता विचार करावा, याजविषयीं आपली सल्ला काय असेल ती सांगावी. असें महाराज बोलल्यानंतर सर्वांनीं विचार केला आणि राजाज्ञ यांणीं सांगितलें कीं, मालवण देऊन कंपनी सरकाराशीं तह करावा, आणि निपाणकर, सावंतवाडीकर वगैरे यांनीं जे किल्ले व प्रांत घेतले आहेत, ते सर्व परत यावे, आणि प्रांतास कोणाचा उपसर्ग न व्हावा व कटकटी ही उत्पन्न होऊं नयेत, असा बंदोबस्त करून घ्यावा. हें म्हणणें महाराजांसही मान्य होऊन त्याचरात्रीं नारायणराव पंडित, दिनकरराव गायकवाड, उदाजीराव घाटगे

महिपतराव गोपाळ पारसनवीस व त्रिंबक आबाजी म्हेसाळ-कर यांजबरोबर सरंजाम वगैरे देऊन अश्वीन शुद्ध ३ चे दिवशीं कुर-लेच्या मुक्कामास साहेबां कडे पाठविले. ते दुसरे दिवशीं तिसऱ्या प्रहरीं जाऊन पोंचले, आणि साहेबांची भेट घेऊन कळविलें कीं, मालवण घेऊ-न तह करून पूर्वापार स्नेह चालत आल्या प्रमाणें पुढें चालवावा, सांव-गांवच्या लढाई नंतर निपाणकर यांणीं जे गांव व हक्क, व चिकोडी आ-णि मनोळी तालुके व प्रांत घेतले आहेत, ते व वाडीकर सावंत यांणीं जे किल्ले घेतले आहेत ते परत यावे, व दुसऱ्या कोणापासून उपसर्ग हो-ऊं नये. त्या विषयीं बंदोबस्त व्हावा, अशी महाराजांची आज्ञा आहे. असें बोलणें पडतांच महाराजांच्या मनोदयानुरूप सर्व बंदोबस्त क-रून देतों. मात्र चिकोडी व मनोळी हे दोन तालुके प्रधाना कडे आहे-त, त्यांची तजवीज पुढें होईल. त्यां बद्दल हल्लीं बोलणें काढूं नये व त्यां बद्दल हक्क हल्लीं सोडावा लागेल. बाकी सर्व बंदोबस्त येथून पुण्यास जा-तांच करून देतों. तह होऊन मालवण स्वाधीन करावें. या प्रमाणें सा-हेबांनीं सांगितल्यावर महाराजांस कळवून त्यांचा रुकार आणविला, आणि मालवण मोकळें करून देण्यास दोन महिने अवकाश पाहिजे असें सांगितलें. नंतर उभयतां कडील बोलणीं चालणीं नेमांत ये-ऊन करविरीं ठरल्या प्रमाणें खालीं लिहिलेला दहा कलमी तहनामा तारीख १ अक्टोबर सन १८१२ इसवी रोजीं झाला, आणि साहेब पल-टणासह परत पुण्यास गेले.

याद करारनामा फिमाबैन सरकार दौलत मदार कंपनी इंग्र-ज बहादूर, व सरकार श्रीमन्महाराज शिव छत्रपति करवीरकर

१ कलम पहिलें:— फिमाबैन सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर व सरकार राव पंडितप्रधान बहादूर एक तर्फ व महारा-ज छत्रपति करवीर कर दुसरे तर्फ यां मध्यें कायम सल्लाह व दोस्ती चा-लेल.

२ कलम दुसरें:— महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व फर्जदा-

नखुद वारसानखुद करार करीत आहेत कीं, चिकोडी व मनोळीवर व दोन्हीही माहालचे तालुक्यांत आजपावेतों दखल आहे त्यावर तमामहक्क व दावा हर्कीसमाचा सोडून देतों व सोडून दिला आहे, व दोन्ही महाल मजकुर आजपासून रावपंडित प्रधान पेशवे बहादूर यांचे तसरुफांत व फर्जदान व वारसान यांचे तसरुफांत पुरतेपणी हुकमतीनें राहतील.

**३ कलम तिसरें:—** कीर्तमाना मुलूख व किल्ले गेल्याचारवर्षांत महाराजांपासून इस्तकबील माहे सपटंबर सन १८०८ इसवी तागाईत आज पावेतों पेशवे बहादूर व त्यांचे सरदार चिकोडी मनोळीचे लढाई सबवेनें घेतगेले व हल्लीं पेशवे बहादूर यांचे फौजेचे तसरुफांत आहे तो मुलूख व किल्ले फिते फौर महाराजांस माघारा दिला जाईल.

**४ कलम चवथें:—** महाराज छत्रपति ऐसा करार करीत आहेत कीं, आणखीं तमामदावा हरएक तऱ्हेचा कीं, राव पंडित प्रधान बहादूर यांजवर व यांचे तसरुफांत जितका मुलूख आहे त्या तमाममुलकावर तसरव करच्या मुलूख जो तिसरे कलमांत लिहिला आहे तो खेरीज करून, तमामदावा सोडून द्यावा व सोडून दिला, व महाराज छत्रपति निपाणीचाही दावा सोडून देत आहेत, व महाराज आणखीं करार करीत आहेत की, पेशवे बहादूर यांचे सरदारान, व वस्तगान, व रयत वगैरे हर दरज्याचा व हर तऱ्हेचा त्यांजवर तमाम दावा हरकिसमाचा सोडून द्यावा व सोडून दिल्हा.

**५ कलम पांचवें:—** नजर यांजवर कीं, महाराज छत्रपति यांचे जिल्ह्यांत लोकां कडून इंग्रजी जहाजांची तारानी जहाली ती बंद करावया करितां महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व फरजदान खुद्द व वारसान खुद्द कायम मुकरर करार करीत आहेत कीं, मालवणचें बंदर, कीं जितकी जमीन किल्ल्याचे गिर्दागिरद आहे त्याचा तपशील.

१ किल्लाव जंजिरा सिंधुदुर्ग उर्फ मालवण.
१ किल्ला पद्मगड.
१ किल्ला राजकोट.
१ किल्ला सरजेकोट.

या चोकिल्यास जितकी जमीन खर्चाची मुकरर असेल ती अखंड रक्षा-
ण्या करितां व पुर्तेपणे हुकमती करितां सरकार इंग्रज बहादूर यांस दि-
ली आहे, तर ज्यावेळेस इंग्रजी फौज येईल त्या वेळेस किल्ला व जमीन व-
गैरे सुद्धां त्यांचे शीपूर्द केली जाईल.

६ **कलम सहावें:—** महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व अज
तर्फ फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं, कोठे ही आरमा-
र अथवा जंगी जहाज हरगीज ठेवणार नाहीं व मालचण वगैरे दिल्यानं-
तर महाराजांचे मुलखांत जितकी बंदरें रहातील अथवा महाराजांचे कब-
जांत कोणी बंदरें येतील त्या बंदरांत जंगी जहाजें अथवा आरमारें तयार
होऊं देणार नाहीं अथवा त्या बंदरांकडे जाऊं देणार नाहीं. आणि महाराज
असा करार करीत आहेत कीं, कंपनीचे जहाजास ऐसा हक्क होईल कीं,
कोणी जहाज बंदर मजरांत येईल अथवा बंदर मजरांतून बाहेर निघेल,
त्याचा झाडा घेत जावा, अगर त्याजमध्यें सामान जंगी निघाले तर इंग्रज
सरकारांत जप्त करावें; आणखी महाराज करार करीत आहेत कीं, हल्लीं
जी बंदरें महाराजांचीं आहेत, व ऐदा तसरुफांत होतील त्या तमाम बंद-
रांवर सरकार इंग्रजांचे तर्फेनें दरोगा राहील, कारणकी तेथील जहाजांचे
वर्तमान दर्याप्त करण्यासाठी, व ऐसा ही करार करीत आहेत कीं, दरो-
गे मजकुरास सदरहू जहाजाचा झाडा घेऊं देत जातील.

७ **कलम सातवें:—** कोणी जहाज कीं, ज्यावर इंग्रजांचे नि-
शाण अथवा इंग्रजी दस्तक असेल किंवा त्यांचे दोस्तांचे ज-
हाज महाराजांचे बंदरांत येईल अथवा आफत असमानीन किंवा दुसऱ्या
सबबेनें महाराजांचे किनाऱ्यास जाऊन लागतें जहालें तर त्याज विषयीं म-
हाराज अजतर्फ खुद्द व फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं,
सदरहू जहाजाची जितकी कुमक होऊं शकेल तितकी करीत जावी. आण-
खी महाराज करार करीत आहेत कीं, कोणत्याही मुलखाचे जहाज आ-
फत असमानीनें किंवा कोणत्याही प्रकारें महाराजांचे मुलखाचे किना-
ऱ्यास येऊन लागल्यास किंवा व्रीकस्त जहाजास महाराजानी व यांनी

त्या जहाजावर कांहीं दावा न करावा.

८ कलम आठवें:— महाराज छत्रपति जर मालवणचें बंदर देतील व जहाजांच्या लुटी महकूब करवितील, तरी या दोनीही शर्तीवर इंग्रजसरकार कौल करार करीत आहेत कीं, जितका मुलूख मालवण दिल्यावर महाराजांचे तसरूफांत राहील त्याजवर कोणीही बाहेरील दौलतदार अथवा सरदार येऊन रवचना करील तर त्याजला दस्त अंदाज करूं देणार नाहीं.

९ कलम नववें:— वरील आठ कलमांच्या शर्ती अमलांत याव्या म्हणून, महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व अजतर्फ फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं, इंग्रजसरकारचा इतल्ला व मसलत घेतल्याशिवाय कोणत्याही परकी दौलतवाल्याशीं कांहीं लढाई झगडा करणार नाहीं. जर करितां महाराजांशीं किंवा त्यांचे फरजदान व वारसान यांशी व परकी दौलतवाल्याशीं तकारीचा मुकदमा इत्तिफाक पडला, तरी इंग्रज सरकारास इतल्ला केला जाईल. आणि सरकार इंग्रज त्याची चौकशी करून त्या तकारीं इनसाफानें मुनासबेनें फैसल्ला करतील, व जो कांहीं इनसाफ सरकार इंग्रज करतील त्याजला महाराज छत्रपति उजूर कबूल करतील, व महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व फरजदान व वारसान खुद्द असा करार करीत आहेत कीं, या तहनाम्याच्या पूर्वीं जो दावा इरकोगतेही परदौलतदाराबरोबर असेल तो दरपेश आणणार नाहीं, व नववे कलमाच्या शर्ती महाराज छत्रपति बजावून न आणतील, तर आठवें कलम रद्द असें समजलें जाईल.

१० कलम दहावें:— महाराज छत्रपतीवर कंपनी सरकारचे जहाजाचे तारानगीचा दावा हिशेब बहुत आहे. परंतु मालूम होतें कीं, महाराजांस मुलकाचे खर्चामुळें हिशेब आदा करावयास तखलीफ फारगुजरेल आणि हें ही कळोन येतें कीं, महाराजांचे चित्तांत असें खास आहे कीं, पुढें गारदगिरी न व्हावी, याजकरितां सरकार दौलतदार कंपनी इंग्रज बहादूर महाराज छत्रपतीचे सरकारावर

जो दावा पेशव्याच्या ठेवीत होते, तो दावा तमाम दरोबस्त हमेशा करि-तां सोडून देत आहे.

एकूण कलमें सुमारें दहा लिहिल्याप्रमाणें करार तारीख छ २४ माहे रमजान, मुक्काम करवीर रुजू महाराजांचें मोर्तब, सदर-हु कलम बमोजीब करार, तारीख ८ माहे अक्टोबर सन १८१२ इसवी. निशाण इंग्रजी मोहोर.

नंतर मालवण मोकळें करून देण्याचा विचार चालला, इतक्यां-त महाराजांस वर्ख होऊन तारखा फारच अतिअवस्थेचा झाला, सबब प-रिणाम नीट नाहीं म्हणून सर्व गडबडले. परंतु थोड्याच दिवसांत उता-र पडून महाराजांस आरोग्य झालें. तेव्हां मालवण मोकळें करून दे-ण्या साठीं राजाज्ञांस आज्ञा करून करविराहून रवाना केले, ते कार्तिक वद्य ७ रोजीं जाऊन मालवणास पोंचले. तेथें गेल्यावर किल्ला मोकळा करून कंपनीकडून आलेल्या कामगारांच्या हवाली करून देण्याचा बे-त करूं लागले. त्या समयीं किल्ल्यावरील लोकांनीं राजाज्ञांस विचारि-लें कीं, आपण किल्ला मोकळा करून कंपनी सरकारांत देणार तर आम-ची वाट काय? तेव्हां त्यांच्या रोजमुऱ्याचा महाराजांच्या मंजुरीनें बंदोब-स्त करून कांहीं लोकांस प्रसिद्धगडास (रांगणा) आणि कांहीं लोकांस भुदरगडास नेमून पाठविलें. किल्ल्यांतील शककर्ते शिवाजी यांच्या सं-स्थानांतील माणसें व खर्च, आणि इकडील चौथाई अंमल कायम ठे-विला. किल्ल्यांतील तोफा, जखीरा वगैरे जंगी सामान बाहेर काढून नेलें, आणि कंपनी कडून आलेल्या लोकांच्या हवाली किल्ला करून पा-वत्या घेतल्या, आणि करविरास निघून गेले.

किल्ला स्वाधीन झाल्याचें समजल्यावर एल्फिस्टन साहेबांनीं अचिसन साहेब यांस पलटणें देऊन वाडी प्रांतांत पाठविलें, आणि त्यांणीं घेतलेले किल्ले परत घेऊन महाराज सरकारास दिले.[*]

---

* याचा उल्लेख तहामध्यें नाहीं; याचें कारण [illegible]मजत नाहीं.

महाराजांच्या पदरीं पुष्कळ पठाणलोक होते. त्यांचा मुख्य सादुल्लाखान हा होता. त्याची तलब फार चढली होती, सबब तो आपली महाराज सरकारांत बाकी येणें आहे, ती यावी म्हणून कारभारी यांजकडे जाऊन नित्य मागणें करूं लागला. तेव्हां नवीन कारभारी गायकवाड व जाधव त्यास सांगत कीं, हा जाबसाल मागील वहिवाटीतला आहे, सबब या विषयीं मागील कारभारी यांस विचारावें. या प्रमाणें कांहीं दिवस गेले; तत्रापि उलगडा होईना. या मुळें पठाण यांणीं विचार केला कीं, खटला केल्याशिवाय सुरळीत जाबसाल उलगडत नाहीं. सबब पठाणांनीं राजाज्ञ व आणखी चारदोन असामी यांस आणून वाड्यात बसविलें, तरी कांहींच निकाल होईना. तेव्हां वाड्याच्या उत्तरेकडील सज्यावरील मजल्यांत त्यास ठेवून खुद्द सादुल्लाखान कांहीं पठाणांस घेऊन खानाच्या मजल्यांत राहिला, व बाकीच्या पठाणास तयारीनें बाहेर उभें केलें, आणि उपोषणें काढीत राहिले. दोन तीन उपोषणें झाल्यावर वरच्या लोकांस खालीं आणवून भोजनास घालावें, आपण भोजन करावें. या खटल्याच्या कारणानें महालाच्या स्वाऱ्यां सहीत महाराजांची स्वारी राजाज्ञांच्या घरीं जाऊन राहिली. या प्रमाणें दीड दोन महिने गेले. नवे कारभारी यांणीं मनांत आणिलें कीं, वाड्यास तोफा लावून पठाणांचा नाश करावा. त्या उद्देशानें तोफा आणून ठेविल्या. हें पठाणांनीं पाहून आतां आपण वांचत नाहीं, आपला नाश होतो असें त्यांच्या मनांत आलें. नंतर वाड्यांतील जाजमें तेलांत भिजवून खांबास गुंडाळलीं, आणखी त्यांवर तेल ओतून आग लाविली. ती जास्त पेटली तेव्हां राजाज्ञ वगैरेस घेऊन पठाण हुजूर पागेंत जाऊन राहिले. तेव्हां शहर लुटतात किंवा गर्दी करून खराबी करितात कीं काय याची भीति लोकांच्या मनांत उत्पन्न होऊन शहरांत जिकडे तिकडे गडबड झाली. परंतु शहरास उपद्रव न देतां ते स्वस्थ होते. या थरास गोष्ट आली तेव्हां आतां काय नुकसान होईल हें समजत नाहीं, आणि अग्नी पसरून प्रळय झालानर दुर्लौकिकास कारण हो-

ईल. यास्तव यांची कांहीं तोड काढणें भाग आहे. केवळ नव्या कारखान्यां-
च्या नादास लागून उपयोगी नाहीं, असें मनांत आणून कंपनी सरकारचे
वकील **कृष्णाराव** होते त्यास बोलावून त्यांच्या विद्यमानें पठाणांच्या
बाकीची तोड ठरविली, आणि ठरल्या ऐवजाची रखाली श्रीस्वामी जगद्गु-
रु यांनी देऊन पठाणास वारणे पार घालवून दिलें. आणि रत्नाकरपंत
राजाज्ञासमोकळे करून आणिलें. महाराजांचें दर्शन घेऊन डोंगरास जा-
ण्याचा निरोप मागितला व तो घेऊन ते डोंगरावर जाऊन राहिले. वा-
ड्य पेटविला होता तो लागलाच विझविला. तथापि कांहीं भाग जळून खा-
क झाला, व बरेच कागदपत्र ही अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडले, व ते-
णें करून मोठी नुकसानी झाली.

या प्रमाणें जिकडे तिकडे थावराथावर झाल्यानंतर तहनाम्या-
च्या वेळीं जे जाबसाल ठरले होते त्या पैकीं कित्येकांचा उलगडा होणें
राहिला होता, ते उलगडून घेण्यासाठीं एलफिस्टन साहेबांकडे **श्री
भाऊमहाराज** व **दिनकरराव** गायकवाड यांस पुण्यास पाठ-
विलें. त्यांनीं पुण्यास जाऊन साहेबांची भेट घेतली, आणि करारां-
तील कांहीं जाबसाल उलगडणें राहिले आहेत ते उलगडून द्यावे,
अशी विनंति केली. तेव्हां साहेबांनीं प्रधानांकडे सांगून पाठवून ए-
क दोन गांव सोडून देण्या विषयीं ताकिदी आणून दिल्या. त्या
कारविरा पाठविल्या व त्या प्रमाणें गांव स्वाधीन करून घेतले.

सर्वांस उदक विपुल व्हावें या हेतूनें पद्मालें तलाव बांधून वि-
स्तीर्ण करावा, म्हणजे त्यांत पाणी जास्त सांठून सर्वांस सुख होईल,
असा विचार करून तलाव वाढविण्याचें काम आरंभिलें, व काम पहा-
ण्या करितां स्वारी वरचेवर जात असे. काम पाहून आल्यानंतर एके दि-
वशीं महाराजास अतिशय ज्वर आला. मागें वळाचें दुखणें झालें हो-
तें त्या वेळीं अपथ्य न करण्याविषयीं वैद्यांनीं सांगितलें होतें, पण क-
र्मवशात् जे जिन्नस वर्ज होते तेच खाण्याची इच्छा होऊन महाराजा-
नीं ज्वर असतां खाल्ले तेणें करून प्रकृत दिवसें दिवस अधिकच बि-

घडूं लागली. पुढें उतार न पडतां यांतच परिणाम होणार असें महाराजांसही वाटलें. जवळजे नवशिके कारभारी होते, त्यांची योग्यता महाराजांस समजत होती, व त्यांवर तितका त्यांचा विश्वास नव्हता. यास्तव महाराजांनीं राजाज्ञांस बोलावणें पाठवून डोंगराहून आणविलें. ते येतांच महाराजांच्या दर्शनास गेले. राजाज्ञ येतांच सर्वांस बाहेर काढून त्यांस जवळ बसवून घेतलें, आणि बोलले कीं, पुढें विचार नीट दिसत नाहीं; या दुखण्यांतच आमचा परिणाम होणार; उभयतां चिरंजीव वयानें लहान आहेत; चिकोडी व मनोळी तालुके निपाणकरांनीं घेतले असून ते शत्रु सन्निध आहेत. यास्तव कोणत्या समयीं काय अपाय होईल याचा नेम नाहीं. या करितां तुम्हांस आणविलें आहे. तर किल्लेकोटाचा बंदोबस्त करून सरंजामी व शिलेदार यांस करवीरीं आणवून हुषारीनें बंदोबस्त ठेवावा. स्वारी तुळजापुरास श्रीच्या दर्शनास जाणार. राजाज्ञ बाहेर जाण्यापूर्वीं सुंदराबाई राणीसाहेबांस बोलावून आणून सांगितलें कीं, राजाज्ञांस सर्व मजकूर सांगितला आहे. उभयतां चिरंजीव लहान आहेत, यास्तव पदरच्या जुन्या माणसांस अंतर न देतां व कोणाच्याही सांगण्यावर त्यांजविषयीं विकल्प न आणितां त्यांचा सांभाळ करावा; आबासाहेबा पेक्षां बाबासाहेबावर सापत्नभाव मनीं न आणितां विशेष लोभ करावा. त्या वरून बाईनीं आज्ञेप्रमाणें करीन म्हणून सांगितलें. नंतर राजाज्ञ बाहेर आले आणि बापूवैद्य बहिरेश्वरकर यास, महाराज यांतून पार पडतील कीं, नाहीं? म्हणून विचारिलें. तेव्हां त्याणीही सांगितलें कीं, महाराज यांतून पार पडावयाचे नाहींत. असें वैद्याचें मत पडल्यावर राजाज्ञ यांणीं किल्लेकोटाचा बंदोबस्त ठेवून हुषारीनें रहाण्याविषयीं आज्ञापत्रें पाठविलीं, तसेंच प्रतिनिधि अमात्य वगैरे सरदारांस करवीरीं जलद निघून येण्या विषयीं आज्ञापत्रें रवाना केलीं. त्या प्रमाणें जवळची कांहीं मंडळी आली. कांहीं ता[illegible] पल्ल्यावरील येणेची होती. चैत्रवद्य

अष्टमी भृगुवारीं ( तारीख २४ माहे एप्रिल सन १८१२ ) प्रातःकाळीं वैद्यांनीं वाड्यांत येऊन महाराजांची प्रकृति पाहून राजाज्ञ वगैरे सर्वांस सांगितलें; कीं आजचा दिवस कठीण आहे. सबब सर्वांनीं भोजन करून वाड्यांत येऊन हजर असावें. त्या प्रमाणें सर्व आपल्या घरीं जाऊन भोजनें आटपून वाड्यांत आले. तिसरे प्रहरीं महाराजांनीं राजाज्ञांस जवळ बोलावून सांगितलें, कीं आसन घालून त्यावर आपणास निजवावें; आणि भागिरथी व तुळशी मुखांत घालाव्या. त्या अन्वयें राजाज्ञ यांणीं करविलें, आणि प्रायश्चित्तादि दानधर्म झाला, व गोप्रदानें देवविलीं, व ब्राम्हणांचे चरणाचीं तीर्थें ही दिलीं, व नाम स्मरण चाललें. इतक्यांत श्री बाबा महाराज व हैबतराव गाईकवाड यांणीं दुर्बुद्धीनें अशा समयांत एल्फिस्टन साहेबांकडे थैली पाठविण्याचा मसुदा करविला; त्यांतील मतलब असा कीं, महाराजसरकारची कदीम दोस्ती, यास्तव कंपनी सरकारच्या मांडीवर उसें ठेविलें आहे, तर सर्वोपरी चिरंजिवांस मदत करून राज्य न [illegible] करावी. या प्रमाणें थैली तयार करवून त्या क्षणीं रवाना केली. [illegible] महाराजांनीं सायंकाळीं तीन घटका दिवसास "श्रीराम श[illegible]सरग[illegible] श्रीच्या देवघरानजीक" कैलास वास केला. त्या सरसा वाड्यांत व शहरांत एकच गर्दी होऊन हाहा कार झाला.

महाराजांनीं देह ठेविल्यावर राजाज्ञ यांणीं लोक पाठवून शहरचे दरवाजे बंद करविले, आणि शहरचा व पेठांचा बंदोबस्त करविला. तसेंच वाड्यांतील जामदार खाना व इतर कारखानें यांचा बंदोबस्त आपले चिरंजीव व पुतणे यांस ठेवून केला, व सर्व कुलपांच्या किल्ल्या आणवून आपल्याजवळ घेतल्या. नंतर उभयतां महाराज व महालच्या स्वाऱ्या प्रेता सन्निध असल्यानें फार आकांत होतो असें पाहून स्वाऱ्यांस दुसऱ्या चौकांत पाठव्या केल्या. नंतर महाराजांच्या प्रेतास पोषाख घालून सदरेवर [illegible] ठेविलें आणि चाली प्रमाणें पुढें नाच उभा केला. इतक्यांत बाबा महाराज व हैबतराव गाई-

कवाड यांणीं पुण्यास साहेबांकडे दुसरी थैली पाठविण्याचा मसुदा तयार केला. त्यांतील मतलब कीं, शिवाजी महाराज कैलासवासी झाले; पुढें राज्यवृद्धिविषयीं मदत व्हावी. तेथें वकिलीच्या कामावर श्रीभाऊमहाराज व दिनकरराव गाईकवाड आहेत; येथें कारभाराचे कामावर श्रीबाबामहाराज व हैबतराव गाईकवाड आहेत. या प्रमाणें मजकुराची थैली तयार करवून सांडणी स्वाराबरोबर रवाना केली. या दोनही थैल्या उभयतांनीं राजाज्ञास न विचारितां व त्या प्रकरणीं त्यांस न कळवितां पाठविल्या. तथापि त्या विषयीं त्यांणीं मनांत कांहीं विषम न आणितां कैलासवासी महाराजांनीं अंतकाळीं आज्ञा केली त्या प्रमाणें काम बजावून महाराजांचे सार्थक करण्यांत ते मग्न होते. या वरून त्या पुरुषाचें मन किती थोर व पोक्त होतें याची कल्पना सहज होईल.

श्रीबाबामहाराजांनीं राजाज्ञांस सांगून पाठविलें कीं, छत्रपति महाराजांचें सार्थक श्रीबावामहाराजांचे देवालया नजीक पश्चिमेस करावें. यांतील मतलब असा कीं, येणें करून सरकारी खर्चांतून आपलाही खर्च चालेल. परंतु राजाज्ञ यांनीं विचार केला कीं, तिकडे सार्थक केलें असता पृथक खर्च ठेवणें प्राप्त येईल. कैलासवासी शंभु छत्रपति यांच्या देवालयाच्या दक्षिणेस जागा आहे, त्या ठिकाणीं सार्थक केलें असतां तेथें चौघडा वगैरे खर्च पूर्वींचा आहेच. थोडा जास्त खर्च ठेविला म्हणजे दोही कडील खर्च एकदरींतून भागेल. असें मनात आणून दोनही प्रकार आईसाहेबांस कळविले. त्यांस्याही विचारास राजाज्ञांचें म्हणणें पसंत पडलें, आणि शंभु छत्रपतिच्या देवालयाजवळ सार्थक करण्याची तयारी करविली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं (मंदवारीं) शहरांत आबासाहेब महाराजांची दुराई फिरविली. नंतर विजापूर दरवाजा उघडून स्वार, शिबंदी, हत्ती, घोडे, लोक वगैरे आंत घेऊन स्वारी नेणेची सिद्धता केली. नंतर महाराजांस स्नान घालून रो[illegible]व घातला. नंतर महाराजांच्या स्वाऱ्या

आणून दर्शन करवून अंत पावत्या केल्या. मग महाराजांस शिबिकेत बसवून सर्व लवाजम्यासह स्वारी निघाली. त्या वेळीं तोफा उडविल्या. उभयतां महाराज हुजऱ्यांच्या कडेवर बरावर होते. मागें पुढें सरदार, कामदार, मानकरी वगैरे राजाज्ञांच्या ताकिदी प्रमाणें तफावतीनें चालले होते. कोणी जवळ येऊन महाराजांचें दर्शन घेण्याची अपेक्षा दर्शविल्यास त्यास शिबिकेजवळ येण्यास देत. या प्रमाणें स्वारी गंगादरवाजाच्या बाहेर गेली. वेशी बाहेर जातांच पुनः तोफा झाल्या. दोहों बाजूंस सर्व शहरची माणसें तटस्थ पहात उभी होतीं. महाराजांनीं पुष्कळ वर्षे राज्य केलें असल्यानें व महाराजांचा स्वभाव मोठा उदार, दयाळू व ममताळू असल्यामुळें सर्व लहान थोरांस त्यांची माहिती होती. यास्तव सर्व दुःखी होऊन शोक करीत होते, अशा प्रकारें स्वारी गंगेवर पोंचल्यावर श्री शंकराचार्य व श्रीबाबा महाराज यांच्या समाधीस सव्य प्रदक्षिणा घालून तारकेश्वरानजीक गंगेंत शिबिका उतरली. तेथें प्रेतास गंगेंत स्नान घालून कर्मास आरंभ झाला.

ह्या विधि गंगेवर चालला आहे त्या समयीं कंपनी सरकारचे अखबरनवीस स्वामींच्या मठांत असत ते झाल्या मजकुराची अखबर लिहीत होते. त्यांच्या मार्फत नवीन कारभाऱ्यांनीं थैल्या पाठविल्या नव्हत्या व त्यांस ही कळविलें नव्हतें. यास्तव त्यांनीं अखबरनवीसांकडे पारसनवीस यांस पाठवून थैल्या पाठविल्याचा मजकूर कळविला. आणि हा मजकूर थैल्या पोंचण्या पूर्वी साहेबांस कळावया विषयीं जी तजवीज करणें ती करावी अशी विनंति केली; तेव्हां त्यांणीं तेथें इकडील वकिलापाशीं **सरूपजी क्षीरसागर** हुजरे होते त्यांच्या नांवें कारभारी यांचे साहेबांस थैल्या पाठविल्याचा मजकूर कळविण्या विषयीं पत्र घेऊन तें आपल्या डाकेंतून रवाना केलें.

गंगेवरील कर्म आटपून महाराजांचें प्रेत चितेवर ठेवते वेळीं राजाज्ञा यांणीं महाराजांचें शेवटचें दर्शन घेऊन चरणावर मस्तक ठेविलें, आणि फार श्रमी होऊन नेत्रांतून घळघळां अश्रु टाकिले. नंतर अग्नि दि-

ला, त्या बरोबर आणखी तोफांचे बार झाले. दहन आटपल्यावर ति-
सऱ्या प्रहरीं उभयतां महाराजांच्या स्वाऱ्यांसह सर्व लोक शहरांत आले.
तिसरे दिवशीं श्रीकृष्णेस पाठविण्या साठीं रक्षा* भरविली व रवाना के-
ली.

पुण्यास थैल्या पोंचण्याच्या पूर्वीं डांक जाऊन पोंचली. क्षीर सा-
गर यांस खरबोटा पावतांच साहेबांकडे जाऊन झालेला मजकूर कळविला.
अखबारनवीसां कडून यथा तथ्य हकीकतीची अखबर अलाहिदा गेलीच
होती. डांके नंतर दोन दिवसांनीं थैल्या पोंचल्या त्या भाऊ महाराज व दि-
नकरराव गाईकवाड यांणीं साहेबांकडे गुजरल्या आणि महाराजांनीं
कैलासवास केल्याचा मजकूर विदीत केला. त्या वरून साहेबांस ही वा-
ईट वाटलें. परंतु उभयतांशीं कांहीं भाषण केलें नाहीं. दुःख प्रदर्शक
पत्र चारी नांवें गाळून पाठविलें, व दुखोटयास दोन शालजोड्याही पाठ-
विल्या, त्या अखबारनवीसांकडे अकरावे दिवशीं आल्या, व त्यांणीं री-
ती प्रमाणें शालजोड्या वाड्यांत उभयतां **महाराज व राणी
साहेब** यांजकडे राजाज्ञांच्या मार्फत गुजरल्या.

इकडे महाराजांची नित्यक्रिया चालली होती. नऊ दिवस विधि
झाल्यावर दहावे दिवशीं तिळांजळी देण्यास सर्व गंगेवर गेले तिळांज-
ळी देऊन पिंड ठेवितांच काक स्पर्श झाला. अकरावे दिवशीं गज, अ-
श्व, रथ, शय्या वगैरे दानें यथा सांग दिलीं. बाराव्या दिवशीं सपिंडी
झाली. तेराव्या दिवशीं माशिक निवृत्ति झाली. हा वेळ पर्यंत कैला-
स वासी महाराजांच्या आज्ञे प्रमाणें सर्व बंदोबस्त ठेवून राजाज्ञ यांणीं
कारभार चालविला. सापत्न विचारांत कलहास आरंभ होणार, सबब
कामांत असणें चांगलें नाहीं, असा विचार करून तेरावे दिवशीं साय-
काळीं राजाज्ञ आईसाहेबां पाशीं गेले, आणि जामदारखाना व इतर का-

---

* "रक्षा भरतांना महाराजांच्या [illegible]ंगावरील शालजोडीचा पोटावरील सबंद तुकडा अ-
ग्निस्पर्श न होतां निघाला; त्यावरून स[illegible] आश्चर्य करून महाराज पुण्यवंत असें मानिलें"
असा लेख आढळतो

रखानें त्यांच्या किल्ल्या पुढें ठेवून पायांवर मस्तक ठेविलें, आणि महाराजांचे आज्ञेप्रमाणें सार्थक झालें, आतां आम्ही घरीं जातों म्हणून विनंती करून निरोप घेऊन गेले. चवदाव्या दिवशीं यथा पद्धति प्रमाणें अन्नशांति झाली.

राजाज्ञ यांणीं कारभारांतून हात काढतांच पहिल्याच दिवशीं नवीन कारभाऱ्यांनीं कलहाचें बीज पेरिलें. शिवाजी महाराजांनीं उभयतां महाराजांस जवळ घेऊन त्यांजकडून सर्वांस विडे देवविण्याची चाल ठेविली होती; **श्रीबाबामहाराज** व **हैबतराव** गायकवाड यांणीं सापत्नपणाचा भाव मनांत आणून बाबासाहेब महाराजांस सुख झाल्यावर त्यांस न कळवितां, रात्रौ कचेरी करून **आबासाहेब** महाराजांकडून सर्वांस विडे देववावे अशी मसलत केली, आणि आईसाहेबांस कळवून त्यांचा ही रुकार घेतला. त्या अन्वयें रात्रौ कचेरीची तयारी करवून सांप्रदायाप्रमाणें नजरा व सलके होऊन विडे देवविले व किल्लेकोटांस आज्ञापत्रेंही पाठविलीं. दुसऱ्या दिवशीं **बाबा**साहेब महाराजांची मातोश्री **कमळजा** बाईसाहेब यांस रात्रौ झालेला प्रकार समजतांच देवघरांत येऊन त्यांणीं आकांत मांडिला. नंतर राजाज्ञास बोलावून आणून सांगितलें, कीं रात्रौ झालेला मजकूर आपणास कळलाच असेल. तुम्ही तर पहिल्या पासून माहितगार आहां. झाली ती गोष्ट विपरीत झाली, अशा गोष्टी पुढें ही होणार त्यास तुमचा उपाय नाहीं. आतां आपण आईसाहेबांकडे जाऊन त्यांस चार बुद्धि वादाच्या गोष्टी सांगून खर्चाचा बंदोबस्त करून चिरंजिवांसह आमची यात्रेस रवानगी करून द्यावी. येथें गाईकवाड वगैरेंच्या आकसांत रहाणें योग्य नाहीं. कोणत्यावेळीं काय अपाय करतील आणि कांहीं तरी दुर्निमित्त ठेवून काय वदलौकिक करतील याचा नेम नाहीं, यास्तव हें तुमच्या हातून होत असल्यास करावें. नाहीं पेक्षां पुण्यास साहेबांकडे पत्र पाठवावें. त्यांच्या स्वाधीन चिरंजिवांस केलें आहे. ते सांगतील तसें करतां येईल. अशी आज्ञा झाल्यावर राजाज्ञ आईसाहेबांकडे गेले, आणि सांगितलें, कीं, एखाद्या अल्पबुद्धीच्या माणसाची गोष्ट ऐकून दौलत । अपाय करून घेणें अप्रशस्त

आहे. महाराजांनीं जरी आज्ञा केली, आणि ज्यांचें जसें चालविलें तसेंच चालवावें, हें योग्य असें आम्हांस वाटतें. या उपर साहेबांची मर्जी म्हणून विनंति केली. तेव्हां आई साहेबांनीं झाली ती गोष्ट गैर झाली, असें कबूल करून उभयतां चिरंजिवांस देवघरात कमळजाबाई साहेबांपाशीं घेऊन गेल्या आणि झालें त्यांत आमची चूक झाली, इतःपर असें होणार नाहीं; महाराजांनीं जसें चालविलें त्याहून अधिक चालवूं. यांत किमपि अंतर करणार नाहीं, असें सांगून श्रीची शपथ केली; तथापि बाईची समजूत पडली नाहीं, त्या बोलल्या कीं झालें तें झालें. आपण आग्रह करूं नये. आपल्याकडे झाल्याचा दोष कांहीं नाहीं. आपल्याजवळची मंडळी आमच्या नाशास उद्युक्त आहेत. तेव्हां त्यांच्या सांगण्यावरून आपल्या मनांत काय येईल याचा नेम नाहीं. वरचेवर करकरी उत्पन्न होणार. यास्तव येथें रहाणें ठीक नाहीं. माझी चिरंजिवासह रवानगी करून द्यावी. हें वडिलांसही विहीत व निर्वेध होणार आहे. हें बोलणें ऐकून आईसाहेब अत्यंत खिन्न झाल्या. बाहेरही गलबल झाली. भोजनें नाहींत. तेव्हां आबासाहेबांनीं आईसाहेबांचे घट्ट पाय धरून पायांवर मस्तक ठेविलें आणि बोलले कीं, आपण ज्या अन्वयें सांगाल त्या प्रमाणें करीन. झालें तें गैर समजुतीनें झालें, ती चूक झाली. इतःपर असें व्हावयाचें नाहीं, असें सांगून श्रीची, महाराजांची व आईसाहेबांची शपथ दिली. तरी मर्जी शांत होईना. त्या समयीं राजाज्ञ यांनीं बहुतप्रकारें बोध केला, आणि क्षमा करून सर्व राग शांत करावा, आणि आईसाहेब व महाराज सांगतात तें ऐकावें; पुढें आपण सांगाल तसें ते ऐकतील, अमान्य करणार नाहींत अशी विनंति केली. तेव्हां मर्जी किंचित् शांत झाली. नंतर आबासाहेबांनीं त्यांस हातीं धरून चौकांत नेलें. मग सर्वांचीं एके ठिकाणीं ताटें झालीं. आणि दरकूड मंडळीही आपापल्या घरीं भोजनास गेली. दुसऱ्या दिवशीं राजाज्ञही निरोप घेऊन श्रीच्या दर्शनास डोंगरास गेले.

---

# पुरवणी.

## पत्रें यादी वगैरे

### नंबर १.

कानूजाबता राज्याभिषेक शके १ आनंदनाम संवत्सरे, ज्येष्ठ वद्य १३ भौमवासरे.

(१) **मुख्यप्रधान** यांणीं सर्व राज्यकार्य करावें. राजपत्रावरी शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग स्वारी करावी, व तालुका तालुका विल्हे स्वाधीन होईल त्याचा (तो) रक्षून बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें. सर्व सरदार व सेना यांणीं यांजबरोबर जावें. त्यांणीं सर्वां सम्मतें चालावें. येणें प्रमाणें कलम १.

(२) **सेनापति** यांनीं सर्व सैन्य रक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेने वर्तावें. फौजेच्या लोकांचें बोलणें बोलावें; सर्व फौजेचे सरदार यांणीं त्यांजबरोबर चालावें. कलम १.

(३) **अमात्य** यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दफ्तरदार फडणीस यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडणिशी, चिटणिशी, पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे, तालुका जतन करून आज्ञेंत चालावें. कलम १.

(४) **पंडितराव** यांणीं सर्व धर्माधिकार धर्म अधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त पत्रें होतील त्यांजवर सम्मत-चिन्ह करावें. दान, प्रसंगशांति, अनुष्ठान तात्काळ करावें. कलम १

(५). **सचीव** यांणीं राजपत्रें शोध करून अधिक उणे अक्षर, मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करावा. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेंत वर्तावें, राजपत्रावर चिन्ह [illegible]त करावें. कलम १.

(६) न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय अन्याय म-नास आणून बहुत धर्में करून न्याय करावे. न्यायाची निवाडेपत्रें यांजव-र समत चिन्ह करावें. कलम १.

(७). मंत्री यांणीं सर्व मंत्र विचार, राजकारणें, यांतील सावधतेनें विचार करावे. आमंत्रण, वाकनिशी, त्यांचे स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत चिन्ह करावें. कलम. १.

(८) सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा, त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे, युद्धादि प्रसंग करावे, राजपत्रां-वर समत चिन्ह करावें. कलम १.

(९). चिटणीस यांणीं सर्वराज्यांतील राजपत्रें लिहावीं, राजकारण पत्रें व उत्तरें लिहावीं. आणखी दानपत्रें वगैरे माहली हु-कमी यांचा जाबता, फडणिशी अलाहिदा, त्या प्रमाणें लिहावीं. हात-रोखे नाजुक पत्रें यांजवर मोर्तब, अथवा खास दस्तक मात्र वरकडांचा दाखला चिन्ह नाहीं; चिटणीसानींच करावें. कलम १.

(१०). फौजेचे सबनीस बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. याद करून समजवावें, रोजमुरा वांटावा, सत्कार क-रावा, युद्धादि प्रसंग करावे. कलम १.

(११). किल्ले, कोट, गणी, जंजिरे येथील कायदे करून दिले त्या प्रमाणें हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, सरनोबत, तट सरनोबत लोक यांचे जाबते करून दिले, त्या प्रमाणें चालून सावधतेनें स्थळें रक्षावीत. तगीरीबहाली हुजुरून व्हावी. बेजमी नेमणूक तालुके-दार यांजकडे, दरवाजा किल्ला हवालदार यांचा हुकूम. शिक्के त्यांचे नांवचे कारखाननिशी, सबनिशी जाबता अलाहिदा असे. कलम १.

(१२). सेनाधुरंधर यांणीं बिनी करावी, आघाडीस जावें. फडफर्मास जमा करावी. लूट करणें, मना करणें, चौकशी ताकीद त्यां-जकडे. पुढें असून सेना र[illegible]ण करावी. कलम १.

(१३). सुभे, मामले, तालुकेदार यांस, त्यांजकडे नेमले, त्यांणीं जाबते प्रमाणें चालावें. हुजूरचे दरखदार चिटणीस, फडणीस, मुजूमदार यांचे इतल्यानें चालून हिशेब गुजरावे. कलम १.

(१४). बारा महालचे अधिकारी यांणीं आपापलें काम दुरुस्त राखून हिशेब आकारून दफ्तरांत गुजरावें. कलम १.

(१५). अठरा कारखान्याचे अधिकारी यांणीं खासगीचे अधिकारी यांचे इतल्यांत चालून दफ्तरीं हिशेब गुजरावे. कलम १.

(१६). दरुणी महालचें कामकाज दिवाण नेमून दिले त्यांणीं सर्व पाहून करावें. चिटणीस, फडणीस, यांणीं आपापले दरखाचे कागद पत्र लिहितजावे. त्याजवर निशाणचिन्ह दिवाणांनीं करून वत्यास समजून मोर्तब समक्ष करावें. कलम १.

(१७). पोतनीस यांणीं पोतें जमाखर्च लिहिणें करावें. नजर दशाकशी जमा करावी. पोतदार यांणीं पारख करावी कलम १.

(१८) अबदारखाना चिटणीस यांजकडे, सरफखानासुद्धां अधिकार सांगितला. मजालसी विडे, अत्तरगुलाब व हारतुरे, फळफळावळ खुषबाई खरदी जमाखर्च यांणीं करून हिशेब दफ्तरीं गुजरावा. कलम १.

(१९) पागा जुमेलदार, सरदार यांणीं कैद करून दिली, त्याप्रमाणें चालून, सेनापति व प्रधान यांच्या समागमें कामकाजें करावीं कलम १.

अष्टप्रधान यांजकडे पेटे व तालुके, व स्वारीस जाणें, यास दरखदार सर्व हुजूरचे नांवें त्यांचे दारखल्यांनीं व्यवहार करावा. स्वारीस जावें, त्यास मुतालीक करून दिले त्यांणीं सर्व व्यवहार चालवावा. हुजूर रहावें. कलम १.

एकूण कलमें वीस

मोर्तब.

## नंबर २

* यादि युवराज अष्टप्रधान पद द्यावयाच्या समयीं वस्त्रें वगैरे, शाके राज्याभिषेक ४५, विलंबी नाम संवत्सरे. सुरुसन तिस्सा अशार मय्याव अल्लफ

१ युवराज यांस.

१ वस्त्रें पांच भरगच्ची.

१ मंदील, १ चादर, १ परटका, १ किनखापपान, १ महंमुदीपान. ५

१ दागिनें.

१ शिरपेंच, १ कंठी मोत्यांची, १ चौकडा, १ मोत्यांचा तुरा, १ जगा. ५

१ किता.

१ शिक्केकटार, १ चौघडा, १ हत्ती, १ चवरी सोन्याच्या दांडीची, १ ढालतरवार, १ जरिपटका, १ घोडा, १ चोपदार. ८

३

१

कलम

१ प्रतिनिधि यास युवराज अन्वयें.

१ सेनापति यांस सदरहू अन्वयें.

१ पंत अमात्य यांस.

१ वस्त्रें.

१ मंदील, १ चादर, १ किनखापपान, १ महंमुदीपान. ४ सनगें

१ दागिनें.

१ चौकडा, १ तुरामोत्यांचा, १ कंठीमोत्यांची १ शिरपेंच. ४ दागिनें.

---

* पूर्वीची वहिवाट समजावी यास्तव ही यादि दिली आहे.

१ कित्ता.

१ शिक्केकटार, १ चवरी सोन्याच्या दांडीची, १ ढाल-तरवार, १ हत्ती, १ घोडा, १ रुप्याच्या दांडीचें कलमदान ७॥ कलम.

१ पंत सचीव यांस पंत अमात्या प्रमाणें.

१ पंत सुमंत यांस सदरहू अन्वयें.

१ पंत मंत्री यास सदरहू प्रमाणें.

१ पंडितराव यांस सदरहू अन्वयें ढालतरवार खेरीज करून.

१ पंत न्यायाधीश यांस पंतसुमंत मत्री अन्वयें.

१ पंत राजाज्ञा यांस सदरहू अन्वयें.

१०

१ उपप्रधान यांस वस्त्रें साडेतीन. ३॥

१ निमर, १ दुपेटा. ॥ किनखाप, १ महमुदीपान.

७ सदरहू प्रमाणें अष्टउपप्रधान यांस वस्त्रें द्यावयाचीं.

१ चिटणवीस यांस वस्त्रें.

१ मंदील, १ झगा, १ विजार - दुपेटाकुमजन. एकूण.

१ दागिनें.

१ कंठीमोत्यांची, १ चौकडा, १ शिरपेंच. एकूण.

१ कित्ता.

१ कलमदान रुप्याच्या पत्र्याचें, १ चवरी रुप्याच्या दांडीची, १ घोडा.

२ ७ कलम.

१ फडणीस यांस वस्त्रें साडेतीन - कलमदान १ रुप्याच्यादांडीचें.

१ पोद्दार यास वस्त्रें साडेतीन - कलमदान १ रुप्याच्यादांडीचें.

१४

येणें प्रमाणें राज्याभिषेक समयीं शककर्ते महाराज यांणीं वस्त्रें वगैरे सन्मा-

न दिला असे. छ २९ साबान.

## नंबर २

तहनामा* राजश्री खेमसावंत व लखमसावंत देसाई बहादूर प्रांत कुडाळ यांजकडील पितांबर शेणवी कारभारी येऊन ठराव करून दिल्हा. सुरुसन तिस्सा खमसेन अल्लुफ. इ.स. १६५८ फसली १०६८.

प्रांत मजकूरचे महाल वगैरेचा ऐवज निम्मा हुजूर पावता करावा, निम्मा आकार राहिला त्यांत तीनहजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे. व ज्या समयीं हुजूर चाकरीस बोलाविले जाईल तेव्हां तीन हजार लोकांनिशीं सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल तेव्हां येत असावें. कलम १

किल्ले फोंडे प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक गरबीत जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास स्वारी होईल त्याच्या कुमकेस जात असावें. कलम. १

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलास पाशीं मध्यें राहून तुरुक लोकांचें साधन करावें. कलम १.

प्रांतांतील जमाबंदीच्या चौकशीस हुजुरून कारकून व लोक रहातील. ते ठेवून त्यांच्या नेमणुकी बद्दल हुजूर अमलापैकीं पावते करावे. कलम १.

प्रांत मजकूरचें देशकत वतन तुमचें व बहादूर किताब अजरामर चालेल. त्यांतील किल्ले कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत तेथें दास्तान करून जतन करावी. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. कलम १.

---

* हा तहनामा थोरले शिवाजी महाराज यांच्या कारकीर्दीतील आहे. यावेळीं विजापूरचा अमल असतां त्यांच्या पदरचे वाडीकर शिवाजीशीं सख्य करण्याविषयीं किती उत्सुक झाले होते हें स्पष्टपणें दिसून येते.

शके १५८० विळंबी नाम संवत्सरे फाल्गून वद्य ७. एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे. इ. स. १६५८.

"मोर्तब"

---

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांस प्रति राजश्री शाहूराजे यांणीं लिहून दिला. सुरूसन सीत अशरीन मय्याव अलुफ ५ माहे रबिलाखर ऊर्फ पौष शुद्ध ७ गुरुवार विश्वावसु नाम संवत्सरे. मितपशील. (इ. स. १७२५)..

अहद श्रीकृष्णा धोम महाबळेश्वर पासून दक्षिण तीर तहत् निवृत्ति संगम पर्यंत कुल दुतर्फा मुलूख दरोबस्त ठाणीं व किल्ले तुम्हांस दिले असत. कलम १.

श्री सावित्री नदी उगमा पासून तहत् समुद्र गामिनी पर्यंत दक्षिण तीर जंजिरा कोट किल्ले सुद्धां व ठाणीं दरोबस्त महाल अकोले पर्यंत तुम्हांस दिले असत. कलम १.

मिरजप्रांत व विजापूर प्रांतींची ठाणीं देखील अथणी, तासगांव वगैरे तुम्हीं आमच्या स्वाधीन करावे. कलम १.

इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नये, व तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नयेत. कलम १.

तुंगभद्रा दक्षिणतिरा पासून श्रीकृष्णा समुद्रगामिनी व श्रीरामेश्वर देखील संस्थानें निम्मीं आम्हांकडे व निम्मीं तुम्हांकडे करार करून दिली असत. कलम १.

मोंगलाईतील वगैरे उत्तरेकडील मुलूख सुटेल त्यांतील निम्मे प्रांत तुम्हांस देऊं व तुम्हांकडून सुटला असता निम्मा प्रांत आम्हास द्यावा. कलम १.

तुम्हांशीं जे वैर करतील त्यांचे पारिपत्य आम्हीं करावें व आम्हांशीं जे वैर करतील त्यांचे पारिपत्य तुम्हीं करावें. तुम्हीं आम्हीं राज्याभिवृद्धि एक विचारें करावी कलम १.

एकूण सात कलमें करार करून तहनामा लिहून दिला असे. मदरहू प्रमाणें आम्ही चालूं. यासी अंतराय येणार नाहीं.

## नंबर ८.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५. किलक नाम संवत्सरे आषाढ बहुल १ सौम्य वासरे. क्षत्रिय कुलावतंस राजश्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधि यांस आज्ञा केली ऐसीजे. स्वामीनीं स्वामिकार्या विषयीं तुम्हांस आज्ञा केली पाहिजे.

हुजूरचा कारभार पूर्वी ज्या पद्धतीनें राजश्री परशराम पंडित करीत होते त्या प्रमाणें करावा. आलेल्यास जाबसाल देणें, त्यास स्वाधीन मुख्यत्व तुम्हां आहे. कलम १.

खासगी पागा व पीलखाना, अठरा कारखाने व नोकांच्या रोजमुऱ्याचा हिशेब मनास आणून भोईन जाबते करून द्यावे. स्वामी त्या प्रमाणें चालवितील. कलम. १.

सरकारकून व सरदार जिल्हेयांचे हिशेब व हुजरीयांची वोती चाली तुम्हीं मनास आणून स्वामीस मदत करीत जावी. कलम १.

राजश्री यशवंतराव गोपाळ व शिवाजी शंकर, चिंतो महादेव व जिवाजी राघोजी यांजकडील हिशेब कितब तुम्हीं मनास आणावे. हे स्वामींनीं तुमच्या स्वाधीन केले आहेत. कलम १.

मौजे किन्हूर येथील हिशेब कितब मनास आणावे; तेथील खर्चाची बंदोबस्ती करून रोजेज मनास आणावा. कलम १.

पन्हाळा, पावनगड येथील हिशेब मनास आणून बंदोबस्ती करावी. व त्याच प्रमाणें सिंधुदुर्गाची ही करावी. कलम १.

येणें प्रमाणें सहा कलमें स्वामींनीं धंदा तुम्हांस सांगितला असे. तुम्हीं त्या चोकशीनें मनास आणून कारभार करावा. स्वामींनीं दोन प्रतिनिधी तुमचें उर्जीत करून चालवावें, यास अन्यथा नाहीं.

तुमची जिल्हे भुदरगड, सामानगडची राज्यकार्या निमित्त स्वामींनी घेतली असे. हे एकावर्षानें तुमची तुम्हांस करार करून द्यावी. बहूत काय लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा.

---

## नंबर ५.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५७ विरोधिकृत नामसंवत्सरे चैत्र बहुलषष्ठि भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं राजश्री सुभानराव मोरे यांस आज्ञा केली ऐशीजे स्वामीची व चिरंजीव राजेश्री संभाजी राजे यांची भेट झाली. वारणे पासून तुंगभद्रे पावेतों मुलूख दरोबस्त गड, कोट, ठाणीं त्यांजकडे दिलीं. किल्ले कोदन चिरंजीव राजश्री यांकडे देविले असे. तरी त्यांची पत्रें घेऊन येतील त्यांच्या स्वाधीन कोदन किल्ला करणें जाणिजे. बहुत काय लिहिणें.

मोर्तब

---

श्री.

सन ११४५ फ. सन १७३५ इ.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ६२ अनलनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १ भौमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं वालदेज यास करून दिला तहनामा ऐशीजे, वालदेज कुंडी दोर जुलियोस फालतेज फन खालेनेस बंदर कोची यांणीं जंजिरे सिंधुदुर्गच्या बंदरास आपणाकडील जाहजावरून नुबल दलील व पित्रलेनजाईल या दोघांजणा बराबर कोल्हापूरच्या मुक्कामीं पत्र पाठविलें असतां जहाला करार बितपशील.

१. वालदेज बहादर कोची याचे वावदईचे कोपामीं महाराजां सन्निध बसून बोली केली कीं, स्वामींनी व वालदेजाची गोडी

व खुलासा बळकन झाला आहे तो यावत् चंद्रसूर्य वर करार चालावा, यामध्यें अंतर होऊंनये. कलम १.

१ महाराजांनीं आपणास मालवणाच्या बंदरीं वखार बांधावयास जागा दिली आहे, तो वेंगुर्ल्यास वखार होती त्यास त्यांणी आपला खर्च लावून बांधून द्यावी, वेंगुर्ल्यास पहिले आपलें चालवीत होते तसें चालवावें म्हणून विनंति केल्या प्रमाणें करार असे. कलम १.

१ जहाज बंदरांत येतांना वादळानें शिकस्त झालें तर आपले लोक वाचून जिन्नस निघेल तो आपला आपणास काढून द्यावा. त्यास खर्च लागेल तो वरकड बंदराच्या शिरस्त्या प्रमाणें वालदेजांनीं आपणा कडून घ्यावा. कलम १.

१. पूर्वीं वेंगुर्ल्यास फटोरी म्हणजे वखार होती ती लुटून नेली. त्या गोष्टी बद्दल आपल्या मनामध्यें कांहीं नाहीं. कलम १.

१ आणखी सोईकर वखारीस जागा मागतील त्यास तेथें जागा द्यावी. जहाजावरून जिन्नस उतरेल त्याची व येथील जिन्नस भरती करतील त्याची जकात घेऊं नये. वेंगुर्ल्यास चालत होतें त्या प्रमाणें चालवावें. कलम १.

१ वखारींत कोणी चोरी केली तर त्याचें पारिपत्य करावें. कोणी वखारीवर चढाई केली तर त्यास मारून काढावें, नेलेली मत्ता आणून द्यावी. कलम. १.

१ आपणाकडील माल उदमी नेतील त्याचा पैका न देतां दगाबाजी करतील त्याचें पारिपत्य करून पैका घेऊन आपणास द्यावा व आपले चाकर लोक कोणी पळून जातील ते कबजी मुलखांत उमगतील त्यास धरून आणून द्यावे. कलम १.

१ आता या वोली खेरीज कांहीं बोली असली तर पुढें होईल. कलम १

---

एकूण कलमें ८ शालिवाहन शके १६५८ चैत्र शुद्ध १ निशाण

च्चनी गास्त अव्वल मोर्तब, तारीख २१ माहे सव्वाल सुरूसन सीत स-
हासीन मय्याव अलफ, फसली ११४५, इ०स० १७३६ तारीख १४ मार्च.

## नंबर ६.

श्री.

श्रीमन्महाराज छत्रपति स्वामीचे सेवेसी.

बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी यांणी लिहून दि-
ल्हा करारनामा ऐसाजे, सन इहिदे आर्बैन, रौद्र नाम संवत्सरे (स-
न १७४० इ०)

१ सातारीयास तीर्थस्वरूप शाहू महाराज राज्य करीत हो-
ते, त्याजमुळें वारणेच्या नह झाला होता, हल्लीं तीर्थस्वरूप शाहू
महाराज यांणीं कैलासवास केला, त्यांचे पोटीं संतान नाहीं. तेव्हां तें
राज्य स्वामींचें आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा.

२ शाहू महाराज असते समयीं किल्ले सातारेचे मुक्कामी से-
वकांनीं विनंति केली होती, जे शाहू महाराज यांचा जिवात्मा आहे
तो वास्तविकारें त्यांचे सेवक, अंतर्यामी स्वामीचे. शाहू महाराज यां-
णीं कैलासवास केल्यावर दोन्ही राज्यावर आज्ञा स्वामींची आणि आ-
म्ही सेवक स्वामींचे. स्वामींचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं, अशी
शाफत दिल्हीहोती त्याच प्रमाणें दोन्ही राज्यें एक करून एकछत्री स्वा-
मींचा शिक्का चालावा. आणि आम्ही शाहू महाराज यांचे कारकीर्दी
प्रमाणें सेवा करून असावें हे प्रमाण. यासी अंतर करणार नाहीं.

३ वारणेचे अलीकडील तुंगभद्रा पावेतों यासगी यात क-
रून महाराजांस द्यावा. वारणे पासून तुंगभद्रे पावेतों गड, कोट -
ठं, ठाणीं दरोबस्त खासगीस करून देऊं.

४ सातान्यास राजधानीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम
महाराजांकडे द्यावा. शाहू महाराज यांचे कारकीर्दी प्रमाणें दे-
ऊन वर्तणूक करूं

५ स्वामीसन्निध लहान मोठे सेवक सेवा करून होते त्यांस त्यांचे योग्यते प्रमाणें चालवावें. योग्यतेनरूप स्वामीचे आज्ञे-प्रमाणें चालवूं.

६ हुजूरचे सनदेनें लोकांस गांव इनाम व वतनें दिलीं तीं चालवावीं. अंतर करूं नये.

स्वामींनी कृपाळू होऊन ज्यांस गांव इनाम व वतनें जीं दिलीं असतील तीं आज्ञे प्रमाणें चालवूं.

७ संस्थान बिदनूर व सोंध, व अनगूज, व सावनूर येथील चौथाई व तोफेचा ऐवज सरकारांत यावा.

पावत आल्या प्रमाणें ऐवज पावता होईल. आणि स्वामीचे आज्ञे प्रमाणें निर्वेध पणें देईतसें करूं.

८ स्वामींत व तुम्हांत किमपि पडदा नसावा. स्वामींनी जें केलें तें तुम्ही परिणामास नेऊन स्वामीचे लक्षानुरूप चालून प्रांजळरीतीनें स्वामीचे सेवेशीं सादर असावें.

स्वामीची सेवा एकनिष्ठेनें करून स्वामी आज्ञा करतील तदनुरूप आज्ञेप्रमाणें मनोदयानुरूप वर्तणूक करूं. स्वामी चरणीं द्वैतभाव किमपि न धरूं.

९ शिंदे, नरगुंदे व पतके, पूर्वी हुजूर पागेचे सरदार सरंजाम सुद्धां पूर्ववत् प्रमाणें स्वामीचे हुजुरातीस सेवा त्यांणीं करावी. त्यांचे सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणें तो होत असावा.

स्वामीच्या आज्ञे प्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक होय असी करून देऊं. आज्ञेप्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक न होय तरी त्यांजकडून सरंजाम, गड, कोट, किल्ले, ठाणीं सरकारांत घेऊन देऊं.

१० सरदेशमुखी व बाजे वतनें जीं सरकार तालुक्यास आहेत तीं सरकारांत असावीं.

शाहुमहाराजांचे कारकीर्दी प्रमाणें सरकारांत चालवूं.

११ सरदेश कुळकर्णीचे व इनामगांव चालवावे.

आज्ञेप्रमाणें चालवूं.

१२ आंग्रेकडील किल्ले, व जंजिरे, व भुईकोट, व पंचमहाल, जयगड पर्यंत सरकारांत यावे.

आज्ञेप्रमाणें आंग्रेकडील किल्ले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल जयगड पर्यंत दरोबस्त मुलुख घेऊन स्वामीकडे देऊं.

एकूण कलमें बारा असत.

गुजारत दादाजी यादव निशाणी इनशा.

---

## नंबर ७.

" सन खम्मस मय्याव अल्लुफ शालिवाहन शके १६७६ राज्याभिषेक शके ८१ भावनाम संवत्सरे. श्रीमन्महाराज शंभुछत्रपति महाराज यांचे दर्शन करून सावनूरकर नबाब साहेब यांचे प्रांतांत जाऊन लढाई करावी असा बेत पुणें मुक्कामीं ठरून, श्रीमंत बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब व रघुनाथराव पंडित पेशवे यांचे बंधु सदाशिवराव चिमणाजी पंडित ऊर्फ भाऊसाहेब हे फौजे सुद्धां पुण्याहून दरकूच निघाल्यावर पंडित प्रधान यांहीं महाराज सरकारांत विनंति पत्रें देऊन वकील पाठविले. नंतर किल्ले पन्हाळे कडून महाराज सरकारची स्वारी व खाशा महाराजांच्या स्वाऱ्या करवीरीं येऊन दाखल झाल्या. नंतर पंडित प्रधान यांची स्वारी फौजे सुद्धां कऱ्हाडा नजीक येऊन पोंचली. तेथून कूच दरकूच पंडित प्रधान यांची स्वारी फौजे सुद्धां निघोन वावडें तर्फ हवेली नजीक पंचगंगातिरास मुक्काम झाला. दुसरे दिवशीं महाराज सरकारची खासा स्वारी हत्तीच्या अंबारींत होऊन सामोरे कोस दीड कोस गेली. तेथें डेऱ्यांत सदर होऊन पंडित प्रधान यांस सरदारलोक व मानकरी लोक यांचे मुजरे पद्धतवार झालेवर महाराज सरकारची खासा स्वारी हत्तीचे अंबारींत झाली. नंतर पंडित प्रधान यांची स्वारी खवास खान्यांत बसून दो-

न्हीं हातांत मोर्चेल घेऊन महाराजांवर उडवूं लागले. महाराजांचीस्वारी चालती होतांच पंडित प्रधान यांचे फौजेने दोन्ही बाजूस फेर धरून पद्धती प्रमाणें मुजरे केले. महाराजांची स्वारी शहरांत येऊन पोंचेल्यावर पंडित प्रधान यांही महाराजांची डेऱ्यांत जाण्या विषयीं आज्ञा घेऊन श्रींचे दर्शन करून पंडित प्रधान यांची स्वारी डेऱ्यास आली. पंडित प्रधान यांचे डेरे रंकाळ्या नजीक बागेंत, मोतबागेंत दिले होते, व सरदार लोक व मानकरी लोक यांचे डेरे पद्धती प्रमाणें फौजे सुद्धां पंचगंगा किनारेसी झालेहोते. पंडित प्रधान यांचा फौजे सुद्धां करवीरी मुक्काम वीस पंचवीस दिवस झाला होता. ते समयीं महाराज सरकारांत पंडित प्रधान यांणीं विनंति करून सदाशिवराव चिमणाजी पंडित यांस प्रधानपद देऊन वस्त्रें दिलीं. त्यावेळीं महाराज सरकारांतून किल्ले पारगड, भवानगड, वल्लभगड, शिवगड व सामानगड दिल्हे. यां पैकीं चार किल्ले पंडित प्रधान यांच्या हुकुमांत वागले. किल्ले सामानगडकरी हे पंडित प्रधान यांचे हुकुमांत वागले नाहींत. कर्नाटक प्रांतांतील संस्थानीक दौलतदार यांजकडून चौथाईचा ऐवज दरसाल महाराज सरकारांत यावयाचा तो ऐवज पंडित प्रधान यांहीं संस्थानिक यांजकडून घेऊन महाराज सरकारांत दरसाल देत जावा असा करार ठरला. नंतर दरसाल चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत देणेचा तो पंडित प्रधान यांजकडे देत जावा, म्हणजे पंडित प्रधान चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत पावता करतील म्हणून महाराज सरकारांतून संस्थानवाले यांचे नांवें ताकीद पत्रें लिहून पंडित प्रधान यांजबद्दल दिलीं. महाराज सरकारची आज्ञा घेऊन पंडित प्रधान निघून बाबासाहेब सावनूरकर यांचे प्रांतांत पांचन्यावर नबाबसाहेबांच्या फौजेची व पंडित प्रधान यांच्या फौजेची लढाई होऊन पंडित प्रधानांणींफौजेसुद्धां सावनुरास जाऊन शह दिला. तेव्हां नबाब साहेबांकडून सलुखाचें बोलणें झालें. ते समयीं मध्यस्थांनीं बोलणें करून स्वकी-

त चाळीस महालांपैकीं नबाब साहेबांनीं अकरा महाल पंडित प्रधान यांनीं खंडणींत लावून दिले.

| | | |
|---|---|---|
| १ बागलकोट. | १ हुनगुंद. | १ बदामी. |
| १ गदग. | १ डंबळ. | १ अण्णीगिरी. |
| १ नवलगुंद. | १ गोकाक. | १ सलाबतनूर. |
| १ बाळगीनजीक कृष्णातीर. | १ [illegible] | |

नंतर पंडित प्रधान यांचें फौजे सुद्धां सावनूर मुक्कामाहून कूच होऊन पुण्यास जाण्यास दरकूच स्वारी परत निघून महाराज सरकारचे सरहद्दीस येऊन पोंचल्यावर पंडित प्रधान यांनी सडी स्वारी करविरास येऊन महाराज सरकारांत विनंती करून श्रीमन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न ( जिजाबाई ) यांची खासास्वारी सरंजाम सुद्धां करविराहून निघाली. तेव्हां पंडित प्रधान यांची स्वारीही दरकूच जात होती. ते समयीं कऱ्हाडा नजीक श्रीकृष्णा तिरीं उतरल्यावर पुढें एकदोन मुक्कामावर वळवाचा पर्जन्य अकाळीं फार पडला. त्या मुक्कामास श्रीमन्महाराज सकलसौभाग्यादिसंपन्न जिजाबाई साहेब यांच्या खासास्वारीच्या डेऱ्या पुर्ती जमिनीतील भिजलेली माती कामाठी यांजकडून पंडित प्रधान यांही काढवून कोरडी जमीन करवून डेरे दिले. आणि स्वारीचे ताराची तयारी होई पर्यंत पंडित प्रधान डेऱ्यांत राहून आज्ञा घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. पुढें दरकूच होऊन स्वारी पुणें मुक्कामीं दाखल झाल्यावर दररोज स्वारीचे दर्शनास पंडित प्रधान यांची स्वारी येत होती, आणि पंडित प्रधान यांच्या कुटुंबाच्या स्वाऱ्या दररोज स्वारीचे दर्शनास येऊन खाशी तारें होई पर्यंत राहून स्वारीचे सुख झाल्यावर आपल्या हातांनीं स्वारीच्या पायांची सेवा करून आज्ञा घेऊन आपल्या वाड्यास जावें असा नेम स्वारी पुणें मुक्कामीं होती तो पर्यंत चालविला होता. पुणें मुक्कामीं स्वारीस पंडित प्रधान यांणीं आपल्या दौलतीचें ऐश्वर्य सर्व दाखवून स्वारीची मर्जी संतोषित केली. नंतर पुणें मुक्कामाहून श्री-

मन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न जिजा आई साहेब यांची स्वारी करविरास येण्यास निघाली. ते समयीं पंडित प्रधान यांणीं आपले कडील सरदार फौजे सुद्धा स्वारी समागमें दिल्यावर स्वारीचें कुच होऊन मजल दर मजल स्वारी करविरास येऊन दाखल झाल्यावर पंडित प्रधान याजकडील सरदारांस महाराज सरकारांतून वस्त्रें देऊन परत जाण्यास आज्ञा झाली.

---

## नंबर ८.

श्री.

राजेश्री दौलदी बसवप नाईक बिदनूर गोसांवियांशीं.

छ सकलगुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य प्रति राजेश्री राजा शंभु छत्रपति उपरी आवृत्य कुशलजाणून स्वकुशल लिहिणे विशेष — सस्थान मजकूरचा मामला राजेश्री बाळाजी पंडित प्रधान यांजकडे दिला आहे, त्या प्रमाणें करार असे, तरी तुम्हीं पंडिन मशार निल्हेकडे रुजू होऊन सस्थानचा ऐवज बाकी व सालमजकूरचा झाडयानिशीं देणे. त्या प्रमाणें पंत प्रधान हुजूर प्रविष्ट करतील, जाणिजे, बहुतकाय लिहिणे लिहिणें शिक्क्याचें मोर्तब असे.

---

## नंबर ९.

श्री.

राजेश्री सवाई इख्लू सदाशिव नाईक सोंधे
गोसावि यांशी —

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य

प्रति राजेश्री ——— उपरी सस्थान मजकूरचा मामला हुजुरून राजेश्री बाळाजी पंडित प्रधान यांजकडे दिला आहे, त्या प्रमाणें करार असे. तरी तुम्हीं पंडित मशार निल्हेकडे रुजू होऊन सस्थानम- [illegible] ऐवज बाकीचा व सालमजकूरचा सुरळीन पणें देव-

जाणें. उजूर न करणें. संस्थानचा ऐवज पंतप्रधान हुजूर पावता क-
रतील. तुम्ही ऐवज देत जाणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें लिक्षा-
चें मोर्तब असे.

---

श्री.

नंबर १७

सन ११७१ फसली.

पुण्यश्लोक अनुबाई यांशीं.

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब यांणीं आज्ञा के-
ली ऐसीजे, तुम्ही विनंती पत्र पाठविलेंतें प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रव-
ण झाला. तेथें लिहिलें जे शांतवन किती करावें; काय संतोष आहे,
जें साहेबांस लिहावें; हें तरी प्रमाणच आहे. भवितव्यास तुम्ही काय
कराल. करविरास जाणें विशीं राजश्री रघुनाथ पंडित सांगतात;
आपण येतों म्हणून विनंती सांगून पाठविली. अशास चिरंजीव कुसा-
बाईस गर्भ असते समयीं तुम्हांस येणें विशी वरचेवर पत्रें पाठविलीं;
कांकीं, तुम्ही वयातीत बायका आणि पुरातन सेवक रावत्यांतील; सा-
हेब दुःखांत निमग्न; समीप राहून सुतीची उगाठेव करावया करितां बो-
लाविलें होतें, व राजश्री प्रधानपंतांस ही लिहिलें होतें. अशास त्यांच्या
व तुमच्या ध्यानात आलें, जे परीक्षे साठीं बोलावितात. पुढें राजकुंवर
जहालाच तर संदेह पडणेस जागा रहात नाहीं. हा अर्थ प्रधानपंतां-
नी चित्तांत आणून तुम्हांस निरोप न दिला. तुम्ही न आला. साहे-
बांचे वंशांत अशा कुष्ट कल्पना या मागें झाल्या नाहींत व पुढें ही हो-
णें नाहींत. सर्व जनांशी शिक्षा करणेंचे अगर बुद्धिवाद सांगणेचें
स्थल हें. या स्थळीं असें वर्तल्यास जनास मोकळीकच जहाली. जे
आजपर्यंत मार्गरहित वर्तले यांचें बरें देवानें काय केलें आहे की त्या
मार्गें अन्यत्रांनीं जावें. असो परिणामीं सत्य तें सत्य श्री भवानी प्र-
कट करणार. परंतु जे मूर्ख भाषणें करणारांचें स्मरण साहेबांसही

असेल हें अपूर्व नाहीं. भोसल्यांचे वंशपरंपरेने स्मरण राहील, सर्वत्रांशी आयुष्य सारखेंच आहे. आठवण मात्र अक्षयी राहील. सांप्र- त तुम्ही येऊन परीक्षा पाहून सांगणारांशी सांगोन त्याचे मुखें होय म्हटल्यानें हा राजा होतो, नाही तर ब्रम्हदेवाचें लिहिणें लटके पडतें असें नाहीं. अनंत सेवक पदरी आहेत, कोणी तांब्याभर पाणी देईल, जो भोसला म्हणवील तो कांहीं पूर्वजांचें स्मरण धरील, चिंता काय आहे. आमच्या वडिलांनी या वरी कृपा या प्रमाणें सेवा करावी म्हणून केली होती ! त्या प्रमाणें करितील. परंतु सोयरीकीचें नातें ही यांचें आमचे होईसें नाहीं. तुम्ही येणेचा प्रकार काय हा समजला नाहीं. उघड लिहिणें. जाणिजे. छ २७ जिल्हेज बहुतकाय लिहिणें.

मोर्तब. पैवस्ती छ. ८ मोहरम सन् इसन्ने सीतेन मय्यातैन व अल्लुफ. श्रावणमास.

---

## नंबर ११.

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री
विसाजी कृष्ण गोसावि यांस.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुहूसन आर्बा सित्तेन मय्याव अल्लुफ कसबा बेळगांव वगैरे येथील मुकासा बाबेचा ऐवज मनोळीकडे पावत असतो त्यास हल्ली तालुके मजकूर श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यांच्या खासगीस दिला, तरी कसबा मजकूर येथील मुकास बाबेचा ऐवज सालदरसाल चालत आल्याप्रमाणें मनोळीकडे चालविणें. जाणिजे. छ १५ जिल्काद बहुत काय लिहिणें ” मोर्तब ॥

---

## नंबर १२.

राजश्री यावराजीत राजमान्य राजश्री आनंदराव भिकाजी गोसावि यांस.

सेवेध माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. परगणें बागलकोट व बदामी येथील मुकास बाबेचा ऐवज मनोळीकडे पावत असतो त्यास साल मजकुरीं तालुके मजकूर श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यांच्या खासगीस दिला आहे. तरी तुम्ही आपल्या तर्फेच्या कमाविसदारांस ताकीद करून हरदू परगणें यांच्या मुकास बाबेचा ऐवज सालदरसाल पावत आल्या प्रमाणें देणें. जाणिजे. छ १५ जिल्काद सुरुसन अर्बा सित्तेन मय्याव अल्लफ बहुतकाय लिहिणें ही विनंति.

---

## नंबर १३.

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब.
साहेबांचे सेवेशीं.

विनंति सेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना— सेवकाचे वर्तमान तागायत च ५ रबिलाखर पावेतों यथास्थित असो विशेष. या नंतर शहाजी भोसले खानवटकर हे साहेबांचे व शांतील यांचा पुत्र दत्तक घेऊन राज्यासनीं स्थापना करावी. एतद्विषयीं सेवकांनीं पेशजीं विनंतिपत्र पाठविलेंच होतें, त्यास साहेबी मशार निल्हेच्या पुत्रास विधियुक्त घेऊन विजयादशमीचे मुहूर्तें सिंहासनारूढ केलें, हें वर्तमान परस्परें कळोन संतोषावाप्ती जहाली. साहेबीं जो प्रकार केला तो सर्वांस मान्य आहे. सेवकाचें ही लक्ष दुसरें नाहीं. राजश्री कारणें वस्त्रें, भूषणें राजश्री बाबूराव बावाजी यांजबरोबर पाठविली असत, घेऊन प्रत्युत्तराची आज्ञा करावी. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ० ५ माहे रबिलाखर सूरसन सल्लास खिलैन मयातैन अलफ ऊर्फ कार्तिकमास.

## नंबर १४.

श्री.

श्रीमंत राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी.

विनंति शेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना सेवकाचें वर्तमान तागायत छ० ५ रबिलाखर पावेतों यथास्थित असे. या नंतर विजया दशमीचे सुमुहूर्ते स्वामी सिंहासनारूढ जहाले हें वर्तमान परस्परें श्रवण होऊन बहुत संतोष झाला. स्वामीचे शेवेशी वस्त्रें व जवाहीर पाठविलें आहे. त्याची यादि अलाहिदा आहे. त्या प्रमाणें राजश्री बापूरावजी प्रविष्ट करतील. घेऊन उत्तर पाठविण्याची आज्ञा केली पाहिजे. शेवेशी श्रुतहोय हे विज्ञापना. पैवस्ती छ० ५, रबिलाखर सु० सल्लास खिलैन मयाव अलूफ ऊर्फ कार्तिकमास.

## नंबर १५.

श्रीलक्ष्मीकांत.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेशी.

विनंति शेवक जानोजी भोसले सेनासाहेब सुभा कृतानेक विज्ञापना तागायत छ० १५ रबिलावल पर्यंत महाराजांचे कृपाकटाक्षें करून शेवकाचें वर्तमान यथास्थित असे. या नंतर महाराजांनी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केलेतें मस्तकी वंदून सनाथ झालों. श्रीमंत महाराज मातोश्री आईसाहेब यांणी शेवकास पोषाख व शिरपेच बादशाहजादेबरोबर पाठविला तो आज्ञे प्रमाणें घेऊन बहुत संतोष झाला. येथून शेवकानें महाराजांचे शेवेशी पोषाख

राजश्री कोन्हेरगणेश यांजसमागमे पाठविला त्याची यादि अलाहि-
दा असे त्याजप्रमाणे महाराज कृपावंत होऊन अंगीकार करणार ध-
णी समर्थ आहेत. शेवेशी श्रुतहोय हे विज्ञापना. (शिक्का).
पेवेस्ती छ. १५ रबिलावल सु. अर्बा शितेन मय्याव
अलूफ.

## नंबर १६.

राजश्री याचिराजित राजमान्य राजश्री शेषोनारायण
गोसावियांसी

त्र्यंबक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील
कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें. विशेष. राजश्री राणो-
जी घाटगे सर्जाराव कागलकर हे घराणदार लोक, यावर धन्याची
गैरमर्जी, यास्तव तुमचे विद्यमाने करार करून राजश्री विठ्ठलरा-
व शिवदेव यांस कागलास रवाना केले. ते दरम्यान होऊन त्यांचे
इनामगांव सांवर्डे सुद्धां सात व परगणे मजकुरी गावगन्ना इनाम
जमिनी व हक्क कानू कायदे देशमुखी व नाडगौंडीचे नेमून देऊन सु-
दामत चालवावे असा करार करून ठाणे सरकारात दिल्हें व ऐव-
जीच्या बोलण्यांत तुम्ही व भगवंत आप्पाजी असता मशार निल्हे-
ची वतनदारी व सांवर्डेबुद्रुक इनामगांव घाटगे मशार निल्हेकडे
चालत नाही, म्हणून मशारनिल्हे सरकारात आले. त्यावरून हे
पत्र तुम्हांस सादर केले असे. तरी तुम्ही धन्यास विनंति करून
याचे इनामगाव करारा प्रमाणे व गावगन्ना इनामजमिनी व कानू
कायदे नेमून देऊन सुरळीत चालते करावे, जाणिजे. छ. २९ र-
मजान सुम्मा सब्बा सितेन मय्याव अलूफ बहुत काय लिहिणे.
मोर्तब असे.

## नंबर १७.

श्री आई आदिपुरुष.

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाऊ साहेब.

साहेबांचे शेवेशीं.

विनंति शेवक आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि कृतानेक विज्ञापना तागायत छ० १५ मोहोरम पावेतों साहेबांचे कृपादृष्टीं करून सेवकाचें वृत्त यथास्थित असें विशेष. शेवेशीं विज्ञापना साहेबीं पन्हाळे मुक्कामीं शेवकास इनाम पत्राविशीं आज्ञा केली. त्यास शेवकानें आपले आत्मसंतोषें लिहून दिलें इनामपत्र ऐशीजे— साहेबांचे चरणाशिवाय शेवकास अन्य दैवत नाहीं. कोणी किती एक सांगतील तें न ऐकतां कोणाचे मिळणींत न मिळतां साहेबांचे लक्षांत राहून वडिलांहीं आपली सेवा ज्या अन्वयें केली त्या प्रमाणें साहेब आज्ञा करतील त्या रीतीनें वर्तणूक करूं. सेवकांस फौजे सुद्धां येण्याची आज्ञा होईल ते क्षणीं फौजे सुद्धां शेवेशीं हजर होऊं. धनी आज्ञा करतील तेव्हां आज्ञा घेऊन जाऊं. जमाव शेवेशीं पाठविण्याची आज्ञा जाहलीयास तेच क्षणीं जमाव शेवेशीं पाठवूं. साहेबांचे हुकुमा प्रमाणें शेवा करणें विशीं किल्ले मनगडचे मुक्कामीं अंबेचे बेल, तुळशी, पुष्प, शपथ पूर्वक काढून स्वामीचे चरणा सन्निध प्रमाण केलें. ते समयीं मातोश्री उपाध्येबावा व राजश्री जीत्याजी जाधव व राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार शेवेशीं सन्निध होते. यांचे विद्यमानें ज्येष्ठ वद्य २ गुरुवासरे शपथ केली. त्या प्रमाणें शेवक वर्तेल आणि शेवा निदर्शनास आणून देईल. यास अंतर करीन तर आपण परशुरामापर्यंतचे वंशाचे नर्क. शेवकानें इमान प्रमाण दिल्हें त्या प्रमाणें शेवेचे निभावणीस राजश्री त्र्यं॰ राव माणकेश्वर दरम्यान देऊन शेवगी विनंतीपत्र दिल्हें असे. हल्लीं शेवेशीं जो करार केला आहे त्यास अंतर सर्वथा नाहीं. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

—पैवस्ती छ० १६ माहे मोहरम सुम्मासम्यान सित्तेन मय्याव अल्लफ.

## नंबर १८.

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेबांचे शेवेशी.

विनंति शेवक हणमंतराव माणकेश्वर कृतानेक विज्ञापना ता- गायत छ० १५ मोहोरम पावेतों साहेबांचे कृपावलोकनें करून शे- वकाचे वृत्त यथास्थित असे. विशेष आज्ञा केली जी आपणास मा- न्य होऊन शेवेशी विनंती पत्र लिहून दिल्हें जे.– राजश्री भगवंत- राव त्र्यंबक प्रतिनिधि व राजश्री आबाजी राव कृष्ण प्रतिनिधि या उ- भयतांनीं व आम्हीं शेवा एकनिष्टपणें इमाने इतबारें करावी. साहे- बांचे लक्षांत राहून तातेयाकडील पक्षपात धरून खोटे कामांत मिळणार नाहीं. अन्यत्र कोणी कांहीं सांगतील तें न ऐकूं. पे- शवे इतरकल्पना चित्तांत आणतील त्यास ही सांगूं, तुम्हीं असें क- र्म न करावें. महाराज मातोश्री आईसाहेबांचे पायांपाशीं अंतर न करावें, तेच धनी मानावे. इतर कल्पना करू नये. म्हणून परि- छिन्न सांगून ही गोष्ट खामाखा न घडे असेंच करूं. पेशवे म- नस्वी कर्म करूं लागले, साहेबां विशीं दुष्टबुध्दि हरएक विशीं धरूं लागले, तरी त्यांचे मिळणींत न मिळतां साहेबांचे लक्षांत राहून सा- हेबांचे आज्ञेप्रमाणें मनोदय सिद्धीस नेऊं. किमपी सेवकाचे हा- तून अंतर सहसा पडणार नाहीं. जे जे समयीं साहेब आज्ञाप- त्र पाठवितील ते क्षणीं दहाहजार पांचहजार फौजे निशीं साहे- बांचे शेवेशीं हजर होऊं, कोणी विक्षेप करूं लागलीयास न ऐकूं. हुकूम होईल ते क्षणी फौजे सुध्धां शेवा येऊन करूं. साहेब जेव्हां निरोप देतील तेव्हां जाऊं. त्यास अंतर करूं तर आमचे कुलस्वामि- णीची शपथ असे. मनोळी प्रांत व हुकेरी प्रांत. व फुटगांव पे- शवे यांणीं साहेबांस नजर केले आहेत, त्यांतील एक रुपया अ- गर एक बिघा जमीन सोडून न देतां साहेबांचे मनोदयाप्रमाणें घ- लवूं. फिरोन उपद्रव या विशीं व हरएक विशीं त्याकडून अंतरन

पडे असा घरबंद करून देऊं. हे राजकारण आम्हांकडे लागलें. कुडाळ प्रांत घेऊन साहेबांस नजर करूं. त्यांतील कांहीं एक आस्ता न धरितां यथास्थित करून देऊं. या शिवाय साहेबांचे मनोदयानुरूप सेवा अधिकोत्तर करून दाखवूं. यासी अंतर न करूं. सदरहू लिहिल्याप्रमाणें इमानपत्र साहेबांचे शेवेशीं लिहून दिलें आहे. त्या प्रमाणे सहसा अंतर होणार नाहीं. हे त्रिवाचा खरें. यास लिहिले प्रमाणें अंतर करूं तर आपले कुलस्वामिणीची व साहेबांचे पायांची व मातापित्याची शपथ असे. ज्येष्ठ वद्य २ गुरुवासरीं किल्ले पन्हाळे मुक्कामीं श्रीअंबेचे सन्निध साहेबांचे चरणापाशीं शपथ केली व बेल, तुळशी, पुष्पें दिलीं आहेत, जे इमान इतबारें सेवा करूं म्हणून दिल्हे आहेत, ते समयीं विद्यमान गंगाभागिरथी समान मातोश्री आई उपाध्ये व राजेश्री यशवंत राव शिंदे सुभेदार व राजेश्री जोत्याजी राव हवलदार व राजेश्री भगवंत मल्हार, साहेबां सन्निध होते. उपरांतिक राजश्री भाऊजीराव कृष्ण प्रतिनिधि यांणीं साहेबांचे चरणापाशीं एक निष्ठेची सेवा करून दाखवावी. आणि शिवाय वर्तू नये. श्री अंबेची पुष्पें व तुळशी व बेल शपथ पूर्वक दिली आहेत. उभयतांकडील निभावणी आम्हांकडे लागली. उभयतांतून ज्याकडून अंतर पडेल त्याची निभावणी आपण करून देऊं. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ० १६ माहे मोहोरम सुमासस्मान शित्तैन मयाव अल्लफ.

---

## नंबर ३९ (पृ० ६८ पहा).

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेबांचे शेवेशी.

विनंति सेवक बाळाजी जनार्दन सेवेशी कृतानेक विज्ञापना लागायत छ. ३ साबान पावेतो साहेबांचे कृपें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष:- तालुके चिकोडी व मनोळी येथील श्रीमंत पंत प्रधान यांणी फडशा करून करार मदाराचे कागद साहेबांकडे राजश्री शिवाजी भोसले व आपाजी शामराव व आकोजी नेवरे व वेदमूर्ति महादेव शास्त्री यांजबरोबर पाठविले आहेत, प्रविष्ट होतील. इकडील अर्थ सविस्तर मशार निल्हे सेवेशी निवेदन करतील, सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. १४ रमजान सन अर्बा सब्बैन मय्याव अलूफ

" या तहनाम्या वरून पेशव्यांकडील कामदारांनी वगैरे गफलतीनें घेतलेले गांव परत आले त्यांचा तपशील.

३०००, भगवंत आपाजी यांनी मौजे शिदनुरली येथील राजपत्रांत शके संवत्सर मागाहून घातला, सबब हागांव साहेबी घ्यावा. देह एक, आकार अदमासें रुपये.

१०००, शेषो नारायण यांणी मौजे भिवशी येथील राजपत्रांत शके संवत्सर मागाहून घातला. सबब साहेबी हा गांव आपले सरकारांत घ्यावा. देह एक, आकार अदमासें रुपये.

२०००, दादाजी त्रिंबक यांजकडे मौजे भिलगुंदी प्रांत रायबाग सन आर्बा शितेन साली घेतला आहे. त्याचें वृत्त मनास आणितां रायबागकर देसाई यांचा गाद ख्वालसा झाली सा. हेबी सरकारांत घ्यावा.

४०००, मौजे हैरवाड प्रांत रायबाग हागांव येसाजी राम व रामचंद्र नारायण यांणी वडगांवचे साली गांवास ठाणे घातलें, तोगांव सरकारांतयावा, म्हणून आज्ञा, त्यास येविशी चौकशी येसाजीराम यास आपून केली. त्यांणी सांगितलें जें इनामपत्र वडगांवचे पूर्वी घेऊन गाव शिवाजी भाने यांजकडे चा-

करी घेऊन चालवीत होते. त्याजवरून जिवाजी माने यांचे भाऊ शिदोजी माने यांस रुबरू आणोन माथां तुळशी ठेवून पुरशीश केली. त्याजवरून त्यांणीं सत्योत्तर लिहून दिल्हें, जे जिवाजी माने व आपण एकवट असतां गांव आपणाकडे पेशवाजी पासून चालत आला; त्याची इनामपत्रें आपणाजवळ आहेत. हरीराम व विसाजी नारायण यांनीं चाकरी गांव संबंधी केली नाहीं. वडगांवचे साली जबरदस्तीनें गांव घेऊन ठाणें बसविलें. त्याजवरून साहेबांचे गांव साहेबांकडे द्यावयाचा करार केला असे. त्या प्रमाणें माहेबी घ्यावा. बाकी तीन दहाहजार आकाराचे अजमासें चिंतो हरी व आबाजी विश्वनाथ यांजकडे चालवावे; येणें प्रमाणें रुजू. मौजे हेरवाड येथील मग्रारनिल्हेनीं इमारत बांधिली आहे. यास्तव तो गांव त्यांजकडे ठेवावा. त्याचे मोबदला मौजे रामपूर रुपये ३००० तीनहजार व मौजे वाळवे प्रांत कागल रुपये १००० एकूण रुपये ४००० चार हजाराचे गांव दोन्ही साहेबीं सरकारांत आपले घ्यावे.

४०००, शिवाजी घोरपडे यांजकडे मौजे दतवाड परगणे मिरज, देह गुमारें एक, सन आर्वा शितैनचे सालीं साहेबांकडे दिल्हे असतां, तिगस्तां मग्रार निल्हेचे स्वाधीन केले आहेत; सदरहू गांव घोरपडे यांजकडून दूर करून साहेबांकडे दिल्हा असे, साहेबीं आपले सरकारांत घ्यावा.

१००००, आनूबाई घोरपडे यांजकडे तिगस्तां हुजूरची ३ ठाणीं उठो न दिल्हीं, त्यात व रांगोळी देह दोनगांव दहाहजार अजमासें आकाराचे, आनूबाई कडे होते; ते हल्लीं साहेबांकडे ठेविले असे. आपले सरकारांत साहेबीं घ्यावे.

२४७००, रामचंद्र महादेव व बाळाजी केशव वगैरे यांणीं तिगस्तां मध्यस्तीनें इनामगाव म्हणोन चालले. देह १०:—
१००० मौजे मस्कर मजरे सुद्धां देह २.

१२०० मौजे करजगें प्रांत हुकेरी.
३००० मौजे गदलगें प्रांत मजकूर.
३५०० मौजे कमलें प्रांत मजकूर.
२००० मौजे आडी प्रांत मजकूर.
३००० मौजे जनवाड परगणे मजकूर.
३००० मौजे कुडपूर परगणे मजकूर.
१५०० मौजे नसलापूर प्रांत मजकूर.
५०० मौजे आकीवाट परगणे मजकूर.

२४७००

एकूण दहा गांव चव्वीस हजार सातशें अजमासें आकाराचे रामचंद्र महादेव व बाळाजी केशव वगैरे यांणीं पेशजीं मध्यस्ती संबंधें घेतले होते, ते हल्लीं आईसाहेबांकडे माघारे घ्यावे.

२०००, विसाजी कृष्ण यांजकडे मौजे कापवागी प्रांत हुकेरी जबरदस्तीनें काटकाचे अमलांत घेतला आहे देह १ व वडगांवचे सालीं एक गांव दोनहजार रुपये आकाराचा विसाजी कृष्ण यांणीं घेऊन पागेकडे जमा धरला आहे, तो हल्लीं साहेबीं आपले सरकारांत घ्यावा.

२४५००, तालुके निपाणी प्रांत हुकेरी निंबाळकर देसाई पाटील मजकूर यांजकडे होती. ती सन आर्बाचे सालीं साहेबांकडे दोन्हीही तालुके नजर केले, ते समयीं निपाणी तालुका सरकारचे अमलांत आला असतां हल्लीं गैरवाका तुम्हांस समजावून गांव घेतले आहेत ते:—

४५०० मौजे निपाणी १.
३५०० मौजे जत्राट. १.
४००० मौजे काडणी. १.
५००० मौजे कणंगले १.

१००० मौजे शिरगुपी. १
५००० मौजे कोगनुळी. १
१००० मौजे मतिवडे. १
५०० मौजे सुळगांव. १

२४५००

एकूण गांव आठ आदा चोवीस हजार पांचशे रुपये आकाराचे घ्यावे. याचा आलाहिदा तपशिलवार करार केला आहे त्या प्रमाणें साहेबीं गांव सरकारांत घ्यावे.

१५०० रामचंद्र सरवोजी यांजकडे मौजे मोरवे प्रांत रायबाग हा गांव आहे, तो सरकारांत घ्यावा. मशार निल्हेस पांचशें रुपये सालीना वेतन देऊन चाकरी घ्यावी. सदरहू दीड हजार रुपयांचा गांव साहेबीं आपले सरकारांत घ्यावा. मौजे तुपे वाडी व येडेगांव प्रांत रायबाग हे दोन गांव दिनकर महादेव यांजकडे होते ते सरकारांत सन तिस्सा शितेंनचे सालीं आलेच आहेत, त्या प्रमाणें असावेत. सन तिस्सा सितेनचे सालीं साहेबीं घेतले; त्यास साहेबीं स्वसंतोषें करून चालवावयाचे झालेतर चालवावे. मौजे माणगाव शेषो नारायण यांजकडे असतां त्याजकडून अम्मल दूर झाला, त्या समयीं सरकारांत न देतां किचूरकरांचे म्हणून सांगून, व्यंकाप्पा नाईक कळेकरी यांजकडून किचूरांचें पत्र आणून त्या पत्रावरून तुमचे पत्राचें साधन करून गांव मध्येंच व्यंकापा नाईक खातात, तो सरकारांत घ्यावा. भागिरथीबाई सावनीणी यांसी आईसाहेबां कडील सरंजाम आहे त्या पैकीं हा गाव किचूरकरांनीं दाबिला होता, तो शेषो नारायण यांणीं घेतला. पुढें सन तिस्सा सितेनांत साहेबां कडे यावा; त्यासी शेषो नारायण यांणीं सांगितलें कीं किचूरकरांचा गांव किचूरकरांनीं घेतला त्या उपरी व्यंकाजी नाईक यांणीं कि-

मूरकरांची पत्रे करून घेतली ती आणून दाखविली; त्या प्रमाणें आम्हां कडील पत्रे करून घेतली; म्हणून साहेबीं सांगून पाठवि-लें. त्यास पहातां अर्थी पांच वर्षे त्रोषे नारायण यांणीं अम्म-लकेला त्या अन्वयें म्हटलें तरी साहेबां कडील गांव असा होतो, तो साहेबीं आपले सरकारांत घ्यावा.

---

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गा आई साहेब यांणीं राज-श्री जिवाजी भोंसले यांसी आज्ञाकेली ऐशीजे:- सूरसन आर्बा-सबेन मय्याव अलूफ, तुम्ही विनंति पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊ-न लेखनार्थ निवेदन जहाले. राजश्री गोविंद दासो या पात्री कि-ती एक विवेकार्थ विनंती सांगून पाठविली ती सविस्तर निवेदनज-हाली. तदनंतर मागाहून राजश्री आबाजी नोघरे यांत्री विनंति क-रणें विशीं त्वरेने पाठविले प्रमाणें त्यांणी येऊन तुम्ही सांगित-ल्या अन्वयें साकल्य विनंति केली. त्यास इतके दिवस धीर धर-ला. निश्चय एक रीतीचा आणि हल्ली प्रकार या अन्वयें करावा असा सुचविला, त्यास इष्ट तुम्हास बोलल्या प्रमाणें निभावले, व सध्यां करारकराल त्यांत पुढें मागें काजकाम फांट घेणार नाहीत असें पुरतें दिसून आलें, तर यादी पाठविली आहे तिचा फ-डशा एक कलम दिगर न होतां सरकार उपयोगी रीतीनें करून घेऊन राजश्री प्रधानपंतांची कुलस्वामीची शपथ पूर्वक समजून क्रियापत्र प्रधान पंतीं करार केल्या प्रमाणें आपण निभावून देऊं. असा राजश्री सखाराम भगवंत यांचा बाख्यान् काग निभावणी अ-र्थ रुजीस आला पाहिजे. यास्तव राजश्री बाळाजी जनार्दन वगैरे मुत्सद्दी यांची पत्रें कराराप्रमाणें निभाऊन देऊं, यासी पाठ-वून द्यावी म्हणजे तीर्थस्वरूप कैलासवासी मातोश्री आई सा-हेब यांणीं सखाराम भगवंत यांसी बंधू म्हणविलेली सार्थकता

ती हीच. ये विशीं पेशजी आज्ञापत्रें सादर आहेत, तेव्हां आ-ज्ञाकरून विशेष सुचविणें तें काय. सदरहू प्रमाणें निश्चून बंदोबस्त करून पत्रें सुद्धा विनंति पत्र अंतर्गत सखाराम भगवंत यांचें येतांच वेदमूर्ति व आकोजी नोबरे यांची रवानगी होईल. सारांश यादिप्रमाणें सुप्रयुक्त फडशा व्हावा. गेली वस्तु माघारे साहेबांचे साहेबां पाशीं यावी. पुढील निभावणी ती पक्की बळकट करावी, हा काळ पावेतों वरदी शकर्ते महाराज यांचे वचनास या मंडळांत भोवानी शंकर आणिले नाहीं. ते या समयीं देशकाळ पाहून घडणें तें मशार निल्हेचे भिस्तीवर करावें. परंतु ज्यांत मशार निल्हेच्या करण्यास शब्द लौकिकांत न लागे व सरकारचा बद लौकीक न घडे व काल काला उपयोगीं पडेल तेंच मशारनिल्हे करतील. परंतु सूचनार्थ आज्ञा असे, मशार निल्हेशांचे पदरींचे, तेव्हां एकादी गोष्ट दोखतां येईल किंवा न येईल. असें साहेबीं चित्तांत आणून त्रिवर्ग शास्त्र्यांस आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. तरी वरदी शकर्ते महाराजांचे चरणस्मरण पुरःसर त्यांचीं पत्रें प्रधान पंतांपाशीं आणोन त्या करवीं लौकिक अगत्य करवावा. कां तरी क्रियापूर्वक पद पिंगळ्याचे प्रसंगोपात समय पाहोन अविवेकें करून घेतले असावें. वरकड सविस्तर आज्ञे प्रमाणें गोविंद दासो सांगतील तो भाव चित्तांस आणून निश्चय जो करणें तो करावा. एवंच ममतेच्या सांगण्यांतील व आज्ञापत्रांतील अर्थ सर्व आहे, तो साहेबीं सखाराम भगवंत यांचे विश्वासावर मशारनिल्हेच्या सिघराव रीतीनें दरम्यान मशारनिल्हेचे खातर जमे करितां आज्ञा केली आहे. तरी सर्व गोष्टी लिहिल्या प्रमाणें तुमच्या हातीं येऊन शपथ पुरःसर विनंतीपत्र आलेवर उभयतां तुम्हांपाशीं आज्ञेप्रमाणें येतील ते समयीं या तीन बाबिणें जाहाले वरी मग प्रगट करणें तें करावें. तीर्थ-

स्वरूप कैलासवा मातोश्री आईसाहेबांचे वेळेस यादी पाठ-
विल्या, त्या कलमाची झाड पिछाडी करून पाठविली, त्या अ-
लीकडे नवीनच यांणी हे निर्माण केलें. याज करितां हाली
यादि पाठविली आहे. त्यांत एक कलम न राहतां झाड पिछा-
डी करून देणें. या मागें त्यांणी बोलणेंतें निष्ठा दाखवून सखो
जनार्दन या पासून डोळे भरीन घेतलें, आणि कार्याची सुरत ना-
हीं. तेव्हां माघारे आणावयाशी महत् संकट प्राप्त झालें. त्या-
वेळीं तुम्ही गेले पासून ते म्हणत आले त्याच प्रमाणें आज्ञाप-
त्रें घेऊन गेला, परंतु त्याचा दस्तैवज एकही नाहीं. या क-
रितां पुरतें आगापिछा पाहून जें करणें तें करावें. तुम्ही जा-
तिवंत मराठे व आप्त या करितां तीर्थस्वरूप कैलासवासी
मातोश्री आईसाहेबांहीं तुमची रवानगी केली, तरी तुम्हांस
राज्याचा डाग न लागे असें खचित ध्यानांत आणून इतःपर जो
कर्तव्यता ती करणें. या उपर साहेबीं आज्ञापत्रें पाठवावीं
किंवा तुम्ही विनंतीपत्रें लिहावीं असें नाहीं. तरी एकवेळ लि-
हिलां, ते जहालेवरी तें ठेवून दुसरेंच कलम नवेंच निर्माण होतें
असें जाहलीयास स्पष्ट कायोम येणार नाहीं. वरकड चिरंजीव
राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार व महादेव शास्त्री लिहिली-
ल, व याच अन्वयें गोविंद दासी यांसी आज्ञा केली आहे.
आज्ञे प्रमाणें सांगतां कळेल. तुम्ही राजश्री सुभेदार यांसी
लिहिलें जे राज्याची बदलामी तुम्हांवरी येईल तरी शिघ्रतेनें
कर्तव्य ते करावें असें लिहिलें; तरी तुम्हांस आज्ञापत्रें निरवाळ-
स सादर आहेत त्या प्रमाणें खचित करून घेणें. इतःप-
र बदलामी तुम्हांकडे, हे समजून कार्य करून यशास पात्र
होणें, जाणिजे. रवाना छ ४ माहे रबिलाखर लेखन सि-
मा मोर्तब असे.

श्री.

## नंबर २० (पृ. ६५).

श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गा आईसाहेब यांणीं राजमान्य राजश्री आबाजी महादेव यांसी आज्ञा केली ऐसी-जे :— राजश्री रघुनाथराव पंडित प्रधान यांसी आज्ञापत्र सादर आहे, तरी ठाणें शिरोळ येथील बहुतच नाश करून बायका व हुजरे व पागे यांचीं घोडीं व शिलेदारांचीं घोडीं व चीजवस्त नेली. बायका थोराता कडे आहेत, त्यांस ताकीद करून बायका व घोडीं चीजवस्त हुजूर पाठवून देणें. तसेंच चिकोडी व मनोळी तालुके जुनें नवे गांव फूटगांव हुजूर नजर केले म्हणून प्रधानपंत यांचीं इमान पुरस्सर शपथपूर्वक विनंती पत्रें व करार मदाराच्या यादी हुजूर पाठविल्या. त्यातीरा निभावणी करणें आली याची माहितगिरी तुम्हांस आहेच. तरी त्या प्रमाणें प्रधानपंत यांसी सांगून दोन्ही ही तालुके व जुने नवे गांव व फूटगांव करारा प्रमाणें हुजूर येत तें करणें व शिरोळचे ठाणेदार यांजपासून कागद कर्दबा घेतले आहेत ते हुजूर पाठवून देणें. जाणिजे. सुहूर सन आर्बा सबैन मयाव अलूफ. रवाना छ. १६ माहे मोहोरम. बहुत काय लिहिणें. मोर्तब असे.

---

श्री.

## नंबर २१. (पृ. ६५).

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०० जयनाम संवत्सरे चैत्र शुद्ध ८ रविवासरे. क्षत्रियकुलावतंस राजश्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं समस्तराजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री रघुनाथराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे:- बहुत दिवस तुम्हांकडून विनंती पत्र ये-

ऊन वर्तमान श्रवण होत नाहीं. निरंतर विनंतीपत्र लिहून पाठ-वीत असावें. तुमचा मुक्काम कृष्णातिरीं जाहला म्हणून हुजूर स्वामीचे सेवेशीं निवेदन जाहलें. ऐश्यायास कृष्णे अलीकडे हुजूरचे प्रांतांत कही येऊन उपसर्ग जाहला. लष्करांत ताकीद होऊन प्रांतांत उपद्रव न होय तें करावें. हुजरोन कितेकार्थ आज्ञा करणें ते वकिली जाबसालास राजश्री नागो शामजी यांशीं आज्ञाकरून आपणाकडे पाठविले असतां कोणीं गैरवाका तुम्हांस समजाविला, यामुळें मशार निल्हेस तसदी तुम्हांकडोन जाहली, म्हणून स्वामीचे शेवेशीं हुजूर निवेदन जहालें. तुमचे वाडिलांची वर्तणूक कोणते प्रकारची होती, हल्लीं तुम्हीं करार मदारांच्या यादी शपथ पूर्वक वेदमूर्ति राजश्री महादेव शास्त्री फोंडेकर याजबरोबर पाठविल्या असतां अमर्यादा वर्तणूक स्वामीचे चरणापाशीं होऊं नये. वरकड मजकूर राजश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार यांशीं आज्ञा केली आहे. आज्ञेप्रमाणें राजश्री चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव यांशीं लिहितील. उभयतां मशारनिल्हे तुम्हांस सांगतील त्याजवरून कळून येईल, जाणिजे. बहुत लिहिणें तरी सुज्ञ असा. (यापुढें शिक्क्याचें मोर्तब असे).

---

## नंबर २२ (पृ. ६८)

महाराज बुलंददरजे शिवाजीराजे छत्रपति हाम-वारे खुषवक्त व कामयाब बाशद.

उबाहत व शौकत पन्हाहा एकबाल व इजलाल दस्त-गाह कुदवय राजहाय समूआल मकान

बाआदज इजहार इखियाक फिरावा मशहूद आंकी, येथील खुषी जाणोन आपली षादमानी हमेषा कलमी करीत यावें. दरिविलाखत मसरत नमत पाठविले तें पोहोंचून मजमून मालूम

झाला. अज्ञा बहिरजी नाइक गाइकवाड व बाळाजी विठ्ठल यांस पाठविलें आहे, फौजेच्या खर्चाबद्दल ऐवज पाठवावा, आम्हांहीं कूच करून त्या जिल्हेस यावें, असें करार केलें होतें, तरी पेशजीं येथून भारी फौज बंकापूर जिल्ह्यास रवाना करून पाठविले असतां बाराभाई यांजकडील पांडुरंग घेकी वगैरे फौजे सुद्धां सावनूरीवर येऊन नमूद झाले. या करितां लढाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पांडुरंग घेकी वगैरे सरदार पाडाव आले. (हा) मजकूर आपणासही मालूम झाला असेल. हल्लीं ही येथून भारी फौज रवाना करून पाठविली असे. आम्ही ही निघावयाची तयारी करविली होती. मोहरमच्या आखुर नजदीक पोंचल्याजकरितां महकूब झाली. इनशाह अल्ला हता अग्रा बाआदज आखुरा कूच करून अनकरीब त्या जिल्हेस येत असों. आपणाकडून आले बहिरजी गायकवाड व बाळाजी विठ्ठल अर्कापुरास बाजीराव बर्वे कडे येऊन पोंचले. येथून ऐवज आपणाकडे पाठवावा, तर ऐवज घेऊन आपल्याबद्दल येथून इतबारी मजाम गाडावाट जाणणार दोनतीनशें स्वारांस बंकापुरास पाठवून द्यावे. म्हणजे त्यांचे स्वारां बरोबर ऐवज देऊन आपणाकडे पाठवील असों. आपण तेथें भारी फौजेचा जमाव करून तिकडे बाराभाई यांचे फौजेस खूब तंबीह करीत जावें. आणि तिकडील मुलूख ही मारून [illegible] करीत जावें. इनक्यांत आम्ही ही भारी फौज व भारी तोफखाना सुद्धां अनकरीब येत असों. हमेशा आपली खुशखबरी कळवीत यावें. ज्यादा लिहिणें काय असे. हे किताबत.

पेशस्तर छ. २०, माह मोहरम सुरसन सबा सब्यान अलूफ सन ११८६ फसली. मु. पन्हाळा.

## नंबर २३ (पृ. ६८)

राव अज्जम यशवंतराव शिंदे सरसुभेदार
दाम मोहबतहूं

मोहोबत व मुवदत पन्हाहा खुलत व मवकत् दस्तगाहा.

बा-आदज इश्तियाक फिरावा मशाहूद आंकी, येथील खुषी जाणोन आपली षादमानी हमेषा कलमी करीत आलें पाहिजे. दरिंविलाखत पाठविलें ते पोहोंचून मजमून मालूम जहाला. अज्जम वहिरजी नाईक गायकवाड व बाबाजी विठ्ठल यांस पाठविलें आहे. फौजेच्या खर्ची बद्दल ऐवज पाठवावा, व आम्हीही कुच करून त्या जिल्हेस यावें असें कलमी केलें होतें. तरी पेशजी येथून भारी फौज वंकापूर जिल्हेस रवाना करून पाठविले असतां बाराभाई यांजकडील पांडुरंग शेकी वगैरे फौजेसुद्धां सावनोरवर येऊन नमूद झाले.

बाकी मजकूर नंबर २२ प्रमाणें.

## नंबर २४ (पृ. ६९)

महाराजगी राणी दुर्गा आऊसाहेब दाम षगफतहूं.

असमत पन्हाहा ईफत दस्तगाहा मुषफिक मेहेरबान करम फर्माय जीशान बुलंद मकान.

बाआदज इजहार मरातीब नियाज मषहूद आकि, येथील खुषी जाणोन आपली शादमानी कलमी करवून दिल अराम करवीत असावें. दिगर तेथें भारी फौजेचा जथ करविल्याचा मजकूर, व ऐवजा करितां स्वार पाठविले आहेत, ऐवज रवाना करून पाठवावा, म्हणून अज्जम यशवंतराव शिंदे सरसुभेदार यांणीं लिहिलें होतें, आणि राव अज्जम बाजीराव बरवे यांणीं पैहम कलमी केल्यावरून ऐवज रवाना करून पाठ-

विणें जरूर जाणून हाल्लीं एक लाख रुपयेस, दर साबनुरीस साडेतीन रुपये प्रमाणें अठ्ठावीस हजार पांचशेंहें सत्तर होन स्वारांबरोबर पाठविले आहेत. पोहोंचल्याचे मजकुरास निगारिष केलें पाहिजे. भारी फौज अथवा विता ताबड तोब करून मातबर काम करावें. दिरंगाईवर घालतीयास मनसबा तूल दराजावर जात आहे. भारी फौज अथली असतां रामचंद्र गणेश जूज फौजे निशीं नजीक असून त्यांस गारत करणेची पयरवी कां सबब केली नाहीं त्याचा सबब मालूम न झाला. आताही रामचंद्र गणेश वगैरे फौज आटोक्यांत येते असेल तर सरसुभेदार यांस सांगून ते फौज गारत जलद होयसें करवावें. अगर ते फौज आटोक्यात येत नसेल तर दरोबस्त अथले फौजे सुद्धां सरसुभेदार यांस धारवाडचे सुमारास पाठविणें म्हणजे धारवाड नजीक येथील फौज आहे. हरदू फौजा सामील होऊन मरवालीफास गारत करतील. आम्ही ही छ० २५ मोहोरम पट्टणाहून कुचकरून पेशखानेस दाखल झालों. अनकरीब मजल दरमजल धारवाड जिल्हेस येत असों. सरसुभेदार यांची आमची मुलाकात होऊन तर्फनचे मसलतीनें मरवालीफांस जरब द्यावयाची पेरवी केली जाईल. हरदो फौजा मिळाल्यावर खातरखा मनसुबा हुजरात येईल. इतक्यावरी दिरंग करणें हरगीज मसलत नाहीं. अग्राख सदरहू लिहिल्या प्रमाणें रामचंद्र गणेशास तंबीह होऊं शकेल तर तें काम करवावें. तो मजकूर अटोक्यांत येत नसेल तर सरसुभेदार यांची रवानगी जलद केली पाहिजे. ये बाबें सरसुभेदार यांस लिहिलें असे बाकी मरातीब वकील आनंदराव यांचे जबानी मालूम होईल. नाव अज्जम नाजीराव यांणीं ही लिहिलें आहे, त्यांवरून आया होईल. हमेषा आपणांकडील खुष-

खबर निगारीस आहून दिलशाद करीत असावें. जादा काय लि-
हिणें हे किताबत.

पैवस्तो छ. २२ सफर सूरसन सब्बा सबैन मय्या-
व अलूफ. मुकाम किल्ले पन्हाळा.

नंबर २५. (पृ. ६१).

राव अज्जम यशवंतराव शिंदे सरसुभेदार
दाम मोहोबत हूं.

मोहोदत व सुवदत पन्हाहा खुलुल व मवाफत दस्त
गाहा.

बाआदज इस्तियात मुलाकात मषहूद आंकी, येथी
खुषीजाणोन आपली शादमानी हमेषा कलमी करीत यावें. दरी
विलारवत पाठविले ते पोहोंचून व आनंदराव वकिलाचे अर्जी वरून
न मुफसील मजमून मालूम झाला. तेथे भारी फौज जमा झा-
ली आहे, खर्चासही ऐवज पाठवून द्यावा, आम्ही ही कुचकरून
यावें, म्हणून मुफसील कलमी केलें होतें, तरी तेथील फौजेचा
खर्च बंकापुराहून एक लाख रुपयांचा ऐवज तेथून आले स्वारांब-
रोबर पाठविला असे. तो हाल पोंचला असेल. आम्ही ही भा-
री फौज व भारी तोफखाना सुद्धां पट्टणाहून कुच करून वीस
कोशांवर येऊन पोंचलों कूच दरकूच अनकरीब त्या जिल्ह्यास ये-
ऊन पोहोंचत असों. हुबलीत सरकारची फौज ठेविली होती.
फौजवाले परशुराम पेकी उगरगोला पाशी उतरले असतां
त्यावरी चालून जाऊन शबखून केले. सरकारचे फौजेतून आरवां-
चा मारझाला: याजकरितां उरूं न सकतां परशराम पेकीची फौ-
ज दाणादाण होऊन फरारी झाली. सरकारचे फौजेचे लोकांनी
पेकी मजकूर उतरले स्थळ लुटोन तीन चार शे घोडे, वीस तीस
स उंट व बाहेरचे बैल वगैरे दोनतीन हजार मवाषी सह लुटोन घे-

घेऊन परतोन हुबळीस येऊन पोंचले. हुबळीस सरकारची फौज गुजरली आहे. त्याचे मुकाबिलेस परशराम पेकी ठरत नाहीं. तिकडे फरारी होऊन आला आहे. अशास तेथें भारी फौज जमा केल्या बादज शिबंदी वढत जाते. फौजेचे लोकांस खाली बराबेत्याने काम नाहीं फौजेचे लोकांस खर्च वेगास देऊन गजावंदी करून तिकडे रामचंद्र गणेशाची तंबीह तुम्हांकडोन होत असलिया त्यावरी चालोन जाऊन तंबीह पोहोंचून त्याचा पाय तेथून उखडे असे करविणें. अगर रामचंद्र गणेशाची फिकिरी तूर्त होत नसलिया इकडोन परशराम पेकी फरारी होऊन मुनवली वगैरे कडे आला आहे. त्याची कामराही फौज ही रहशात खावोन रागादाण झाली आहे. वक्त काबूचा आहे. परशराम पेकीची तरी तंबीह होत असे करवावें. हुतक्यांत अनकरीब स्वामी स्वारीही येऊन पोहोंचत आहे. बा आदज मुनासीब तजवीज करणें ती केली जाईल. तवलग जमा झालेल्या फौजेस खाली न ठेविता इकडे रामचंद्र गणेशाची तंबी तरी, अगर इकडे परशराम पेकीची फिकीर तरी करीत आले पाहिजे. हमेषा आपली षादमानी कलमी करावे. ज्यादा लिहिणे काय? रवाना छ. ८ सफर.

पेवस्ती छ. १० रबिलावल खूरसन मय्या मय्यैन अशाय अलूफ. मुकाम पन्हाळा.

---

## नंबर २६ (पृ. ६९).

जी शान बुलंद मकान नवाब बहादर राजे आफजुबाद.

धु दौलत व एकबाल पन्हाहा इजलास दस्तगाह. अर्जाजानी बसादी कुल ए खलास यशवंतराव शिंदे सरसु- १ भेदार बा आदज इबराज मरातीब ए खलास मशाहूद जमीर अु-

एक तरखमीर गर्दानीद मे. आयदके दरीविला आयकबालपनाहां-
नी खत खुष नमत मरसूल केले ते नेकनजी पोहोंचून कल-
मी केला मजमून बयाबार मालूम होऊन बिषयार खुषवक्ती
हासील झाली. आ एकबाल पनाहांचे येणें या जिल्हेस अ-
नकरीब भारी फौज व तोफखाना सुद्धां व्हावें. फौजेचे खर्चा-
बद्दल ऐवज येऊन पोहोंचावा. बई सबब पंदरणें तीर्थस्वरूप
महाराज मातुश्री धणी साहेबांनीं व महाराजांनीं कलमी करून
पाठवीत असतां जवाब बासवाब निविस्तबूदके येथून भारी
फौज रवाना करून पाठविली असे. व आ एकबाल पनाहांची
तयारी करविली असतां मोहोरमचा आखुराजदीक पोहोंचला.
बई सबब तहकूब झाली. इनशाह अल्ला हता अलाबाद आ-
खुरा कूच करून अनकरीब त्या जिल्हेस येत असों. ऐवज घेऊ-
न जावया बद्दल येथून इतबारी मजा मराहबाट जाणणारे दोनशें
स्वार बंकापुरास पाठवून द्यावे म्हणून कलमी केल्यावरून श्रीम-
न्महाराज धणी साहेब खुशाखिब खुशाली फरमाद जाहली. अ-
खास आखुरातम होतांच आ एकबाल पनाहांनीं भारी फौज व तो-
फखाना सुद्धां खुद कूच दरकूच जलदीनें बंकापुरास यावयाचें क-
रावें. अज्जम बाजीराव बरवे यांजकडे कित्येक पोषीदा मसल-
तीचे मजमूनावास्ते अज्जम राघो विठ्ठल यांस फिरस्ताद केले अ-
सत. त्या हमराह दोनशें स्वार देऊन पाठविले असत. तरी तेथें ये-
ऊन पोहोंचतांच जूददर खर्चाची मदत इमदाद पोक्त ऐवज देऊन
रवाना करून पाठवावे. मसलतीचा वक्त हाच आहे अशास आं-
एकबाल पनाहांनीं बा फौज येऊन पोहोंचावें. हुजूरचे फौजेचा ग-
थ आहे. हरदू इत्तिफाक पडून फितुरियांस तंबीह पोहोंचून दिख-
खनाह मसलत हासील होतील. बारीषचे रोज नजदीक न पोहों-
चले तों आ एकबालपनाहांचें येणें होऊन मसलत हासील होईल
तों अर्थ करावा. हरएक बाबें आपला खातर जमा बरकरार राखो

न यावया विषयींचा अंदेशा खातरेंत न आणितां जूद आएक बाळ पनाहानीं या जिल्हेस तसरीफ फरमवावी. जियादय बजूज न्होकिचे निगास्त आयद आयाम कामरानी मुदाम बाद.

नंबर २७. (पृ. ६९).

फयुजात इलाही व तवज्यहात नामत न्हाही शामिल हाल फररबुंद म आल.

खान अजी सुशान. नबाव हैदर अली खां बाहादर राज आफजुबाद.

अजीसीब महाराजगीराणी दुर्गाआऊ साहेब बा आदज दुवा आंकी, दरिविला छ. १८ शाबानचे खतपत्रीं त्या जिल्हेचीं काजकार्ये फैसल जहाली याचा मजमून कलमी केल्यावरून व अज्जम बाजीराव गोविंद व आबाजी महादेव यांनीं मुफसील इरकाम केला, मनालीव जाहिरीस पोंचून खुषवक्ती रुयदाद जाहली. तिकडील मुकदमा फैसल होऊन या जिल्हेस रवाना जाहली. आ दौलतमंद भारी फौज व भारी तोफखाना सुद्धां गनकरीब कूच दरकूच येत असों. अशावक्ती हुजूरची फौज येऊन सामील व्हावी, व खर्चासही येऊन पोंहोंचेल म्हणून बयावार कलमी केलें होतें. पेशअजीं बदां गाजीब इरकामे केल्या मवाफिक तेच वक्ती मातबर फौजेचे सरदारास आज्ञापत्रें सादर करून नालबंदीकरितां कारकून आणविले, मवाफिक पैदरपे येऊन दखल झाले आहेत. नालबंदी होवोन भारी फौजेचा गाहा होत आहे. पुरंधराकडून महादजी शिंदे बाफौज या तर्फेच्या मसलहाती करितां छावणीचा इरादा धरून रहिमतपुरानजीक उतरले आहेत. बाआदज दसरा दरपेश येणार, त्याचे पारपत्यास हुजूर भारी फौजेचा जथ राखिला पाहिजे. येथील बंदोबस्ती मुस्तकीम राहून अज्जम सटवोजी भोंसले याहमराह

फौज देऊन आदोलनमंदाकडे फिरिस्ताद करणेची तरतुद झा-
ली आहे. अनकरीब याफौज [illegible] जिल्हेस घेऊन दाखल होत आ-
हेत. खाम आंकी मातबर फौजेस भारी खर्च देणे लागतो, हा
अर्थ आदोलन मदास माहूम आहेच. [illegible] फौज घेऊन रशीद
झाला असल्या तरी इतके रोज दिरंगा [illegible] सिरफआत व-
रसात वख्त अखेरीस पोहोचला. फौजचा गाढा भारी होत आहे.
अशा वख्ती याना सर्वाची मदत इमदाद घेऊन पोहोचावी. बंदा-
जीबा दिलखाह कामकामे हासील होऊन येतील. मकदुरास फौजे-
ची इमदाद न पोहोचली तो गाठ घालोन दरबिदर कोशियान
अवसान असणार नाही. [illegible]म रघुनाथराव पंडित यांची
स्थापना दौलतीवर व्हावी, हा रख [illegible] ओदोलत मदांचा आहे. त्या-
पेक्षां जियादतर महाराजांचा [illegible] आहे. बंदाजीब हासील
होऊन नामनामोष जाहिरीस पोचते करावें. बाजे कितेक मु-
फसील मवाफिक हुकूमकयकुलमरहमत्यवावंतराव शिंदे सरसुभेदार
कलमी करतील त्या वरून माहूम होईल.

---

## नंबर २८ (पृ. ६९).

जीशान बुलंद मकान नवाब बहादर रोज
अफजुबाद.

छु दौलत व एकबाल पनाहा इजलाल दस्तगाह.

अजी ज्यानीब सादा कुंद एकलास यशवंतराव शिंदे स-
रसुभेदार बाआदज इबराज मरातिब एकलास मवाहूद जमीर
लुफ्त तरखमीर गर्दानीद मे आयदके आ एकबाल पनाहानीं पे-
शजीचें खतपत्रीं वीस पंचवीस हजार फौजेची कुमक जल्दीनें या
जिल्हेस रवाना करून फिरिस्ताद करतो, वई सबब कलमी करून
पाठविल्यास अजी एक माहे पर्यंत गुजरत आला असोन लाहाल या
तर्फेस कुमक रसीद न जाहला. बावजूद ये बाबेची हरिजारी अ-

-नहद आफजूं जाणोन आएकबाल पनाहानीं कलमी केल्या ब-
मोजीब शिंदे मजकुराशीं मनलबी सलूखाचा पैगाम लावून अ-
जीलग रोज कांटीत आणिले आहेत. महादजी शिंद्याची निक-
ड भारी आणि मोर्चे नजीक पोहोंचले असून कोट करविरांतील स-
रदारानीं व शमशेर बहादूरांनीं हिम्मत मुस्तकीम धरून दररो-
ज लढाई बेधतर करीत आहेत. आणि कोट मजकुराची उस्त-
वारी मजबुदीनें करून खबरदारीनें राखीत आणिले आहे.
आएकबाल पनाहा कडील फौजेची कुमक जलदीनें येऊन र-
सीद होने हा खातरजमा मुस्तकीम राखून आज तागायत श-
ह राखीत आलों असोन हनोज ये बाबेची पैरवी खातरेंत
आणोन मसलहातीची पैरवीची तरदूद अनकरीब जाहिरीस
न पोहोंचली. बावजूद अज्जम बाजीराव यांणीं इजानि-
बास खतपत्रीं आएक बालपनाहा कडील पुस्तपनाहाचा मु-
फसील मजमून इरकाम केला तो जाहिरीस पोहोंचोन बेधतर
खुषवक्ती हांसील जाहली. अजीतान बरसालग आएक
बालपनाहाचा तमाम चजे हय आतिबार धरिला असोन अ-
सा मुष्किल वक्त श्रीमन्महाराज धणी साहेब यांच्या राज्या-
वरी गुजरला आहे. हा दिल निशीं जाणून आजादिल व ज्या-
न कोशीष करून इमदाद केली पाहिजे. फिलहाल पांच हजार
स्वार व दहा हजार बारच्याच्या तोफा सामानगड शाल बिल-
क आता एक दो गजांत अज्जम टिपुमिया या हमराव देऊ-
न बाजीराव देखील या जिल्हेस रवाना होणार, बाई सबबम-
जार गिन्हेनीं कलमी केलें त्यास अजी चारदहा रोज झाले.
ईतके रोजांत जलदीनें दरमजल रवाना होऊन आली असेल.
या इतिजारी बेधतर जाणोन कलमी केलें असे. तरी या उप-
र गुजर खवाही हरगीज न करितां बिलाहुजूर फौजेची कुम-
क रवाना करून फिरस्ताद केली पाहिजे. जियादये बजूज

शेकचे निगाल आयद आथाम कामगानी मुदामबाद.
सूर समान सेन्बेन मय्याव अलफ.

---

नंबर २९ (पृ. ७२).

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेशीं

विनंति सेवक परशराम रामचंद्र कृतानेक विज्ञापनः
तागायत छ. २२ माहे जमादिलावल मुक्काम नर्गीक गोकाक ये-
थें स्वामीच्या कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थि-
त असे. विशेष:- स्वामींनी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर
केलेंतें भविष्ट होऊन सनाथ जाहालों. तेथें आज्ञा की, नोरगल
तालुका व करकोळ तालुका व वरकड सरकार तालुके तिकडे आ-
हेत त्यास उपद्रव न होय असे विशीं फौजेंत ताकीद करणें म्हणो-
न आज्ञा. ऐशीयासी आज्ञे प्रमाणें फौजेंत ताकीद करून उप-
द्रव लागूं दिला नाहीं. बन्नूर व करकोळ येथील कारकून अ-
मर्यादा करीत आले. राजश्री लक्ष्मणराव शिंदे यांचे ही ऐकेना-
त. याजकरितां कारकुनांचें पारिपत्य केलें. राजश्री लक्ष्मणरा-
व शिंदे याजकडून राजश्री मुरारजी भोसले आले तेव्हां बन्नू-
रचें ठाणें मशार निल्हेच्या हवालीं केलें. करकोळच्या ठाण्याचा
बंदोबस्त केला आहे. वरकड आज्ञेप्रमाणें सरकार तालुक्यास
उपसर्ग तिळमात्र लागला नाहीं. मनोळी तालुका सावकारास
लावून दिल्हा. त्याणीं स्वामीच्या आज्ञेवरून ऐवजाचा भरणा क-
रून दिला असतां राजश्री सरफोजी भोसले याणीं हैदर खाना-
च्या गडबडीच्या संधीत ठाणें घेतलें आहे. त्यास ताकीद होऊ-
न सावकाराचे स्वाधीन होय असें जहालें पाहिजे. नमेन हुके-
रीचें ठाणें मशारनिल्हेंनी घेतलें आहे ऐशीयास त्यास ताकीद

द होऊन सावकारानीं गांव सावकाराकडे देवविले पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. सेवेसी छ० ३९ माहे जमादिलावल सन सम्मानीन मय्याव अल्लफ.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

नंबर ३० (पृ० ७२).

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामीचे सेवेशीं.

विनंति सेवक परशराम रामचंद्र कृतानेक विज्ञापना तागायत छ० ६ जमादिलाखर मुक्काम आर्किवाट कृष्णा दक्षिण तीर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष :- स्वामींनी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केलें तेथें आज्ञा जे, हुक्केरी व मनोळी प्रांत व फुटगांव हुजूर यावे, या अर्थी वकील पाठविले आहेत, त्यांचें बोलणें लागलें आहे, तरी तालुक्यास उपसर्ग न लागे तें करावें, म्हणोन आज्ञा; ऐशियास मनोळी व हुक्केरी वगैरे गांव खंडी सावकाराकडील स्वामींनीच सावकाराकडे देविली असतां, दरम्यान प्रभू राजश्री सरदेसाई भोसले वगैरे यांणी घेतली होती. सावकाराची उगवणी झाली पाहिजे. यास्तव हुक्केरी, दोंडूर वगैरे गांव सावकाराकडे घेऊन दिले. गडहिंग्लज वगैरे गांव घोरपडे यांजकडील पुरातनपासून होते, ते आलीकडे सामानगडकरांनी घेतले होते, ते त्यांस घेऊन दिल्हे, आणि आर्किवाटास आलों. तेथें यावयाचें कारण स्वामी म्हणतील, गडीयास यांणी वाटा फार मारिल्या, वाणी, उदमी यांचे बैल वळून आणावे, कुरुंदवाड वगैरे स्वामीच्या गांवांस बहुतच उपद्रव दिल्हा, उपद्रवामुळें त्रास पडल्या; स्वामीची आज्ञा या अन्यथा कदापि होणार नाहीं. दरम्यान आले-

शिवाय उपद्रव करितात असें लिहून आलें. या करितां या मुक्का-
मास आलों आहों. पुढें याचा बंदोबस्त करितां गोरे ...
के सोडविण्याचें योजणें लागलें, उत्तम आहे. तेथें दगा झाईल
त्या अन्वयें सावकार वर्तणूक करतील. शेवटीं विदीत होय हे
विज्ञापना. पैवस्ती छ० ९ माहे जमादिलाखर सन् सम्मानीन
मय्यातैन अल्लफ. मुक्काम पन्हाळा.

---

नंबर ३१. (पृ० ७७).

श्रीमन्महाराज राजासाहेब शिवाजी छत्रपति
एक बाल पन्हाई.

(छु शाहामत व एकबाल पनाहा बिसालत व इजला-
स दस्तगाहा:-

मेहेर की बजर राबर्ट इनशा दस्कायर तसलिमात व
कुरनिशात बा आदज शौक मशाहूद आंकी, शाहामत पन्हाहा
साहेबीं मेहेरबानगी करून किताबत फर्माविली ती रसीद होऊन
खुशीहासल जाहली. बिनायार रोज गुजर जाले असतां इंजान-
बे किताबत कलम करून जास्तुरा समागमें फिरिस्ताद केले, ती उ-
जूर रसीद झालीच असेल. फिलहाल एक बाल पन्हाहाचे खता-
मध्यें फर्माविले जे भोसले (वाडीकर) वगैरे सरदार महाराज
राज्याचे सेवक कदीम खिजमत करीत असतां हाली कमानी क-
रून महाराजापाशीं अमर्यादेस प्रवर्तले आहेत. त्यास तंबीह
करणें हें जरूर असें शाहामत पन्हाहाचे खतावरून जाहीर झा-
लें. हजरत महाराज राजा साहेबांचें पुरातन संस्थान, गावशी
हर कोणी दे दिल करून इमान चुकलें, यांत यश कधीं पावों-
णार नाहीं; हा खातर निशा असावी. ते विशीं आमचा इंजा-
ने बास जरूर होऊन सावत भोसले यास खलकलम करून वाडी-
स जासूद रवाना केले ते विशींचा मजकूर जबाब साफ कलम

करावा, तो सर्व ऐखलासमंद यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार यांचे किताबती संबंधें कलम करून से मुफसील अर्ज करितां मालूम होईल. बाकी इजानिबाचें हातीं होणें, हुजरन महाराज साहेबांचें काजकाम होणें त्यास हजीर आहों.

रवाना छ. ७ माहे सन ११८२ सन १७८२ हिजरी

किताबत पंचस्ती छ. ४ माहे साफर इसन्ने र. मानीन मयाव अलूफ. मुक्काम करवीर.

---

## नंबर ३२ (पृ. ७७).

अर्जम यशवंतराव शिंदे सेनासाहेब सरसुभेदार सलम उल्ला उताला.

(छ) शाहामत व एक बालपनाहा बिसालत व इजलाल दस्तगाहा:–

बुलंद मकान रावरईनशा इस्कायर बा आदज शौक मश्हूद आंकी, येथील नेकी जाणून एखलास मंदाई आपणाकडील शाहभानी कलमनविसा करीत गेलें पाहिजे. दिगर एखलास मंदाई खत जासुधा समागमें फिरस्ताद केलें, तें रशीद होऊन कथर्शी केलेला मजकूर बयानवार मालूम झाला. पेशजी इजानेब कोल्हापूर मुक्कामीं असतां कितीएक काजकामें मुकरार करून एखलास मंदाई माधवथली यांशी सुरतेशीं रवाना केला. त्यास अद्याप घर इजानिबाचें खत वकिलापाशीं पाठविलें तें दिल्हें नाहीं. एकदभा करार केला तो कायेसी आला नाहीं येणें करून काय म्हणावें. हाल्ली एखलास मंदाई कलम केलें जे खुदायवंद ज्या हामत आनराबल कंपनीचें वेणें गेवजान्या निशा करून देतों म्हणून खत फिरिस्तार केलें. पुण्यांचे सावकार गुजारथीनें इजानिबाचे सरकारचे ऐवजाचा निशा करितां याशी मुकरर सावकार यांचीं नावनिशी

कलम करून पाठविला. त्यांत मयाफीक इंज्यानिबाचे खातर जमेची खिदी आणून देतों म्हणून लिहिलें, ते विशींचा मजकूर मशाहुरल दादाजी यादव यांचें किताबती मध्यें कलम केला असे; सर्व एरखलास मंदास जाहीर करील. किल्ले रांगणें विशीं अजम सावंत भोंसले यांशीं जे रीती कलमे करावें ते रीतीनें लिहून खत जासुदा समागमें वाडीस रवाना केले आहे.' तेथें नशीद खताची नक्कल हाली मशाहुरल दादाजी यादव याचे खतांत जात असे. सावंत मजकुराकडून जबाब येतांच एरखलास मंदाकडे रवाना करून देतों. सुरतेहून आनंदी बाईचा निरोप एरखलास मंदाशीं आला. सवाई बाजीराव यांशीं परेबाईची वस्त्रें द्यावीं त्याशीं एकबाल पन्हाहा महाराज धणी साहेबांचे चित्तीं इंजानिबाचे गुजारतीनें देणें म्हणून लिहिलें त्या वरून आम्ही बहूत खुषी झालों. जे हजरत महाराज राजा साहेबांचे रीतीरिवाज आहेत त्यास आम्ही राजी आहों. आमचे हातीं होणार त्यास अंतर करणार नाहीं. घोडेचे मजकुरा विशीं लिहिलें ते विशीं याद असते, कांहीं अगाध नाहीं. थोडकीच गोष्ट आहे. मजा मवाफीक बरा पाहिजे, खातर निशा असावी. दिगर एरखलास मंदाकडून हुजूर गोवेंत हजरत इस्ताद फिरंगी यांजकडे काजकामाबद्दल आले होते. तेही इंजानबाचे भेटीस एकदोन दफा-ती आले, त्यांची भेट झाली. ते चौ दुसरे दिवशीं फिरंगी यांस दाखल झाले. जे इंजानिबाचे भेटीशी हुजूर येतात जातात, म्हणून कांहीं मनामध्यें असंख्याती असल हकीकत इंजानेबास परस्परें मालूम झाली. ते नंतर हुजरे यांशीं आज्ञा केली जे. गचीचे येऊन भेटून जावें म्हणून काजे इंजानिबास ते गोष्टीचें कांहीं नाहीं. परंतु एरखलासमंदाचे काजकामाबद्दल त्याकडे आलेले इंजानेबांस भेटतां पुढें संख्या धरून एरखलासमंदाचे कामास खोटी होईल. यास्तव फार करून त्या कडे कोणी चाला कांहीं

मनास आणिली. हुजूर आले समयीं इंजानिबास दस्तऌ झालें नाहीं, कांजे आम्हीं ते दिवशीं जहाजावरी कांहीं कामा करितां गेलों होतों. ते मुलाकत नसतां जाउणी गेले. त्यावर तो गुन्हा नाहीं. एक्वलास मंदास जाहीर होणें वास्ता कलमी केला. ज्यादा काय कलमी करावें, प्यार मोहोबत असो देणें. रवाना छ. ७ अनरे सन १७८२ इजरी विस्त्री हे किलावत.

---

नंबर ३३ (पृ. ७७).

नबाब हैदरअली खां बहाद्दर ग्यादकाम

व मलाजी आलमराम बादाद्.

ॐ अमारत व अयालत मर्तबत शौकत व इशामत मजीलत रवान अर्जी मुद्यान:—

बाआदज इखलीयाक फिरावा मशाहूद आंकी, येथील खेरे अर्फायल जाणोन आ अमारत पनाहा कडील खेरियत कलमी करून शादमानी रुयदाद होय ते केले पाहिजे. दरिविला आ अमारत पनाहाकडून अज्जम परशराम बल्लाळ व आनंदराव त्र्यंबकेश व राघोविठ्ठल व बाळाजी विठ्ठल या हमराह खत खुपनमत बमय एफजंजीरफिल व जवाहीर वखील आत पारचे बरहुकूम याददास्त इरसाल केले, ते इंतिजार समयीं पोहोंचून कलमी केला मतालीब मुफसील जाहिरीस पोंचला, व जबानी रूबरू मशार निल्हे याणीं राजकारणाचा मजमून मुफसील पोशिदा अर्ज केल्यावरून बिरादराय खुषवक्ती हांसील जाहली. इनशा अल्ला हुला आला दसरा होतांच आ अमारत पन्हाहा बमे भारी फौजे निशीं त्या जिल्हेस थेत असों. इखवदील खवाहा मतालीब हांशील होतील, म्हणून बयांवार कलमी केले ते मालूम जाहलें. पेश-

अजीं आ अमारत पनाहाचे येणें त्रेमे तोफखाना भारी फौजेनिशीं तुंगभद्रा पार होतांच, मजल दरमजल कूच करून दरपेश आलों असतां म्हणजे दिलखवाह मतालीब कार सुरत पजीर होऊन रम्हा काजकामें हासील जाहलें असतां, बरसातचे बारिशीच्या जोरामुळे साधारे कूच करून गेलों. फिलहाल मसलहातीचे रोज अनकरीब येऊन पोंचतील. दरीं नजदीककीं आ अमारत पनाहानीं दसऱ्याचे मुहूर्तें कूच करून दरमजल तुंगभद्रापार होऊन जलदीनें या जिल्हेस येऊन पोहोंचावें हेंच होतेनारी आजन्द् आरजू आपला मुद अमदन काफिरत. अज्जाम रघुनाथराव पंडित यांची स्थापना स्वस्थळास करावी. हा इरादा हरदू तर्फेनें बेशतर आहे. बई सबब आ अमारत पनाहाचें येणें या तर्फेस भारी फौज व तोफखाना सुद्धां जाहलीयानें महाराजांचा व आ अमारत पनाहाचा इतिफाक होतांच बारभाईस तंबीह पोहोंचून पंडित मशारूर इलें यांची स्थापना केली जाईल; व बेशतर मसलहातीची काजकामें घडून येतील. ये बाबेचा कित्येक मुफसील हुकूम फर्मावणें तो कयकुल मरहमत यशवंतराव शिंदे सरलष्कर यांस फर्माविला आहे. सताबीक हुकूम अमली करतील, त्या वरून मालूम होईल. त्या मवाफीक कार सुरत पजीर होऊन आ अमारत पनाहाचें आमदन या जिल्हेस जलदीनें होय तें करावें. जियादयेचे निगारष आयद. अय्याम बक्काम शादमानीमुदामबाद. रवाना छ. १९ शाबान. सन आर्बा सब्बैन मयाव अलफ.

---

## नंबर ३४ (पृ. २०).

श्रीमन्महाराजबुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति हमवार खुषवक्त व कामयाब बाशद्.

उबहत व शौकत पन्हा एकबाल व इजलास दस्त-

गाह. कुदरत्य राजश्री समूअल मकान :-

बा आदज इजहार इत्तियाक फिराचा मराहूद आं-
की, येथील खुषी जाणून आपला आदमानी कलमी करीत यावें.
दरिविशा आपण खत पाठविलें तें पोहोचून मजमून मालूम जा-
हाला. आपल्या कुमकेस फौज ही रवाना करावी, खर्चास ही
पाठवावें असें लिहिलें होतें. तरी पेशजी कोल्हापुरांत फौजजमा झाली त्यावक्तीं सरकार-
फौजेसहीत बाजीरावही हुजुरींचे रोखेस होते. सरकारचे फौजेस आ-
पली फौज येऊन सामील झाली असती या बहुताद कामाची
सरबराई होत होती. त्या प्रमाणें इत्तिफाक झालें नाहीं. आतां-
ही आपणांपाशी फौज आहे ती आहे आणखी फौजेचा जमा-
व करणेचा करावा. येथून भारी फौज व भारी तोफखाना बंका-
पूरचे रोखेस रवाना करून पाठविलें असो. आपणाकडील फौ-
जे सुद्धां यशवंतराव शिंदे बंकापूरचे रोखेस येऊन सरकारचे
फौजेस सामील जाहली यास आपले फौजेस खर्चासही पोचेल.
आणि सरकारची व आपली फौज इत्तिफाक जहाल्याबादज हरी-
पंत फडके शिरहदी कडे आला आहे, त्याचे तंबीह सहजात
होईल. या प्रमाणें कोलिया मरवालिफांचे तंबीही होत आहे.
अगर नाहीं तर दिल फैल तेथें जमाव झाला आहे ते फौजे पैकीं
एक हजार स्वार तेथें ठेवून घेऊन बाकी फौजेस बंकापुराकडे
सरकारचे फौजेस शरीक होत असे पाठविली पाहिजे, बेहेतर
असे. येथून ऐवजाचा सरंजाम करून कोल्हापुरास पाठवून दे-
ऊ. तेथें आणखी फौजेचा जमाव करावा. खुलुस जे कीं
शिवजन बाराभाई यांची तंबीह व्हावी. आणि रावसाहेब मे-
हेरबान रघुनाथरावजी यांची स्थापना व्हावी. हेंच आमचेंही
खुषीचें काम आहे. आपणास ही हें काम जरूर आहे. हें
काम इनसराम झाल्या बादज आपलें ही काम बहुत घडोन ये-
ईल. या वास्ते कोणवजे तरहूद करावी. त्या प्रमाणें भारी फौजे-

च्या जमाव करून पोक्त मसलत ठरवून त्या मजकुरास लिहून पाठविणें. तेथें जमा झाल्या फौजेस इकडील खर्चास पोहोंचवि- ले आईल. कोणे वाल्या अंदेशा न करितां खातरजमे कडोन बाळाभाई यांची तंबीह व रावयोसुफ यांची स्थापना होय अ- शी पैरवी करीत जावें. बाकी मजकूर बाजीराव व आबाजी महादेव लिहिले आहेत त्यावरून मालूम होईल. आपणाक- डील बहीरजी गायकवाड व बाळाजी विठ्ठल आहेत त्यासही जे काय मरातब सांगणेचा सांगितला आहे. त्यांणी लिहि- लील त्यावरून मालूम होईल. हमेशा आपली ग्राह्मानी क- लमी करीत यावें. ज्यादा लिहिणें काय असे हे कितावत.

पेवेस्ती छ. १५ माहे शाबान सु॥ संमान सबे- न मयाव अलुफ. मु. करवीर.

---

## नंबर ३५ (पृ. ७७).

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति साहेबांचे शेवेशीं,

विनंती शेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना तागा- यत छ. ७ मोहोरम पावेतों साहेबांचे कृपेंकरून वर्तमान यथा- स्थित असे. विशेष :- महाराजांनी वस्त्रें व जवाहीर राजश्री प- रशराम बल्लाळ व दुजरे व कारकून याजबरोबर पाठविली तीं याद्री प्रमाणें पावलीं. बहुत संतोष झाला. कितीएक मसलती- चे मजकूर व मुंबईकर जनरल याजकडील कामकाजाचे जाब- साल करून ज्यावयाविशीची साहेबांची आज्ञा झाल्याचा अर्थ आम्ही विदीत केला. अशास मुंबईहून कारकून आणविले आहेत, ते आल्यानंतर जनरल याजकडील जाबसाल होईल तसा करून घेऊं कळावें. सरकारच्या नगोरे यादीचा बंदोब-

ल करणें तसा करून मागाहून परशराम बल्लाळ, हुजरे व कारकून यांची रवानगी होईल. इकडील मजकूर तरी लढाईचा सनसला जारी केला. राजश्री बाजीराव गोविंद यास नबाब हैदर अलीखान बाहादूर यांचे फौजे सुद्धां त्या प्रांतीं आणविले असत. सांवेशीं श्रुतहोय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. २८ मोहोरम. मु. पन्हाळा. सु॥ सलासीन मयातेन अल्लफ.

---

## नंबर ३६ (पृ. ७७).

महाराज बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति हमवार खुषवक्त व कामयाब बाशद.

उवहत व शोकत पनाहा व एकबाल व इजलात दस्तगाहा कुरबय राजहाय समूअत मकान :-

बाआदज इजहार इष्तियाक फिरावा महशूद आंकी, येथील खुषी जाणून आपली शादमानी हमेषा कलमी करीत आलां पाहिजे. दिगर आपला व आमचा एखलास मुदत पासोन चालत आहे. या करितां पेशजीं पुणे वाले बाराभाई यांचा व आमचा बिघड होता. करितां इकडोन ही त्यांचे मुलखास तोशीस पोहोंचत होती; आणि आपणा कडोन ही हरज पोहोंचत होता. दरिंविला बाराभाई यांचा व आमचा सलूकाचा पैगाम लागला आहे. या करितां इकडोन ही त्यांचे मुलकास इजा न पोहोंचे अशी ताकीद करविली आहे. तेथें सटवोजी भोसले व मानाजी शिंदे यांणीं जमखंडी, तेरदाळ वगैरे बाराभाई यांचे मुलखास तोशीस देऊन लूटलाई करितात, असें ऐकण्यांत आलें. तिकडून सलूकाचा पैगाम असतां त्यांचे मुलखास तोशीस देणें लाजीम नाहीं. या करितां मानाजी शिंदे तेथें असतील तर, त्यास रावसाहेब मेहेरबान रघु-

नाथ रावजी कडे जातसे रवाना देऊन पाठवावे. सटवोजी भोंसले यांसही बाराभाई यांचे तालुकेंत स्वारी न करी तसे ताकीद करून कराराप्रमाणें सटवोजी भोंसलेस राजमियत सुद्धां येथें रवाना करून पाठवावें. बिलफैल पुणेहून सलुकाचा जबाबसवाला करितां मातबर येथें आले आहेत. इकडील सलुकाचा जबाब सवाल होते वक्तीं आपणाकडील तहाचा जबाब सवालही फैसल्ला व्हावा लागतो. कार्ज तर्फेनें जुदाई नाहीं. या करितां आपणाकडील मातबरास जबाब सवालाची अकूत्यारी देऊन पाठविले पाहिजे. अगर आपली मर्जी बाराभाई यांसी सलूका करणे नसलीयास त्या मजकुरास लिहून पाठवावें. सटवोजी भोंसले यांसही जलद रवाना करून पाठविले पाहिजे. बाकी मजकूर राघो विठ्ठल व अवधूतराव लिहिल्या वरून मालूम होईल. हमेषा आपली शादमानी सकलमी करवीत आला पाहिजे. ज्यादा लिहिणे काय असे हे किताबत.

सदरहू खत नवाब अली खा बहादूर याचें.
पैवस्ती छ २१ माहे मोहोरम सूरसन् समानैन मयाव अलूफ. मुक्काम किल्ले पन्हाळा.

---

## नंबर ३७ (पृ. १०२).

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशी.

विनंति सेवक बाळाजी जनार्दन. कृतानेक विज्ञापना. तागाईत छ १२ जमादिलावल पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून वर्तमान यथास्थित असे विशेष:- खासा स्वारी फौजे सुद्धां बाईचे सुमारें जावें म्हणून महाडचे मुक्कामाहून विनंति पत्र लिहिले होतें. आलीकडील महाल्या मजकुराची विनंती पत्रे स्वामीस लिहिली आहेत. त्या वरून विदीत जहालें असेल. आम्हीं ये-

थीन मसलतीचे अन्वयें महाडाहून कूच करून वाईस आलों पुढें दरमजल पुण्याकडे जातों. यास्तव खासा स्वारी इकडे यावयाची न करून फौज ही येऊं नये. सरकार तालुक्याचे माहाल राजश्री गंगाधरराव व राजश्री रघुनाथराव यांजकडे सरंजामास वगैरे आहेत, त्यांस उपद्रव होऊं नये या प्रमाणें पेशजांचे करारांत आहे. त्या पक्षीं उपद्रव जहालाच नसेल. राजश्री परशराम रामचंद्र यांजकडे सरंजामास वगैरे महाल आहेत त्यांस मात्र उपद्रव व्हावा असें बोलण्यांत आहे. परंतु परशराम रामचंद्र हस्तगत जहाले, प्रस्तुत खोटे बयांत आली. याजकरितां राजश्री गंगाधरराव व राजश्री रघुनाथराव व राजश्री परशरामपंत यांजकडे सरंजामास वगैरे महाल आहेत त्यांस कोणे विशीं उपद्रव होऊं नये येविशीं सरदारांस निक्षून ताकीद व्हावयाची आज्ञा जाहली पाहिजे. राजश्री बाजीराव यांचा मुक्काम कोरेगांव येथें आहे व राजश्री चिमाजी आप्पा यांचा मुक्काम मौजे मोसी नजीक पुणें येथें आहे. स्वामीस कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. श्रुतहोय हे विज्ञापना.

पेस्तर्नी छ माहे जमादिलावल सूर सन सव्वा तिसेन मय्यावअल्लफ.

---

## नंबर ३८ (पृ. १०७).

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति

स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक सखाराम घाटगे सर्जाराव विज्ञापना ता॥ आषाढ शुद्ध ४ पर्यंत स्वामींचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामींनी कृपाळू होऊन पत्र पाठविलें तें मस्तकी वंदून सनाथ झालों. तेथें निरोपिलें जे

राजश्री दौलतराव बाबा यांचे पत्रावरून फौज रवाना केली आहे. व मागाहून ही रवाना करितो असें निरोपिलें. त्यावरून यजमानास बहुत संतोष झाला. इकडोनही स्वामी सेवेशीं अंतर व्हावयाचें नाहीं. राजश्री गोपाळ मोहिते व सखाराम शिरसार या उभयतांची लिहिल्या अन्वयें रवानगीची आज्ञा व्हावी. फौजेचें सामान निवडक त्वरें येऊन पोहोंचे ती आज्ञा निरोपावी. इकडील लक्ष दुसरें नाहीं. स्वामीचे कृपें करून आतां कांहीं मसलत अवघड नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पेवस्ती छ. ६ मोहोरम सुम्मा तिस्सा तिसैन मय्याव अल्लफ मुक्काम कासेरी.

---

## नंबर ३९ (पृ. १०७)

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति

स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक दौलतराव शिंदे. कृतानेक विज्ञापना, ता छ. ५ मोहोरम पावेतों स्वामीचे कृपें करून सुखरूप असे. विशेष, स्वामींनी दोन आज्ञापत्रें पाठविलीं तीं पाहून संतोष झाला. पत्री आकाराम यादव हवलदार हुजूर आले, यांणीं विनंती केल्यावरून निवेदनांत येऊन हुजुरून राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति व चिरंजीव राजश्री रायाजी जाधव जसन मुहुरव असें फौजे सुद्धां पुढें रवाना केले असत. कर्नाटकची फौज आणीवली असे, तीही सत्वरच येईल. आल्यानंतर त्याची रवानगी होईल. आपणाकडील सखाराम शिरसार व गोपाळजी मोहिते हुजूर येऊन पोहोंचले नाहींत, ते हुजूर आल्यानंतर आपण विनंति लिहिल्या अन्वयें शपथ व स्वदस्तुरचें आज्ञापत्र असें आकाराम यादव हवलदार या समागमें देऊन व सदरहू उभयतां मागाहून आज्ञा-

होऊन सत्वर येऊन पोहोंचतील म्हणोन आज्ञा लिहिली त्यास उत्तम आहे. पेशजी सेवेशीं विनंतिपत्र पाठविलें आहे त्या प्रमाणें फौजेची रवानगी सत्वर झाली पाहिजे व सखाराम शिरसाट व गोपाळजी मोहिते येथून सेवेशीं रवाना केले येऊन पोहोंचले असतील. पेशजी विनंती लिहिल्या अन्वयें राफत व स्वदस्तुरचें आज्ञापत्र अकाराम यादव हवलदार याजबरोबर पाठविलें पाहिजे. स्वामींनी कृपा करून हवलदार मजकूर या समागमें वस्त्रें पाठविलीं तीं यादी प्रमाणें पावलीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

## नंबर ४० (पृ. १०८).

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति

स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापना ता॥ छ. २० रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष मातोश्री बायांचें खुळ चौघे लबाड मिळोन लाविलें. हल्लीं कूच करून करविराकडे जाणार म्हणून ऐकण्यांत येतें. त्याजवरून स्वामींस विनंति लिहिली आहे. नबाब आदीकरून पत्रें गेलीं त्यांणीं अश्वासन दिलें. इकडील फौज पलटणें ही मागें आहेत. त्यास स्वामींनींही अश्वासन दिलें पाहिजें. सूचनार्थ विनंति लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पेंवरुनी छ. ८ माहे शव्वाल सन् तिस्मा तिस्सैन मयाव अलफ. मुक्काम लष्कर.

---

## नंबर ४१ (पृ. १२०).

श्री.

राजमान्य राजश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव यांसी.

आज्ञा केली ऐसीजे:- तुम्ही विनंतीपत्र छ. २६ ज्या वालचें पाठविलें तें हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहालें, वरकड सविस्तर जें लिहिणें तें आज्ञापत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. यांजकडील प्रकार कसाकाय बोलणेचा ठराव येतो तो मागाहून सविस्तर आज्ञापत्री लिहून पाठविणेची आज्ञा होईल. राजश्री मोरो सखदेव यांसी रूबरू कितेक कार्य भागाची आज्ञा केली आहे. त्या आज्ञेप्रमाणें साद्यंत अर्थ चित्तांत आणून तदनुरूप तुम्ही आविलंब गोवेस जाऊन अज्जम जासूबाधुदाफ यांची भेट घेऊन त्यांजकडील बोलण्याचा प्रकार खचित करून घेऊन आविलंब त्यांजकडील पलटण सरंजाम सुद्धां जलदीनें हुजूर येऊन पोहोंचेनें करावें. ये विशीचा सर्व अर्थ तुमच्या चित्तीं असता आज्ञापत्रीं आज्ञा करून कळवावें असें काय आहे. पुण्याचें पत्राची नाकल लिहून पाठविली आहे. त्याजवरून कळेल. जाणिजे सूर सन्न मय्यातैन व अलुफ छ. २ माहे जिलकाद. सरकारचें निशाण मानेल असे. पंतरसी छ. ८ माहे जिलकाद सन्न मय्यातैन व अलुफ. मुक्काम बंदर गोवें.

---

## नंबर ४२ (रू. १२१).

श्री.

राजमान्य राजश्री नागोजीराव घाटगे सर्जेराव झुंजारराव यांसी.

आज्ञाकेली ऐसीजे:- राजश्री आत्माराम यादव हुजदार छ. २८ गोवानीं येऊन पोहोंचले. तिकडून नहकूब लिह्या पधरा दिवसांच्या घेऊन आले आहेत. "जे गोवेंगोळ्या दूर असावी; त्याहूनचे लोकांनीं ही गोवा मारू नये, व आंतून ही गोळा मारू नये.

सभींवला शाह देऊन बसावें. आणि वेदशास्त्र संपन्न राजश्री भाऊ जोशीराव व राजश्री रायाजीआधव जप्तन मुलूक व राजश्री विश्वासराव घारगे सर्जेराव या त्रिवर्गास पुण्यास पाठवावें. तेथें बोलण्याचा ठराव करून फौज उठवावी. ” या प्रमाणें त्यांजकडील बोलणें घेऊन मशार निल्हे आले आहेत. त्या प्रमाणें त्या त्रिवर्गांची रवानगी करून पाठविण्यांत येत आहे. तेथील बोलण्याचा ठराव पक्केपणें घडोन कसा काय उलगडण्यांत येतो तो मजकूर मनास आणून तुम्हांस आज्ञापत्री आज्ञा होईल. तिकडील मजकुराचा प्रकार हा सर्व तुम्हांस दखल आहेच. परंतु आलेले बोलणें मनास आणावें, या करितां त्रिवर्ग मशारनिल्हेची रवानगी होत आहे. सारांश ये विषयींचा मजकूर तुमचे चित्तांत आलाच आहे. त्या प्रमाणें तुम्ही गेल्या कार्य भागाचें बोलणें रचीत करून अज्जम गोसूना युवाफ यांशीं शफत पुरस्सर करार दाद करून घेऊन त्यांची खातरदास्त करून देऊन त्यांजकडील पलटण सरंजामसुद्धां जरुदीनें येऊन पोहोंचे सें जरूर करावें. येविशींची तुम्हांस आज्ञा करून कळवावें असें नाहीं. बरकड आज्ञे प्रमाणें राजश्री हवतराव गायकवाड विश्वासराव तुम्हांस लिहितील त्याजवरून कळेल. जाणिजे. सूरसन मय्यातैन व अल्लूफ. छ० २ माहे जिलकाद निशाण मोर्तब असे.

पावस्ती छ० ८ जिलकाद सूरसन मय्यातैन व अल्लूफ मुक्काम बंदर गोवें.

---

## नंबर ५३. (पृ० १२२).

श्री.

राजमान्य राजश्री नागोजीराव घारगे सुजा-र राव यांसी

आज्ञा केली ऐसीजे. पुण्याहून राजश्री भाकरा-

प यादव दबाउदार यांजबरोबर राजश्री दौलतराव शिंदे व बाळा-
जी अनंत पागनीस यांची पत्रें त्यांजकडून राजश्री गणपत शि-
वाजी व रामचंद्र परशराम यांसी व कंपुनी पत्रें बरडेल इंग्रज यां-
स आलीं. जे करवीरची लढाई बंद करून पंधरा दिवस स्वस्थ रहा-
वें आणि हुजुरून मसलतमार गृहस्थ आणविले आहेत ते पुण्याहून
येऊन तहाचे बोलण्याचा ठराव करून तुम्हास पत्रें पाठवून देऊं. त्या-
प्रमाणें वर्तणूक करणें. या प्रमाणें पत्रें आलीं तीं देऊन राजश्री शि-
वाजी अंबाजी व बच्याजी बल्लाळ व निकडील अलकारी रवाना करू-
न दिल्हे. त्याजपरी त्यांणीं जाबसाल केला जे पंधरा दिवस उगीच
तहकुबी करून रहावयाचें आपणास अनुकूल पडत नाहीं. आ-
पण पत्रें पाठवितों. त्यांचें उत्तर येईल त्या प्रमाणें आम्ही वर्तणूक
करूं, तुम्ही आले मार्गे जाणें. या प्रमाणें सांगून उभयतांस लष्क-
रात ठेवून न घेतां निरोप देऊन पाठवून दिल्हे. हें कळवें वर्तमा-
न तुम्हास कळावें म्हणून आज्ञापत्री लपशिलें आज्ञा झाली असे.
परभारें तुम्हास पुण्याहून पत्रें येऊन तह झाला की आबदू आईल.
यास्तव लपशिलें आज्ञा झाली असे. तरी तुम्ही त्वरेनें निकडीन
सिद्धता करून समक्ष आज्ञा जहाले अन्वयें यावयाचें करणें. मु-
ख्य गोष्ट तुम्ही पतरणें सरंजाम सुद्धां अजम गोसूबा सुराफ यां
शीं येऊन अगत्यरूप यावयाचें करावें. म्हणजे बहुतेक मसल-
तीचे कार्यभाग उभय पक्षींचे इनस्तेकडून घडोन येतील. येणे-
चा समय हाच आहे. हें जाणोन त्वरेनें यावयाचें करावें जा-
णिजे. सूरसन सब्यासैन व अलफ. छ. ७ माहे जिलकाद ब-
हुत काय लिहिणें. शिक्का.

## नंबर ४४ (पृ. १८८).

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामी याजकडील
चंदोवगरांची फौज में राजश्री पंत प्रधान यांजकडून उलगडून ध्या-

द्याची. विद्यमान राजश्री दौलतराव शिंदे आलिजा बहादूर सूरसन इहिदे मय्यातैन व अल्लुफ.

१ परगणें, चिकोडी व मनोळी येथील फूटगांव इनामदार व सरंजामी सुद्धां रामचंद्र परशराम यांसीं पत्र द्यावें. सदरहू अन्वयें माहाल व फूट गांव दरोबस्त यांचे यांजकडे लावून द्यावे. चिकोडी व मनोळी व फूट गांव पूर्वीं स्वामी कडे चालत होते त्याप्रमाणें चालतील येणें प्रमाणें करार.

२ पेशजी प्रमाणें कागदी पत्रीं शिलशिला उभयपक्षीं चालत असावा. संस्थानचें कल्याण दिवसें दिवस वृद्धि होत असावी. पूर्वीं पासून कागदी पत्रीं शिलाशीला चालत आला आहे.

त्या प्रमाणें चालेल, स्वामीचे राज्याचें कल्याण तें सेवका कडून घडेल, येणें प्रमाणें करार.

३ परशराम पंत यांचा देण्याचा तंटा एकंदर न लागावा.

सदरहू प्रमाणें करार.

४ तिकडून वकिलीस येतील व पुण्यांत राहतील त्यांची योग्यता पाहून खर्च चालवावा.

सुदामत पेशजी चालत आल्याप्रमाणें शिरस्ता पाहून चालविलें जाईल. येणें प्रमाणें करार.

५ परभारें फिर्याद इकडे कोणी आल्यास जिकडील तिकडे पाठवून द्यावे. कलम.

स्वामी कडील कोणी फिर्याद आल्यास स्वामीकडे पाठवूं. सेवका कडील कोणी स्वामी कडे आल्यास सेवकाकडे पाठवावयाची आज्ञा असावी. येणें प्रमाणें करार.

६ इकडील कामें पडल्यास तिकडून पुस्त पन्हा व्हावा. तिकडील कामें पडल्यास उभयतां परस्पर साहित्य

व्हावें. कलम. १.

सदरहू प्रमाणें करार.

७ इंग्रजांचे रुपये मुद्दल वाजवी हिशेबी रुजुवात मुंबईच्या रुजुवातीनें फडशा करून हात्तेबंदी प्रमाणें उलगडून देऊं. यांस इंग्रजांचें बोलणें जरबेचें पडल्यास सदरहू प्रमाणें आपण तोड काढावी. कलम. १

इंग्रजांचा ऐवज स्वामीकडे येणें त्याचा फडशा सावंतराव स्वामीकडून दोन महिन्याच्या मुदतींत क्षेप निक्षेप व्हावा. तों पावेतों स्वामीकडील जाबसालास मातबर आले आहेत, त्यांनीं येथें असावें. इंग्रजाकडील जाबसालाच्या ठरावाविषयीं सेवकाकडून अंतर होणार नाहीं. येणें प्रमाणें करार. छ. १९ माहे सफर, आषाढ, इहिदे मय्यातैन व अल्लुफ.

## नंबर ६५ (पृ. १२८).

यादि राजश्री श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामी आंकडील द्रव्य फौजेस खर्चामुळें आसरीस आलें, सबब ज्याजती सरंजाम श्रीमंत पंतप्रधान यांजकडून कौल देण्याचा सूर सन इहिदे मय्यातैन व अल्लुफ. सरंजाम बमुजी राज्याचे बंदोबस्तास.

२,५९,०००. महाराजांस सरंजाम
२५००० सौभाग्यवती बाईस सरंजाम.

२७५,०००

स्वामीनीं ज्याजती खर्चाबद्दल सरंजामा सहा महाल लावून द्यावे, म्हणोन आज्ञा केली, त्यास सेवकास अनेक प्रकारच्या दौलती प्रकरणीं मसलती पडतात. त्यास फौजे विषयीं सेवकें विनंति पत्र लिहिलें, त्या प्रमाणें स्वामी कडून फौजेची रवानगी हरवक्त होत असावी. सदरहू पावणेतीन

लक्षाचे कमाल बेरजेचे महाल नेमून देऊं. येणें प्रमाणें करार.

१ राज्यांतील इनामदार व जहागीरदार व देशमूख व जमेदार व सरंजामी श्रीमंता कडील सक्तीचा उपर दाखवून सरकार हुकुमा प्रमाणें अनुभवीत होते, ते कही एकंदर त्याची तगिरा बहाली हुजुरास व्हावी ये विशीं तुम्हांकडे आल्यास फिर्याद मनास आणू नये. सदरहू प्रमाणें करार. कलम.

---

## नंबर ४६ (पृ. १२९).

चिरंजीव राजमान्य राजश्री सखाराम घाटगे सर्जेराव यासीं आज्ञा केली ऐसाजे, तुम्ही करवीरचे मुक्कामीं स्वामी सन्निध विनंति केली कीं, प्रांत कागल देहाय. सुद्धां आम्हाकडे पुरातन पासोन इनाम चालत असतां हाली लग्यामुळें काहीं देहाय चालत नाहीं. याजकरितां नूतन सनदा भोगवटीयासी देऊन चालविले पाहिजे, म्हणोन विदीत केलें. त्यावरून मनास आणितां तुम्ही स्वामीचे राज्याचे उपयोगी रहावें, रामचंद्र परशराम यांणीं पंतप्रधान व शिंदे यांजकडून व आपली फौज आणून राज्य आखरीस आणिलें. करविरास ग्राह देऊन राज्याचा उच्छेद करावा, हे लक्ष धरून राज्याचा नाश केला. ते समयीं तुम्ही राज्य उपयोगीं स्वामी सेवा खातर जमा मुक्त करून दाखविली. त्याजवरून स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन पुरातन तुमच्या वडिलार्जित पादशाही सनदा आहेत. त्या बरहुकूम साडे एकूणहात्तर देहाय सुद्धां दरोबस्त इनाम कुलबाब कुलकानू हाली पटी व पेस्तर पटी जल, तरू, पाषाण, निधि; निक्षेप सहित खेरीज हकदार व इनामदार करून दिल्हे असत. गाव बितपशील.

| | |
|---|---|
| ५२ प्रांत कागलगाव. | २२ प्रांत बावडेगाव. |
| १४ कसबा मुरगूडगाव. | १२ कसबा चिखलीगांव. |

७॥ कसबा मांजरी प्रांत. ९ कसबा हिरण्यगाव.

२ मौजे आकासिंग, ४ खुद्लकडी.

३६॥ १२

८ ६४॥

एकूण देहाय साडे एकुणसत्तर इनाम करार करून दिल्हे असे. तरी तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंश परंपरेने चिरकाल पुरातन भोगवटे प्रमाणे अनुभवून राज्यास एकनिष्ठ पणे असोन सुखरूप रहाणे. आपिणे. सूरसन इहिद्दे मय्यातेन व अलूफ. छ १९ माहे जिल्काद. बहुत काय लिहिणे. मोर्तब शिक्क्याचे असे.

---

## नंबर ४७ (पृ. १२९).

राजमान्य राजश्री शिवोजी नाईक निंबाळकर देसाई सरनाईक प्रांत हुक्केरी यांसी आज्ञा केली एसीजे. तुम्हांविशी चिरंजीव राजश्री सखाराम घाटगे सर्जेराव यांणी करवीरचे मुक्कामी विनंती केली जे मशार निल्हे यांजकडे प्रांत मजकूर यातील खेडी इनाम पुरातन चालत असता दंग्यामुळे चालत नाहीत. याजकरिता नूतन सनदा देऊन चालविले पाहिजे. मशार निल्हे राज्याच्या उपयोगी, एकनिष्ठपणे सेवाचाकरी केली याचे वडिलार्जित सनदा आहेत, त्या बरहुकूम कर्यांती तीन देहाय सुद्धां इनाम दुबेस्त करून द्यावें, म्हणून विदीत केले. त्यावरून स्वामी कृपाळू होऊन पुरातन सनदा आहेत त्या प्रमाणे कुलबाब कुलकानू हल्ली पट्टी व पेस्तर पट्टी जल, तरू, पाषाण, निधी, निक्षेप, सहीत खेरीज हक्कदार व इनामदार करून दिल्हे असत. तपशील:

५ कसबा कटगांव. १ मौजे निपाणी.

१ मौजे जत्रचर. १ मौजे कोरणी.

१ मौजे शिरगोंदी　　१ मौजे कुरळी.

२　　२

५

२ मौजे कणंगले कसबा सोलापूर, मौजे कुणूर कसबानेज.

४ कसबा सांवगांव.

१ मौजे कोगनुळी, १ मौजे संवदलगें.

१ मौजे मतिवडें. १ मौजे सुळगांव.

२　　२

४

११.

१ कसबा मजाती पैकीं कमत व इकरू सुद्धां. कळम.

१ कसबा मजकूर कसबा सांवगांव व कसबा सोलापूर, कसबा लार या तिन्हीं कर्यातींत पाटिलक्या व नाईक्या व देशमुखीचा कमत व इकरा सुद्धां.

१ मौजे हामीदवाडा येथील देसकत व पाटिलकी व नायकी व इकरा सुद्धां.

१ मौजे सिंदनाळ येथें निमसावर जमीन सन सब्बा सालीं अमार्विंडीवर लढाईंत चारगीर पडला सबब सालपरवसीची सनद करून दिल्ही आहे.

त्या प्रमाणें चालावें. कळम.

एकूण देहयाम ११ एकूण व कळमें ४ पुरातन शोगवटे प्रमाणें करार करून दिल्हे असे. तरी सदरहू प्रमाणें इनाम तुम्हीं व तुमचे पुत्र पौत्रादि वंश परंपरेनें चिरकाल अनुभवून राज्याशीं एकनिष्ठपणें असोन सुखरूप राहणें. जाणिजे. सूरसन इहिदे मय्यातैन व अलफ. रवाना छ. १९ जिल्काद बहुत काय लिहिणें. मर्यादेयं विराजते.

—वर अदिलशहाची स्वारी ५९
शिद्दी मरजान २४५
शिद्दी रेहान २४३
शिद्दी साबा अंबरखानी २४०, २४३
शिरगांव ८९, ९०, ९३, ९७, १००
१०१, १०३, १०५
शिवाजी जन्मतिथीवरील अप्रस्तुत
आक्षेप २८८
शिवाजीच्या खऱ्या जन्मतिथीचे आ
धार २७२, २७३
—आक्षेपकांची खरीं मतें २८०
—आक्षेपकांस सूचना २८१
शिवजन्म ५४, ६५.७०, २१६, २५२,
— चे निरनिराळे शक ११३
शिवजन्म तिथी (राजवाडे मत) १, ४९
—निर्णयाचा पहिला प्रयत्न
व बखर वगैरे ग्रंथ २५४
—काव्येतिहाससंग्रहजंत्री १, ५
—चित्रगुप्त ३, ७२
—छत्रपतींची वंशावलिवद्ध
यादी ५
—छत्रपतिंचें चरित्र ५
—डफ १
—तंजावरचा शिलालेख २५०
२५१
—न्यायशास्त्री पंडितरावाची
बखर ७६
—पुरंदरे वही ७८
—पंतप्रतिनिधीची बखर ५,
७६
—भूषण कवी ३
—मराठी साम्राज्याची छोटी
बखर ४, ७५

—मल्हार रामराव बखर
१, ३, ७४
—रायरीची बखर १, ४
—शिवकाव्य ४
—शिवदिग्विजय १, ४, ९,
७५
—शिवप्रताप ४, ७७
—शिवभारत २५१—२५४
—शेडगांवकर बखर ७७
—शहाण्णव कलमी बखर
५, ७३
—सभासद ३, ७१, ७२
शिवजन्म तिथीबद्दल बखरींतील
निर्णय २००
—वि..गत वर्णन ६, ७,
२००, २७७ २७९
—ग्रंथांतील घोटाळा
२६१–२६३
—अशास्त्रीय बहुमत २६५
शिव जन्म तिथी, ५ मी वरील आक्षेप ४
—२ व ५ मधील घोटाळा
८
शिवजन्म–गणिताची कसोटी २६०
शिवाजीची जुनी चुकीची कुंडली
११२, ११४, ११९
—जन्मलग्न, नवमांश,
जन्मराशि कुंडली १८५
—चे पांच उच्च ग्रह–शिव–
भारत १८८—१८९
—चे जन्मलग्न १८२, १८७
बद्दल ज्योतिर्विदांची मतें
१८३, १९२,—धनु
लग्नांवाचून इतर लग्नें

अमान्य १८६ शिवा-
जीच्या चुकीच्या जन्म
तिथीचें एक कारण
१८६
शिवाजीची जन्मपत्रिका १८२, २२७
शिवाजीची जन्मतिथि १, ४९
—व आपटे २८९
—खरे शास्त्री २२२
—ज. स. करंदीकर ११४
—राजवाडे १, ४९
—लोकमान्य १२
—वें. बा. केतकर ८०
शिवजन्म-तोतयामिर्ता २७६, २७०,
२८६-२८८
—तोतयामिर्तीची तरफदारी
२८२-२८६
शिवजन्माची खरी तीथ २५५
—च्या खऱ्या व खोटया
तिथीचे साक्षीदाराची तुलना २५८
—खऱ्या तिथीवरील लुले
आक्षेप २५७
—च्या वादाचा उत्कर्ष
२८९
शिवाजीची मुंज २७, ५२, ७४
—चें लग्न समंभ्रक २७, ५२
—ची इंगळ्याशीं सोयरीक
१८, ५६
—ची गायकवाडाशीं सोयरीक
१८, ५०
—ची जाधवाशीं सोयरीक
१८, ५०, ५६
—चें पहिलें लग्न २०१
—चें सकवारबाईशीं लग्न
५६
शिवाजी राज्यारोहण; पुनः सिंहासना-
रोहण ५२; ६४, २७,
११०, २०६
—मृत्यु ३०, ४७, ५३,
७०, ११०, २०७

शिवाजी व किल्ले वगैरे स्थलविशेष

—अकोलें घेतलें २७
—अहमदनगरचें युद्ध ५०, ५६
—अहिवंत किल्ला घेतला २५
—आग्रा २३, ४७, ६०,
६१, २०५
—उंबरखिंडीचें युद्ध ५१
—कडवाडी घेतली २७
—कर्नाला घेतला ५२
—कल्याणभिवंडी घेतली
१८, ४२
—कल्याणकडे गड पाहावयास
जाणें ५०
—कारंज्यास येतो ६२
—कुडाळास जातो ५१
—केळंजा घेतो २७, ६४
—कोल्हापुरास वेढा घातला
२८
—कोंकणांत गमन ५१
—कोंढाणा घेतो, विजापूर-
करांस देतो ४१
—कोपल घेतलें ५३
—खुदावतपूर लुटलें
६०, २३१
—खेळण्यास येतो २१, ५८
—गदग घेतो २९
—गांगोली ४७
—गोळेवाडी (प्रांत वाई) बंद

मोडतो २०९
शिवाजी गोवे सरकारकडे वकील
रवाना १७९
—गोव्यासभोंवारचे देसाई
1
—गोवें प्रांतांतून चौथाई
घेतो 12, 13
—चौलकडील प्रांत १७८
—चंदी घेतो २८, ४७,
२०६
—जव्हार घेतो ५२
—जाउलीस येतो १९,४२,५१,
५७; घेतो १७,१८, ५५
५०;-हून स्वार
झाले ५०
—जालनापूर लुटलें ३०,४७
—जुन्नर लुटलें १८, ५०,
५६, ६२
—दमणवर स्वारी 13
—दाभोळ घेतो ५८
—दिल्लीकडे जातो ५१
—नळदुर्ग घेतलें २९
—निजामपूर लुटलें २१
—परळी येतो २०, २१,
२६, ४६, ५०, ५२,
५७, ६४,
—पन्हाळयास जातो
६४, २१९
—प्रतापगडास गेला २६
—प्रभानवली घेतो ५८
—पुरंधर घेतो ५२, ६०
—पेणचें युद्ध २२, ५९
—फोंड्याचा कोट उडविला
२७, ६४
शिवाजी बहादुरबिंडा घेतो ५३
—बसनुरास जातो २३,५१,
६०,
—बेलेवाडीस वेढा घातला
२९
—बेंगरूळ ३
—बंकापूर लुटलें २६, ६४
—भागानगर २८, ६३,
२१९
—भूपालगड घेतो ५३
—मनोहर गडावर मुकाम
करतो १७९
—माहुली घेतली
२५, ५२, ५६, ६२,
—मारकंडा घेतला
२५, ६२
—रवलाजवला घेतला
२५, ६२
—रायरी घेतो
१८, ४२ ५०; ५५,
—रांगण्याचा वेढा उठवितो
२४
—राजगडास येतो
२४, ५० ५१, ६१
—रामनगर घेतो
२५, ६३, १८०
—राजापूर घेतो ५८ २०३,
—रायगड घेतो २०२
—रोहिडा घेतला
२५, ५२, ६२
—लालमहाल ४६
—लोहगड घेतो
२५, ५२, ६२
—वसईची चौथाई 22

—वर्धनगडास येतो २२
—वासोट्यावर द्रव्यप्राप्ती
२१, ३०, ५०, ५८
—विजापुराहून येतो २००
—विजापुरावर स्वारी
२०, २३, ५०, ५७
—वेंगुर्ल्यास मुक्काम १७८
—शृंगारपूर घेतलें २२, ५८
—श्रीगारपूर घेतलें ५१
—शिवापटणास येतो ५०
—शिवेश्वर घेतो २७
—शिवापटण वसविलें ४२
—साल्हेरी घेतो ६२
—सातारा घेतो २६, २७,
५२, ६३, २१०
—साताऱ्यास येतो ५३
—सिंहगड घेतो ५५
—सिंहगडास येतो ५१
—सुपें घेतो ५५, १८
—सुरत लुटली २२, २५,
५१, ५९, ६२
—सुरतेची चौथाई 22
—मंगगांवची पेठ लुटली २६
—हिंदोला घेतला ५२
शिवाजी व इतर व्यक्ति
शिवाजी-आदिलशहा तह २४,
६०, ६१
—आदिलशहाचा तह तुटला २६,५९
शिवाजी व अफजलखान, भेटण्याची
तयारी १९,२०,४४
—अफजलखानाचा वध ५७
२०३,२१६
—स आलमिडाचें दुसरें पत्र
15
—औरंगजेब भेट २३,४७
—कान्होजी नाईक जेधे शपथ
४३,४४
—कारतलबखान युद्ध २१,
५८
—कोळी राजावर स्वारी १८०
—खंडोजी खोपडा २०,४५
—खवासखानाशीं लढाई १७९
—गुरुगोविंदसिंग १२७
—जयसिंग २३,५१,६०
—दाउदखानाशीं झगडा २५,
६२
—दिलेलखान भेट ५१
—नौसिरखानाशीं युद्ध १८
—पिरमिया ताजखानाशीं
झगडा ६१
—पोर्तुगीज I, 2-5,
8, 9, 16, 13, १७८,
१७९,१८०
—फाजलखानाशीं युद्ध २१
—बहादुरखान व बहलोल-
खान यांशीं लढाई २८
—बाजी घोरपड्यास मारतो
२३,६०
—बांदल ४५
—बारदेशावरील स्वारी १७९
—भूषणकवी ३०४
—मोंगल २४,४६,६१
—येसुबाई भेट २१८
—रघुनाथ नारायण २९,४७
—रुस्तुमजमानचा पराभव
करतो २१,५०
—विठोजी शिंदा यांशीं लढाई
६३

—वेंकोजी भेट २८; पाडाव २९;—स पत्र २०६
—शास्ताखान ४६,५९,२०३
—शिद्दी 6
—सर्जाखान ६३
—संभाजी कावजीशीं युद्ध २०४
—संभाजी मोहिते १८,५०, ५५
—समर्थ २१८
—सावंत १७९, १८०
—मेरखान बैरागी २८
—हंबिरराव मोहिते २७
शिवाजी १३१,१४१,१४२,(सिउवा) ३०१
शिवकालीन ग्रहसाधन १३४
शिवकालीन शकावल्या व त्यांचा रचना काल २६३ २६६
शिवाजीचें आरमार व पोर्तुगीज आरमेडामधील चकमकी 19
शिवाजीनें करविलेले ग्रंथ २१९,२२४, २२५
शिवाजी कसायाचा शिरच्छेद करतो ३०१
शिवकार्यारंभ २०१,२९३,२९६ व शहाजीच्या हालचाली २९६,३००
शिवाजीचें कार्य १२६, १२७, १२८
शिवाजीची कारकीर्द ११०
शिवाजी गडांचीं नांवें ठेवतो ५०
शिवाजीची गुणग्राहकता 12
शिवभारत २७२
शिवाजीचा दारुखाना १
शिवशाहींतील पंचांगशुद्धि २१९
शिवाजी पोवाडा २१
शिवाजीचें पोट राज्य २९७-२९९
शिवाजीचे बखरींतील प्रसंग १९८
शिवाजी मुलुख मोजणी करतो ६१
शिवराजमुद्रा २९२,—पहिला उल्लेख २९३,-चा यथार्थ अभिप्राय २९७—२९८; कोणीं केली २९८
शिवाजी लष्करची पाहणी करतो ६४, ६५
शिवाजी लिहिण्या वाचण्यास शिकतो- २९६
शिवाजीवर विजापुरकराकडून पहिली स्वारी २०८
शिवाजी व विद्यावृद्धि २२३
शिवापूरकर देशपांडे वहींतील शकावली ५३ ६५
शिवापा नाईक १७९
शिवाजी बिन नागशेटी शिंपी १०६
शिवाजी महाराजांची स्वराज्य कल्पना १२३
शिवाजी स्वतंत्रपणें स्वतःस राजा केव्हां म्हणवितो १, ११५
शिवाजी राजारामपुत्र ११०;--जन्म ३८,३९;-राज्य करूं लागतो ६७
शिंगणापूरचें तळें २१२
श्रीनिवासराव जुन्नरकर २४०
शेख निजाम ४८
शेख मोहनुद्दीन—शहाजहानचा वकील कैद होतो २४१

स

सईबाई मृत्यु १९,५०,५७
सकवारबाई जन्म ५१
सखो कृष्ण १८

सखोपंत–शिवाजीचा गोंव्याकडील वकील १७९
सटवाजी पटेल १०८
सभासदी बखर व शिवभारत २९४
समर्थ रामदास
व क्षेत्र महाबळेश्वर २८९
–स इनाम २१६
समानगड ६७
सरकारी दप्तरखाना ११६, ११७
सर्जाखान २२९,-शीं लढाई ६८,-चा पराभव ३६
सर्जाराव जेधे २८, ४४, ४७, ६०, —आग्र्यास जातात; २३ कारीस येतात ३५; तुलापुराहून पातशाही कौल घेऊन येतात ३६;–वतनावर येतात ४८
सरदेशमुखीचा उगम २२
सरबुलंदखान २२९
सरबुलंदराय २३१, २३२, २३७
सलाबतखानास पन्हाळा मिळतो २१
सलाबतपुरी ६९
सवाई माधवराव १११
सागठाणे ९६
साताऱ्च्या शनवार चौघड्याचा प्रारंभ २१०
साताऱ्यास वेढा व युद्ध ३६
साबाजी आनंदराव व निजामशाही सरदार–मोंगलाकडे जातात २४२
सामराजपंत पेशवे ४२
साम्राज्य १२६
सालप्याचा घाट २२६
सालेरीस वेढा ६२
सावंतवाडी 1
सावित्रीबाई १११
सिदोजी निंबाळकर मृत्यु ३०
सिदोजी फर्जंदाचा कडेलोट ३५
सिद्धांत-सार्वभौम-ग्रंथ १३५
सिद्धेश्वर देव–शिरगांव ९०-१०७
सिपादारखान–अहमदनगरचा किल्लेदार २३७
सिरोज ६८
सिलिमकर देशमुखांच्या वाटण्या १८
सिंहगड ११०, ३०१;—युद्ध २४; —सुलतानढवा मारला ५१
सींदसेटी महाजन १०८
सुभानजी भांडवलकर ६७
सुलतान अकबरशहा ३१
सुलतान खुरम=शहाजहान पहा.
सुलतान महमदशहा तक्तीं बसला १६, २३९
सेवसेटी चौगुला १०८
सोंधा 1
सोनजी मोकदम १०१
सोनोपंत डबीर ७२; ७४;–दिलीसरवाना ५७;--राजगडास शाहिस्तेखानाकडून येतात २१, ५८-तुळा २३, ६०;-मृत्यु २३, ६०
सोमा शंकर नाईक १७९
सोलापुरास वेढा २३३
हिंग्रजलचा इतिहास २७३
स्वराज्याची व्याप्ती १२६
स्वराज्याच्या सनदेचा अर्थ १२६
स्वामिभक्ती १२७
संकेश्वर २०
संक्राजी नीळकंठ ७४
संताजी घोरपडे अलिमर्दाखानास दस्त करतो ३६;–खानजादीखान व कासीमखान यांस कैद करतो ३८;

—राजारामाचे मदतीस जातो चंदीस ३६;—राजारामाशीं बिघाड ३७;—साताऱ्यास युद्ध ३६, ६६;—यांनीं हिंमतबहादारास मारिलें ३८;-मृत्यु ३९, ६६
(सं)भाजी कावजी २०४
(सं)भाजी जन्म १८, ५०, ५६,६५, १२८, २२५
(शंभु) १३१; २०४, २१३;-ची कुंडली १११, ११२, ११४,मुंज २७, ५२, ६४; अकबर भेट ३१;
—औरंगाबादेस जातो २५;-कर्नाटकांत फौज पाठवितात ३१;-करवीराकडे रवानगी २०७;-कवी कलशास कुल मुखत्यारी देतो ३२;-कुंभार जुवें घेतले ३२; केळसीस स्वारी ५३; देवगिरीस जातो ५१; दिल्लीकराचे मनसबदार होतात २३, ४६, ६०
—पालीस मुक्काम ३१
—पोर्तुगीजांचें पत्र 11
—मोंगलाकडे जातो २९
—मोंगलाकडून परत येतो ५३
—मंचकारोहण ३०, ५३
—राज्याभिषेक ५३, ३१, ३०
—मोरे, गंगाधरपंत वगैरेस कैद करतो ३१, ३३
—मुलगी भवानीबाई २९
—राजगडास येतो ६०
—रायगडास येतो ५३, ३०
—खेदंड्यास वेढा ३२
—शहाजादा भेट ५२, ६१
—शिरके युद्ध ३४
—श्रीगारपुरास राहतो २८
—हंडियाचा वेढा उठविला ३२
—कैद ३०, ३५,-मृत्यु ४८
संभाजी—राजाराम पुत्र-जन्म ६६

## ह

हणगोजी पाटील १०३
हणमंत निंबाळकर ३७
हणमंतराव मोरे ४२
हणमंते वंश १७५
हरिहरभट ९०
हंबिरराव मोहिते ६५, २११
हमीदखानाची निजामशाहींत ढवळाढवळ २३७
हरजी माहडीक-कंचीवर जातात ३४
—केसो त्रिमलास धरतात ३५
—जइतजी कांटकर यांचा त्रिचनापल्लीस वेढा ३२
—शामजी नाा पुंडे यांचकडील कर्नाटकाचा कारभार ३०,३१
—मृत्यु ३५
हवजी बिन साऊजी कामथे २२६
हसन अलीखान कल्याणभिवंडी जाळतो ३१
हिजरी सनाचा घोटाळा २४७-२४९
हिरडस 12
हुसेनखान मायणा ४७
हैदरअली 7
हैबतराव सीलमकर देसाई २२६
हैबतराव सिलिंबकर देशमूख ४२,४४, ६५

## शुद्धिपत्र

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २५ | १० | १५९३ | १५९२ |
| ४८ | ३० | ग. स. जोशी. | स. ग. जोशी |
| १०७–१०९ | | वर लेखांक ३८–४२ घालणेचें राहिले आहेत. | |
| १२९ | २९ | ह्या ओळींतील वदान्यः हा शब्द वेगळा पाहिजे. | |
| १४३ | १६ | भूवि | भुवि |
| १४४ | ५ | युयराजा | युवराजा |
| | १० | प्रक्र्र्थ्यते | प्रकथ्यते |
| | १४ | कार्यपूरुतः | कार्यपूरुषः |
| १९३ | २ | मिर्जा राजा | २६मिर्जा राजा. |
| १९८ | १५ | प्रभावल्लींतील | प्रभानवल्लींतील |
| २१२ | १८ | मालोजीस | मालोजी |
| २३४ | १६ | केली असें | केली असें ठरतें. |
| २३७ | २ | जामशाहीतर्फे | निजामशाहीतर्फे |
| २४४ | ५ | (महब्रतखानाचा मुलगा हे) शब्द गाळावे. | |
| २७८ | टीप | विचिधशान | विविधशान |
| २८८ | ३५ | वितंति | विनंति |
| प्रस्ता. १ | टीप | रूवन | वरून |
| १३ | ३३ | 'पुढें आढळत नाहीं' | शके १६७० च्या पुढें फारसा आढळत नाहीं. [खं. ८ पृ. २०५] |
| १५ | ६ | १५२२ | १५५२ |
| १६ | ८ | जेथें | तेथें |

# शिवनेरी येथील शिवजन्मोत्सवाचा वृत्तान्त.

**जेधे शकावली, शिवभारत** इत्यादि अस्सल पुराव्यावरून श्री शिवाजी महाराजांची जुनी जन्मतिथि अग्राह्य वाटूं लागली आणि नवा जन्मतिथीविषयीं अधिकाधिक खात्री पटूं लागली. या कारणांमुळें शके १८४६ च्या वैशाख महिन्यांत जुन्या पद्धतीप्रमाणें जन्मोत्सव चालू असतांना व्याख्याते **ज. स. करंदीकर** यांनीं अशी विनंति केली कीं, आतां जुन्या पद्धतीनें वैशाखांत उत्सव करणें हें ऐतिहासिक दृष्टीला अनुरूप होणार नाहीं; तेव्हां या पुढें **जेधे शकावली व शिवभारत** यास अनुसरून फाल्गुन कृ. ३ या तिथीलाच जन्मोत्सव करावा हें प्रशस्त होय. ही नवी तिथि ज्योतिषशास्त्र दृष्ट्याहि शिवाजीच्या चरित्रास जुळते. तेव्हां त्या बाजूनें हरकत येण्यासारखी नाहीं. अध्यक्ष **प्रो. पोतदार** यांनीं फोर्बस कलेक्शन वरूनहि हीच तिथि ग्राह्य ठरतें असें सांगितलें.

याच उत्सवाचा समारोप करतांना उत्सवाचे अध्यक्ष श्रीयुत **न. चिं. केळकर** यांनीं आपल्या भाषणांत असें उद्गार काढले कीं, "शिवरायाच्या जन्मतिथिसंबंधीं वाद निघाला आहे. तेव्हा त्याचा उहापोह जाहीरपणें इतिहास--संशोधकांनीं करून एक तिथि निश्चित ठरवावी."

या उत्सवानंतर थोड्यांच दिवसांनीं भारत–इतिहास–संशोधक मंडळाचें वार्षिक संमेलन झालें. त्या संमेलनांत ज. स. करंदीकर यांनीं शिवाजीमहाराजांच्या नव्या जन्मकुंडलीचा उहापोह केला आणि त्याच वेळीं भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाच्या एका मागील अंकांत शिवाजीची कुंडली कशी चुकीची मांडली गेली आहे तें दर्शविलें आणि शिवभारतांतला शिवजन्म काल दर्शक जो श्लोक तो छापतांना छपाईची चूक कशी झाली आहे तेहि नजरेस आणून खरा पाठ '**भूबाणप्राणचंद्राब्द**' असा असल्याचें श्रीयुत सदाशिवराव दिवेकर यांच्या जवळच्या प्रतीवरून दाखवून दिलें. या वेळीं किंवा त्यानंतर पांच सहा महिन्यांत कोणाहि इतिहास संशोधकानें जेधे शकावलीच्या अथवा शिवभारताच्या प्रामाण्याविषयीं आक्षेप घेतला नाहीं, नव्या तिथीविरुद्ध कोणताहि पुरावा पुढें मांडला नाहीं, किंवा जुन्या तिथीला पोषक असें कोणतेंहि नवें प्रमाण दर्शविलें नाहीं. अर्थातच नव्या तिथीविरुद्ध आक्षेपकांचे कांहीं आक्षेप आहेत असें मानण्याला कारणच उपस्थित झालें नाहीं.

अशा परिस्थितीत शके १८४६ च्या फाल्गुन महिन्यांतली शिवभारतानें दिलेली खरी जन्मतिथि समीप येत चाललेली पाहून शिवजन्माच्या उत्सवाच्या चालकांस यंदाचा पहिलाच नव्या जन्मतिथीचा उत्सव जुन्नरास खुद्द शिवनेरीवर मोठ्या प्रमाणावर करावा अशी साहजिकच स्फूर्ति झाली व या उत्सवाच्या कामीं पुणेंकरांचेंच नव्हे तर महाराष्ट्राचें सहाय्य मिळावें या हेतूनें पुढील विनंतिपत्र **केसरी** पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आलें.

## जाहीर विनंति

श्रीशिवाजीच्या जन्मतिथीच्या पूर्वपरंपरेस अनुसरून आजपर्यंत शिवाजीचा जन्मोत्सव वैशाख महिन्यांत होत होता. परंतु अलीकडे प्रसिद्ध झालेल्या जेधे-शकावली, शिवभारत इत्यादि अस्सल पुराव्यावरून शिवाजीचा जन्म शके १५५१ फाल्गुन कृ. ३ शुक्रवारीं रात्रीं झाल्याचें सिद्ध झालें आहे. यास्तव आतां यापुढें शिवरायाचा जन्मोत्सव त्या जन्मतिथीस करण्याचा संप्रदाय पाडणें हें ओघानेंच प्राप्त आहे. त्याप्रमाणें येत्या फाल्गुन कृ. ३ रोजीं शिवनेरीवर हा जन्मोत्सव प्रथम साजरा करण्याचा उपक्रम करावा असें कांहीं मंडळींनीं ठरविलें आहे व आमच्या मतें तें युक्त आहे. तरी महाराष्ट्रांत व इतरत्र जेथें कोठें शिवाजीचा जन्मोत्सव करण्यांत येत असेल तेथें त्यांनीं हि हा समारंभ चालू सालापासून फाल्गुन कृ. ३ स करावा अशी आमची त्यांस आग्रहपूर्वक विनंति आहे.

शिवनेरीस करण्यांत येणाऱ्या यंदाच्या उत्सवप्रसंगीं शिवकालीन अस्सल पत्रें व मालोजी, शहाजी व शिवाजी यांच्या संबंधाचे ऐतिहासिक चर्चेचे निबंध तेथें वाचण्यांत येतील. त्याकरितां, ज्या कोणास असला पत्रव्यवहार अगर निबंध पाठवावयाचा असेल यांनीं तो द. वि. आपटे, भा. इ. सं. मंडळ, पुणें, या पत्त्यावर ता. ५ मार्चचे आंत पाठविण्याची कृपा करावी. त्यांतून जेवढा निवडक भाग पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यासारखा निवड मंडळास वाटेल तेवढा शिवजन्मोत्सवाचा स्मारकग्रंथ म्हणून प्रसिद्ध करण्यांत येईल.

खं. चिं. मेहेंदळे; का. ना. साने; द. वा. पोतदार; न. चिं. केळकर; चिं. वि. वैद्य; ल. ब. भोपटकर; द. वि. आपटे; गं. ना. मुजूमदार व्यं. बा. केतकर; स. म. दिवेकर; श्री. व्यं. केतकर; य. रा. दाते; ना. रा. गुंजाळ; कृ. ना. कवडे; ग. स. मराठे; ज. स. करंदीकर; पां. के. शिराळकर; त्र्यं. ह. आवटे; दा. वि. गोखले; त्र्यं. भि. हर्डीकर; वा. मो. पोतदार; प. वि. महाजन.

हें जाहीर विनंतिपत्र म्हणजे शिवनेरीस उत्सवास येण्याविषयीं व निबंधपाठविण्याविषयीं निमंत्रण होतें आणि त्यांतच इतरत्रहि हा जन्मोत्सव या नव्या तिथीस ( फाल्गुन कृ० ३ ला ) करणें 'आमच्या मतें युक्त आहे' अशी शिफारस होती. विनंतिपत्राखालीं सह्या करणाऱ्यांना नवा पुरावा ग्राह्य वाटला, जुनी तिथी त्याज्य वाटली, म्हणून त्यांनीं आपलें स्वतःचें मत जाहीर केलें. ज्यांना तें मत पटलें होतें ते त्याप्रमाणें नवा पायंडा पाडतील, ज्यांना तें पटलें नसेल ते ही तिथि पाळणार नाहींत, हें उघड होतें. यांत कोणी कोणावर जुलूम करीत नव्हता. ज्याला जेधे शकावली प्रमाणभूत वाटली त्यानें जगांतील इतरांचीहि तशीच खात्री पटेपर्यंत वाट पाहात राहाणें अवश्यक होतें असें नाहीं. असें असून बडोद्याच्या कांहीं आक्षेपकांनीं आपल्या सहानें उलट विनंतिपत्र काढून हा उत्सव फाल्गुनांत करूं नये असें प्रसिद्ध केलें !

उत्सवाच्या चालकावर अगर त्यांच्या सहाय्यकावर या आक्षेपाचा कांहींच परिणाम झाला नाहीं. जुन्नरकरांनीं मोठ्या उत्साहानें उत्सवाची तयारी केली आणि पुण्याची व आसपासची बरीच मंडळी जुन्नरास व शिवनेरीस जाऊन तेथें त्यांनीं हा जन्मोत्सव यथासांग पार पाडला. जुन्नरच्या उत्सवाची हकीकत त्यावेळच्या ' **केसरी** ' पत्रांत जी प्रसिद्ध झाली ती वाचकांच्या माहिती करितां पुढें देत आहे.

## जुन्नर येथील उत्सव.

श्रीशिवाजी महाराजांचें जन्मस्थान जो **शिवनेरी किल्ला** त्यावर नवीन शोधाप्रमाणें होणारा यंदाचा पहिलाच उत्सव संघटित रीतीनें मोठ्या प्रमाणावर करावा अशी कल्पना निघून त्याप्रमाणें विनंतिपत्र प्रसिद्ध करण्यांत आलें. त्या विनंतीस मान देऊन जुन्नरच्या पुढारी मंडळींनीं हा उत्सव थाटानें साजरा करण्याची तयारी केली. आणि परस्थ मंडळींस निमंत्रण केलें. त्यास अनुसरून पुणें, तळेगांवदाभाडें वगैरे ठिकाणची ५०।६० पाहुणे मंडळी तेथें जमली होती.

शुक्रवारीं सायंकाळीं ६ वाजतां जुन्नरच्या नगरमंदिरांत तेथील प्रसिद्ध वकील **जोगळेकर** यांचे अध्यक्षतेखालीं उत्सवसमारंभास प्रारंभ झाला. भा. इ. सं. मंडळाचे चिटणीस **प्रो० द० वा० पोतदार** यांचें ' शिवकालीन समाज ' या विषयावर व्याख्यान झालें. ' स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो । बुद्धिनाशात् प्रणश्यति ' या गीता वचनाच्या आधारें सर्व महाराष्ट्रीयांना आपल्या पूर्वजांची स्मृति ठेवण्याविषयीं आणि जुने शिवकालीन कागदपत्र असतील ते शोधून काढून प्रसिद्ध करण्याविषयीं त्यांनीं विनंति केली.

**ज. स. करंदीकर** आपल्या भाषणांत म्हणाले, पाश्चात्य लोक क्षुल्लक गोष्टींचेंहि केवढें स्तोम माजवितात आणि आपल्या देशांतल्या साधारण पुरुषाचाहि केवढा गाजावाजा करतात तें पाहिलें म्हणजे शिवाजीमहाराजांविषयींच्या आमच्या अनास्थेनें सखेदाश्चर्य वाटतें. ऐतिहासिक काळांतल्या कोणत्याहि देशांतल्या वीर पुरुषाशीं तुलना केली असतां श्रीशिवाजीमहाराज हे सर्वांत श्रेष्ठ ठरतात. पाश्चात्यांच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास शिवाजीस ' वर्ल्डस रेकॉर्ड-ब्रेकर ' असें म्हणतां येईल.

शिवाजीमहाराज हे जसे राजकीय पुढारी होते तसेच ते धर्मशीलहि होते आणि ते ईश्वरी अवतार असल्यामुळेंच आपण त्यांची पुण्यतिथि न करतां जयन्ती साजरी केली पाहिजे, असें **त्रिंबकराव** आवटे यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें. अध्यक्षांनीं आपल्या समारोपांत उत्सवाची तिथि बदलण्याचा उतावळेपणा करूं नका असें सांगणाऱ्यांच्या बाजूचा नवा पुरावा पुढें येईपर्यंत जनतेनें आपला निकाल तहकूब ठेवणें योग्य नाहीं, असें सांगितलें. व्याख्यानानंतर तळेगांवच्या **नवीन समर्थ विद्यालयांतील** विद्या-

र्थ्यांनीं आणि गोपाळ गायन-समाजांतील विद्यार्थी व शिक्षक यांनीं शिवाजी व शहाजी यांचे पोवाडे म्हणून दाखविले. मध्यरात्रीं शिवनेरी किल्ल्यावर देवीच्या देवालयांत ह. भ. प. डॉ. पटवर्धन यांचे शिवजन्मावर कीर्तन झालें. जुन्नर गांवांतहि विठ्ठल मंदिरांत ह. भ. प. मुरुडकरबोवा यांचें शिवचरित्रावर सुंदर कीर्तन झालें.

शनिवारीं सकाळीं व सायंकाळीं जुन्नरच्या नगरमंदिरांत निबंध वाचन झालें. ज. स. करंदीकर व द. वि. आपटे यांनीं आपल्या निबंधांत दा. ना. आपटे-प्रभृति लेखकांच्या आक्षेपांस उत्तर दिलें. प्रो. यदुनाथसरकार, प्रो. सेन, नानासाहेब वैद्य वगैरेंचेहि निबंध वाचून दाखविण्यांत आले. कृ. वा. पुरंदरेप्रभृति संशोधकांनीं अलीकडे मिळविलेला पत्रव्यवहार करणकौस्तुभ ग्रंथ, अफजुलखानाचीं अस्सल पत्रें, संभाजीचें दानपत्र, शिवभारताच्या एका पानाचा फोटो, शेठ पुरुषोत्तम मावजी यांच्या संग्रहांतली शिवाजीची 'अप्रतिम तसबीर वगैरे ऐतिहासिक वस्तु दाखविण्यांत आल्या.

सायंकाळीं कुस्त्या होऊन बक्षिसें वाटण्यांत आलीं. शिवाजीच्या तसबिरीची मिरवणूक मोठ्या थाटानें काढण्यांत आली होती. रात्रीं विठ्ठलमंदिरांत डॉ. पटवर्धन यांचें बहारीचें कीर्तन झालें. आणि पुन: गोपाळ गायन-समाजाचे पोवाडे होऊन उत्सवाची समाप्ति झाली. या उत्सवाच्या कामीं जुन्नरचे पुढारी रघुनाथराव जोशी, मोहनराव खत्री, सहस्रबुद्धे, जोगळेकर, निगुडकर वगैरेंनीं अत्यंत परिश्रम घेतले हें त्यांस भूषणावह आहे.

जुन्नर व शिवनेरी याखेरीज पुढील ठिकाणीं हा उत्सव नव्या तिथीप्रमाणें साजरा करण्यांत आला. पुणें ( शिवाजी मंदिर ); भारत हायस्कूल पुणें, दादर, विलेपार्ले, वर्णा, सातारा, अलीबाग, नगर, माटुंगा, कुर्ला, मालाड, जमखंडी, कलकत्ता, दावणगिरी, सोलापूर, सासवने, कोळथरे, इंदापूर, ब्राह्मणपूर, मडगांव, बंगलोर, कल्याण, श्रीवर्धन, म्हापसें, यंकनमर्डी, नाशीक, नारगांव, अळकुटी, वाळवे, त्रिंबक, कुंडल, इंदूर, मिरज, नागपूर, कराची, म्हसवड, येवलें, खामगांव, रत्नागिरी, केळये इ. इ.

याप्रमाणें पहिल्याच वर्षी हा उत्सव तीस चाळीस ठिकाणीं साजरा करण्यांत आला. हा उत्सव झाल्यानंतर आक्षेपकांचें साधार व सविस्तर खंडन करण्यांत आलें व तें या पुस्तकांत समाविष्ट केलेंच आहे. तें वाचून पाहून आतां आक्षेप घेण्याला जागाच राहिली नाहीं अशी वाचकांची खात्री पटेल आणि यापुढें हा उत्सव नव्या साधार, प्रमाणभूत, विश्वसनीय आणि शिवकालीन अस्सल कागदपत्रावरून ठरलेल्या तिथीलाच पाळला जाईल अशी आशा आहे.

केसरी कचेरी
कार्तीक कृ० ३।१८४७ } ज० स० करंदीकर.